
दक्षिणभारत



# जैनधर्म




लेखक
वा. भु. पाटील
बी. ए. एल्. एल्. बी.



ढी/३१६
एक
२०७

ऐ/376

# दक्षिण-भारत, जैन व जैनधर्म

यांचा

# संक्षिप्त इतिहास.

लेखक

**बाबगौंडा भुजगौंडा पाटील,**

बी. ए., एलएल. बी.,

**जैनवीर** व **रायबाग-हुव्विनबागे** या पुस्तकांचे लेखक आणि
**प्रगति** आणि **जिनविजय** या साप्ताहिकाचे संपादक आणि
पब्लिक प्रॉसीक्युटर व सरकारी वकील सं. सांगली.

महावीर संवत् २४६४] **किंमत २ रुपये.** [इसवी सन १९३८

प्रकाशकः—

श्री. **बाबगौंडा भुजगौंडा पाटील,**
बी. ए., एलएल्. बी.,
वकील, सांगली.

मुद्रकः—

श्री. **अनंत विनायक पटवर्धन**, बी. ए.,
११५।१ भांबुर्डा पेठ,
आर्यभूषण छापखाना, पुणें नं. ४

## अर्थमंत्री ना. आण्णासाहेब लट्ठे यांची

# प्रस्तावना.

पुणें, ता. २२।६।३८

श्रीयुत पाटील यांचें "दक्षिण–भारत, जैन व जैनधर्म" हें पुस्तक बहुतेक सगळेंच मीं वाचून पाहिलें. आमच्या देशांतील निरनिराळ्या धर्मांच्या लोकांचा इतिहास संकलित रीतीनें लिहिण्यांत आलेला नाहीं. जैनधर्मीयांविषयीं ही उणीव या पुस्तकानें चांगली भरून निघेल यांत शंका नाहीं. राजकारण, वाङ्मय, तत्त्वज्ञान वगैरे विषयांत आपल्या धर्मानें कोणतें कार्य केलें आहे; संस्कृत, प्राकृत आणि कानडी वगैरे भाषांत त्या धर्माच्या अनुयायांनीं केवढे मोठे पराक्रम केले आहेत आणि कोणत्या कारणांमुळें खरोखर त्यांची अवनति झाली, याची या पुस्तकाच्या वाचनानें स्पष्ट कल्पना येते.

इतिहास हा समाजाच्या अभिमानाचा विषय समजला जातो. तो सारासार विचारानें मर्यादित झालेला असेल तर त्याचा फायदाहि फार आहे. जैनधर्म म्हणजे अहिंसावृत्तीच्या, किंबहुना नेभळ्या वैश्यांचा धर्म, ही कल्पना चुकीची आहे इतकी जरी या पुस्तकामुळें खात्री झाली तरी चांगलेंच. मात्र पूर्वीच्या जैन राजांच्या, मुत्सद्यांच्या आणि विद्वानांच्या पराक्रमाचा पोकळ अभिमान उराशीं बाळगून त्यांतच कृतार्थता मानण्याची चूक मात्र वाचकांनीं करूं नये.

वैदिक संस्कृतीच्या आचार्यांनीं वाढविलेलें स्नानसंध्यादिक क्रियाकांडाचें बंड आपल्या समाजांतहि माजविण्याची चूक केल्यामुळें जैनधर्माचा ऱ्हास कसा झाला, हें या पुस्तकांत दाखविलें आहे. हा धडा जैनधर्मीयांनीं गिरविला तर या पुस्तकापासून त्यांनीं उत्कृष्ट फायदा करून घेतला असें होईल.

**आ. बा. लट्ठे.**



बाबगौंडा भुजगौंडा पाटील,
बी. ए., एल्‌एल्. बी.

ॐ

# आत्मनिवेदन

**स्वजातिपूर्वजानाम् यो न विजानाति संभवम्।**
**स भवेत् पुंश्चलीपुत्रसदृशः पितृवेदकः ॥ १ ॥**

**भावार्थः**—ज्यांना आपल्या जातीच्या व धर्माच्या पूर्वजांचा इतिहास, त्यांची थोरवी इत्यादिकांचें ज्ञान नाहीं, त्यांची कवीनें वेश्यापुत्रांत गणना केली आहे कारण वेश्यापुत्राला आपल्या जन्मदात्या खऱ्या बापाचा पत्ताच नसतो.

आपल्या कुलाचा, धर्मांचा व देशाचा इतिहास समजून घेण्याची किती जरूरी आहे हें वरील संस्कृतवचनावरून स्पष्ट होत आहे. वरील वचनाप्रमाणेंच अनेक थोर व्यक्तींनीं आपले विचार प्रदर्शित केले आहेत. सारांश हा कीं, इतिहासाच्या ज्ञानावांचून कोणताहि धर्म, कोणताहि समाज, कोणतीहि जात अगर कोणतेंहि राष्ट्र जिवंत राहणें अगर त्यांना जिवंत ठेवूं पाहणें शक्य नाहीं. याच्या उलट असें म्हटलें जातें कीं, एखाद्या धर्माचा, समाजाचा अगर जातीचा नाशच करावयाचा असेल तर त्यांचा इतिहास प्रथम नष्ट केला पाहिजे. इतिहासाची कोण ही महती! ज्यांना आपल्या धर्मांचा व समाजाचा इतिहास ज्ञात नाहीं, त्यांना आपला धर्म, आपलें कुल व गोत्र हें सांगण्याचा अधिकार तो कोणता ! !

याचसाठीं साहित्यामध्यें इतिहासाला उच्चस्थान दिलें गेलें आहे. आपल्या जातीची, धर्मांची व राष्ट्रांची धार्मिक, नैतिक, सामाजिक व राजकीय स्थिति व प्रवृत्ति कशी होती, त्यांत कालमानानें बदल कसा व कां होत गेला हें समजण्यास इतिहास हेंच एक प्रमुख साधन आहे.

भारताचा खराखुरा प्राचीन इतिहास अद्याप तरी अंधेरांत पडून आहे. भारताचा खराखुरा, साग्र व संगतवार इतिहास प्रकाशांत यावा असें वाटत असल्यास प्रथम जैनधर्म, जैन संस्कृति, जैन वाङ्मय, जैन राजे व राजघराणीं, त्यांचें अतुल पराक्रमी सेनानी व दूरदर्शी मंत्री, जैनधर्मीय आचार्य व पंडित आणि जैनश्रेष्ठी यांचा आधुनिक पद्धतीनें संशोधनात्मक इतिहास लिहिणें जरूर आहे. अशा इतिहासाच्या अभावीं लिहिलेला भारताचा कोणताहि इतिहास अपुराच राहणार आहे. जैनांचें इतिहासविषयक भांडार अत्यंत समृद्ध आहे. त्याचा शोध व त्याचे

संशोधन करून इतिहास लिहिणें जरूर आहे; असें झाल्यास जगाचाच इतिहास विस्तारपूर्वक नव्यानें लिहिण्यास मदत होईल.

आमचें हें वरील विधान कित्येकांना अतिशयोक्तीचें व पंथाभिमानाचें वाटेल; परंतु दोन हजार वर्षांपूर्वीचा जगाचा व भारताचा इतिहास समजून घेऊन त्यानंतरच्या काळाचा इतिहास लिहिण्यास जैन इतिहासविषयक सामुग्रीचाच उपयोग करणें क्रमप्राप्त आहे.

जैनधर्म इतका प्राचीन आहे कीं, त्याच्या उत्पत्तीचा व विस्ताराचा इतिहास लिहूं लागलें कीं, जगांतील प्रमुख धर्मांचा इतिहास समजून घेण्यास खास मदत होणार आहे. जैनधर्माच्या अभ्यासाशिवाय लिहिलेला धर्मांचा इतिहास खास एकांगीं व अपुराच होणार आहे.

जैनाचार्य व पंडितांनीं लिहिलेला कथाविषयक संग्रह इतका विपुल आहे कीं, भारताचा प्राचनि इतिहास लिहितांना या कथाग्रंथांचा संशोधनात्मक व सांगोपांग अभ्यास होणें जरूरच आहे.

जैनधर्मांचा इतिहास लिहून जगापुढें आल्यास तो हिंदु कायद्याची उत्पत्ति व वाढ यांच्या अभ्यासकांना अत्यंत उपयुक्त होईल.

जैनवाङ्मयाचा अभ्यास झाल्यास भारताचा आजवर लिहिलेला इतिहास नव्यानेंच लिहावा लागेल.

वर वर्णन केलेली इतिहासाच्या ज्ञानाची महति पटल्यावर शक्य तितका आपला इतिहास समजून घ्यावा अशी जिज्ञासा व इतरांना संक्षेपानें कां होईना तो सांगावा अशी इच्छा उत्पन्न झाली; परंतु ही जिज्ञासा व ही इच्छा फलद्रूप व्हावी कशी ? हें सर्वच व सर्व प्रकारें आपल्या आवाक्याबाहेरचे आहे असें वाटूं लागलें.

## स्मृतिचित्र

अशा गोंधळलेल्या व भांबावलेल्या मनःस्थितींत असतां सुप्रसिद्ध इंग्रज कवी बनीअन् ( Banyan ) यानें आपल्या प्रथम लेखनाच्या वेळच्या रेखाटलेल्या मनःस्थितीचें स्मृतिचित्र डोळ्यापुढें राहिलें. बनीअन्च्या मनःस्थितीसारखीच प्रस्तुत लेखकांची मनःस्थिति झाली.

इंग्रज कवी बनीअन्नें आपल्या मनःस्थितीचें उद्बोधक वर्णन खालील शब्दांत केलें आहे. तो म्हणतो कीं:—

When at the first I took my pen in hand,
Thus far to write, I did not understand,
That I at all shall make to a little book,
In such a mode............

या स्मृतिचित्राबरोबरच आत्मनिवेदनाच्या सुरवातीस उद्धृत केलेल्या कविवचनांतील तुलनेच्या विधानाची बोंचणी अधिकच बोंचक वाटू लागली.

## कार्यपूर्ततेची तीव्र इच्छा

अंगिकृत कार्यपूर्ततेची तीव्र इच्छा संकटांना न जुमानितां व अडचणीच्या आहारीं न जातां आपल्या ध्येयाकडे नेण्यास समर्थ ठरते असें जें थोर व कर्तृत्ववान व्यक्तींनीं स्वानुभवानें नमूद करून ठेविले आहे त्या अनुभवानें व वचनानें प्रस्तुत लेखकास नितांत आशावादी बनवून कार्य प्रवृत्त केलें.

## शिवाय

प्रस्तुत लेखकानें लिहिलेल्या **जैनवीर** या पुस्तकाचें जैन व जैनेतरांकडून आदराचें स्वागत झाल्याचें पाहून प्रस्तुत लेखकाचा आशावाद अनाठायीं नव्हता व तसेंच थोर व कर्तृत्ववान व्यक्तींनीं नमूद केलेल्या अनुभवावर श्रद्धा व निष्ठा ठेवण्यांत चूक व फसगत झाली नाहीं असें वाटूं लागलें.

## स्वजाति, स्वधर्म व स्वदेश यांच्या इतिहासाच्या ज्ञानाची महति

आत्मनिवेदनाच्या सुरवातीस जें संस्कृत वचन उद्धृत केलें आहे त्याचा आधार न घेतां स्वजाति, स्वधर्म व स्वदेश यांच्या इतिहासाची महति प्रतिपादन करण्याचा प्रस्तुत लेखकानें प्रयत्न केला असतां तर अनेकांनीं प्रस्तुत लेखकाची वेड्यांतच गणना केली असती.!

जैनधर्म, जैनराज्यघराणीं, जैनवीर, जैनमुत्सद्दी, जैनाचार्य व जैनवाङ्मय इत्यादि इतिहासाच्या अंग व उपांगांसंबंधीं खरी व भरपूर सामुग्रीच नाहीं व यामुळें या सर्वांचा आपल्या धर्मीयांत अभावच आहे कीं काय ? अशीहि शंका डोकावीत असे. या शंकेचें निरसन करून घेण्याचा यथामति प्रयत्न केला. ऐतिहासिक अगर दुसरें कसलेंहि पुस्तक हातीं आलें कीं प्रथम त्यांत जैनधर्म व जैन याबद्दल उल्लेख आहे अगर कसें ? हें हावरेपणानें पहावें अशी मनाची वृत्तीच बनली. अशा पुस्तकांतून दिलेली माहिती कधीं त्रोटक वाटे, कधीं परस्पर विरोधी दिसे, तर कधीं

हेतुपुरःसरच जैनधर्म व जैन यासंबंधीं लबाडीचीं विधानें केलीं गेलीं आहेत असेंहि वाटे.

## असें कां व्हावें ?

अशी अपुरी, परस्परविरोधी व हेतुपुरःसर लबाडीची माहिती कां दिली जात असावी याचा विचार करीत असतां एखाद्या धर्मांचा व धर्मीयांचा नाश करून त्यांना नेस्तनाबूत करावयाचा असल्यास त्यांचा इतिहासच प्रथम नष्ट केला पाहिजे या विधानाची आठवण झाली. आपल्या विरोधी धर्मांचा व धर्मीयांचा अनन्वित छळ करून व त्यांना देशोधडीस लावून शत्रूंना आपलें ईप्सित कार्य पूर्ण साध्य झालें असें म्हणतां येत नाहीं. त्यांचा इतिहास नष्ट करण्यानें मात्र हें कार्य साध्य होतें. असा हा सैतानी व्यवहारधर्म उराशीं बाळगून प्राचीन व मध्ययुगीन काळीं इतर धर्मीयांचें जैनांशीं वर्तन झालें व आजच्या विश्वबंधुत्वाच्या ( ? ) व राष्ट्रैक्याच्या ( ? ) प्रतिपादनाच्या काळांतहि तीच परंपरा अखंड चालूं आहे कीं काय असेंहि वाटूं लागलें. कांहीं उदारधी अपवाद आढळले नसते तर ही परंपरा अखंड चालूंच ठेविली जात आहे असेंच ठाम मत आम्हीहि प्रतिपादन केलें असतें.

## हल्लीं इतिहास कसा लिहिला जातो ?

आपल्या इतिहासाच्या ज्ञानावांचून कोणताहि धर्म व देश, कोणतीहि जात व कोणतेंहि राष्ट्र जिवंत राहणें अगर त्यांना जिवंत ठेवणें म्हणजे माशाला पाण्याबाहेर ठेवून जिवंत ठेवण्यासारखेंच व्यर्थ व फोल आहे. हें जाणूनच जैनधर्म, जैनसमाज, जैनसंस्कृति, जैनराजघराणीं, जैन राजेरजवाडे, त्यांचे शूरवीर सेनानायक, त्यांचे जैनधर्मीय मंत्री, जैनाचार्य, जैनवाङ्मय, जैन शिल्पकला यांचा नामनिर्देश करण्याचें बुद्ध्या टाळण्यांत येतो. नामनिर्देश करण्याचा अनिवार्य प्रसंग इतर धर्मीय लेखकांवर आलाच तर त्यांना जैनधर्मीय झेंड्याखालून ओढून वैदिक अगर बौद्धधर्मीय झेंड्याखालीं उभे करण्याचा हटकून प्रयत्न होतो. नाइलाजानें जैनधर्मीय म्हणून त्यांचा उल्लेख करण्याचा प्रसंगच आला तर निंदायुक्त शब्दांनीं त्यांची संभावना होते. जैन इतिहास भारताच्या अभ्युदयाला पोषक नाहीं ? जैन हे भारतभूचे सुपुत्र नाहींत काय ? जैनधर्म व जैनसंस्कृति यांनीं भारतास ऋणी केले नाहीं ? जैन शिल्पकला भारतास भूषणभूत झाली नाहीं ? जैनवीरांचें चरित्र भारतीयांस बलवान् व स्वातंत्र्यप्रेमी करण्यास असमर्थ आहे काय ? जैन वाङ्मय टाकाऊच आहे ! हिंदुस्थानांतील जैनांचा इतिहास इतर कोणत्याहि धर्मीयांपेक्षां

हीन नाहीं हें उघड असतां तो विकृत स्वरूपांत दाखविला जातो; जणूं काय तो सम्यक् स्वरूपांत दिसल्यास भारतांवर सूर्यच उगवणार नाहीं ऽऽ प्रथम व मौर्य सम्राट् चंद्रगुप्त, महाराजा अशोक, राष्ट्रकूट राजा अमोघ वर्म, धर्मवीर राजा बिज्जल, कलिंग देश व कुरलादि ग्रंथ वगैरे वरील विधानांतील कांहीं ठळक उदाहरणें होत.

## जैन इतिहास कोणी लिहावा ?

इंग्रजांचा इतिहास इंग्रजांनीं, रोमचा इतिहास रोमन लोकांनीं, मराठ्यांचा इतिहास मराठ्यांनीं लिहावा असें जोरानें प्रतिपादिलें जातें, तद्वतच जैनांचा इतिहास जैनांनींच लिहिला पाहिजे असें प्रतिपादिल्यास तें न्यायाचें होणार नाहीं ? ग्रँड डफनें लिहिलेल्या मराठ्यांच्या इतिहासांत व १८५७ सालच्या बंडाचा इंग्लिशांनीं लिहिलेल्या इतिहासांत परकीय दृष्टि असल्यानें जेथें तेथें विपर्यास करून पराक्रमाच्या व विजयश्रीच्या माळा इंग्रजांच्या गळ्यांत बांधण्यांत आल्या; निंद्य व अमानुषीय कृत्यें आणि गैरमुत्सद्दीपणा यांचे शिक्कामोर्तब मराठ्यांच्या कपाळावर उठविण्यांत आलें; अशी अनेक हिंदी इतिहासकारांची सार्थ तक्रार आहे. हुबेहूब तशीच तक्रार जैनांची इतरां विरुद्ध आज तरी आहे. इतरांच्या दृष्टीकोनांत आमूलाग्र बदल होईपर्यंत तरी जैनांचा इतिहास जैनांनींच लिहिणें जरूर आहे. त्याशिवाय खरा जैन इतिहास उपलब्ध होणें शक्य नाहीं.

## भारताचा खराखुरा इतिहास शक्य केव्हां ?

जैन इतिहाससामुग्रीचा उपयोग न करितां अगर त्याचा उपयोग करितांना खऱ्या इतिहासकारांच्या अंगीं जे गुण असावे लागतात व त्यांना ज्या अनेक दोषांपासून अलिप्त रहावें लागतें, या सर्वांचें योग्य प्रमाणांत संमिश्रण झाल्याखेरीज भारताचा खराखुरा इतिहास लिहून झाला असें मानणें शक्य नाहीं. प्राचीन भारताचा खरा इतिहास लिहिण्याची बाब क्षणभर बाजूस ठेविली तरी मध्ययुगीन भारत व त्यानंतरचें विजयनगरचें हिंदुराज्य म्हणून मानिलें जाणारें राज्य यांचा इतिहास लिहितांनाहि जैन इतिहास विचारांत न घेतल्यानें व खऱ्या इतिहासलेखकांच्या अंगीं असणाऱ्या गुणापासून इतिहासलेखक दूर असल्यानें मध्ययुगीन भारताचा व विजयनगर साम्राज्याचा खराखुरा इतिहास अद्याप लिहून झालाच नाहीं असें प्रतिपादन केल्यास त्यांत अतिशयोक्तीचा दोष प्रस्तुत लेखकांवर मुळींच येणार नाहीं. कांहीं ठळक उदाहरणें दिल्यानेंहि प्रस्तुत विधानांची सत्यता पटण्यास मदत होईल. रा. ब. चिंतामणराव वैद्यांचा 'मध्ययुगीन भारत भाग २' स्व. वा. डॉ.

केतकरांचा 'ज्ञानकोश', विजयनगर राज्याचा इतिहास व मि. मोरास यांचा 'कदंबकुल', हीं पुस्तकें पाहिल्यास प्रस्तुत विधानांची सत्यता कळून येईल. अशीं दुसरीं अनेक उदाहरणें देतां येण्यासारखीं आहेत, परंतु विस्तारभयास्तव तीं दिलीं नाहींत.

मराठेशाही स्थापन होण्यास रामदासाची शिकवण कारणीभूत मानण्याचा जसा इतिहास लिहिला जात आहे, तद्वतच विजयनगर राज्य स्थापन करण्याचा मान सायन-माधवाच्या शिकवणुकीकडे देण्याची हिंदु इतिहासकारांची प्रवृत्ति दिसते. कदंब राज्यघराणें जैनधर्मीय असतां त्यास हिंदुधर्माच्या झेंड्याखालीं उभे करण्यांत येत आहे. कदंब राजांचे उपलब्ध शिलालेख, तीर्थंकरांना उद्देशून त्यांत बहुमान पुरःसर केलेला उल्लेख, जैन देवालयांना व जैनाचार्यांना दिलेल्या त्यांच्या देणग्या;. इत्यादिकांतून अंगचोर वाट काढण्यासाठीं म्हणून त्या राजांना जैनधर्मप्रेमी अगर परधर्म-सहिष्णु असें ठरविण्याचा व्यर्थ खटाटोप होत आहे. बुद्धपूर्वजग व बुद्धोत्तर-जग या ज्ञानकोशाच्या भागांत जैन, जैनधर्म व तीर्थंकर फार काय बुद्ध समकालीन भगवान् महावीर-वीरवर्धमान-यांच्या बद्दलचा अत्यंत त्रोटक व विपर्यस्त मजकूर वाचून खेद वाटल्यावांचून राहत नाहीं. मध्ययुगीन भारतांत इ. सनाच्या ११ व्या शतकाअखेरचा भारताचा इतिहास विचारांत घेतला आहे; तथापि त्यांतहि अशीच निराशा. जैनग्रंथ, जैन आख्यायिका, जैन शिलालेखादि इतिहासाचीं साधनें यांच्याकडे दुर्लक्ष्य केल्याचा व इतिहास लिहितांना हिंदूदृष्टि ठेविल्याचा, हे परिणाम आहेत. याशिवाय या बाबतींत दुसरी व्युत्पत्तीच बसत नाहीं. भारताचा खरा इतिहास लिहावयाचा झाल्यास जैनधर्म व जैनजगत् यांचा निर्विकारपणानें विचार करून व त्यांना योग्य स्थान देऊन लिहिलेला इतिहासच भारताचा खराखुरा इतिहास होऊं शकेल.

## विपर्यास

जैनधर्माची प्राचीनता व जैनधर्माची शिकवण, जैनधर्म अस्तिक व नास्तिक वगैरेबद्दल बरेंच विपर्यस्त लिखाण झालें व त्यानंतर अनेक प्राच्य व पाश्चात्य विद्वानांच्या परिश्रमामुळें हा विपर्यास दूर होण्यास मदत होऊन जैनधर्म हा बौद्धधर्माची शाखा नाहीं अगर हिंदुधर्मांतून जरूर ती साधनसामुग्री घेऊन बाहेर पडलेलें व सवता सुभा उभारणारें बंडखोर पोरहि नाहीं असें निर्विवादपणें ठरलें असतांहि अद्याप पूर्वीच्या विपर्यस्त मताचाच पुनरुच्चार करून धन्यता मानणारे महाभाग अद्याप थोडथोडके नाहींत.

जैनधर्मीय अहिंसावादानें भारत स्त्रैण बनून स्वातंत्र्यास मुकला अशी वेळीं अवेळीं टिका करून या विजयी तत्त्वाची प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष निंदा करणाऱ्यांना दिग्विजयी महाराजा खारवेल, सम्राट चंद्रगुप्त, वीरकेसरी चामुंडराय, सेनापति गंगराज, मंत्रीहुल्ल, महाराजा बिज्जल, राष्ट्रकूटादि शूरवीर राज्यघराणीं व त्यांचे अतुल पराक्रमी सेनानी व मंडलिक इत्यादीं शेंकडों नव्हे तर हजारों नरवीरांचें समारांगणावरील पराक्रमाचें ओझरतेंहि ज्ञान अशा टीकाकारांना नाहीं. दक्षिण भारतांतील मुसलमानांच्या आक्रमणास पायबंद घालण्यासाठीं स्थापन झालेल्या विजयनगर राज्याचें मुसलमानांशीं जे सामने झाले ते सामने लढविण्यांत जैनांचाच बहुभाग आहे. विजयनगर राज्यांतील प्रांताधिकारी व मुत्सद्दी म्हणूनहि अनेक अग्रणी जैन होते. विजयनगरराज्य स्थापन करण्यांत व त्याला उर्जितावस्थेंत आणण्यास अहिंसावादी जैनांची तरवार, बुद्धि व लेखणी मुख्यतः कारणीभूत आहेत. विजयनगरच्या वैभवकालींहि त्या राज्याचें मांडलिकत्व झुगारून देऊन आपल्या स्वातंत्र्याची यशस्वी द्वाही फिरविण्यास समर्थ झालेली एक अबला जैनधर्मीयच होती. कदंब व राष्ट्रकूट राज्यांत ऐन घडामोडीच्या काळांतहि प्रांताधिकाऱ्यांचा अधिकार यशस्वी रीतीनें चालविणाऱ्या जैनधर्मीय अबला होत्या. विजयनगर राज्याच्या नाशानंतर मुसलमानांचें अधिपत्य न स्विकारतां स्वतंत्र राजे म्हणून राज्य करणाऱ्यांमध्यें जैनधर्मीयांची संख्या कांहीं थोडथोडकी नाहीं.

भिमथडीची घोडी अटकेपार केल्याबद्दल मराठ्यांची व कृष्णा–वेण्णा नद्यांचें पाणी दिल्लीच्या बादशहाचें सैन्य प्यालें म्हणून मुसलमानांची पाठ थोपटणारे इतिहासकार अनेक आहेत; परंतु आपल्या कारकीर्दीच्या अवध्या १३ वर्षांच्या काळांत या दोन्ही अभिनंदनीय गोष्टी घडवून आणणाऱ्या सम्राट खारवेलाची आठवण इतिहासकारांना अद्याप होत नाहीं. सम्राट खारवेल हा इ. सनापूर्वी दुसऱ्या शतकांत होऊन गेला. मौर्य सम्राटनें भारताची पश्चिम सरहद्द बदलून टाकून आपल्या राज्याची सीमा काबूल–कंदाहार पलीकडे नेऊन भिडविली. राष्ट्रकूट व गंगराज्य या दोन घराण्यांनीं अनेक वेळां उत्तर हिंदुस्थानावर यशस्वी स्वाऱ्या केल्या. असा खरा इतिहास असतां हिंदुस्थानच्या पारतंत्र्याचें खापर जैनधर्मीय अहिंसावादाच्या पदरीं बांधण्यांत अक्षम्य चूक होत नाहीं?

लोककल्याणकारी उत्कृष्ट राज्यकारभार केल्यानंतर मुनी दीक्षा घेऊन आत्मकल्याण करणारे सम्राट चंद्रगुप्त व राष्ट्रकूट राजा अमोघवर्ष, सेनापति चामुंड-

राय यांसारखीं अनेक वीररत्नें जैनधर्मांत होऊन गेलीं. प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन काळांतील अनेक जैनराजादिकांना व सबंध राज्यघराण्यांना हिंदु अगर बौद्ध म्हणून इतिहासकारांनीं लेखिलें आहे. शुद्धिकरणाचा यापुढें जेव्हां भडक इतिहास लिहिला जाईल त्यावेळीं हे राजे व हीं राजघराणीं शुद्धिकृत होतीं असा इतिहास लिहिला न गेल्यासच नवल ?

जैनराज्यें व जैननरवीर हे हिंदु अगर जैनधर्मीय होते असें आग्रहानें प्रतिपादूनहि समाधान न पावणाऱ्यांनीं अनेक अमूल्य जैनग्रंथांचें कर्तृत्वहि स्वजातीचाकडे देण्याचा अखंड प्रयत्न चालविला आहे. एवढ्यानेंहि त्यांची महत्त्वाकांक्षा पुरी न झाल्यानेंच कीं कोण जाणें अनेक शिल्पकलायुक्त व भव्य मूळ जिनमंदिरें पण हल्लीं हिंदुधर्मीय मंदिरें यांचें कर्तृत्व व स्वामित्वहि आपल्याकडेच घेत आहेत.

अशा इतिहासकारापेक्षां शेजारच्या शेतकऱ्यांची जमीन अंशतः व हळूहळू साधून घेऊन आपल्या जमिनींत तिचा समावेश करणारा धूर्त शेतकरी अगर जमेच्या बाजूला जमाखर्चाच्या वहींत कुळाचें नांव व रक्कम न लिहितां ती नांवेच्या बाजूला लिंहिणारा निधड्या छातीचा सावकारहि बरा ! ! लबाड व धूर्त शेतकरी शेजाऱ्याची जमीन अंशतः लाटतो व निधड्या छातीचा सावकार कुळाचें खरेंखुरें नांव तरी लिहितो. परंतु बऱ्याच इतिहासकारांत हेंहि सौजन्य ( ? ) दिसत नाहीं. यासाठीं जैनांचा इतिहास जैनांनींच लिहिणें जरूर आहे.

## साधनसामुग्रीची विपुलता

जैनपुराणें, जैनवाङ्मय, जैनकथाकोश, जैनशिलालेख; जैनआख्यायिका, इतक्या भरपूर आहेत कीं, त्यांचा आधुनिक पद्धतीनें अभ्यास करून संगतवार इतिहास लिहिल्यास जैन व जैनधर्म यांचाच काय पण आखिल भारताचा नवा इतिहास लिहावा लागेल व तसा इतिहास लिहिण्यास ही साधनसामुग्री पुरेशी आहे असें तज्ज्ञांचें मत आहे. मूळच्या वैदिक धर्मांतील तत्त्वज्ञानांत व कर्मकांडांत व तदनंतरच्या हिंदुधर्म शास्त्रांत व हिंदुधर्मीयांच्या कर्मकांडांत आमूलाग्र बदल झाला आहे; जैनधर्मीयांची तशी स्थिति नाहीं. या परिस्थितीचा व इतर धर्मीय तत्त्वज्ञान व कर्मकांड यांचा तौलनिक अभ्यास करून इतिहास लिहिल्यास अखिल विश्वाचा सामाजिक व धार्मिक इतिहास लिहितां येईल असेंहि तज्ज्ञांचें मत आहे.

## जैन इतिहास कां लिहिला गेला नाहीं

विपुल साधनसामुग्री व अनुकूल परिस्थिति असतां सांप्रत जैन इतिहास आजवर लिहून कां झाला नाहीं असें कोणीहि विचारील ? त्यास समाधानकारक असें

उत्तरच देतां येणार नाहीं. सांपत्तिक अडचणीमुळें हें कार्य झालें नाहीं असेंहि म्हणतां येणार नाहीं. आपला इतिहास लिहिण्याइतकी बुद्धिमत्ता व पात्रता जैन समाजामध्यें नाहीं असेंहि नाहीं. आजवर बरेंच वाङ्मय प्रसिद्ध झालें आहे. परंतु वाङ्मय अगर साहित्यशास्त्रांत इतिहासाचें स्थान बरेंच उच्च आहे; यांची जाणीव नसल्यानें व इतिहासाचें खरेंखुरें महत्त्व न कळल्यानें आधुनिक पद्धतीनें जैन इतिहास लिहिला गेला नाहींत. जैन इतिहासाची ही उणीव थोडीशी भरून काढण्याचा प्रयत्न उत्तरप्रांतीय जैन विद्वानांनीं करून इतिहासाचें महत्त्व पटविण्यास तोंड पाडिलें आहे; परंतु मराठी भाषेंत या इतिहासाची रूपरेषा देण्याचा प्रयत्न अद्याप झालाच नाहीं असें म्हटल्यास तें खास चुकीचें होणार नाहीं.

## हें चित्र पहा

पेशवाईच्या काळांत उदयास आलेल्या व पेशवाई बरोबरच अस्तंगत झाल्यानें ज्यांना पुन्या शंभर वर्षांचाहि इतिहास नाहीं अशा घराण्यांचा इतिहास लिहिला जात असतां विसाव्या शतकांतील हरिदासाचीहि माहिती त्यांत नोंदिली गेलेली पाहण्यांत येते; मात्र जैनसमाज व जैनधर्म यांचा लिहिलेला इतिहास नसावा हें पाहून अत्यंत खेद वाटणें साहजिक आहे.

## याचा परिणाम

जमेल तसा इतिहास लिहावा असें मनानें घेतलें. निरनिराळ्या ग्यॅझेटर्समध्यें, इलाख्याच्या पुराणवस्तु—संशोधन—खात्यानें प्रसिद्ध केलेल्या रिपोर्टामध्यें, शिलालेखांच्या पुस्तकांमध्यें, धर्मांचा तौलनिक अभ्यास करून लिहिलेल्या पुस्तकांमध्यें व अशाच अनेक ठिकाणीं प्रांतवार व कालानुक्रमानें जरूर ती माहिती नमूद आहे असें कळून आलें परंतु संगतवार व एकत्रित माहिती मिळेना व इतस्त्र चोहोंकडे विखुरलेलीं पुष्पें गोळा करून ती एकत्रित करून त्यांचा सुमनोहर हार, माला अगर गुच्छ तयार करण्याचें काम आपल्या आंवाक्याबाहेर आहे असेंहि एकवार वाटूं लागलें. काय करावें कसें करावें हा मंत्र जपत असतां व घड्याळाच्या लंबकाप्रमाणें मन इकडून तिकडे व तिकडून इकडे मर्यादित जागेंत हेलखावें खात असतां या पुस्तकांतील विषयांची स्थूल मानानें कल्पना देणारी इंग्रजी व हिंदी कांहीं पुस्तकें मिळालीं व या लेखाचे सुरवातीस उद्भूत केलेले कवि बानिअनच्या लिखाणाचें व Where there is a will, there is a way या बोधपर सुभाषितांची आठवण झाली. तीं पुस्तकें व त्यांत उल्लेखित कांहीं ग्रंथ पाहून प्रस्तुतचें पुस्तक लिहिलें आहे. अशा आधारभूत ग्रंथांची यादी अन्यत्र दिली आहे.

अशा विषयाचा कोता अभ्यास व इतर अशाच अडचणीमुळें या पुस्तकांत अनेकांना अनेक दोषस्थळें दिसून येतील. डोळ्यापुढें उच्च ध्येय ठेवून तें सिद्धीस नेत असतां आलेल्या अपयशाबद्दल वाचक मला दोषी न ठरवितां क्षमाच करतील व माझ्या या प्रयत्नाकडे हंसक्षीर न्यायानेंच पाहतील अशी आशा व उमेद आहे. माझा हा प्रयत्न जैनसमाजास मान्य झाल्यास जैन राजघराणीं, जैनराजे, जैनधर्मीय शूरवीर सेनापति, राजकारणी व मुत्सद्दी मंत्री, वीरांगना, वीरकन्या, जैनाचार्य व जैनपंडित यांचा अधिक विस्तारपूर्वक इतिहास लिहिण्यास मला अगर इतरांना उत्तेजन मिळणार आहे.

निर्वाहाचा धंदा व इतर व्यवसाय सांभाळून सन १९३३ च्या मे महिन्याच्या सुट्टींत या पुस्तकाचा आराखडा तयार केला; परंतु त्यास अखेरचा सफाईचा हात लागण्यापूर्वींच अनेक स्नेही विद्वानांकडून कांहीं अमूल्य सूचना मिळाल्या. त्या दृष्टीनें विचार करीत असतां सुट्टी संपली व त्याबरोबरच हें काम मागें पडलें. १९३४ सालच्या उन्हाळ्याच्या सुट्टींत फिरून पूर्वींच्या हस्तलिखितांत स्नेह्यांच्या अमूल्य सूचनेनुसार बराच मजकूर घालून पूर्तता करण्याचा प्रयत्न केला; परंतु ही पूर्तता होण्यापूर्वींच **जैनवीर** या पुस्तकाची पूर्तता करावी लागल्यानें फिरून या पुस्तकाच्या अखेर पूर्ततेचें काम मागें पडलें व सन १९३७ च्या उन्हाळ्याची सुट्टी आली व त्या सुट्टींत पुरें झालेलें हें पुस्तक आपल्या हातीं देण्यास आनंद व अभिमान वाटत आहे.

ही पूर्तता करण्यांत व इतर हरएक प्रकारचें सहाय्य देण्यांत माझे मित्र श्री. बा. भि. पाटील, बी. ए., एलएल्. बी. वकील, सांगली, हल्लीं मॅजिस्ट्रेट सांगली संस्थान व श्री. केशवराव आपाजी चौगुले, बी. ए., एलएल्. बी., वकील, सांगली, यांनीं उपकृत करून ठेविलें आहे. त्यांच्या सहाय्याच्या अभावीं इतक्या लवकर या पुस्तकांची पूर्तता झाली नसती.

मुंबई इलाख्याचे अर्थसचिव गु. नामदार आण्णासाहेब लठ्ठे यांनीं आपल्या शिष्याच्या या लहानशा कृतीचें चीज करण्यासाठीं वेळांत वेळ काढून प्रस्तावना लिहून देण्यांत आपला बहुमोल वेळ खर्चिला याबद्दल मी त्यांचे कृतज्ञापूर्वक आभार मानितों.

आर्यभूषण छापखान्याच्या कार्यवाहकांनीं हें पुस्तक सर्वांगसुंदर करण्यांत कोणतीहि कसूर केली नाहीं, याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें.

शेवटीं या पुस्तकास प्रसिद्धी देण्यासाठीं ज्यांनीं आर्थिक सहाय्य केलें त्या सर्व लहान–थोर दात्यांचे आभार मानून हें आत्मनिवेदन पुरें करीत आहें.

श्रुत पंचमी<br>ता. ३।६।३८

**बा. भु. पाटील.**

# आधारभूत कांहीं पुस्तकांची यादी.


(i) **Studies in the South Indian Jainism**–by N. S. R. Ayyangar and B. S. Rao.

(ii) **Inscriptions of Shravan Belgole**–Mysore Government.

(iii) **Mysore Gazetteers.** 1930 edition.

(iv) **Lectures in the history of Vijaynagar Empire**–by Father Herras.

(v) **Forgotten Empire**–by Sewell.

(vi) **An empire never to be forgotten**—Surya Narayan Rao.

(vii) **The historical inscriptions of the South India**–by Robert Sewell.

(viii) **Rastrakutas and their Times**–by Dr. Altekar.

(ix) **The Kadambakul**–by G. M. Moraes.

(x) **Jain Jati Mahodaya-Vol. I (Hindi)**–by Muni Gagyansundarji.

(xi) **Studies in Tamil Literature and History**–by Dikshitar.

(xii) **Studies in the History of the third Dynasty of Vijaynagar**–by N. Venkata Ramanayya.

(xiii) **The Gang as of Talked**–by Krishnrao.

(xiv) **An Historical account of the Belgaum District**–by H. J. Stokes.

( १ ) **संक्षिप्त जैन इतिहास,** ( द्वितीय भाग ) बाबूकान्ता प्रसादजी जैन
( २ ) **प्राचीन जैनस्मारक;** मद्रास, म्हैसूर व मुंबईप्रांत ब्र. शीतलप्रसादजी
( ३ ) **भारतके प्राचीन राजवंश** ( राष्ट्रकूट ) विश्वेश्वरनाथ रेऊ
( ४ ) **जैन शिलालेख संग्रह**–माणिकचंद दिगंबर जैनमाला–प्रो.हिरालाल
( ५ ) **ज्ञानकोश–बुद्धपूर्व व बुद्धोत्तर जग**
( ६ ) **महावीर चरित्र**–अज्ञात
( ७ ) **प्राचीन महाराष्ट्र सातवाहन पर्व**
( ८ ) **भारतवर्षीय मध्ययुगीन चरित्रकोश**–स. वि. चित्राव
( ९ ) **ज्ञानेश्वरदर्शन** भाग १ ला
( १० ) **मध्ययुगीन भारत**–चिंतामणराव वैद्य
( ११ ) **राजपुतानेका जैनवीर**–श्री. गोअलीय
( १२ ) **मौर्य साम्राज्यके जैनवीर**–श्री. गोअलीय
( १३ ) **नीतिवाक्यामृतम्**–सोमदेवसूरि

याशिवाय बेळगांव व कोल्हापूरचे ग्याझेटिअर्स, डॉ. भांडारकरादिकांचे निबंध वगैरे पुस्तकांचा व टिप्पणांचा हें पुस्तक लिहितांना उपयोग केला आहे. याबद्दल या सर्व ग्रंथकारांचा मी अत्यंत आभारी आहे.

---

# विषयानुक्रमणिका.

# चित्र--परिचय.

( १ ) मुखपृष्ठः—आचार्य सिंहनंदी आपला शिष्य माधव ऊर्फ कोंगुनीवर्मा यांस ' लढाईंत पाठ दाखवूं नका, यांत अंतर पडल्यास कुलनाश होईल ' असा उपदेश करीत आहेत. ( पहा पान १०३ )

( २ ) पानः—४।५ भगवान् पार्श्वनाथ यांची कारवार जिल्ह्यांत मिळालेली सुंदर मूर्ति.

( ३ ) पानः—१२।१३ कलिंगाधिपति महामेघवाहन चक्रवर्ती महाराजा खारवेल यांची मगधावरील स्वारी.

( ४ ) पानः—१०४।१०५ वीर शिरोमणी समरकेसरी चामुंडराय.

( ५ ) पानः—१०६।१०७ समरकेसरी चामुंडरायांची चिरस्मरणिय कृति—श्री. बाहुबली—गोमटेश्वर यांची अद्वितीय प्रचंड मूर्ति.

यांपैकीं मुखपृष्ठावरील चित्र श्री. मोर्ची–आर्टिस्ट सांगली–यांनीं तयार करून दिलें.

चित्र नं. २ श्री. गुंडापा तवनपा औरवाडे रा. सांगली यांनीं कारवार जिल्ह्यांत मिळविलेल्या मूर्तीवरून.

चित्र नं. ३ व ४ आर्टिस्ट श्री. उपाध्ये पुष्पकुंज निपाणी यांनीं तयार केलेलें. वरील सद्गृहस्थांच्या या सहाय्याबद्दल आम्हीं अत्यंत आभारी आहोंत.

प्रकाशक.

ॐ

# दक्षिण महाराष्ट्र जैन सभा ग्रंथ-माला

## उद्देश

जैनधर्म, जैन संस्कृति व जैन इतिहास यांची जैनेतरांना ओळख व्हावी व जैनधर्मावरील त्यांचे आक्षेप व गैरसमज दूर होऊन जैनधर्माच्या श्रेष्ठत्वाची व उदारतेची त्यांना कल्पना यावी आणि जैनधर्मीयांना आपल्या पुण्यश्लोक पूर्वजांचें स्मरण करून देऊन कार्यप्रवृत्त करावें; यासाठीं:—

( १ ) ऐतिहासिक व धार्मिक विषयांवरील छोटीं पुस्तकें सुलभ मराठी भाषेंत प्रसिद्ध करणें.

( २ ) अशा पुस्तकांचा शक्य तितका अधिक प्रसार व्हावा व तीं सर्वांना विकत घेतां यावींत म्हणून तीं अत्यल्प किंमतीस विकणें.

( ३ ) अशीं पुस्तकें प्रसंगीं शाळा-कॉलेजांतील ग्रंथालयांना मोफत देऊन मतप्रचार करणें.

या मालेच्या ग्रंथप्रकाशनाला जैन धनिकांनीं उदार हस्तें मदत देऊन जैनधर्माच्या प्रभावनेचें श्रेय घ्यावें, अशी आग्रहाची विनंति आहे.

**पत्रव्यवहाराचा पत्ताः**—संपादक, द. म. जैनसभा ग्रंथ-माला,

पो. सांगली, S. M. C.

# दक्षिण–भारत, जैन व जैनधर्म.

## प्रकरण पहिलें

### जैनधर्माचा प्राचीन इतिहास



**दक्षिण–भारतांत** जैनधर्मांचा प्रारंभ केव्हां झाला व तो उदयास केव्हां आला; हा विषय दक्षिण हिंदुस्थानविषयक अभ्यासकांना अत्यंत चित्ताकर्षक व मनोवेधक आहे यांत शंका नाहीं. दक्षिण-भारताच्या राजकीय, धार्मिक, सामाजिक व वाङ्मय क्षेत्रांत जैनधर्म व जैनधर्मीय यांनीं अत्यंत महत्त्वाची क्रांति घडवून आणिली; हें मान्य असतांहि दक्षिण हिंदुस्थानांतील जैनधर्माच्या प्रारंभासंबंधीं व त्याच्या विस्तारासंबंधीं संगतवार इतिहास लिहिणें शक्य नाहीं असेंही एका काळीं वाटत होतें, परंतु अनेक पाश्चात्य व प्राच्य विद्वानांच्या कित्येक वर्षांच्या सतत व अविश्रांत प्रयत्नामुळें व नितांत चिकाटीच्या अध्ययनामुळें जैनधर्माविषयीं संगतवार इतिहास लिहिणें शक्य कोटींत येऊं पहात आहे. या पुस्तकांत जी माहिती दिली आहे ती पुरी आहे असें मुळींच नाहीं. रोजच्या रोज नवी नवी माहिती उपलब्ध होत आहे; व त्यामुळें पूर्वीं उपलब्ध झालेल्या माहितीवरून केलेलीं विधानें व काढलेलीं कांहीं अनुमानें चुकीचीं होतीं असेंही आढळून येतें. यापुढेंहि असें घडणें क्रमप्राप्त आहे.

या विषयावर प्रकाश पाडण्याचें श्रेय ज्या पाश्चात्य विद्वानांनीं जोडिलें, त्यांत मि. बर्नेल, बुल्हर, बर्गेस, होर्नले, जेकोबी, म्यॅकेंझी, कोलब्रुक् व विल्सन् यांचा प्रामुख्यानें उल्लेख करणें जरूर आहे. कोलब्रुक्, वेबर, बुल्हर व डॉ. भांडारकरादिसारख्या विख्यात विद्वानांनीं जे अनेक लहान मोठे लेख, निबंध व जीं टिप्पणें लिहिलीं त्यांचा प्रस्तुत विषयाशीं निगडित संबंध आहे. लुईस राईस साहेबांनीं

शिलालेखाच्या आधारें जैनधर्मासंबंधीं माहिती प्रसिद्ध करून या विषयाच्या अभ्यासकांना, जैनधर्म व जैन यांना निरंतर उपकृत करून ठेविलें आहे.

म्हैसूर दरबारच्या शिलालेखखात्यानें संग्रहित व प्रसिद्ध केलेली माहिती म्हणजे या विषयरूपी खाणींतील निवडक व वेंचक रत्नेंच होत. आजवर उपलब्ध झालेल्या नवीन माहितीमुळें वर निर्दिष्ट केलेल्या विद्वानांनीं त्या काळच्या साधनसामुग्रीवरून जीं मतें प्रस्थापित केलीं होतीं व जीं अनुमानें बांधिलीं तीं जशींच्या तशीं उपयोगांत आणतांना अत्यंत दक्षता घेणें जरूर आहे. वरील विद्वानांच्या लिखाणानंतर बरीच नवीन माहिती उपलब्ध झाल्यामुळें पूर्वीं जे अनेक प्रश्न संशयित राहिले होते ते प्रश्न हल्लीं संशयातीत व स्पष्ट झाले आहेत. युरोपियन विद्वानांच्या संशोधनकार्यांत येथील भाषेच्या ज्ञानाचा अभाव ही अत्यंत दुर्गम अडचण आड येणें स्वाभाविक आहे; याचेंहि विस्मरण न होऊं देण्याची खबरदारी घेणें जरूर आहे. तामिल, तेलगु, कानडी व संस्कृत या भाषेंतील वाङ्मयांतच या प्रांतांतील जैनधर्म व जैन यांचा इतिहास संकलित झाला असल्यानें जैनधर्मीयांच्या इतिहास-संशोधनकार्यांत तर संशोधकांना भाषाविषयक अडचण प्रामुख्यानें आड आली आहे व येत आहे.

## दक्षिण-भारतांत जैनधर्माचा प्रारंभ

दक्षिण हिंदुस्थानांतील जैनधर्माच्या प्रारंभाबद्दल हल्लीं बरीच माहिती उपलब्ध झाली आहे. तथापि या प्रारंभकालाबद्दलचा कांहीं विद्वानांचा संशय अद्याप संपूर्णपणें नष्ट झालेला नाहीं. कांहीं अपवाद वगळल्यास बाकीच्या पौर्वात्त्य विद्वानांच्या मतांचा कल जैनधर्म हा बौद्धधर्माची एक शाखा आहे असेंच मानण्याकडे झुकता होता. विख्यात विद्वान हरमन् जेकोबी यांनीं **आचारांगसूत्र** या ग्रंथाच्या आपल्या प्रस्तावनेंत **जैनधर्म** हा बौद्धधर्माची शाखा नसून तो अत्यंत प्राचीन व स्वतंत्र धर्म आहे असें प्रस्थापित करून या विरुद्ध प्रतिपादन केलेल्या विद्वानांचीं विधानें यशस्वी रीतीनें खोडून काढिलीं आहेत. जैनधर्म हा बौद्धधर्माची शाखा आहे, असें प्रतिपादन करणाऱ्यांमध्यें वेबर व लॅसेन हे प्रोफेसर द्वय प्रमुख आहेत. हरमन्, जेकोबी, बुल्हर व होर्नले हे तद्विरुद्ध मत प्रतिपादन करणाऱ्या विद्वानांत प्रमुख आहेत. जैनधर्माच्या, जैन राज्यघराण्याच्या व जैनाचार्यांनीं व पंडितांनीं लिहिलेल्या कित्येक ग्रंथांच्या उत्पत्तीविषयीं, राजघराण्याच्या धर्मासंबंधीं व ग्रंथांच्या कर्तृत्वाविषयीं आपणास अनुकूल तेवढेंच मत ग्राह्य मानणारे व त्याचाच पुनरुच्चार करणारे डॉ. केतकर,

रा. ब. वैद्य वगैरे सारखे अनेक ग्रंथकार आहेत. वाद्विषयक प्रश्नांसंबंधीं व वरील विद्वानांच्या मतासंबंधीं साग्र विचार या लेखांत करणें इष्ट व शक्य नाहीं. तसेंच ४०।५० वर्षांपूर्वीं प्रो. वेबर व लॅसेन वगैरेंनीं प्रतिपादन केलेलीं मतें साफ चुकीचीं आहेत, हें आतां सर्वसम्मतहि झालें आहे.

भगवान् श्रीमहावीर व महात्मा गौतमबुद्ध हे समकालीन होते; व या दोघांहि महान् विभूतींच्या चरित्रांत व त्यांच्या उपदेशांत कांहीं महत्त्वाच्या बाबतींत साम्य आढळून आल्यानें महात्मा बुद्धांच्या विचारांची छाया भगवान् महावीरांच्या विचारसरणीवर पडली असें मानलें गेलें. तेवीसावे तीर्थंकर श्री पार्श्वभगवान् ही ऐतिहासिक विभूति होऊन गेली अशी ग्वाही हल्लीं इतिहासज्ञ देत आहेत. एवढेंच नव्हे तर श्री पार्श्वनाथ भगवान् व अंतिम तीर्थंकर यांच्या निर्वाणकालांत फक्त १९८ वर्षांचें अंतर आहे असा कालनिर्णयही इतिहासज्ञांनीं दिला आहे. प्रो. वेबर प्रभृतींनीं आपलीं मतें प्रसिद्ध केलीं त्यावेळीं श्री पार्श्वभगवान् ही ऐतिहासिक विभूति होऊन गेली असें मानलें जात नव्हतें. त्यामुळें महात्मा बुद्धाच्या विचारसरणीवर दुसऱ्या कोणातरी विभूतीच्या विचारसरणीचा परिणाम घडला होता अगर नव्हता या दृष्टीनें विचार करण्यास साधनच नव्हतें. महात्मा बुद्धापूर्वीं सुमारें दोनशें वर्षें अगोदर भगवान् पार्श्व यांनीं केलेल्या धर्मजागृतीचा परिणाम महात्मा बुद्धांच्या विचारसरणीवर झाला होता असें मानणें चुकीचें होणार नाहीं. वैदिकधर्मीयांच्या वेदादि अनेक पूज्य व प्रमाणभूत मानल्या जाणाऱ्या ग्रंथांतून तीर्थंकरांच्या नांवाचा आदरपूर्वक स्पष्ट उल्लेख आढळून येतो. ही बाब प्रो. वेबर प्रभृतींच्या दृष्टीपुढें होती असें मानण्यास आधार नाहीं. हल्लीं प्रसिद्ध झालेली सर्वच माहिती त्यावेळीं उपलब्ध झाली असती तर प्रो. वेबरादिकांनीं जैनधर्म हा बौद्धधर्माची शाखा नसून तो अत्यंत प्राचीन व स्वतंत्र असा धर्म आहे हें मान्यहि केलें असतें. वर वर पहाणाऱ्यांना हे दोन्ही धर्म एकच दिसतात अगर या दोन्ही धर्मांत बरेंच साम्यतरी दिसतें; परंतु चिकित्सक अभ्यासकांना या दोन्ही धर्मांत मूलतः व तत्त्वतः फरक व भिन्नता दिसून येते. जैनधर्म हा बुद्धापूर्वींचा व बौद्धधर्मापूर्वींचा आहे याबद्दल व भगवान् महावीर, श्री पार्श्वप्रभु व श्री नेमिनाथ या ऐतिहासिक विभूति होऊन गेल्या, हें एक ना दोन नव्हे शेंकडों प्रमाणांनीं सिद्ध झालें आहे. मच्छिंद्रनाथ व गोरखनाथ यांच्या शिष्यांनीं जैनधर्माची स्थापना केली, जैनधर्म हा बौद्धधर्मांची शाखा आहे अगर वैदिक धर्मांतून जरूर ती सामुग्री घेऊन घराबाहेर पड-

लेलें हें बंडखोर पोर आहे; हें म्हणणें सर्वस्वी असत्य, अंधपरंपरायुक्त व द्वेषयुक्त आहे असें मि. राईस डेव्हिड यांनीं एन्सायक्लोपिडिया ब्रिटानिका व्हॉल्यूम २९ मध्यें अधिकारवाणीनें प्रतिपादिलें आहे.


मूळ विषयाकडे वळण्यापूर्वीं श्री नेमिनाथ भगवान्, पार्श्वभगवान् व वीरवर्धमान्–महावीर–तीर्थंकरांच्या विहाराबद्दल त्रोटक माहिती दिल्यास जैनधर्मांच्या प्राचीनतेची व दक्षिण-भारतांतील त्याच्या प्रारंभाची अंधुक तरी कल्पना येईल असें वाटल्यानें तसा प्रयत्न यापुढें केला आहे.

\+ + + +

## श्री भगवान् पार्श्वनाथ

श्री भगवान् पार्श्वनाथ स्वामींनीं काशी, कौशल, अंग, वंग, मगध, कलिंग, पांचाल, कोणादादि प्रांतांमधूनच विशेषतः विहार केला; व उपरिनिर्दिष्ट प्रांतांपैकीं अंग, वंग, मगध व कलिंग या प्रांतांमधील रहिवाश्यांना उपदेशामृत पाजवून त्यांना सम्यग्दृष्टि बनविलें. जैनधर्मांच्या अभ्युदयासाठीं त्यांनीं फारच मेहनत घेतल्याचें इतिहासावरून दिसून येत आहे. कलिंग देशांतील उदयगिरी पहाडाच्या **हाँथीपुर** नामक गुंफेमध्यें श्री पार्श्वनाथ चरितात्मक असा एक शिलालेख आजहि विद्यामान आहे. हा पहाड "**कुमारतीर्थ**" या नांवानें आजमितीसहि प्रसिद्ध आहे. श्री पार्श्वप्रभूंच्या शिष्यवृंदांनींहि त्याच प्रांतांत पुष्कळ वेळां विहार केल्याचें दिसून येतें.

श्री पार्श्वनाथांच्या निर्वाणानंतर, मायाजालाच्या तत्त्वानें पुनः आपलें डोकें वर काढण्याचा थोडा बहुत प्रयत्न केला. श्री पार्श्वनाथ स्वामींच्या परंपरेंतील मुनी पेटतर्षी यांचे शिष्य बुद्धकीर्ति यांनीं आपल्या नांवानें एक नवीनच मत प्रस्थापिलें. त्यानें आपल्या नवीन मतास "बुद्धधर्म" असें संबोधण्यास सुरवात केली. बुद्धकीर्तीनें अहिंसाधर्माचा दिव्य उपदेश करून लोकांना आपल्या मताच्या झेंड्याखालीं एकत्रित करण्यास प्रारंभ केला. त्याच्या चिकाटीच्या व निःस्वार्थी उपदेशाला कल्पनातीत यश येऊन थोडक्याच अवधींत अनेक जैन राजांनीं जैनधर्मांचा त्याग करून बुद्धधर्मांचा स्वीकार केला. बौद्धधर्मांच्या अभ्युदयाच्या याच क्षणास बाल ब्रह्मचारी आचार्य श्री. केशिश्रमण यांनीं बौद्धधर्मांचें आपल्या ओजस्वी भाषेनें सतर्क खंडण केलें. **श्रमण-**




चित्र नं. २

**केशीच्या** ह्या प्रयत्नानें विलक्षण क्रांति घडवून आणिली. त्याचा इष्ट व अत्यंत गोड परिणाम झाला. बौद्धधर्मानुयायी बनलेले जैन राजे लवकरच त्या धर्माचा त्याग करून " जुन्यालाच सोनें " मानून पुनः जैनधर्मानुयायी बनले. त्यांत चेटक, प्रसाजित, सिद्धार्थ, उदाई, सन्तानिक, चंद्रपाल व प्रदेशी आदि राजे यांचा समावेश होतो. अधिराजांच्या धर्मांतराबरोबरच त्यांच्या मांडलिक राजांनींही जैनधर्माचा अंगिकार केला. भगवान् पार्श्वनाथांच्या निर्वाणकालानंतर सुमारें २६० वर्षांनीं कलिंग देशांतील उदयगिरी पर्वतावरील हाँथीगुंफेंत भगवानांचें चरित्र शिलालेखांत दिलें आहे. तें विश्वासार्ह नाहीं असें कोण म्हणेल ? या शिलालेखासंबंधीं अधिक व साग्र माहिती पुढें दिली आहे. ( पहा पान ९ व १९ ).

भगवान् पार्श्वनाथांच्या निर्वाणानंतर थोड्याच दिवसांत लिहिलेल्या या इतिहासाचें महत्त्व विशेष आहे हें कोणीहि मान्य करील. भगवान् महावीरांच्या निर्वाणकालानंतर केवळ ६० च वर्षांनीं लिहिलेल्या या इतिहासाचें सर्वच दृष्टीनें वैशिष्ट्य आहे.

पुराणांतरीं दिलेला वृत्तांत क्षणभर बाजूस ठेवून केवळ या एका शिलालेखाच्या आधारेंच महात्मा बुद्धापूर्वी २०० वर्षें अगोदर भगवान् पार्श्वनाथ ही एक ऐतिहासिक विभूति होऊन गेली असें स्पष्ट होत आहे. जैनधर्म हा बौद्धधर्माची शाखा नव्हे हेंहि तितकेंच स्पष्ट होत आहे. अंतिम तीर्थंकर श्री वीरवर्धमान-महावीर हे जैनधर्माचे प्रस्थापक असें प्रतिपादन करणाऱ्यांनाहि निरुत्तर करण्यास हा एकच शिलालेख पुरेसा आहे.

## भगवान् श्री महावीर

केवलज्ञान प्राप्त झाल्यानंतर अखिल भारत-वर्षांत भगवान् महावीरांनीं समोवशरणासहित विहार केला. त्यांचें प्रथम शुभागमन मगध देशांतील राजगृहाजवळील विपुलाचल पर्वतावर झालें व तेथून त्यांचें श्रावस्तीकडे प्रयाण झालें; तेथून मिथिला, वैशाली, चंपा, बनारस, कलिंग, वंग, पांचाल, उत्तर मथुरा वगैरे देशांतून व प्रांतांतून भगवान् महावीरांनीं आपल्या तत्त्वज्ञानाचा प्रसार करण्यासाठीं विहार करीत करीत दक्षिणभारतामध्यें आले. त्यावेळीं कांचीपुरावर राजा वसुपाल राज्य करीत होता, व तो महावीरांचा भक्त होता ( आराधना–कथा–कोश भाग ३ ). हेमांग देशांत ( म्हैसूर ) भगवान् महावीरांचें जेव्हां आगमन झालें तेव्हां राजा सत्यंधराचा पुत्र जीवंधर हा तेथें राज्याधिकारी होता. हेमांग देश म्हणजे

आजकालचा म्हैसूर प्रांतवर्ती प्रदेश असें मानलें जातें. कारण जेथें सोन्याच्या खाणी आहेत, मलयपर्वतावरतीं वन आहे व जवळ समुद्र आहे, अशीं विशेषणें हेमांग देशाला लावलेलीं आहेत. राजपुर ही हेमांग देशाची राजधानी होती. जवळच "सुरमलय" नामक उद्यान होतें. महावीरांचें समोवशरण याच उद्यानांत उतरलें. महावीर तीर्थंकरांचें आपल्या राजधानींत आगमन झालेलें पाहून राजा जीवंधर यास परम हर्ष झाला. आपल्या पुत्रास राज्यपद देऊन तो मुनी होऊन वीरसंघांत सामील झाला. हा एक महाप्रतापी राजा होता. त्यानें दक्षिणेंतील पल्लवादि देशांतील राजेलोकांबरोबर व उत्तरेकडील राजेलोकांबरोबर युद्धें केलीं होतीं (उत्तरपुराण पृष्ठें ६५१–६९७). या राजाचा गौरवपर उल्लेख अनेक जैन ग्रंथकारांनीं आपल्या ग्रंथांतून केला आहे. दक्षिण-भारतांतून विहार करीत करीत उज्जैनी नजीकच्या पोदनपूर नामक राजधानीमध्यें भगवान् महावीर स्वामींचें समोवशरण गेलें. त्यावेळीं जैनधर्मभक्त राजा विद्रुराज तेथें राज्य करीत होता. तेथून पुढें रजपुताना, गुजराथ, पंजाब, काश्मीर वगैरे देशांमध्यें महावीर स्वामींनीं विहार केला. इ. स. पू. ४ थ्या शताब्दीमध्यें लंकेमध्येंहि जैनधर्माचा प्रसार झालेला होता. यावरून श्री भद्रबाहु स्वामींच्या दक्षिणेंतील आगमनापूर्वींहि दक्षिण-भारतामध्यें जैनधर्माचा प्रसार झालेला होता हें स्पष्ट होत आहे. भगवान् महावीरांचें समोवशरण दक्षिणेंतही विविध ठिकाणीं गेलें होतें असें जैन-इतिहास सांगत आहे, व आजहि दक्षिणेंतील कित्येक तीर्थक्षेत्रें याची ग्वाही देत आहेत. सातारा जिल्ह्यांतील कुंडल क्षेत्रावर महावीर स्वामींचें समोवशरण थोडा वेळ उतरलें होतें अशी एक परंपरागत आख्यायिका आहे असें मानिलें जातें.

खारवेल राजकालीन जैनशिलालेखावरून इ. स. पूर्वी कित्येक शतकें अगोदर जैनधर्माचा प्रसार दक्षिण हिंदुस्थानांत झाला होता असें हल्लीं मानण्यांत येऊं लागलें आहे. जैनेतर धर्मग्रंथांत अगर वाङ्मयांत जैनधर्माबद्दलचा उल्लेख मधल्या कांहीं काळांत मिळत नाहीं; यामुळेंच जैनधर्माच्या अस्तित्वाबद्दलच्या व प्रसाराबद्दलच्या कालनिर्णयाविषयीं विद्वानांमध्यें मतभेद दिसून येतात. जैनधर्मीयांच्या आपल्या धर्माबद्दलच्या आख्यायिका व या आख्यायिकांबद्दलची त्यांची नितांत श्रद्धा विचारांत घेतां जैनधर्म ही बौद्धधर्माची शाखा अगर हिंसाविरहित हिंदुधर्माची सुधारलेली आवृत्ति नसून हा एक स्वतंत्र व प्राचीन धर्म आहे असेंच मानणें भाग आहे.

## श्रीमहावीरांची शिष्यपरंपरा.

### अंतिम श्रुतकेवली श्री भद्रबाहु स्वामी.

भगवान् महावीरांच्या निर्वाणकालानंतर अहिंसाधर्माची व जैनधर्माची उज्ज्वल पताका ज्यांनीं आसेतु–हिमाचल फडकाविली त्यांपैकीं प्रस्तुत विषयाशीं ज्यांचा प्रामुख्यानें संबंध येतो त्यांच्या इतिहासाकडे व चरित्राकडे पहाणें क्रमप्राप्त व जरूर आहे. उत्तर हिंदुस्थानांतील जैनधर्माच्या प्रसाराविषयीं येथें विवेचन करण्याची जरूरी नाहीं. अंतिम तीर्थंकरांचे शिष्य व शेवटचे तीन केवली ( दिगंबर आम्नायाप्रमाणें ) सुधर्म, गौतम व जंबूस्वामी यांपैकीं केवलज्ञानी सुधर्म हे महावीरांच्या अगोदर व श्री गौतम गणधर हे महावीरानंतर होऊन गेले. विष्णुनंदी-मित्र, अपराजित, गोवर्धन, स्थूलभद्र व भद्रबाहु स्वामी असे सहा श्रुतकेवली होऊन गेले. यांपैकीं अंतिम श्रुतकेवली श्री भद्रबाहु स्वामी व त्यांचें दक्षिणेंतील आगमन यांचा प्रस्तुत विषयाशीं अत्यंत जिव्हाळ्याचा व निकटीचा संबंध असल्यानें त्यासंबंधींची माहिती पुढील प्रकरणांत विस्तारपूर्वक दिली आहे. तामिल व कानडी प्रांतांत जैनधर्माचा मोठ्या प्रमाणावर प्रसार करण्यास श्री भद्रबाहु स्वामीच कारणीभूत आहेत. मात्र श्री भद्रबाहूंच्या दक्षिणेंतील आगमनापूर्वीं दक्षिण हिंदुस्थानांत जैनधर्माचें नांवहि ज्ञात नव्हतें असें मानणें सर्वथा चुकीचें होईल, असें वर केलेल्या विवेचनावरून सिद्ध होतें. या आगमनापूर्वी सुमारें १०० वर्षें अगोदर म्हणजे अंतिम तीर्थंकारांच्या निर्वाणानंतर सुमारें ६२ वर्षांनीं मगध देशाचा जैन राजा नंद यानें कलिंग देशावर स्वारी करून तेथील आदिजिन वृषभनाथ यांची प्रतिमा हरण करून नेली असल्याचें खारवेल राजकालीन उदयगिरी येथील शिलालेखावरून स्पष्ट होतें. नंदराजानें कलिंग देशावर राज्य केलें व खारवेल हा नंदराजाचा वंशज होता असेंहि मानिलें जातें.

मगधाधीश नंद व मौर्य कुलोत्पन्न शिष्यवर चंद्रगुप्त यांच्यामध्यें राज्यविस्ताराबद्दल अहमहमिका चालली होती व त्यांत मौर्य घराणें यशस्वी झालें असें मानण्याकडे इतिहासज्ञांचा कल आहे. यावरून उत्तर हिंदुस्थानांत मौर्य व नंद हीं राज-

घराणीं समकालीन होतीं व कलिंग देश पादाक्रांत करून आपल्या राज्यक्षेत्राचा विस्तार करून तेथें नंदांनीं कदाचित् आपलें वास्तव्य कायमहि केलें असावें.

कलिंग देशाचा समावेश दक्षिण हिंदुस्थानांत केला जात असे. अंतिम तीर्थंकर व पार्श्वनाथ या दोघांहि तीर्थंकरांचा विहार या देशांत झाल्याचें व अंतिम तीर्थंकरांनीं 'हेमांग' म्हणजे हल्लींच्या म्हैसूर संस्थानांत विहार केल्याचाहि उल्लेख आहे. मगध, कलिंग, हेमांग वगैरे देशांतून सिलोनमध्येंहि जैनधर्मोपदेशक आल्याचा उल्लेख सिलोनच्या इतिहासावरून मिळतो. यावरून श्री भद्रबाहूंच्या दक्षिणेंतील आगमनापूर्वीं दक्षिण-हिंदुस्थानांत जैनधर्माचा प्रसार खास झाला होता; व या आगमनानंतर जैनधर्माचा अनेक पटींनें विस्तार झाला.

भगवान् नेमिनाथ तीर्थंकर ही ऐतिहासिक विभूति होऊन गेली असें मानण्याकडे विद्वानांचा कल होऊं लागला आहे. श्री नेमिनाथ तीर्थंकरांच्या निर्वाणकालाबद्दल मात्र जैनधर्मीय व इतर यांच्यामध्यें महदंतर असल्यानें त्या बाबतींत मतभेद राहील असें वाटतें. यापुढें याच प्रकरणांत भगवान् नेमिनाथ यांचा कालनिर्णय करितांना भगवान् नेमिनाथ यांच्या निर्वाणकालास हल्लीं सुमारें ३५०० वर्षें होऊन गेलीं असें प्रतिपादिलें आहे. भगवान् नेमिनाथ व भगवान् पार्श्व यांच्या निर्वाणकालांत सुमारें ८५० वर्षांचें अंतर आहे असें दिसून येईल. श्री पार्श्वनाथ प्रभु व अंतिम तीर्थंकर वीरवर्धमान या ऐतिहासिक विभूती होऊन गेल्या याबद्दल मतभेद नाहीं. श्री पार्श्वप्रभु सुमारें २६५० वर्षांपूर्वीं मोक्षगामी झाले. त्यानंतर १९८ वर्षांनीं श्री महावीर स्वामी मोक्षास गेले. सुमारें २३४२ वर्षांपूर्वीं श्री भद्रबाहु स्वामींचें दक्षिणेंत आगमन झालें. मौर्य कुलोत्पन्न राजा चंद्रगुप्त व मौर्यवंश जैनधर्मी होता. महाराजा खारवेल याच्या जन्मापूर्वीं नंदवंशीय राजे जैनधर्मीय होते. २२०० वर्षांपूर्वीं नंदराजा होऊन गेला. राजा खारवेलाचा जन्म इ. स. पूर्व १६७ व्या वर्षीं होऊन इ. स. पूर्व १३० व्या वर्षीं म्हणजे सुमारें २१०० ( २१०५ ) वर्षांपूर्वीं त्यांचें देहावसान झालें. श्री नेमिनाथ प्रभूपासून खारवेल कालापर्यंतच्या दरम्यानच्या सुमारें १४०० वर्षांच्या कालांत जैन व जैनधर्म आस्तित्वांत होता हें ऐतिहासिक दृष्ट्या मान्य झालें आहे. यावरून जैनधर्माच्या प्राचीनतेची कल्पना येईल अशी उमेद आहे.

# कलिंगाधिपति महामेघवाहन चक्रवर्ती महाराजा खारवेल यांचा प्राचीन शिलालेख.

महाराजा खारवेल यांच्या शिलालेखाचें महत्त्व जगमान्य झालें असल्यानें तो भाषांतरासहित यापुढें साग्र दिला आहे.

### ( पंक्ती १ ली. )

नमो अरिहंतानं [ । ] नमो सवसिधानं [ । ] ऐरेन महाराजेन माहामेघ वाहनेन चेतिराज वसवधनेन पसथसुभ लखनेन चतुरंत लुठितगुनोपहितेन कलिंगाधिपतिना सिरि खारवेलेन.

### ( पंक्ती २ री. )

पंदरसवसानि सिंरिकडार—सरीखता कीडिता कुमार कीडिका [ । ] ततो लेख-रूपगणना––वनहार–विधि–विसारदेन सवविजावदातेन नववसानि योवरजं पसासितं [ । ] संपुण–चतु–वीसाति–वसो तदानि वधमान–सेसयो वेनाभि विजयो ततिये

### ( पंक्ती ३ री )

कलिंगराजवंस–पुरिसयुगे माहारजाभिसेचनं पापुनाति [ । ] अभिसितमतो च पधमे वसे वात–विहत–गोपुर–पाकार–निवेसनं पटि संकारयाति [ । ] कलिंगनगरीं [ । ] खबीर–इसि–ताल–तडाग–पाडि यो च बंधापयाति [ । ] सवुयान–पटिसंठपनं च.

### ( पंक्ती ४ थी )

कारयति [ ॥ ] पनतीसाहि सतसहसेहि पकतियो च रंजयति [ । ] दुतिये च वसे अचितयिता सातकंणि पछिमदिसं हय–गज–नर–रध–बहुलं दंडं पठापयाति [ । ] कन्हवेंनांगताय च सेनाय वितासितं मुसिकनगरं [ । ] ततिय पुन वसे.

### ( पंक्ती ५ वी. )

गंधव–वेदबुधो दंप–नत–गीतवादित संदसनाहि उसव–समाज कारापनादिच कीडापयति नगीरं [।] तथा चवुथे वसे विजाधराधिवासं अहत–पुवं कालिंग पुवराज-निवेसितं·········वितध–मुकुटसबल माढितेच निखित–छत.

**( पंक्ती ६ वी )**

भिंगारे हित-रतन-सापतेये सवरठिक भोजके पादे वंदापयति [।] पंचमेच दानी वसे नंदराज-तिं-वस-सत-ओघाटितं तनसुलिय-वाटापनाडिं नगरं पवेस [य] ति [।] सो·········भिसतो च राजसुय [०] संदश-यंतो सव-कर-वणं. ६

**( पंक्ती ७ वी )**

अनुगह-अनेकानि सतसहस्रानि विसजाति पोरं जानपदं [।] सतमं च वसं पसासतो वजि-रघरव [ ॰ ] ति-घुसित-घरिनीस [-मतुकपद]-पुंना [ति ? कुमार] ·········[।] अठमे च वसे महता+सेना··············गोरधगिरिं.

**( पंक्ती ८ वी )**

घातापयिता राजगहं उपपीडा पयति [।] एतिनं च कंमापदानसंनादेन संवितसेन-वाहनो विपमुंचितु मधुरं अपयातो यवनराज डिमित···········[मो ?] यछति [वि]······पलव···········

**( पंक्ती ९ वी )**

कपरूखे हय-गज-रथ-सहयंते सवघरा-वास-परिवसने सअगिणठिया [।] सव-गहनं च कारयितुं बम्हणानं जातिं परिहारं ददाति [।] अरहतो··············व ···········न·········गियं

**( पंक्ती १० वी )**

······[क] ं मान [ति]* रा [ज]-संनिवासं महाविजयं पासादं कारयति अठतिसाय सतसहसेहि [।] दसमे च वसे दंड-संधी-साम-मयो भरधवस-पठानं महि-जयनं···············ति कारापयति··············[निरितय] उयातानं च मनिरतना [नि] उपलभते [।]

**( पंक्ती ११ वी. )**

...मंडंच अवराज निवेसितं पीथुडगदभ-नंगलेन कासयाति [ ं ] जनसदंभावनं च तेरस-वससतिक [ ' ] -तु भिदाति तमरदेह-संघातं [ । ] वारसमेच वसे... हस...के. ज. सवसेहि वितासयति उतरापथ-राजानो...

## ( पंक्ती १२ वी. )

मगधानं च विपुलं भयं जनेतो हथी सुगंगीय [ · ] पाययति [ । ] मागधं च राजानं वहसतिमितं पादे वंदापयति [ । ] नंदराज-नीतं च कलिंग-जिनं संनिवेसं...गह-रतनान पडिहारेहि अंगमागध-वसुंच नेयाति [ । ]

## ( पंक्ती १३ वी )

...तु [ ' ] जठर-लिखिलबरानि सिहरानि नविसयति सत-वेसिकनं परिहारेन [ । ] अभुत मछरियं च हथि-नावन परीपुरं सव-देन हय-हथी रतना [ मा ] निकं पंडराजा चेदानि अनेकानि मुतमणिरतनानि अहरापयति इधसतो.

## ( पंक्ती १४ वी )

...सिनो वसी करोति [ । ] तेरसमे च वसे सुपवत-विजयचक कुमारी पवते अरिहते [ य ? ]* प-खीण-संसितेहि कायनिसी-दीयाय याप-ञावकेहि राज-भितिनि चिनवतानि वसासितानि [ । ] पूजाय रत-उवास-खारवेल-सिरिना जीवदेह-सिरिका परिखिता [ । ].

## ( पंक्ती १५ वी. )

... [ सु ] कतिसमणसुवि हितानं ( नुं-? ) च सत-दिसानं [ नुं-? ] ञानिनं तपासि-इसिनं संघियनं [ नुं-? ] [ ; ] अरहत-निसीदिया समीपे पभारे वराकर-समुथपिताहि अनेक योजनाहिताहि प. सि. ओ.... सिलाहि सिंहपथ-रानिसि-[ · ] धुडाय निसयानि.

## ( पंक्ती १६ वी. )

घंटालको×चतरेच वेडूरियगभे थंभे पतिठापयति [ , ] पान-तरिया सत सहसेहि [ । ] मुरिय-काल वोछिनं च चोयठिअंग- सातिकं तुरियं उपादयति [ । ] खेमराजा स वढराजा स भिकुराजा धमराजा पसंतो सुनंतो अनुभवंतो कलाणानि

## ( पंक्ती १७ वी. )

गुण-विसेस-कुसलो सव-पांस-डपुजको सव-देवायतन संकार कारको [ अ ] पतिहत चकिवाहि-निबलो चकधुरो गुतचको पवत-चको राजसि-वस कुलविनिश्रितो महा-विजयो राजा खारवेल-सिरि.

# कलिंगाधिपति महामेघवाहन चक्रवर्ती महाराजा खारवेल यांच्या प्राचीन शिलालेखाचें भाषांतर.

अरिहंतास नमस्कार. सर्व सिद्धांस नमस्कार. सर्व शुभ गुणांनीं युक्त व चारी दिशेला ज्याचे गुण पसरले आहेत असा चेदिराज वंशवर्धक ऐल महाराजा महामेघवाहन कलिंगाधिपति श्री खारवेल यानें आपल्या आयुष्यांतील पहिलीं १५ वर्षें बाललीलेंत घालविलीं. सर्व विद्येमध्यें निष्णात होऊन ९ वर्षें युवराजपद भोगिलें. त्याचें वय २४ वर्षांचें झाल्यावर तिसऱ्या कलिंग राजवंशामध्यें महाराज्याभिषेक झाला. राज्याभिषेक झाल्यावर पहिल्याच वर्षी त्यानें वाऱ्यानें वाताहत झालेल्या राजधानीची व इतर शहरांची तटबंदी दुरुस्त केली. कलिंग देशांत तळीं, तलाव व विहिरी बांधविल्या. सर्व बागबगीच्यांचें पुनरुज्जीवन केलें व आपल्या ३५ लाख प्रजेचें रंजन केलें.

दुसऱ्या वर्षी शातकर्णी राजावर हत्ती, घोडे, पायदळ व रथांनीं युक्त अशी मोठी चतुरंग सेना पाठविली. या सैन्यानें **कृष्णा, वेण्णा** नदीपर्यंत जाऊन मूषिक नगर उध्वस्त केलें.

तिसऱ्या वर्षी गंधर्वविद्येंत कुशल अशा या राजानें नृत्य, गायन व वादन वगैरे अनेक प्रकारांनीं उत्सव साजरे करून सर्व नागरिकांस आनंदित केलें.

चौथ्या वर्षी सर्व **राष्ट्रीक** व **भोजक** राजांना आपापलीं छत्रचामरें यांचा त्याग करावयास लावून मौल्यवान् रत्नांचे नजराणे घेऊन शरण आणिलें.

पांचव्या वर्षी नंदराजानें १०३ वर्षांपूर्वी बांधविलेल्या ' तनसुलीय ' तलावाचें पाणी राजधानींत आणविलें. सहाव्या वर्षी राजसूय यज्ञ केला; व प्रजेस सर्व सारा माफ करून प्रजेवर दुसरेहि अनेक उपकार केले. सातव्या वर्षी त्यास पुत्रजन्माचा लाभ झाला. आठव्या वर्षी मोठें सैन्य पाठवून गोरथगिरीचा नाश करून राजगृह शहरास वेढा दिला. सैन्याच्या या पराक्रमामुळें भयभीत होऊन यवनराजा डिमीत ( Dematrious ) यानें ससैन्य व सपरिवार देश व राज्य यांचा त्याग केला. नवव्या वर्षी घोडे, हत्ती, रथ व सारथी यांनीं युक्त असा सोन्याचा कल्पवृक्ष तो ब्राह्मणांना दान देता झाला; व अडतीस लाख रुपये खर्चून महाविजय नांवाचा नवा राजवाडा बांधविला. दहाव्या वर्षी साम, दाम, दंड यांनीं युक्त असा दिग्विजय




चित्र नं. ३

सुरू केला; व ज्यांच्यावर चढाई केली त्यांच्यापासून मणि व रत्नें नजराणा म्हणून मिळविलीं.

बाराव्या वर्षी उत्तरापथच्या राजांना भंडावून सोडिलें, व मगध देशांतील लोकांच्या मनांत भीति उत्पन्न करून आपल्या सैन्यांतील हत्ती सुगंगपर्यंत नेऊन भिडविले. मगध देशचा राजा **बृहस्पति मित्र** याला लोटांगण घालण्यास भाग पाडलें. नंदराजानें नेलेली **कलिंग देशची जिनमूर्ति** व इतर उत्तमोत्तम रत्नें वगैरे व अंग व मगध देशाची संपत्ति आपल्या देशांत आणिली. आंतल्या बाजूस खोदीव काम केलेलें आहे अशीं सुंदर शिखरें बांधविलीं; व त्यांप्रीत्यर्थ शंभर कारागिरांना हत्तींनीं भरलेलीं जहाजें बक्षीस दिलीं. याच वेळीं **पांड्य राज्यांतील** हत्ती, रत्नें, माणिक वगैरे संपत्ति लुटून आणविली व सर्वांना आपलें अंकित केलें.

तेराव्या वर्षी जन्मजरामरण यांचा फेरा चुकविण्यास समर्थ झालेल्या व सन्मार्गदर्शक मुनिजनासाठीं जैनधर्माचें विजयीचक्र असलेल्या कुमारी पर्वतावर राजाज्ञा लिहविल्या.

पूजेमध्यें रत अशा उपासक खारवेलनें जीव व शरीर यांची परीक्षा केली. सर्व देशच्या पुण्यवान् मुनिजनांकरितां अरिहंताच्या निशीदीजवळील डोंगरावर उत्तम वैडूर्य रत्नमण्यांनीं युक्त असे चार स्तंभ ७५ लक्ष रु. खर्च करून उभारिले. मौर्य कालीं नाश पावलेल्या व ( ६४ वर्णांनीं युक्त ) सात अंगांचा व दुसऱ्या चार अंगांचा पुनरुद्धार केला. हा राजा खारवेल, क्षेमराज, वृद्धराज, भिक्षुराज, धर्मराज आहे. हा कल्याण पाहतो व अनुभवितो. हा **सर्व पंथांचा आदर करणारा,** सर्व मंदिरांचा जीर्णोद्धार करणारा, अप्रतिहत रथ व सेनेचा धारक, राज्यचक्राचा नेता, सर्वांचा रक्षणकर्ता व राजर्षि वंशांत उत्पन्न झालेला आहे.

## संशोधन-इतिहास

ह्या खारवेल शिलालेख-संशोधनाचा इतिहासहि फार मनोरंजक आहे. हा शिलालेख इ. स. १८२० मध्यें स्टर्लिंग नांवच्या मिशनरी साहेबांनीं प्रथम पाहिला; व अर्थ न समजल्यामुळें निरनिराळ्या इंग्रजी वृत्तपत्रांमध्यें त्याची चर्चा सुरू जाहली. अनेक इतिहास-संशोधकांत यासंबंधीं परस्परपत्रव्यवहार सुरू झाला. निरनिराळ्या

विद्वान् संशोधकांची एक सभा बोलाविली गेली व या शिलालेखाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न झाला; पण तो निष्फळ ठरला. यांत डॉ. टॉमस, मेजर किट्ट, जनरल कॅनिंग-हॅम, प्रसिद्ध इतिहासज्ञ विन्सेन्ट, डॉ. स्मिथ आदींनीं प्रामुख्यानें भाग घेतला होता. याविषयीं पुढें भारत सरकारचेही प्रयत्न चालू झाले. भारतीय संशोधक जायस्वाल, राखलदास बानर्जी, भगवानदास इन्द्रजी व केशवलाल हर्षदराय ध्रुव यांचेहि प्रयत्न १९१७ पर्यंत चालू होते. एका शतकानंतर हा शिलालेख कलिंगाधिपति महामेघ-वाहन चक्रवर्ती जैन सम्राट महाराजा खारवेल याचा आहे असें निश्चित झालें.

हा शिलालेख जैनधर्मावरच प्रकाश पाडणारा आहे असेंच नसून भारतवर्षाच्या प्राचीन इतिहासाच्या ज्ञानांत क्रांति घडवून आणणारा असल्यामुळें याचें फार महत्त्व मानिलें जात आहे.

महाराजा खारवेल याचा जन्म इ. स. पूर्व १६७ व्या वर्षी झाला व फक्त वयाच्या ३७ वर्षांत १३ वर्षें राज्यपद भोगून इ. स. पूर्व १३० सावे वर्षी त्यांनीं इहलोकींची यात्रा संपविली. सदरचा शिलालेख १५×५ फूट असून त्यांत १७ ओळी आहेत. पुराणवस्तुसंशोधन खात्यांतील पंडित सुखलालजी यांना या शिलालेखाचा साग्र अर्थ लावण्याचें श्रेय मिळालें. सुमारें दोन हजार वर्षांपूर्वी हा शिलालेख लिहिण्यांत आला असावा असें तज्ज्ञांचें निश्चित मत आहे. वरील हकीकतीवरून या १७ ओळी शिलालेखाचा अर्थ लावण्यास निरनिराळ्या विद्वानांना शंभर वर्षांचा काल घालवावा लागून पुष्कळ पैसाहि खर्चिला गेला; परंतु या १७ ओळींतील माहितीपुढें याची मुळींच किंमत नाहीं.

महाराजा खारवेल कालीन मूळ शिलालेख व त्या शिलालेखाचें मराठींत भाषांतर दिलें आहे; परंतु तेवढ्यानेंच महाराजा खारवेल यांच्या चरित्राची माहिती मिळवूं इच्छिणाऱ्या जिज्ञासू वाचकांचें समाधान होणार नाहीं हें जाणून शक्य तितक्या विस्तारानें त्यांचें चरित्रहि यापुढें दिलें आहे. हें चरित्र वाचतांना महाराजा खारवेलचा वंश, यौवराजपद व राज्याभिषेक, राजमहिषी, कलिंग देशांतील जनता, खारवेलची राजधानी, खारवेलचा दिग्विजय, राष्ट्रिक अगर भोजक, मगधावरील स्वारी, पांड्यराज्य, खारवेलचा राज्यकारभार, जैनधर्म व त्यावेळची सामाजिक स्थिति यांबद्दल पुढें दिलेल्या त्रोटक वृत्तांतावरून विविध विषयांची माहिती मिळणार आहे.

## महाराजा खारवेल यांचा अल्प चरित्रपरिचय

आजच्या या वैज्ञानिक व इतिहासप्रिय युगामध्यें दिक्प्रत्यय अधिक प्रभावी ठरतो. पुरातत्त्वसंशोधन व त्यावरून काढिलेलीं अनुमानें यामुळें विपुल ऐतिहासिक सामुग्री उपलब्ध झाली आहे व ती आपल्या प्राचीन इतिहासासंबंधीं उत्पन्न झालेला संशय नष्ट करण्यास पुरेशी आहे. ज्या प्रतापशाली महापुरुषांचीं, महाकवींचीं व सम्राटचक्रवर्ती राजांचीं नांवेंसुद्धां आपल्यास ज्ञात नव्हतीं, त्यांचा जीवनवृत्तांत आज शिलालेख, ताम्रपत्र व नाणीं यांवरून ज्ञात झाला आहे. त्या त्या काळाची राजनैतिक दशा, सामाजिक व्यवस्था व धार्मिक प्रवृत्ति यांचे विश्वसनीय उल्लेख कांहीं कांहीं ठिकाणीं संशोधनामुळें मिळाले आहेत. **महाराजा खारवेल** कालीन खंडगिरी उदयगिरी पहाडावर हाँथी–हस्ती–गुंफेमध्यें कोरलेल्या शिलालेखांवरून **सम्राट् खारवेल** यांचें चरित्र हल्लीं उपलब्ध झालें आहे.

कलिंगाधिपति महामेघवाहन चक्रवर्ती महाराजा खारवेल यांचा जीवनवृत्तान्त सादर करण्यापूर्वीं त्यांच्या वंशापलीकडे थोडीशी नजर टाकणें येथें अप्रस्तुत होणार नाहीं. भगवान् महावीरस्वामींच्या समयीं कलिंग देशाची राजधानी कंचनपूर येथें राज्य करीत असलेल्या महाराजा सुलोचन याच्यापासून प्रारंभ जैनधर्मीय करतात. इतर इतिहासकार कलिंग देशावर राज्य करणाऱ्या सुरथ नांवाच्या राजापासून करतात. कदाचित् सुलोचन हाच सुरथ असूं शकेल. कारण या दोघांच्या काळांमध्यें फारसा फरक नसून दोघेही कलिंग देशावर राज्य करणारे होते. महाराजा सुलोचन हा निपुत्रिक असल्यामुळें त्यानें आपलें सर्व साम्राज्य आपल्या जांवयास म्हणजे महाराजा चेटक याचा पुत्र शोभनराय यास अर्पण केलें. वीर संवत् १८ मध्यें शोभनराय हा कलिंग देशच्या गादीवर बसला. हा चतवशाय राजा असून जैनधर्मावलंबी होता. यानें कुमारीपर्वतावर अनेक मंदिरें बांधविलीं. त्यानें आपल्या राज्याचा फार विस्तार केला होता. महाराजा शोभनराय याच्यापासून पांचव्या पिढीमध्यें म्हणजे वीर संवत् १४९ मध्यें कलिंग देशाचा चंडराय नांवाचा राजा झाला. यावेळीं मगध-देशावर राजा नन्द हा राज्य करीत होता. राजा नंदानें कलिंग देशावर स्वारी करून कुमारगिरी पर्वतावर असलेली भगवान् ऋषभ देवाची सुवर्णमय मूर्ति हरण करून नेली. शोभनरायाच्या आठव्या पिढीमध्यें खेमराज नांवाचा कलिंग देशचा

राजा झाला. यावेळीं मगध देशावर राजा अशोक हा राज्य करीत होता. अशोक राजानें इ. स. पूर्व २६२ मध्यें कलिंग देशावर स्वारी केली. दोन्ही देशच्या सैनिकांमध्यें घनघोर युद्ध होऊन अशोकाचा विजय झाला; व त्यामुळें बौद्धधर्माचा कलिंगमध्यें शिरकाव होऊन तो जैनधर्माची जागा पटकावूं लागला. या लढाईंत झालेल्या रक्तपाताचा राजा अशोक याच्या कोमल मनावर परिणाम झाल्यानें त्यानें आजन्म युद्ध टाळिलें व धर्ममार्गाकडे त्याची मनःप्रवृत्ति झाली. या लढाईनंतर भेटलेल्या एका बौद्धभिक्षूच्या उपदेशाचा अशोकाच्या मनावर परिणाम होऊन बौद्धधर्म प्रसारार्थ त्यानें आपलें उर्वरित आयुष्य घालविलें असें मानिलें जात आहे. खेमराजानंतर त्याचा पुत्र बुद्धराज हा कलिंग देशच्या गादीवर बसला. हा पराक्रमी योद्धा असून यानें कलिंग देशास स्वातंत्र्य मिळवून दिलें. कलिंग देशावर राज्य करणारे सर्व राजे जैन होते पण विशेषतः बुद्धराजानें जैनधर्माचा फार मोठा प्रसार केला. कुमारगिरी पर्वतावरील अनेक जिनमंदिरांचा जीर्णोद्धार करून नवीन जिनमंदिरें व गुंफा बांधविल्या. इ. स. पूर्व १४३ वर्षांच्या सुमारास महाराजा बुद्धराजाचा पुत्र भिक्षुराज खारवेल सिंहासनाधिरूढ झाला. हा चेत (चैत) वंशीय, कुलीन, वीर व पराक्रमी राजा होता. महामेघवाहन ही पदवी याच्या पूर्वजांपासून चालत आली होती. **भिक्षुराज-खारवेल**-हाच आपला चरित्रनायक होय.

सम्राट् खारवेल यास जैनधर्माचा प्रसार करण्याची खरीखुरी व उत्कट इच्छा होती. सर्व विश्वामध्यें जैनधर्माचा प्रसार व्हावा म्हणून त्यानें हार्दिक प्रयत्नहि केले. सर्व जगामध्यें जैनधर्माचा देदीप्यमान झेंडा सदैव फडकत रहावा अशी त्याची उच्च महत्त्वाकांक्षा होती; परंतु प्रत्यक्ष प्रसार काम करणें, त्यावेळीं इतकें सोपें नव्हतें; कारण त्यावेळीं भगवान् महावीर यांनीं प्रतिपादलेल्या आगमाचा लोप झाला होता. याचें तत्कालिन कारण त्यावेळीं पडलेला दुष्काळ होय. अनेक मुनिजनांना दृष्टिवाद वगैरे अगाध आगमांचें विस्मरण झालें होतें. लोकांना मार्गदर्शक आगमांची उणीव भासूं लागली होती. अशा आपत्तीच्यावेळीं कोणातरी महापुरुषानें आगमोद्धाराचें कार्य आपल्या हातीं घेणें अत्यंत जरूर होतें. पूर्ण दूरदर्शीपणानें राजा खारवेलनें हें कार्य आपल्या हातीं घेतलें. विस्मृतिरूपी अगाध गर्तेत गडप झालेल्या आगमांचें अनुसंधान करणें हें कोणाहि एका व्यक्तीच्या आटोक्यांतील काम नव्हतें; म्हणून राजा खारवेलनें विद्वानांचें एक विराट् सम्मेलन

भरविण्याचें ठरविलें. अनेक ठिकाणच्या विद्वानांना पाचारण केलें. कार्याचें महत्त्व जाणून आमंत्रितांनीं या कामीं संपूर्ण सहाय्य केलें. बौद्धधर्मीयांनींहि आगमोद्धारासाठीं असेच प्रयत्न केल्याची साक्ष इतिहास देत आहे.

या सभेमध्यें जिनकल्पी समान आचार्य बल्लिसह, बोधलिंग, देवाचार्य, धर्मसेनाचार्य आदिकरून २०० मुनि व स्थिरकल्पी आचार्य सुस्थित, आचार्य उमास्वाति व शामाचार्य आदिकरून ३०० मुनि, पइणि आदि ७०० अर्जिका, कांहीं राजे महाराजे, शेठ सावकारादि अनेक लोक उपस्थित झाले होते. या सभेचें अध्यक्षस्थान आचार्य सुस्थित यांना दिलें होतें. या सभेमध्यें त्या वेळच्या दुष्काळाची भयंकर स्थिति, जैन धर्मीयांची घटत चाललेली लोकसंख्या, आगमोद्धाराची जरूरी, धर्मप्रचारक मुनिगणांची उणीव, प्रचारकार्य त्वरित वाढविण्याची आवश्यकता, जिनमंदिरांचा जीर्णोद्धार वगैरे अनेक विषयांवर वादविवाद होऊन बरेच प्रस्ताव प्रसार झाले. हे ठराव निव्वळ कागदी घोडे नसून त्यांना मूर्तस्वरूप देण्यांत आलें. त्या शांत, शुद्ध व पवित्र कुमारगिरी पर्वतावर अनेक मुनिराजांनीं एकत्रित होऊन पुनः सर्व शास्त्रांची याद तयार केली; ताडपत्रावर, भोजपत्रावर व वृक्षांच्या वल्कलांवर तीं शास्त्रें लिहून काढण्यास सुरवात केली. कांहीं मुनिगण धर्मप्रचाराकरितां परदेशींहि धाडले गेले; जीर्ण जिनमंदिरांचा उद्धार झाला. नव्या जिनमंदिरांनीं भारतवर्ष—विशेषतः कलिंगदेश—फुलून गेला. जैनागम लिहून काढण्यांत त्यानें मदत केली. जैनधर्माचा प्रसार फक्त भारतवर्षामध्येंच नव्हे तर भारताबाहेरीलहि चोहोंकडील देशांमध्यें केला गेला. जैनधर्माचा प्रसार करण्याकरितां तन, मन व धनें करून सम्राट् खारवेलानें अविश्रांत श्रम केले. महाराजा संप्रति प्रमाणें विदेशामध्यें व अनार्य देशांमध्यें योद्धे पाठवून मुनिविहाराला योग्य क्षेत्र तयार करण्याची व तद्द्वारां जैनधर्माचा विशेष प्रसार करण्याची राजा खारवेल यास उत्कट इच्छा होती; परंतु त्याची ती महत्त्वाकांक्षा प्रत्यक्ष कृतींत उतरली नाहीं. धर्मप्रेमी खारवेल या नश्वर देहाचा त्याग करून स्वर्गवासी झाला. यावेळीं राजा खारवेल हा केवळ ३७ वर्षांचा होता. यानें गादीवर आल्यापासून फक्त १३ च वर्षें राज्य केलें. आपल्या अंतिम अवस्थेंत यानें कुमारगिरी तीर्थाची यात्रा केली. मुनिगणांच्या चरणकमलांस स्पर्श केला व पंचपरमेष्टि नमस्कार मंत्राची आराधना करून पूर्ण निवृत्तिभावानें देहत्याग केला.

## खारवेल वंश व कलिंग-जैनधर्म

महाराजा खारवेलच्या पश्चात् त्याचा पुत्र विक्रमराय हा कलिंगाधिपति झाला. हा धीर, वीर व गंभीर असून आपल्या पित्यानें सुरू केलेलीं अनेक कार्यें आपल्या हातीं घेऊन तीं पूर्णतेस नेलीं. हा शांत स्वभावी असल्यामुळें याच्या कारकीर्दींत युद्धाचा प्रसंग उद्भवला नाहीं. यानेंहि जैनधर्माच्या प्रसारकार्यास मदत केली. विक्रमरायानंतर त्याचा पुत्र बहुदुराय हा गादीवर बसला. आपल्या पितामहाप्रमाणें जैनधर्माचा प्रचार करण्यांत अमूल्य वेळ, शक्ति व द्रव्य याचा त्यानें व्यय केला.

जैनांनीं कलिंग देशांत आपल्या धर्माची स्मृति चिन्हरूपी भरीव कार्यें करून ठेविली आहे. इतिहास स्पष्ट सांगत आहे कीं, वि. सं. १२०० पर्यंत कलिंग देशामध्यें जैनांची पूर्ण चलती होती; एवढेंच नव्हे तर वि. सं. १६०० मध्यें सूर्यवंशी महाराजा प्रतापरुद्र हा या देशाचा जैन राजा होता. या वेळेपर्यंत तर कलिंग देशामध्यें जैन धर्माचा अभ्युदय होत होता. यानंतर येथून जैनधर्माची पूर्णपणें हकालपट्टी कशी झाली, हा एक मोठा प्रश्न आहे. कलिंग देशांतील जैनधर्माच्या वैभवामुळें पोटशूळ उठलेल्या वैदिकांनीं कलिंग देशास शाप दिला यांत नवल तें काय ? कांहीं विद्वानांचें मत असें आहे कीं, कोणातरी विधर्मी राजानें निर्दयतेनें जैनांचा छळ केल्यामुळें जैनांनीं कलिंग देशाचा त्याग केला असावा. अशा प्रकारची आपत्ति आली नसती तर कदापिहि जैनांनीं कलिंग देशाचा त्याग केला नसता. अशाच मोठमोठ्या संस्कृति कालाच्या विकराल उदरांत गडप झालेल्या दिसतात. कलिंग देशांतील जैनसंस्कृति कांहीं कालापूर्वीं तेथून अदृष्ट झाली यांत कांहीं विशेष आश्चर्य वाटण्याजोगें नाहीं.

कलिंग देशाच्या या दुःखद इतिहासाचें चित्र डोळ्यांपुढें राहिल्यावेळीं 'कालाय तस्मै नमः' असेंच उद्गार काढण्याची पाळी येते.

## कलिंग देशांतील इतर शिलालेखांचें ऐतिहासिक महत्त्व.

सुप्रसिद्ध पुराणवस्तु-संशोधक व तज्ज्ञ श्री. बाबू मनमोहन गांगोली यांनीं खंडगिरी-उदयगिरी पर्वतावरील जैन गुंफांचा निर्माणकाल इ. स. पूर्व तिसरें अगर चौथें शतक असावें असें निर्णायक मत दिलें आहे.

खण्डगिरी-उदयगिरी पर्वतावर हस्ति-गुंफेमध्यें कोरलेल्या सम्राट् खारवेलच्या शिलालेखावरून व तेथेंच उपलब्ध झालेल्या इतर अनंतगुंफा, राणीगुंफा, मांचीपुर-गुंफा, गणेशगुंफा इत्यादि अनेक गुंफांवरून जैनधर्माची प्राचीनता, भगवान पार्श्व-नाथ स्वामींचें ऐतिहासिक अस्तित्व, जिनमंदिरें व मूर्तिपूजेचें अस्तित्व, जैन-धर्माचा परदेशांतील प्रचार व भारतवर्षाची प्राचीन शिल्पविद्या वगैरे विषयांसंबंधीं बरींच अनुमानें काढतां येण्यासारखीं आहेत. येथील गुंफेच्या द्वारावर २४ तीर्थं-कराच्या मूर्तिं खोदविलेल्या असून त्यांच्या खालीं त्यांचीं लक्षणचिन्हें कोरलेलीं आढळून येतात. मांचीपुरगुंफेमध्यें **श्री पार्श्वनाथ तीर्थंकरांचें संपूर्ण जीवन-चरित्र** खोदलेलें आहे. हस्तिगुफेमधील शिलालेखांत, मगध देशाचा राजा नंद यानें कलिंग देशावर स्वारी करून भगवान् ऋषभ देवाची सुवर्णमय मूर्ति हरण करून नेली होती, ती राजा खारवेल यानें परत कलिंग देशांत आणली, असा उल्लेख मिळतो. यावरून नंद राजानें ज्या मंदिरांतून ती मूर्ति नेली तें मंदिर नंद राजाच्या पूर्वींच अस्तित्वांत असलें पाहिजे हें स्वयंसिद्धच होतें. हें मंदिर राजा श्रेणिक यानें बांधविलें होतें असा पुराणवस्तुसंशोधन खात्याचा अभिप्राय आहे. भगवान् महावीर, नंदराज व श्रेणिक राजा यांच्या कालामध्यें फारसा फरक नसल्यामुळें ही गोष्ट सत्य असणें संभवनीय आहे. राजा श्रेणिक यानेंही दुसरें मंदिर पाहून हें मंदिर बांधविलें असलें पाहिजे. भगवान् महावीराचा राजा श्रेणिक हा परमभक्त असून त्याच्या समकालीन होता. गादीवर आल्यानंतर ५ व्या वर्षी खारवेलनें आदिजिनाची सुवर्णमय मूर्ति मगध देशांतून परत आणिली. ही सुवर्णमय मूर्ति यापूर्वीं १०३ वर्षें अगोदर नंदराजानें कलिंग देशांतून मगध देशांत हरण करून नेली होती; यावरून ही सुवर्णमूर्ति सुमारें बावीसशें वर्षांपूर्वीं अस्तित्वांत होती, व त्यावेळीं मूर्तिपूजाहि अस्तित्वांत होती हेंहि उघड आहे. यावरून महावीर तीर्थं-करांच्या काळीं तरी मूर्तिपूजा अस्तित्वांत असावी असें अनुमान करण्यास कांहींच हरकत दिसत नाहीं.

विक्रमशकापूर्वी दोन शतकांपूर्वीचा हा शिलालेख व विक्रमानंतर दुसऱ्या शतकांत लिहिलेला जैन इतिहास यांमध्यें पुष्कळशा गोष्टींत साम्य आहे; हें स्पष्ट होण्यासाठीं खालील कोष्टक दिलें आहे.

| खारवेलचा शिलालेख | जैनाचार्यलिखित इतिहास. |
|---|---|
| कलिंगाचा राजा खेमराज बुद्धराज किंवा खारवेल ( भिक्षुराज ) | कलिंगपति महाराजा खेमराज बुद्धराज अथवा खारवेल. |
| खण्डगिरी–उदयगिरी पर्वतावर जैन-मंदिरें व गुंफा. | कुमार-कुमारी पर्वतावर जैन-मंदिरें व गुंफा. |
| मगधाचा राजा नंद, पर्वतावरून सुवर्णमय जिनमूर्ति घेऊन गेला. | मगधाचा राजा, नंदकुमार पर्वतावरून सुवर्णमय जिनमूर्ति घेऊन गेला. |
| महाराजा खारवेलनें मगधांतून परत जिनमूर्ति कलिंगामध्यें आणिली. | महाराजा खारवेलनें मगधांतून जिनमूर्ति परत कलिंगामध्यें आणिली. |
| महाराजा खारवेलनें कुमार पर्वतावर एक सभा बोलाविली होती. | महाराजा खारवेलनें कुमार पर्वतावर एक सभा बोलाविली होती. |
| महाराजा खारवेलानें विस्मृत झालेले आगम पुनः लिहवून घेतले. | महाराजा खारवेलनें जैनागम ताडपत्र वगैरेवर लिहवून घेतले. |
| महाराजा खारवेलनें लोकांच्या हिताकरितां कूप, तलाव, बाग व बगीचे करविले व मगधांतून कालवा आणला. | महाराजा खारवेलनें लोकांच्या हिताकरितां अनेक शुभ कार्यें केलीं. |

महाराजा खारवेलच्या शिलालेखानंतर तीन चारशें वर्षांनीं जैनाचार्यांनीं लिहिलेल्या इतिहासाची सत्यता व प्रामाणिकता वरील कोष्टकावरून स्पष्ट कळून येईल. यावरून जैनाचार्यांनीं लिहिलेले इतर इतिहासग्रंथहि कपोलकल्पित नसून ते विश्वसनीय आहेत असें मानण्यास कांहीं हरकत नाहीं.

## महाराजा महामेघवाहन खारवेलची राजधानी.

तोषालीः—हल्लीं धरुली ही खारवेलची राजधानी होती. खंडगिरी, उदयगिरी, भुवनेश्वर व धोली या डोंगरांच्या मध्यभागीं ही राजधानी होती.

## एल व ऐर्य

शिलालेखांत कलिंगराजांना 'एल' 'ऐर्य' असें संबोधिलें गेलें आहे. 'एल' व 'ऐर्य' हे शब्द 'आर्य' या शब्दार्थसूचक आहेत असें कांहीं विद्वान् म्हणतात; तर दुसरे असें म्हणतात कीं 'ऐर' वंशीय राजा चैत्र यानें कलिंग देशाला स्वातंत्र्य मिळवून दिलें; या महत्कार्याच्या स्मरणार्थ यापुढें तेथील राजे "ऐर्य चैत्र-वंशीय" या नांवानें ओळखिले जाऊं लागले. चैत्रवंशीय राजे जिनानुयायी होते. या वंशांत नऊ राजे होऊन गेले. मेघवाहन अगर महामेघवाहन अशी त्यांना पदवी होती.

## वंश.

शिलालेखाच्या पहिल्या ओळींत खारवेल हा 'चेतराज' वंशीय असें लिहिलें असून शेवटच्या पंक्तींत त्यास राजर्षि वंशीय असें संबोधिलें आहे. या शिला-लेखाच्या तिसऱ्या ओळींत खारवेल हा तृतीय-कलिंग-राजवंशीय होता असें लिहिलें आहे. तृतीय कलिंग-राजवंशाची व्युत्पत्ति हिंदुधर्मपुराणांशीं जमत आहे.

## केतुभद्र—हा कोण ?

या लेखाच्या ११ व्या ओळींत केतुभद्र राजाचा उल्लेख आहे. महाभारत-भीष्म-पर्वांत कलिंग देशच्या सैन्याचा अधिपति केतुभद्र होता असा उल्लेख आहे. कौरव-पांडव युद्धांतील केतुभद्र व या लेखांतील केतुभद्र एकच होत, असें मानिल्यास १३००+१६७+१९३८=३४०५ वर्षांपूर्वीं भारतीय युद्ध झालें असावें असें मानणें भाग आहे. भारतीय युद्धांतील वीर अर्जुन याचा सारथी श्रीकृष्ण व भगवान् नेमिनाथ हे सख्खे बंधू. यावरून भगवान नेमिनाथ हे सुमारें ३४०० वर्षांपूर्वीं मोक्षगामी झाले असावेत असें मानणें भाग आहे. या कालदृष्टीनें विचार करितां भारतीय युद्धांतील केतुभद्रास अनुलक्षूनच या लेखांतील ११ वी ओळ लिहिली असावी; यावरून खारवेलपूर्वीं सुमारें १३०० वर्षें अगोदर केतुभद्र होऊन गेला.

## यौवराज व राज्याभिषेक.

यासंबंधीं माहिती यापूर्वीं दिली असल्यानें पुनरुक्तीचा दोष टाळण्यासाठीं या-बद्दलची माहिती येथें दिली नाहीं.

## महाराज्ञी.

खारवेलच्या पट्टाभिषिक्त राणीचें नांव ‘ धिसि ’ अगर ‘ धृष्टि ’ असें होतें, व ती व्रजकुलोत्पन्न होती.

## कलिंग देशची लोकसंख्या.

खानेसुमारीची कल्पना प्राचीन काळीं नव्हती अशी अनेकांची आजवर चुकीची समजूत होती. कौटिल्य अर्थशास्त्रावरून व मेगास्थेनिसच्या लिखाणावरून प्राचीन काळींहि हिन्दुस्थानांत खानेसुमारी केली जात असे असें स्पष्ट दिसतें. त्यावेळीं कलिंग देशची लोकसंख्या ३५ लाख होती. कलिंग देश म्हणजे हल्लींचा ओरिसा प्रांत होय; व या प्रांताची हल्लींची लोकसंख्या ५० लाख आहे. अशोकनें कलिंग देशावर स्वारी केल्यावेळीं कलिंग देशच्या एक लाख लोकांना बंदिवान केलें, दीड लाख लोक जखमी झाले; व तितकेच लोक मारले गेले अशी माहिती मिळते. कलिंग लोकवस्ती व स्वातंत्र्यासाठीं केलेला निकाराचा लढा यांचा विचार करितां लढाईचें हें वर्णन केवळ असत्यच आहे असें मानितां येणार नाहीं

## दिग्विजय व त्यांतील प्रदेश.

दिग्विजयासाठीं ज्या ज्या देशांत खारवेलनें सैन्य धाडिलें त्या त्या देशाचा नामनिर्देश शिलालेखांत आहे. लेखांतील मूशिक देश म्हणजे हल्लींच्या गोंडवनाचा कांहीं भाग होय असें समजलें जात आहे. राष्ट्रिक अगर भोजक या शब्दानें हल्लींचा महाराष्ट्र व वऱ्हाड प्रांताचा बोध होतो. कृष्ण-वेण्णा या नद्यांच्या नांवाचाहि उल्लेख आढळ होत आहे. मगध देशाची राजधानी राजगृह यास राज्यावर आल्यानंतर ८ वर्षांनीं खारवेलनें वेढा दिला. या वेढ्याचा अखेर निकाल काय झाला हें या शिलालेखावरून समजून येत नाहीं. ९ व्या वर्षी कोठें स्वारी केल्याचा उल्लेख नाहीं. १० व्या वर्षी ‘उत्तरापथ’ हस्तगत करण्यासाठीं सैन्य पाठविलें; व बाराव्या वर्षी गंगा नदी ओलांडून त्याचें सैन्य पुढें गेलें व त्याचवेळीं कलिंग देशांतून मगधांत नेलेली सुवर्णमय जिनमूर्ति परत आणिली. उत्तरापथ म्हणजे हिंदुस्थानच्या सरहद्दीवरील प्रदेश. कलिंग देशांतून सरहद्दीवरील प्रदेश काबीज करावयाचा झाल्यास या दोन देशांमधील मुलूख व तेथील राजे यांवर प्रभुत्व असणें जरूर आहे. यावरून यापूर्वींच मधील देशावर खारवेलची साम्राज्य सत्ता प्रस्थापित

झाली असावी असें मानणें भाग आहे. राज्याभिषेकानंतर बारा वर्षांनीं दक्षिण देशांतील पांड्य राजाकडून हत्ती, घोडे, मणिमाणिक्यादिकांचा खारवेलनें नजराणा घेतला म्हणजे पांड्य राजांनींहि खारवेलचें मांडलिकत्व पतकरिलें. या दिग्विजयांत ज्या ज्या देशांच्या नांवांचा उल्लेख आला आहे त्यावरून असें दिसतें कीं, खारवेलनें अखिल भरत खंडावर फक्त १२ वर्षांतच स्वामित्व मिळवून आपलें सार्वभौमत्व प्रस्थापित केलें होतें.

## राज्यकारभार.

दिग्विजयाचा त्रोटक वृत्तांत वर दिला आहे. राज्यकारभार काळांतील एक दोन वर्षें वगळतां बाकीचा सर्व काळ दिग्विजयांतच गेला; असें असतांहि राज्याच्या अंतर्गत कारभारांत कोणतेंहि शैथिल्य आल्याचें दिसत नाहीं. नवीन राजवाडे व जिनमंदिरें बांधविलीं. जिनमंदिरांचा जीर्णोद्धार केला. तळीं व विहिरी बांधविल्या. जमीनमहसुलाची व इतर करांची माफी दिली. दुष्काळ पडला म्हणून नव्हे! बागबगींचे केले. 'पौर' व 'जानपद' या संस्थांना अधिक अधिकार दिले. 'पौर' व 'जानपद' या स्थानिक कारभाराच्या संस्था होत. पुर–पौर–शहर–वासी यांची संस्था म्हणजे हल्लींच्या म्युनिसिपल कमिट्यांसारख्या व 'जानपद' म्हणजे डिस्ट्रिक्ट–लोकल बोर्ड संस्थेसारख्या संस्था होत. दिग्विजयामुळें सत्तांध न होतां प्रजाजनांना विश्वासांत घेऊन राज्यकारभाराचे त्यांना धनी केलें. **करभार वाहाणाऱ्यांना कारभार करावयास लाविलें.** संगीतवाद्यद्वारादि प्रजेचें मनोरंजन केलें असा उल्लेख या लेखांत मिळतो; यावरून त्याकाळीं सार्वजनिक नाटकगृहें अगर अशाच संस्था अस्तित्वांत असाव्यात. नवीन राजवाडे, देवालयें, तळीं, विहिरी, तलाव बांधणें व बागबगीचे उठविणें या खर्चाच्या बाबी असतांहि करभार माफ केले गेले; यावरून देशाच्या व राज्याच्या संपन्नतेची व प्रजेच्या स्वास्थ्याची कल्पना होणार आहे. सुख, संपत्ति व ऐश्वर्य यांच्या मदानें धुंद होऊन खारवेलनें आपल्या राज्यांत अगर पादाक्रांत केलेल्या मुलखांत प्रजेचा धार्मिक छळ तर केला नाहींच उलट इतर धर्मीयांबद्दल तो आदरहि बाळगीत असे. प्रजेपैकीं कांहींच्या धर्ममताला मान देण्याकरितांच त्यानें वैदिक धर्माप्रमाणें आपला राज्याभिषेक करविला व राजसूययज्ञहि केला. बौद्धधर्माच्या उत्कर्षकाळांतील बौद्धधर्मीय राजांचें अगर वेदानुयायी राजांचें वर्तन मात्र या चरित्रनायकाहून अगदींच भिन्न झालेलें दिसून येईल.

## या शिलालेखाचा सारांश.

सारांश, २१०० वर्षानंतर हा सतरा ओळींचा शिलालेख आम्हांस त्या काळची अनेकविध माहिती देण्यास समर्थ झाला आहे. दक्षिण हिंदुस्थानांत जैनधर्माचा प्रसार व विस्तार केव्हां व कसकसा झाला; हा या प्रस्तुत पुस्तकांतील विषय आहे. त्याबरोबरच उत्तर हिंदुस्थानांत जैनधर्माचा प्रसार केव्हां झाला याची जिज्ञासा वाचकांना होणें साहजिकच आहे. मौर्य घराणें व नंद घराणें, हीं प्रायः जैनधर्मीयच होतीं व त्या राजघराण्याचा राज्यविस्तार फार मोठा होता असें इतिहासावरून स्पष्ट आहे. इतकाच खुलासा करणें येथें इष्ट होईल. रा. ब. वैद्य मात्र आपल्या 'मध्ययुगिन भारत' या पुस्तकांत इ. स. ८०० ते १२०० च्या दरम्यानच्या काळांत उत्तर हिंदुस्थानांत–गुजराथ प्रांतांत जैनधर्मांचा **प्रथम** प्रवेश झाला असावा असें मत ठोकून देतात ( पहा पान २९० ) हें पुस्तक लिहितांना 'हिंदुदृष्टि–हिंदी दृष्टि नव्हे–ठेविल्याचें हें फळ होय.

## " मध्ययुगीन भारत. "

भारताचार्यांच्या या पुस्तकांतील पान २९० वर फक्त जैन, जैनधर्म व जैनाचार्य व त्यांचें संस्कृत भाषेवरील प्रभुत्व यासंबंधीं डोळे झांकून जीं विधानें केलीं आहेत, त्यांचें खंडण करण्यास एक स्वतंत्रच प्रकरण लिहावें लागेल. भारताचार्यांनीं केलेलीं धाडसाचीं विधानें त्यांच्याच शब्दांत दिल्यासहि हा कार्यभाग होणार आहे. ते म्हणतात कीं "जैनधर्मांचा **उद्भव** विद्यमान कालाच्या ( विद्यमान काल म्हणजे इ. स. १००० ) पूर्वींच झाला होता तरी देखील **आतांपर्यंत** त्याचा विशेष उत्कर्ष झाला नव्हता, (आतांपर्यंत म्हणज इ. स. १०००) पुढील काळांत मात्र त्याचा प्रसार विशेष जोरानें झाला. पुढें ते लिहितात कीं, ' राष्ट्रकूट राजे **देखील** पुढें जैन साधूंचे उपासक झाले" या विधानांतील **देखील** या शब्दाचा अर्थ काय ? पुनः ते म्हणतात कीं, ' पुढें पुढें तर जैनाचार्य मीमांसकांशीं संस्कृत भाषेंतूनच वादविवाद करूं लागले व मीमांसकास जिंकूं लागले. मध्ययुगाच्या अखेरच्या कालांत ( १०००–१२०० ) जैन पंडितांची संस्कृत भाषेवरील प्रभुत्त्वाबद्दल विशेष ख्याति होऊं लागली. ' यावरून इ. स. ११ व्या शतकापूर्वी संस्कृत भाषेची मोनॉपली फक्त मीमांसकाकडेच होती असें भासविण्याचा भारताचार्यांचा मानस दिसतो. वस्तुस्थिति मात्र अशी आहे कीं, इ. स. च्या ११ व्या शतकापूर्वींच अनेक ग्रंथ

जैनचार्यांनीं व जैन पंडितांनीं संस्कृत भाषेंतच लिहिले आहेत. इ. सनाच्या दुसऱ्या शतकापासूनचे संस्कृत भाषेंतील अनेक ग्रंथ आज विद्यमान आहेत. राष्ट्रकूट राजे **देखील** पुढें जैन साधूंचे उपासक झाले असें म्हणण्यानें राष्ट्रकूट घराण्यांतील नंतरचे कांहीं राजे, जैनधर्मीय व जैन साधूंचे उपासक होते व **प्रथमचे** राष्ट्रकूट राजे शिवोपासक होते, असें भासविण्याचा हा प्रयत्न दिसतो. राष्ट्रकूट वंशीय अनेक राजे जैनधर्मीय होते असा खरा इतिहास आहे. डॉ. आळतेकर यांचा The Râshtrakûtâs And Their Times हें पुस्तक वरवर वाचणाऱ्यासहि भारताचार्यांचीं वरील विधानें साफ चुकीचीं आहेत असें दिसून येईल. या पुस्तकांत राष्ट्रकूट राज्यघराण्याचा इतिहास दिला आहे; त्या भागाचे अखेरीस डॉ. आळतेकर यांच्या वरील पुस्तकाच्या आधारें जी माहिती दिली आहे; त्याकडे वाचकांचें लक्ष मुद्दाम वेधित आहों. जैन दृष्टीनें म्हणा अगर तोंडास तोंड अगर तोडीस तोड देणारा जैन इतिहास याच कारणामुळें लिहिणें जरूर आहे, असेंच आम्हांप्रमाणें इतरांनाहि वाटेल यांत शंका नाहीं.

पुढील प्रकरणांत दिलेला वृत्तांत समजण्यास सोईचा व्हावा व दक्षिण-भारतांत अत्यंत प्राचीन कालींहि जैनधर्माचा प्रसार व विस्तार झाला होता याची स्थूल-मानानें कल्पना यावी या हेतूनें भगवान् नेमिनाथ, पार्श्वनाथ व महावीर यांच्या दक्षिणेंतील विहारांचा व सिलोनच्या इतिहासांतील जैनधर्माच्या अस्तित्वासंबंधींचा तसेंच मौर्य व नंद घराण्याचा फक्त जरुरीपुरता उल्लेख केला आहे. याच हेतूनें खारवेल–शिलालेख, त्याचें भाषांतर व त्याचें चरित्रहि याच प्रकरणांत दिलें आहे.

# प्रकरण दुसरें.

## अंतिम श्रुतकेवली श्री भद्रबाहू स्वामींचें दक्षिण भारतांत आगमन



दक्षिण भारताच्या जैनइतिहासाच्या अभ्यासकांच्या दृष्टीनें अन्तिम श्रुतकेवली श्री **भद्रबाहू स्वामींचें** दक्षिणेंतील आगमनाचें महत्त्व अपरिमित आहे. धार्मिक क्षेत्रांतील सम्राट् श्री भद्रबाहू स्वामींनीं व त्यांच्या परंपरागत शिष्यांनीं सामाजिक, धार्मिक व राजकीय क्षेत्रांत सुंदर व भव्य इमारती उठविल्या; त्यामुळें तामिल, तेलगु, कर्नाटक व महाराष्ट्रादि भागांत अनेक जैनराजे, त्यांचे पराक्रमी जैन सेनापति व जैनाचार्य, महाराज्ञी जाकल देवी, कवी कुन्ती–कान्ती, भैरवदेवी, सामन्त इचप्पाची कन्या, वीरांगना सावियब्बे, प्रांताधिकारी नागार्जुन यांची वीरपत्नि, जक्कमव्वे अशा ललना यांची परंपरा किमान पंधराशें वर्षेपावेतों अबाधित व अखंड राहिली.

## श्री भद्रबाहू स्वामी.

या भद्रबाहू स्वामींचे मातापितर वैदिक धर्मानुयायी ब्राह्मण होते. आपला मुलगा जिनानुयायी व महान् पुरुष होणार हें त्यांच्या जन्म कुंडलीवरून जाणून लहानपणापासूनच जैन संस्कारांत वाढविण्याची दक्षता त्यांच्या वडिलांनीं घेतली. अक्षश्रावक स्वामी नांवाच्या जैन विद्वानाच्या देखरेखीखालीं भद्रबाहूंचें बाळपणांत शिक्षण–संगोपन झालें; इतर श्रुतकेवली व अक्षश्रावक स्वामी यांच्या शिक्षणामुळें योगिनी, संगिनी, प्रज्ञानी व प्रज्वेलन या विद्या त्यांनीं बालवयांतच हस्तगत केल्या. चौदा विद्या व व्याकरण शास्त्रांतील चार अनुयोग यांत पारंगत झाले. याप्रमाणें सर्व विद्याविभूषित झाल्यानंतर मातापितरांच्या सम्मतीनें भद्रबाहूंनीं जिनदीक्षा धारण केली. ज्ञान, ध्यान, तप, व संयम आचरून ते आचार्यपदास पोहोंचले.

## श्री भद्रबाहू स्वामींचें दक्षिणेंत आगमन.

मौर्य कुलोत्पन्न सम्राट् चंद्रगुप्ताच्या कारकीर्दीच्या अखेरीस श्री भद्रबाहू स्वामी आपल्या हजारों शिष्यांसह दक्षिणेंत आले. दक्षिणेंतील या आगमनासंबंधीं अत्यंत हृदयस्पर्शी व चित्ताकर्षक वृत्तांत श्रवण बेळगोळ येथील नंबर १ च्या शिलालेखांत दिला आहे. उज्जयनी व त्याच्या आसपासच्या प्रदेशांत बारा वर्षें मुदतीचा भयंकर दुष्काळ पडणार हें त्रिकालज्ञानी भद्रबाहूंना कळलें व त्यासाठीं आपल्या संघांतील बारा हजार शिष्यसमुदायासमवेत ते दाक्षिणेंत येण्यास निघाले. म्हैसूर राजकुटुंबांतील एका जैनधर्मीय साध्वीच्या विनंतीवरून देवचंदर नांवाच्या जैन कवीनें व विद्वानानें "राजावली कथे" या नांवाचा एक ग्रंथ लिहिला आहे; त्यांत भद्रबाहूंच्या या आगमनाचें, सम्राट् चंद्रगुप्त व स्वामी भद्रबाहूंच्या भेटीचें रसभरित वर्णन दिलें आहे. राजाधिराज चंद्रगुप्त यास आदल्या रात्रीं सोळा स्वप्नें पडलीं व त्या स्वप्नांचें फल जाणून घेण्याकरितां चंद्रगुप्तानें दरबार भरवून त्यांत भद्रबाहू स्वामींना आमंत्रण दिलें. चंद्रगुप्तानें स्वप्नांत द्वादश फणी नागसर्प पाहिल्याचें सांगितलें. बारा वर्षें दुर्धर दुष्काळ हें त्याचें फल असें भविष्य भद्रबाहूंनीं वर्तविलें, व हें भविष्य खरें ठरून दुष्काळास प्रारंभ झाला. आपला मुलगा सिंहसेन (बिंदुराज) यास राज्यपद देऊन, राज्य व संसार त्याग करून चंद्रगुप्तानें जिनदीक्षा घेतली व भद्रबाहूंच्या दाक्षिण देशास निघालेल्या संघास तो येऊन मिळाला. श्री भद्रबाहू, चंद्रगुप्त व संघांतील बारा हजार शिष्यसमुदाय श्रवण बेळगोळ येथें आल्यावर आपला काळ जवळ आला आहे असें भद्रबाहूंनीं जाणिलें व तेथेंच अखेरचा मुक्काम करण्याचें ठरविलें. तो भाग सुपीक असून धनधान्यादिकांनीं लोकसमृद्ध होता. हाच प्रदेश वस्तीस व धर्मप्रसारास योग्य व लायख असें ठरविण्यांत आलें. त्या भागास त्यावेळीं **कटवप्र** या नांवानें संबोधण्यांत येत असे. भद्रबाहूंनीं विशाख मुनींस उपदेश दिला; म्हणजे त्यास संघाचे मुख्याधिकारी नेमिलें. संघांतील शिष्यांनीं चोल, पांडय वगैरे दाक्षिण देशांत धर्मोपदेशासाठीं व धर्मप्रसारासाठीं जावें अशी अनुज्ञा केली. मौर्य कुलोत्पन्न राजा चंद्रगुप्त मात्र श्री भद्रबाहू स्वामींजवळ त्यांच्या परवानगीनें राहिला. यानंतर थोड्याच दिवसांनीं झालेल्या श्री भद्रबाहू स्वामींच्या निर्वाणसमयीं हजर राहण्याचें भाग्यहि त्यास लाभलें. श्री भद्रबाहू स्वामींच्या या आगमनासंबंधीं वरीलप्रमाणें आख्यायिका आहे; व देवचंदर यानें आपल्या या ग्रंथांत याचाच पुनरुच्चार केला आहे.

या आख्यायिकेवर, पुढें दिलेल्या पुराव्यावर व श्रवण बेळगोळ येथील शिलालेखावरहि कांहीं विद्वानांचा अद्याप संपूर्ण विश्वास बसत नाहीं. श्री भद्रबाहूंच्या या आगमनापूर्वीं दक्षिण हिंदुस्थानांत जैनधर्माचें व जैनांचें मुळींच अस्तित्व नव्हतें असें मानणें मात्र धोक्याचें होईल. पहिल्या प्रकरणांत यासंबंधीं विवेचन केलेंच आहे. श्री भद्रबाहू संघांतील बारा हजार शिष्यसमुदायाचा परामर्ष घेण्याएवढी तरी जैन वस्ती उज्जयनी अगर पाटलीपुत्र (पाटणा) यांपासून श्रवण बेळगोळच्या रस्त्यावर खास असावी असें अनुमान काढल्यास तें मुळींच चुकीचें होणार नाहीं.

जैनधर्माच्या प्राचीनतेविषयीं मेजर जनरल आर. फरलाँग (Forlong) हे आपल्या " Short studies in science of Comparative Religions " या पुस्तकांत पान २४३–२४४ वर लिहितात कीं " इ. सनाच्यापूर्वीं १५०० ते ८०० वर्षांच्या दरम्यान उत्तर, पश्चिम व मध्य हिंदुस्थानावर तुराणी लोक राज्य करीत असतां, सर्प, वृक्ष व लिंगादि पूजा प्रचारांत होती. याच वेळीं उच्च संस्कृतीचा, आध्यात्मिक विचाराचा व संन्यस्त वृत्तीचें आचरण करण्यास शिकविणारा असा एक सुसंघटित धर्म विद्यमान होता व तो धर्म म्हणजेच जैन धर्म होय. बौद्ध व वैदिक धर्मांतील संन्यासवृत्तीचीं पूर्वरूपें जैनधर्माच्या शिकवणुकींतून उद्भवलीं असावींत असें स्पष्ट दिसतें. " इ. फरलाँग साहेबांच्या या अभिप्रायांतील हा काल भगवान् पार्श्वनाथांच्या निर्वाणापूर्वींचा कांहीं शतकांचा व भगवान् नेमिनाथ यांच्या निर्वाणकालासमीपचा आहे असें दिसून येईल.

मगध देशचा राजा नंद यानें कलिंग देशावर केलेल्या स्वारीचा उल्लेख राजा **खारवेल** कालीन उदयगिरी येथील शिलालेखांत आहे. त्यावरून नंदराजानें आपल्याबरोबर आदिजिन—श्री वृषभनाथ—यांची प्रतिमा कलिंग देशांत नेली होती अगर आदिजिनांची सुवर्णमय मूर्ति कलिंग देशांतून हरण करून नेली होती असे शिलालेखांतील ' आणितस् ' या शब्दावरून दोन अर्थ निघतात. या शिलालेखांत कलिंग देशच्या राजास या मूर्तीच्या पदकमलीं आपलें मस्तक नमविण्यास लाविलें असें वर्णन आहे. यावरून त्या स्वारीच्या पूर्वीं कलिंग देशांत जैनधर्म अस्तित्वांत होता. निदान नंदराजाच्या स्वारीनंतर त्याचें अस्तित्व कलिंग देशांत खास दिसून येतें. महावीर स्वामींच्या निर्वाणानंतर सुमारें ६२ वर्षांनीं ही स्वारी झाली असावी असें डॉ. जार्ल कार्पेंटर, पीएच्. डी. यांचें मत आहे.

कलिंग देशावर नंदराजाची अनेक वर्षे सत्ता होती व हें नंदराजघराणें जैन-धर्मीय होतें.

नंदवंशाचे राजे जैनधर्मीय असल्याचें खारवेलच्या शिलालेखावरूनही स्पष्ट होत आहे. तीर्थंकर मूर्तीची पूजाअर्चा करण्याचें श्रेय लाभावें म्हणून त्यांनीं मगध देशांत त्या मूर्तीची प्रतिष्ठापूर्वक स्थापना केली. त्यावरून असें सिद्ध होतें कीं, या घराण्यांत जैनधर्मोपासक राजे होऊन गेले. नंदवंशीय राजे जैन होते असें जैन इतिहासवेत्त्यांनीं लिहून ठेविलें आहे; तें विश्वासार्ह दिसतें ( स्मिथकृत हिंदुस्तानचा प्राचीन इतिहास पान ११४; दक्षिणेंतील जैनधर्म खंड २ पान ८२ पहा ).

त्या भागांत अनेक लहान मोठ्या गांवांचीं जीं नांवें आजहि प्रसिद्ध आहेत त्यावरून या देशांत जैनधर्माचें वर्चस्व होतें असें उघड दिसून येणार आहे.

तसेंच ज्या भागांतील लोकांना जैनधर्म व जैन यासंबंधीं संपूर्णपणें अज्ञान असेल अशा प्रदेशांत एवढ्या मोठ्या समुदायासह श्री भद्रबाहू जातील असें मानणेंहि चुकीचें होईल.

वर जो पुरावा व जे अभिप्राय नमूद केले आहेत त्यावरून अंतिम श्रुतकेवली श्री भद्रबाहू स्वामींच्या दक्षिणेंतील आगमनापूर्वी अनेक शतकें जैनधर्माचा प्रसार दक्षिण–भारतांत झाला होता असें सिद्ध होत आहे.

## मौर्य सम्राट चंद्रगुप्ताचें दक्षिणेंतील आगमन–पुरावा.

अंतिम श्रुतकेवली श्री भद्रबाहू स्वामींच्या कालानंतर बारा वर्षे तपश्चरण करून मौर्य चंद्रगुप्तानें आपली इहलोकींची यात्रा संपविली. ज्या डोंगरावर त्यांचें प्राणोत्क्रमण झालें त्यास **चंद्रगिरी** पर्वत असें नामाभिधान प्राप्त झालें आहे. बेळगोळ येथें **"चंद्रगुप्त बस्ति"** नांवाचें देवालय सुप्रसिद्ध आहे. चंद्रगुप्त हा धर्मानें जैन होता व त्यानें राज्यत्याग करून चंद्रगिरी डोंगरावर प्राणोत्क्रमण केलें, ही दंतकथा नसून हें एक ऐतिहासिक सत्य आहे. याबद्दल भरपूर पुरावा आहे.

लहानमोठ्या मुदतीच्या व निरनिराळा प्रदेश ग्रस्त करणाऱ्या अनेक दुर्भिक्षांचें व दुष्काळांचें वर्णन "जातक कथांतून" मिळतें. अंगावर शहारे आणणाऱ्या दुर्गादेवी नांवाच्या दुष्काळाचें विस्मरण अद्याप झालेलें नाहीं. यावरून द्वादश-वर्ष दुष्काळाची कथा काल्पित नसून ती सत्यसृष्टींतील आहे; हें उघड आहे.

जैन आख्यायिका व श्रवण बेळगोळ येथील शिलालेखांत ज्याचा उल्लेख आला आहे तो मौर्य राजा चंद्रगुप्त नसून गुप्तीगुप्त नांवाचा कोणीतरी दुसराच इसम होता असें डॉ. फ्लीट यांनीं वारंवार व आग्रहानें प्रतिपादन केलें आहे. परंतु गुप्तीगुप्त या नांवाच्यां उल्लेखाचा तेथील कोणत्याही शिलालेखांत आढळ होत नाहीं. श्रवण बेळगोळ येथील शिलालेख तत्कालीन नाहींत हें जरी खरें असलें तरी त्यावरून ते विश्वासार्ह नाहींत असें मात्र मानितां येत नाहीं, सदरच्या शिलालेखाचा प्रथम शोधक "लुईस राईस" यानें मौर्य चंद्रगुप्त हा जैनधर्मीय होता व तो भद्रबाहूबरोबर दक्षिणेंत आला असेंच अधिकारयुक्त वाणीनें प्रतिपादन केलें आहे; व मि. थॉमससारख्या अनेक विद्वानांनीं मि. राईस यांच्या या मताचा जोरानें पुरस्कार केला आहे. डॉ. ल्यूमन ( Vienna oriental journal VII P. 382 ), डॉ. होर्नले (Indian Antiquary Vol XXI 59, 60), श्री. जयस्वाल (Journal of the Bihar and Orissa Research Society Vol. III ) वगैरे विद्वान् लोकांचें मत वरील विधानास पोषकच आहे. सुप्रसिद्ध प्रवासी मेगॅस्थेनीस यानें लिहिलेल्या आपल्या प्रवासवृत्तांतांतहि यास पुष्टिच मिळते. मेगॅस्थेनीस हा ग्रीस देशचा राजा सेल्युकस यानें मौर्य दरबारीं पाठविलेला वकील होता. ही गोष्ट विचारांत घेतां यानें दिलेली माहिती बिनचूक असावी व त्यानें आपल्या स्वतःचे माहितीवरून ती दिली असल्यानें या वृत्तांताला विशेष महत्त्व आहे. राजा चंद्रगुप्तानें **श्रमण धर्माचा** स्वीकार केला होता असें मेगॅस्थेनिसनें लिहिलें आहे.

**श्रमणधर्म** हा जैन धर्माहून भिन्न नसून त्यायोगें जैनधर्माचाच बोध अधिक होतो. बौद्धधर्मीय शास्त्रग्रंथाविषयीं प्रो. कर्न यांचें मत प्रमाणभूत मानलें जातें. अशोकाच्या धर्मप्रभावनेंत बुद्धधर्मापेक्षां जैनधर्माचाच छटा अधिक दिसते असें प्रो. कर्न यांचें स्पष्ट मत आहे. चंद्रगुप्तास बालवयांतच राज्याधिकार मिळाला व त्यानें फक्त २४ वर्षेंच राज्य केलें यावरून वयाच्या अवघ्या ५४ वर्षांच्या आंतच त्याचें देहावसान झालें होतें असें मानणें भाग आहे. इतिहासज्ञांनीं इ. स. पूर्व ३२२ ते इ. स. पूर्व २९८ म्हणजे ५४ वर्षें अशीच चंद्रगुप्ताची आयुर्मर्यादा निश्चित केली आहे. सम्राट् चंद्रगुप्त केव्हां, कोठें व कशानें मेला याबद्दल इतिहासकारांनीं मौनच स्वीकारलें आहे. समरांगणांत, आपल्या राज्यांत अगर वृद्धपणीं त्यास मरण आलें असतें तर त्याबद्दलचा उल्लेख इतिहासांत अगर इतर वाङ्मयांत खास मिळाला असता. या अभावाची खालील कारणें असावींत.

आपल्या राज्याचा त्याग करून दूरदेशीं गेल्यानें त्याच्या मृत्यूची बातमीहि त्याकाळीं त्याच्या राजवटींत लागणें संभवनीय दिसत नाहीं. तसेंच जैनधर्मांतील संन्यासदीक्षा घेतल्यानेंहि वैदिक धर्मानुयायांनीं या गोष्टीचा उल्लेख करण्याचें बुध्याच टाळलेंहि असावें. जैनधर्मीय दंतकथा असत्य, श्रवण बेळगोळ येथील शिलालेख अविश्वसनीय व "राजावली कथा" म्हणजे भाकडकथा, श्रमण म्हणजे बौद्धभिक्षू असें मानणें इतिहासकारांच्या दृष्टीनें खास चुकीचें ठरेल. मौर्य चंद्रगुप्त हा जैनधर्मीयच होता व राज्यत्यागानंतर तो दक्षिणेंत वारला याबद्दल वर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष जीं कारणें दिलीं आहेत; त्यावरून राजा चंद्रगुप्त मौर्य हा जैनधर्मीय होता व चंद्रागिरीवर वारला असेंच बहुतेक सर्व इतिहासकारांचें ठाम मत झालें आहे.

अंतिम श्रुतकेवली भद्रबाहू व चंद्रगुप्त मौर्य यांचा गुरुशिष्य संबंध व त्यांचें दक्षिणेंतील आगमन यासंबंधीं वर जीं कारणें दिलीं आहेत त्यांना पोषक असा पुरावा आहे अगर नाहीं हेंही पाहणें जरूर आहे. तसेंच चंद्रगुप्तानंतर त्या घराण्याचा धर्म कोणता होता; याबद्दलही विवेचन केल्यास या प्रकरणांतील मुख्य मुद्यावर प्रकाश पडून या बाबतींतील जैन इतिहास खरा इतिहास आहे अशी वाचकांची खात्री होईल असें वाटून पुढील विवेचन केलें आहे.

## इतर पोषक पुरावा

अंतिम श्रुतकेवली श्री भद्रबाहू स्वामी व त्यांचा शिष्यवर्य मौर्य कुलोत्पन्न राजा चंद्रगुप्त यांचा अन्योन्य संबंध श्रवण बेळगोळ येथील शिलालेखांत दिला आहे. कित्येकांचे मतें हे शिलालेख इ. सनाच्या सातव्या शतकांतील व इतरांच्या मतें इ. सनाच्या ९ व्या शतकांतील असावेत असें आहे. इ. सनाच्या चौथ्या शतकांत यतिवृषभ नांवच्या दिगंबर जैनाचार्यांनीं लिहिलेल्या त्रिलोक्यप्रज्ञप्ति नांवच्या ग्रंथांत सम्राट् चंद्रगुप्तानें जिनदीक्षा घेतल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. त्याशिवाय **हरिसेनाचार्यांनीं** शके ८५३ (इ. स. ९२१) मध्यें लिहिलेल्या **बृहत्कथाकोश** नांवाच्या ग्रंथांत अंतिम श्रुतकेवली श्री भद्रबाहूंचा चंद्रगुप्त नांवाचा राजा शिष्य होता असें लिहिलें आहे. **राजनंदी** नांवाच्या जैनपंडितानें शके १४५० मध्यें लिहिलेल्या **भद्रबाहू चरित्रांतहि** हरिसेनाचार्यांच्या या मताचा अनुवाद केला आहे. शके १६०२ मध्यें **चिदानंद** कवीनें लिहिलेल्या 'म्युनिवंशाभ्युदय' नांवाच्या कन्नड काव्यांतहि भद्रबाहू व चंद्रगुप्त या गुरुशिष्यांच्या नांवाचा उल्लेख आहे; व पंडित **देवचंदर** यानें शके १७६१ मध्यें लिहिलेल्या "राजावली कथा" या ग्रंथांत त्याचा पुनरुच्चार केला आहे.

याशिवाय **आराधनाकथाकोश व पुण्याश्रवकथाकोश** आदि ग्रंथांत यासंबंधीं उल्लेख आहेत. यावरून भद्रबाहूंच्या निर्वाणानंतर **पांचशें** वर्षांपासून आज पंधराशें वर्षांपेक्षां अधिक सुदीर्घ अशा कालांत मौर्य कुलोत्पन्न राजा चंद्रगुप्त हा अंतिम श्रुतकेवली भद्रबाहूचा शिष्य होता असेंच मानिलें जात आहे. हरिसेनाचार्यांनीं शके ८५३ मध्यें बृहत्कथाकोशांत असा नसता संबंध जोडण्याचें कांहींच कारण नव्हतें. तत्पूर्वीच्या आख्यायिका व दंतकथा यांना त्यांनीं आपल्या ग्रंथांत स्थान दिलें; तसेंच या काळापूर्वींच्या दुसऱ्याहि ग्रंथांत या गुरुशिष्यसंबंधाचा उल्लेख असणें संभवनीय आहे व तसे ग्रंथ मिळण्याचा संभव सर्वस्वी नष्टच झाला असेंहि मानितां येत नाहीं; कारण अनेक ग्रंथ अद्याप अज्ञात आहेत इ. सनाच्या चौथ्या शतकांतील **त्रिलोक्यप्रज्ञप्ति** या ग्रंथांत चंद्रगुप्तानें जीनदिक्षा घेतल्याचाच फक्त उल्लेख आहे. वर ज्या इतर आधारांचा उल्लेख केला आहे, त्यांत चंद्रगुप्त श्री भद्रबाहूबरोबर दाक्षिणेंत आल्याचेंही कथन केलें आहे. हरिसेनाचार्यांचा काल व चंद्रगुप्ताचे दक्षिणेंतील आगमनाचा काल यांत सुमारें १२०० वर्षांचें अंतर आहे. चंद्रगुप्त मौर्य हा जैनधर्मीय होता असें जैनधर्मीय म्हणतात व तें शाबीत करण्यासाठीं प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष लेखी व परंपरागत आख्यायिका यांचा भरपूर व बिनतोड पुरावाहि देतात. या पुराव्याचें खंडन करणारा व मारक असा कोणताही पुरावा हिंदुधर्मीयांना आजवर पुढें करतां आला नाहीं हें वाचकांनीं जरूर लक्षांत ठेवावें.

सम्राट् चंद्रगुप्त मौर्य हा जैनधर्मीय असल्याबद्दल, अंतिम श्रुतकेवली श्री भद्रबाहू स्वामी हे चंद्रगुप्ताचे गुरु असल्याबद्दल व त्यानें जैनमुनिदीक्षा घेऊन जैनधर्माचा प्रसार केला याबद्दल वरील इतिहास वाचूनही कोणा वाचकांच्या मनांत शंका असल्यास मि. गॅरेट यांचें पुढील मत वाचून तरी ती दूर होईल अशी उमेद आहे.

## मि. गॅरेट यांचें मत.

**चंद्रगुप्त मौर्य** या नांवाच्या आपल्या निबंधांत मि. गॅरेट लिहितात कीं, " चंद्रगुप्त हा जैनधर्मीय होता. मोठ्या दुष्काळाचे वेळीं त्याचें दक्षिणेंत आगमन झालें व तेथेंच तो मोक्षगामी झाला. इ. स. पूर्वी २९८ च्या सुमारास त्यानें राजत्याग केला असावा असें स्पष्ट दिसतें. " इत्यादि.

## मौर्य साम्राज्यके जैनवीर

मौर्य सम्राट् चंद्रगुप्त, बिंदुसार, अशोक व संप्रति आदिसंबंधीं विशेष माहिती **मौर्य साम्राज्यके जैनवीर** या पुस्तकांत मिळेल. जिज्ञासूंनीं तें पुस्तक एकवार तरी जरूर वाचावें.

## आर्य चाणक्य

सुप्रसिद्ध ' अर्थशास्त्र ' या ग्रंथाचा लेखक आर्य चाणक्य—कौटिल्य—चंद्रगुप्त मौर्याचा प्रधान होता असें इतिहासज्ञ मानितात. या सुप्रसिद्ध ग्रंथांत जैनधर्म-तत्त्वज्ञानाचा कांहीं सुगावा लागतो अगर कसें हें पाहणेंही जरूर आहे.

आर्य चाणक्य जन्मतः ब्राह्मणकुलोत्पन्न होता; परंतु सम्राट् चंद्रगुप्ताचे सहवासानें त्याच्यावर जैनधर्माच्या तत्त्वाचा पगडा बसला असावा असें दिसतें. त्यानें आपल्या नीतिसूत्रांमध्यें जैनधर्म-प्रभावनेला कारणीभूत असे जैनाचारविषयक कांहीं सिद्धांत लिहिले आहेत.

"दया धर्मस्य जन्मभूमिः" "अहिंसा लक्षणो धर्मः"
"मांसभक्षणमयुक्तं सर्वेषाम्" "विज्ञानदीपेन संसारभयं निवर्तते"
"सर्वमनित्यं भवति"

इत्यादि वचनें त्यानें जैनधर्म-कांडांतून घेतल्याचें दिसतें. त्यानें आपल्या अर्थशास्त्रांत असा एक उल्लेख केला आहे कीं, सम्राटानें नगराच्या पाठीमागच्या बाजूला **विजय, वैजयन्त, जयन्त** आणि **अपराजित** या नांवाच्या देवतांची प्रतिष्ठापना केली होती. ह्या चारहि देवता जैनांच्याच आहेत. चाणक्याची श्रद्धा जैनधर्मावर असल्याचें व अंत्यसमयीं चाणक्यानें जैन शास्त्रानुरोधानें जैन **मुनिदीक्षावृत्ति** अंगिकारल्याचें दिसतें.

सुप्रभातानंतर सूर्याचे कोमल किरण पृथ्वीवर पडूं लागतात, मध्यान्हकालीं प्रज्वलितावस्थेंत देदिप्यमान दिसतात; पण संध्यासमयीं अस्तंगत होऊन नष्ट पावतात. या निसर्गनियमाचा कित्ता गिरविण्याच्या हेतूनेंच कीं काय या पवित्र अशा भारतभूमीवर पुष्कळ बलाढ्य राज्यें निर्माण झालीं व विलयालाहि गेलीं. या नियमाला नंदवंशीय राजे तरी कसा अपवाद ठरणार?

नंदांच्या नाशानंतर मौर्यांचा महाप्रतापी सूर्य भारतभूच्या राजकीय क्षितिजावर तळपूं लागला. राजा चंद्रगुप्तानें राजकार्यधुरंधर अशा चाणक्य प्रधानाच्या सहाय्यानें मगध देशाचीं राज्यसूत्रें आपल्या हातीं घेतलीं. चंद्रगुप्त हा कार्यकुशल, निर्भीड, अद्वितीय योद्धा होता. थोड्याच अवधींत सर्व भारतवर्ष आपल्या सत्तेखालीं आणून "भरतभूचा प्रथम सम्राट्" अशी पदवी त्यानें स्वपराक्रमानें मिळविली व मौर्य राज्यघराणें स्थापन करण्याचा मान मिळविला.

## सेल्यूकस व चंद्रगुप्त

ग्रीस देशाचा बादशाहा शिकंदर याचा विश्वासू सरदार सेल्यूकस हा हिंदुस्थानावर चालून आला असतां मौर्य चंद्रगुप्तानें त्याचा अभूतपूर्व पराभव केला. या अपमानाचें भयंकर शल्य हृदयीं बोंचत असतांना सुद्धां चंद्रगुप्ताच्या प्रभावापुढें आपला टिकाव लागणें शक्य नाहीं हें जाणून त्यानें हिंदुस्थानकडे पुनः आपल्या ह्यातींत दृष्टि वळविली नाहीं. शिकंदराचें देहावसान इ. स. च्या पूर्वीं ३२३ साव्या वर्षी झालें. शिकंदराचा विश्वासू सरदार सेल्यूकस यानें शिकंदराच्या मरणानंतर हिंदुस्थानवर स्वारी केली. पण त्याच्याहि प्रयत्नाला फळ आलें नाहीं. मात्र पराभवामुळें काबूल, कंदाहार व हिरात पर्यंतचा सर्व भाग सम्राट् चंद्रगुप्तास मिळाला. सेल्यूकसलाहि चंद्रगुप्ताची भीति वाटूं लागली. चंद्रगुप्ताशीं मैत्री केल्याशिवाय आपल्या राज्यांत सौख्य नांदणार नाहीं अशी त्याची दृढ भावना झाल्यामुळें त्यानें आपल्या कन्येचा विवाह सम्राट् चंद्रगुप्ताबरोबर घडवून आणून मैत्री दृढ केली. ऐतिहासिक काळांतील भारतभूचा प्रथय सम्राट् जैनधर्मीय होता हा अभिमान बाळगणारे जैन या विवाहाबद्धल काय म्हणणार ??

## मौर्य वंशज बिंदुसार

चंद्रगुप्तानंतर त्याचा पुत्र बिंदुसार ( सिंहसेन ) राजा झाला, तोहि वडिलाप्रमाणें मोठा पराक्रमी व नीतिमान् होता. जन्मतःच जैन धर्मानुयायी असल्यामुळें त्यानें जैनधर्म-प्रचारकाचें कार्य उत्कृष्ट रीतीनें घडवून आणलें. "राजाचा जो धर्म तोच प्रजेचा धर्म" या सर्वसाधारण नियमास अनुसरूनच कीं काय त्याच्या प्रजेनें जैनधर्माचा स्वसंतोषानें अंगिकार व प्रसार केला. त्याच्या कारकीर्दींत जैनधर्माच्या क्षितिजावर बौद्ध व वेदान्तरूपी थयथय नाचणारीं अभ्रें जैन तत्त्वज्ञानाच्या झंझावाताभुळें हेलकावे खाऊन हवेंतच निश्चल राहण्याच्या पंथास लागलीं होतीं. जैनांच्या दृष्टीनें हा काळ अत्यंत भरभराटीचा होय.

जैन शास्त्रांमध्यें याच बिंदुसार या राजाला "सिंहसेन" म्हणून संबोधिल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें. इ. स. पूर्वी सुमारें ३०० वर्षें तो मगध देशावर राज्य करीत होता. या राजाविषयीं जी माहिती उपलब्ध आहे त्यावरून या राजाचा संबंध पुष्कळ विदेशी राजे लोकांशीं आला होता, हें मात्र स्पष्ट दिसत आहे.

## मौर्य राजा अशोक

महाराजा बिंदुसार याचे पश्चात् मगध देशाचा राजमुकुट राजा अशोकानें धारण केला. तोही वडिलांप्रमाणें शूर, वीर व महाप्रतापी योद्धा होता. त्याच्या तक्षशिलेच्या प्रशस्तिमध्यें व राजाज्ञांत भगवान् पार्श्वनाथ तीर्थंकर यांचेबद्दल स्तुतिपर उल्लेख आढळ होत आहेत.

अशोकानें धर्मांतर करून बौद्धधर्माचा स्वीकार केला; व स्वाऱ्या शिकाऱ्या करून राज्यविस्तार करण्याचेंहि सोडून दिलें; एवढेंच नव्हे तर बौद्धधर्माचा प्रसार करण्यासाठीं अनेक ठिकाणीं राजाज्ञा प्रसिद्ध केल्या असें मानिलें जातें. या राजाज्ञेंत बौद्धधर्म-प्रचाराचा हेतु वरवर पाहणाऱ्यांना दिसतो; परंतु बौद्धधर्मासंबंधीं ज्यांचें मत प्रमाणभूत मानिलें जातें त्यांनी मात्र या राजाज्ञेंत बौद्धधर्मापेक्षां जैनधर्माच्याच शिकवणीची व प्रसाराची छटा अधिक दिसते. बौद्धधर्मीय शास्त्रग्रंथासंबंधीं प्रो. कर्न यांचें मत प्रमाणभूत मानिलें जात आहे. अशोकाच्या राजाज्ञेंत व धर्मप्रभावनेंत बौद्धधर्मापेक्षां जैनधर्माचीच छटा अधिक दिसतें असें स्पष्ट मत प्रो. कर्न यांनीं दिलें आहे. दक्षिण हिंदुस्थानांत बौद्धधर्माचा प्रसार होण्यापूर्वींच या भागांतील रहिवाश्यांची अहिंसावादाकडे मनोवृत्ति वळविण्याचें श्रेय जैनधर्मीयांसच आहे. विशिष्ट देवदेवतांच्या नांवाखालीं अशी अनुकूल परिस्थिति निर्माण करण्याचा प्रयत्न जैनाचार्यांनीं केला नाहीं. जैनधर्मीयांनीं निर्माण केलेल्या या अनुकूल वातावरणाचा फायदा बौद्धधर्मीयांनीं करून घेतला व त्यांनीं आपल्या धर्मप्रसारकार्यास सुरवात केली. स्वमतप्रसारार्थ बौद्धांनीं स्वीकारलेल्या या मार्गाचें जैनधर्मीयांनीं अधिक प्रमाणांत अवलंबन केलें. यामुळें निरनिराळ्या धर्मप्रवर्तकांमध्यें वितुष्ट वाढून त्याचें जैनधर्मीयांच्या छळांत पर्यवसान झालें. सारांश, जैनाचार्यांनीं आपल्या मताचा प्रसार प्रच्छन्नरीतीनें अनेक शतकें केला. जैनधर्मीय कुरळ ग्रंथ व अशोकाच्या राजाज्ञा हे या विधानाची साक्ष देत आहेत.

राजा अशोक प्रथम जैनधर्मीय होता व नंतर त्यानें बौद्धधर्मांचा स्वीकार केला असावा असें डॉ. लॉर्ड कॅनिंग यांचें मत आहे. खालीं नमूद केलेल्या ऐतिहासिक प्रसंगावरून त्यांनीं आपलें मत बनविलें असावें असें दिसतें. तो प्रसंग असाः—

इ. स. पूर्वी २६२ च्या सुमारास राजा अशोकानें कलिंग देशावर स्वारी केली. घनघोर युद्ध झाल्यामुळें भयंकर रक्तपात व प्राणहानि झाली. युद्धांत झालेली भीषण कत्तल त्यानें प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिली. त्याचा परिणाम त्याच्या दयार्द्र मनावर होऊन त्याच्या हृदयाला दयेचा पाझर फुटला. आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत हिंसा करणार नाहीं अशी त्यानें भीष्म प्रतिज्ञा केली. भूतदयेनें त्याच्या हृदयमंदिरांत कायमची वस्ती केली. प्रजेच्या सौख्यवृद्धीसाठीं त्यानें अतिशय कष्ट सहन करून प्रति रामराज्य स्थापण्यास सुरवात केली.

याच सुमारास एका बौद्धभिक्षूचें त्याजकडे आगमन झालें. त्या भिक्षूनें त्याला अहिंसेचें महत्त्व सांगून त्याच्या मनावर आपला पगडा उत्तम प्रकारें बसविला; परंतु त्यानें त्याक्षणीं बौद्धधर्मांचा स्वीकार केला नाहीं. मात्र अहिंसा तत्त्वाचा अढळ परिणाम त्याच्या मनावर झाला. कोणत्याहि जैन साधूनें राजा अशोकाजवळ जाऊन जैनधर्मांतील अहिंसेची शिकवण देण्याची संधी साधली नाहीं. त्याचा परिणाम मात्र जैनधर्मास थोडासा बाधक झाला. सम्राट् चंद्रगुप्त किंवा बिंदुसार यांनीं जैन-धर्मप्रसारार्थ जेवढे श्रम घेतले, तेवढे किंवा त्याच्यापेक्षां कांकणभर जास्त श्रम राजा अशोकानें बौद्धधर्मप्रसारार्थ घेतले. सर्व भारतवर्षभर बौद्धधर्मांचा यशोदुंदुभि गाजला; हें त्याच्या श्रमाचें दृश्य फल होय. परंतु एवढें झालें तरी जैन अगर वैदिक धर्मीयांना द्वेषाची अगर निष्ठुर छळवणुकीची झळ लागली नाहीं हें खास.

## अशोकाचा दार्शनिक सिद्धांत

अशोकाचा दार्शनिक सिद्धांत जैन मतानुसार आहे. “ आत्मा अविनाशी आहे ” “ धर्मांच्या नांवावर यज्ञामध्यें कोणीहि हिंसा करूं नये; धर्मांचें पालन प्रत्येक प्राणि-मात्रानें करावयास पाहिजे ” “ आत्म्याची उन्नति करून पुण्यसंचय करण्यास कोण-त्याहि ब्राह्मणाच्या मध्यस्थीची अवश्यकता नाहीं; जो तो आत्मकल्याण साधण्यास स्वतंत्र आहे ” वगैरे जो उपदेश महावीर प्रभूंनीं तत्कालीन श्रावकांना दिला होता, त्याचेंच अनुकरण अशोकच्या राजाज्ञेंत आहे, यावरून व अशाच इतर अनेक महत्त्वाच्या गोष्टींवरून राजा अशोक याचा धर्म कोणता याबद्दल मतभेद माजून राहिला आहे.

अशोकाच्या कारकीर्दीत कोणत्याही धर्मानुयायांचा छळ झाला नसल्याचें वर लिहिलेलेंच आहे. कांहीं लोकांचें मत असें आहे कीं त्याचा कल बौद्धधर्माकडेच जास्त होता तथापि त्याच्या शासनपद्धतींत बौद्धधर्मांतलि कोणताहि नियम सांपडत नाहीं. "दीन इलाही" यासारखें नवीन मत प्रस्थापित करण्यांत सम्राट् अकबराप्रमाणें त्यानें प्रयत्नहि केले नाहींत, पण त्याची धार्मिक प्रवृत्ति अकबरासारखीच सर्वांशीं समतेची व सहिष्णुतेची होती. तो जर जैनधर्मीच होता तर त्याचा उल्लेख जैन-शास्त्रांत कोठेंच कां सांपडत नाहीं अशी शंका कोणीहि काढील; जैन शास्त्रांत त्याबद्दल उल्लेख नाहीं सबब तो जैन नव्हता असें मानणें सयुक्तिक दिसत नाहीं. महाराजा महामेघवाहन खारवेल यानें जैनधर्माची प्रभावना केली असतांना देखील अनेक जैनग्रंथांत त्याचा नामनिर्देश सांपडत नाहीं; त्याप्रमाणेंच अशोकाचें झालें असल्यास नवल नाहीं. परंतु अशोकाच्या राजाज्ञा त्या ज्या ज्या स्तंभावर सांपडतात त्या त्या स्तंभावर जैनांचीच चिन्हें दृग्गोचर होतात. सिंह, हत्ती हीं जैनांचीं मान्य असलेलीं शुभ व धर्मचिन्हें होत. हीं शुभ व धर्मचिन्हें अशोकानें उभारलेल्या बहुतेक स्तंभावर आढळतात; यावरून तो जैनधर्मीय असलाच पाहिजे असें मानल्यास तें चुकीचें खास होणार नाहीं.

## अशोकाचा खरा धर्म

हल्लीं, कांहीं विद्वानांचें मत असें आहे कीं गादीवर बसल्यापासून ९ व्या वर्षी राजा अशोक बौद्धधर्माचा उपासक बनला. डॉ. कर्न व डॉ. सेनार्ट व मि. हल्श-साहेब वगैरे संशोधकांनीं सिंहलीय ग्रंथाच्या आधारावर त्याला बौद्धधर्मीय मानिलें परंतु या मताविरुद्ध पुष्कळ विद्वानांचीं मतें असून त्यांच्यामध्यें डॉ. फ्ली, मि. मैकफैल, मि. मोनहन, मि. हेरास व डॉ. भांडारकर वगैरे विद्वत्‌रत्नांचा समावेश करता येतो. अशोकची शासनपद्धति जैनधर्मानुसार होती हें सर्वसम्मत असल्याचें दिसून येतें; मात्र त्याच्या धर्माबद्दल एकवाक्यता अद्याप न झाल्यानें राजा **अशोकचा लौकिक-धर्म बौद्धधर्म** व **अंतर्यामींचा धर्म जैनधर्म** असावा अशी तडजोड राजा अशोकाच्या एकंदर चरित्रावरून काढण्याचा विद्वानांचा प्रयत्न दिसतो. अशा स्थितींत राजा अशोकचा खरा धर्म कोणता याबद्दल अधिक चिकित्सा आज करण्यांत अर्थ तो कोणता?

इतिहासज्ञांनीं मौर्य वंशाचा राज्यकाल पुढीलप्रमाणें निर्णीत केला आहे.

| | |
|---|---|
| चंद्रगुप्त | इ. स. पूर्व ३२२ ते इ. स. पूर्व २६८ |
| बिंदुसार | इ. स. पूर्व २६८ ते इ. स. पूर्व २७२ |
| अशोक | इ. स. पूर्व २७२ ते इ. स. पूर्व २३२ |
| कुनाल | इ. स. पूर्व २३२ ते इ. स. पूर्व २२४ |
| दशरथ | इ. स. पूर्व २२४ ते इ. स. पूर्व २१६ |
| सम्प्रति | इ. स. पूर्व २१६ ते इ. स. पूर्व २०७ |

दशरथ व संप्रति हे अशोकाचे नातू होत. या संप्रतीनें जैनधर्मप्रसारार्थ दक्षिणेंत उपदेशक पाठविले होते असें पाश्चात्य विद्वानांचें ठाम मत आहे. मध्ययुगीन चरित्र कोश यांत पान ८०१ संप्रति मौर्य या संबंधीं खालील माहिती दिली आहे. चरित्रकोशकार लिहितात कीं " बौद्धवाङ्मयांत जें अशोकाला महत्त्व आहे तें महत्त्व याला जैनवाङ्मयांत आहे. यानें जैनधर्मांचे प्रचारक हिंदुस्थानबाहेरील देशांत पाठविले होते. यानें योद्ध्यांनाहि साधूंचा वेष देऊन धर्मप्रचाराकरितां रवाना केले.' यानंतर मौर्य राज्यसंस्थापक चंद्रगुप्त हा अन्तिम श्रुतकेवली भद्रबाहूबरोबर दक्षिणेंत आला नसून हा संप्रति ज्यास दुसरा चंद्रगुप्त असें संबोधिलें जातें, हा दक्षिणेंत आल्याचें या कोशांत लिहिलें आहे; परंतु कोशकारांचें हें मत ग्राह्य मानण्यास अनेक अडचणी आहेत. चंद्रगुप्त हा जैनधर्मीय नव्हता हें दाखविण्यासाठीं तर हा प्रत्यत्न नसेलना ! या संप्रतीनंतर शालिशुक, देववर्मा व देववर्मांचे पुत्र शतधनुष व बृहद्रथ असे चार राजे होऊन गेले व इ. स. पूर्वी १८४ सालच्या सुमारास मौर्य सत्ता नष्ट झाली. मौर्य घराण्यासंबंधीं साग्र माहिती "मौर्य साम्राज्यके जैनवीर" ( लेखकः—अयोध्या प्रसाद गोयलीय ) या पुस्तकांत मिळेल.

## २२४० वर्षांपूर्वीचा क्रांतिकारक प्रसंग

सारांश, मौर्य चंद्रगुप्त हा जैनधर्मीय होता. श्रुतकेवली भद्रबाहूबरोबर तो दक्षिणेंत आला व चंद्रगिरीवर त्याचें देहावसान झालें. अंतिम तीर्थंकर महावीराच्या निर्वाणकालानंतर १६२ वर्षांनीं अंतिम श्रुतकेवली श्री भद्रबाहूस्वामी कालवश झाले, असें दिगंबर आम्नायी मानितात. श्वेतांबर सांप्रदायाप्रमाणें व हरमन जेकोबी यांच्या मतें ही गोष्ट श्री महावीरानंतर १७८ वर्षांनीं घडली असें आहे. यावरून सुमारें २२४० वर्षांपूर्वी हा चिरपरिणामी क्रांतिकारक प्रसंग घडून आला असें होत आहे.

## या आगमनाचे इष्ट व अनिष्ट परिणाम

मगध देशांतील या द्वादश वर्ष दुष्काळामुळें श्री भद्रबाहू स्वामींचें दक्षिणेंत आगमन झालें व या आगमनामुळें दक्षिण हिंदुस्थानचें धार्मिक, सामाजिक, राजकीय व वाङ्मयविषयक बाबतींत स्थित्यंतर घडून, दाक्षिणात्यांना उत्तम संस्कृतीचा लाभ झाला. हा दुष्काळ दाक्षिणात्यांच्या पथ्यावर पडून जैनधर्माचा विस्तार अनेक पटींनीं झाला; व एका श्रेष्ठ संस्कृतीच्या सहवासांत सुमारें १५०० वर्षांच्या काळांत आपली सर्वांगीण उन्नति करून घेण्यास त्यांना संधि मिळाली हें खरें; परंतु दुसऱ्या दृष्टीनें पहातां या दुष्काळानें चिरकाल टिकणारी भली मोठी आपत्ती आणिली; व ती आपत्ती म्हणजेच श्वेतांबर पंथाची स्थापना. दिगंबर व श्वेतांबर हा भेद इ. स. पूर्वी ८० व्या वर्षी पडून, जैन धर्मीयांमध्यें दुहीचें बीजारोपण या दुष्काळाच्या पोटीं कायमचेंच झालें. जैन समाज आज दोन हजारापेक्षां अधिक वर्षें त्याचीं कटु फळें भोगीत आला आहे.

## आचार्यपरंपरा

चंद्रगुप्तानंतरच्या आचार्यपरंपरेची माहिती श्रवण बेळगोळ येथील नं. १७ (शके ५७२); नं १८ (श. ६२२); व नं. ४७; ५४, व १०८ १४५ च्या शिलालेखावरून मिळते. यावरून यतिंद्रकुंद हे पहिले आचार्य व तत्त्वार्थसूत्र कर्ते उमास्वामी हे द्वितीय आचार्य होत. गृध्रपिंछ व त्यांचे शिष्य बलाकपिंछ हे तिसरे आचार्य होत. पांचवे आचार्य समंतभद्र हे राष्ट्रकूट राजाच्या सुरवातीस प्रसिद्धीस आले. श्रवण बेळगोळ येथील ४४ च्या शिलालेखांत समंतभद्राचार्यांचें साद्यन्त महत्त्व वर्णन केलें आहे. दक्षिणेंतील संस्कृत वाङ्मयक्षेत्रांतही समंतभद्राचार्यांनीं क्रांति घडवून आणिली. समंतभद्राचार्यांचा "आप्तमीमांसा" हा ग्रंथ अद्वितीय आहे. समंतभद्रानंतर शेंकडों जैन विद्वानांनीं अनेक विषयावर कानडी, तामील, तेलगू व संस्कृत भाषेंत ग्रंथरचना करून या भागांतील वाङ्मय सजविलें, व सर्व बाजूंनीं दक्षिण हिंदुस्थानास ऊर्जितावस्था आणण्यास जैनधर्मीयांचे श्रम कारणीभूत झाले. **सिंहनंदी** आचार्यांच्या मदतीनें गंगवंशीय राज्य स्थापन झालं. जैनेंद्र व्याकरणाचे कर्ते **पूज्यपादाचार्य** व वादविवादपटु **अकलंकाचार्य** यांचीही कीर्ति अजरामरच रहाणार आहे.

याच अकलंकाचार्यांनीं कांची देशांतील हिमशीतल गांवीं बौद्धधर्मीय पंडितांस वादविवादांत पराजित करून बौद्धधर्माचें दक्षिणेंतून उच्चाटन करण्याचें श्रेय संपादन केलें. अकलंकदेवाचा हा विजय संपादन झाल्यास आज ११४४ वर्षें लोटून गेलीं. (स. ७८८). इ. स. पूर्वी ३०५ वर्षें म्हणजे आज सुमारें २२४२ वर्षांपूर्वी श्री भद्रबाहू स्वामींचें दक्षिणेंत आगमन झालें व त्यानंतर अकलंकदेवाच्या विजया-पर्यंतच्या दरम्यानच्या ११०० वर्षांच्या दीर्घ कालांत तामिल, तेलगू व कानडी भाषा प्रचारांत असणारे देश विचारानें व आचारानें जैनमय होऊन राहिले होते. हजार अकराशें वर्षांपूर्वीचे आम्हां जैनांच्या पूर्वजांचे रणांगणावरील पराक्रम, धार्मिक व वाङ्मय शास्त्रांतील विजय व सामाजिक क्षेत्रांतील क्रांति वगैरे गोष्टी आज आपणांस लज्जेनें मान खालींच घालण्यास लावतील.

## उत्कर्ष काल व त्याचीं कारणें

भद्रबाहू स्वामींच्या दक्षिणेंतील आगमनापासून ( इ. स. पूर्वी ३०५ ) श्री भट्टाकलंकदेवापर्यंतच्या व भट्टाकलंकानंतरच्या पुढील ४००-५०० वर्षांच्या म्हणजे श्री भद्रबाहूंच्या दक्षिण भारतांतील आगमनापासून पुढें सुमारें १६०० वर्षांच्या सुदीर्घ कालांत हजारों अन्य धर्मीयांनीं जैनधर्माचा स्विकार केला. एकाच कुटुंबांत पतिपत्नींचा, पितापुत्रांचा व बहिणभावंडांचा धर्म निरनिराळा असे. परंतु त्यामुळें त्यांचा सामाजिक व्यवहारांत कोणताहि व्यत्यय येत नसे. क्वचित् प्रसंगीं एकच व्यक्ती आपले आयुष्यक्रमांत अनेक वेळां धर्मांतरहि करीत असें असें अप्पर यांच्या चरित्रावरून दिसून येतें. हा गतेतिहास विचारांत घेतां अन्य धर्मीयांना जैन-धर्माची दीक्षा देणें शास्त्रबाह्य नाहीं असें स्पष्ट दिसून येणार आहे. इतिहासाकडे दृष्टि न देतां श्री जिनसेनाचार्यांच्या मताकडे बोट दाखविणाऱ्यांची दृष्टि किती सदोष आहे हेंही यावरून कळून येईल.

## जैन इतिहासाची जरूरी

जैनधर्मीयांच्या कर्तबगारीची सर्वच माहिती अद्याप उपलब्ध झालेली नाहीं; तसेंच उपलब्ध झालेली माहिती संकलितहि झालेली नाहीं. निरनिराळ्या विषयांचा उहापोह करितांना जरूर तेवढ्याच प्रसंगीं जैन व जैनधर्मासंबंधीं माहितीचा पौर्वात्य व पाश्चात्य विद्वानांनीं नामनिर्देश केलेला आहे.

कोणाहि विद्वानांच्या नजरेस आजवर न आलेले हजारों शिलालेख आहेत तसेंच नजरेस येऊन प्रसिद्ध न झालेल्या शिलालेखांची संख्याहि कमी नाहीं. अद्याप सूर्यदर्शनही झालेलें नाहीं असे अनेक जैनग्रंथ आहेत व त्या सर्वांहून अत्यंत खेदप्रद व दुःखदायी बाब म्हणजे जैन धर्मीयांची आपल्या पूर्वजाबद्दलची नितांत अनास्था ही होय. अनास्थेच्या या महान पातकांतून व आपल्या पूर्वजांच्या ऋणांतून जैनसमाज केव्हां मुक्त होईल तो सुदिन होय! नवीन देवालयें बांधविणाऱ्या व नांवलौकिकासाठीं संघ काढून प्रतिवर्षी लाखों रुपये खर्च करणाऱ्या श्रीमान् जैनांचें लक्ष इतिहास-संशोधनाकडे केव्हां जाणार? अशा कार्यांनीं जैनधर्माची खरी प्रभावना होणार नसून यापुढें जैनधर्मांतील उत्कृष्ट ग्रंथांचें श्रमपूर्वक परिशीलन करून त्याचें ज्ञान अखिल जगास करून देण्यांत व जैनधर्मीयांनीं जगावर केलेल्या उपकारांचा इतिहास लिहिण्यांत खरी धर्मप्रभावना होणार आहे.

आपल्या पूर्वजांच्या तेजस्वी इतिहासाचें ज्ञान निर्जिव शिलालेखावरून, ताम्रपटावरून, ताडपत्रावरून, व अशाच साधनांनीं आज होत आहे. जैन व जैनधर्माचें आस्तित्व याहीपुढें राखण्यास जैनवाङ्मय व जैन इतिहासच समर्थ आहेत; म्हणूनच अशा वाङ्मयाचा सांभाळ व प्रसार करण्यांतच खरीखुरी धर्मप्रभावना आहे.

तामिल प्रांतांतील जैन, जैनधर्म व जैनवाङ्मय वगैरेबद्दल यापुढील चार प्रकरणें खर्चीं घातलीं आहेत. त्या प्रकरणांत दिलेली माहिती प्रायः अनेकांना ज्ञात नाहीं असें समजून थोड्या विस्तारानें ती माहिती दिलीं आहे. उपलब्ध जैन-वाङ्मयांत तामिल-वाङ्मयाला आद्यस्थान दिलें जात आहे. त्यामुळेंहि या पुस्तकांत प्रथम त्याकडे वळणेंच उचित होईल.

# प्रकरण तिसरें

## तामील प्रांत व जैनधर्म

तामील प्रांतांत जैनधर्माचा प्रवेश केव्हां झाला हें निश्चयानें सांगणें आज तरी अशक्य आहे; कारण हिंदुस्थानच्या अगदीं दक्षिण भागांतील जैनांचा संगतवार इतिहास लिहिण्यास जरूर ती सामुग्री अद्याप भरपूर उपलब्ध नाहीं. राजावलीकथा या ग्रंथाचा मागें नामनिर्देश केला आहे. व त्या ग्रंथांत चोल व पांड्य प्रदेशांत विशाख मुनी विहार करीत असतां तेथील जिनमंदिरांतील जिन बिंबाची पूजाअर्चा केल्याचा व जैनधर्मीयांना उपदेश केल्याचा उल्लेख असल्याचें लिहिलें आहे. यावरून श्री भद्रबाहूंच्या निर्वाण कालापूर्वींच ( ख्रिस्तपूर्व ३०५ ) दक्षिण हिंदुस्थानच्या अगदीं दक्षिण टोंकापर्यंत जैनांचें वास्तव्य झालें होतें असें मानावें लागतें.

## कांहीं प्रत्यंतर पुरावे

सिलोन देशाचा राजा धंतुसेन याच्या कारकीर्दींत ( इ. स. ४६१ ते ४७९ ) महानाम नांवाच्या एका साधूनें " महावंश " नांवाचा पाली भाषेंत एक ग्रंथ लिहिला आहे. त्यांत ख्रिस्तपूर्व ५४३ ते ख्रिस्तानंतर ३०१ म्हणजे ८४४ वर्षांच्या कालांतील घडामोडी नमूद केल्या आहेत. यामुळें दक्षिण हिंदुस्थानच्या इतिहास लेखकांना या ग्रंथाचा आधार घ्यावा लागतो. या ग्रंथांतील सर्वच लिखाण सत्य व ऐतिहासिक कसोटीस उतरणारें आहे असें नाहीं; तथापि प्रस्तुत विषयासंबंधीं त्या ग्रंथांत जी माहिती नमूद झाली आहे ती वाचकांसमोर मांडणें जरूर आहे. **विजय वंशांतील** पांचवा राजा **पंडुगाभय** याचें कारकीर्दींत **अनुराधनपूर** ही सिलोनची नवी राजधानी झाली. (ख्रि. पू. ४३७). या नव्या राजधानींतील अनेक इमारतींचें वर्णन या ग्रंथांत आहे; त्यांत ( निग्रंथ ) निगंध साधू **गिरि** यांच्या वास्तव्याचा उल्लेख आहे. या राजानें निगंथ–निग्रंथ–कुंबंध नांवाचें मंदिर बांधून त्याच्या नित्यनैमित्तिक पूजाअर्चेसाठीं देणगी दिल्याचा उल्लेख आहे. निगंथ–निग्रंथांचें मंदिर म्हणजे जिनमंदीरच होय.

तसेंच परदेशस्थ व परधर्मीय ५०० लोकांची रहाण्याची सोय करण्याकरितांहि एक धर्मशाळावजा इमारत बांधविल्याचा उल्लेख त्या ग्रंथांत आहे. ही माहिती विश्वसनीय मानल्यास सिलोन द्वीपांत जैनधर्माचा प्रवेश इ. स. पूर्वी ४००–५०० अगोदर झाला होता असें मानणें भाग आहे.

मदुरा व रामनड जिल्ह्यांतील ब्राम्ही शिलालेख हे तामील प्रांतांतील अत्यंत प्राचीन शिलालेख आहेत. इ. स. पूर्वी ३००-४०० वर्षें अगोदर हे शिलालेख लिहिले आहेत. या लेखांचा अद्याप अर्थबोध झालेला नाहीं. परंतु ते जैनधर्मीय असावेत असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. हे शिलालेख ज्या ज्या ठिकाणीं आढळून आले त्या त्या ठिकाणच्या आसपास जैन तीर्थंकराच्या भग्न मूर्तीचे अनेक अवशेष मिळाले व मिळत आहेत. यावरून इ. स. पूर्वी ४००-५०० वर्षें जैनधर्माचा प्रसार तामील मुलखांत झाला असावा असें मानावें लागतें.

नंदवंशीय खारवेल राजाच्या कारकीर्दीतील उदयगिरी येथील शिलालेखावरून वीर वर्धमानांच्या निर्वाणानंतर ६२ वर्षांनीं म्हणजे आज सुमारें २४०० वर्षांपूर्वी मगधाधीश नंद राजानें कलिंग देशावर स्वारी करून आपल्या राज्यास कलिंग देश जोडल्या वेळीं कलिंग देशांत जैनधर्म अस्तित्वांत होता असें शिलालेखावरून स्पष्ट होत आहे. कलिंग देश जैनमय होता. या विधानास प्रत्यंतर असा बळकट पुरावा पुष्कळ मिळतो. कलिंग देशांत रहाणाऱ्यांना "वेदधर्मविनाशक" असें वैदिक अनुयायी ब्राह्मणांकडून संबोधण्यांत आलें आहे; कलिंग देश म्हणजे 'अनार्य भूमी' आणि अशा भूमीवर ब्राह्मणांचें जर वास्तव्य घडेल तर ते पतीत होतील अशी आज्ञा आपल्या धर्मग्रंथांत लिहून इतरांची गैर समजूत त्याकाळीं ब्राह्मणांनीं केली. यावरून कलिंग देश, तेथील प्रचालित धर्म व त्या धर्माचा प्रसार करणारे कलिंगाधिपती यांच्याबद्दल वैदिक अनुयायांचा द्वेषाग्नि कितपत भडकला होता हें वरील विधानावरून स्पष्ट होत आहे; अशा मनःस्थितींत चंद्रगुप्त हा हीन कुलोत्पन्न होता असें लिहून ठेविलें नसतें व त्याच्या धर्ममताबद्दल मौन स्वीकारलें नसतें; तरच आश्चर्याचें झालें असतें." पुढें उत्तर हिंदुस्थानांतील जैनधर्माचा उत्कर्ष काळ, कलिंग देशाची भौगोलिक परिस्थिति व कलिंग देशाचें तामील प्रांताशीं समीपत्व इत्यादिकांचें स्मरण या ठिकाणीं वाचकांना करून देत आहों.

## तामील वाङ्मय व जैनधर्म

ताम्रपट व इतर शिलालेखांच्या अभावीं तामील देशांतील जैनधर्माच्या प्रसाराच्या अभ्यासकांना तामीळ वाङ्मयाकडेच वळणें भाग आहे.

लोकांचे रीतिरिवाज, आचार, विचार व विचारसरणी यांचा बोध त्या त्या देशांतील वाङ्मयावरून होतो व तामील वाङ्मय या नियमास अपवाद आहे असें मुळींच नाहीं. यासाठीं तामील वाङ्मयांत जैनधर्मासंबंधीं कांहीं माहिती मिळते अगर कसें हें पाहणें इष्ट होईल.

## तामील वाङ्मयाचे काल-विभाग

कालाच्या मानानें तामील वाङ्मयाचे शैव नयनार, वैष्णव अलवार व आधुनिक असे तीन भाग मानिले जात आहेत. या तिन्ही कालांतील वाङ्मयांत जैन व जैनधर्मासंबंधीं अनेकवार उल्लेख आले आहेत. यांपैकीं कोणत्या भागांत कोणकोणते ग्रंथ येतात हें तामील भाषाकोविदांनीं ठरविलें आहे, त्या आधारें जैनधर्मासंबंधीं पुढील माहिती दिली आहे.

### संगमकाल

संगम म्हणजे वाङ्मयविषयक संघ अगर संस्था होत. तामील-भाषाकोविदांच्या मतें असे तीन संघ होते व त्यांतील शेवटचा संघ इ. सनाच्या दुसऱ्या शतकांत आस्तित्वांत होता असें मानिलें जातें. हाच निर्णय मान्य करून पुढील विवेचन करण्यांत आलें आहे. उत्तर हिंदुस्थानांत मगध देशावर आंध्रकुलोत्पन्न सातकर्णी राजानें इ. स. ७७ ते १३३ पर्यंत ५६ वर्षें राज्य केलें. याच मगध देशावर मौर्य घराण्याचा अंमल इ. स. पूर्व ३२२ ते १८४ पर्यंत म्हणजे १३८ वर्षें होता. वायु, विष्णु, मत्स्य व भागवत पुराणांच्या आधारावरून मगध देशावर मौर्य घराण्याचें राज्य १३८ वर्षें होतें असें होत आहे. ( इ. स. पूर्वी ३२२ ते १८४ ) त्यानंतर कन्दयन घराण्याच्या अंमलाखालीं फक्त ४५ वर्षें हा देश होता. ( इ. स. पू. ६३ ते इ. स. पू. १८ ) त्यानंतर आंध्र घराण्यांनीं आपलें राज्य स्थापन केलें व या घराण्यांतील ३० राजांनीं ४५६ वर्षें ( इ. पू. १८ ते इ. स. ४३८ ) राज्य केलें व त्यांतील सहावा राजा सातकर्णी यानें इ. स. नंतर ७७ ते १३३ पर्यंत म्हणजे ५६ वर्षें राज्य केलें.

मौर्यराजा चंद्रगुप्त व आंध्रराजा सातकर्णी यांचा कालनिर्णय वरील तिसऱ्या संगम-काळाच्या कालनिर्णयास मदत होणार आहे. मौर्यकुलोत्पन्न चंद्रगुप्त व सेल्यूकस निकोटर यांच्यामध्यें इ. स. पूर्वी ३०५ या वर्षी तह झाला, याबद्दल मतभेद नाहीं. त्यावरून चंद्रगुप्तराजा हा इ. स. पूर्व ३१२ या वर्षी तक्तानशीन झाला होता असेंही मानण्यांत येतें. यावरूनच आंध्रकुलोत्पन्न सातकर्णी ( ६ वा राजा ) याचा राज्यकाल इ. स. ७७ ते १३३ असेंच मानिलें जातें. ग्रीक देशाचा राजा सेल्यूकस व मगध देशचा मौर्य चंद्रगुप्त हे जसे समकालीन होत; तसेंच आंध्र सातकर्णी व सिलोनचा राजा गजबाहू हे समकालीन होत. सिलोन देशावर या गजबाहूनें इ. स. पूर्व १३३ ते १२१ पर्यंत १२ वर्षें राज्य केलें. लंकेच्या या गजबाहूच्या कारकीर्दींत मगधाधीशाचा उल्लेख "छिलपधिकारम्" या ग्रंथांत मिळतो. चंद्रगुप्तापासून पहिला सातकर्णी राजापर्यंतचा उल्लेख महावंश व वरील पुराणांत एकवाक्यतेनें आढळून येतो.

महावंश व दीपवंश या दोन्ही ऐतिहासिक ग्रंथांत गजबाहूराजाच्या नांवाचा उल्लेख आहे. या गजबाहूचा आजा सिलोनवर राज्य करीत असतां चोल देशाच्या राजानें सिलोनवर स्वारी करून तेथील हजारों लोकांना बंदीवान म्हणून कैद करून आणिलें; व त्यांच्याकडून कावेरी नदीच्या धरणाचें काम करवून घेतलें अशी आख्यायिका आहे. याचा सूड उगविण्यासाठीं राज्यावर आल्याबरोबर थोड्याच दिवसांनीं या गजबाहूनें चोल देशावर स्वारी केली असा उल्लेख महावंश व दीपवंश या ग्रंथांतून केला आहे. इ. स. पांचव्या शतकांत महावंश लिहिला आहे व दीपवंश त्याहि पूर्वींचा आहे.

कावेरी नदीच्या खोदकामास चोल-राजा करिकल याच्या कारकीर्दींत सुरुवात झाली, असें तामील काव्यावरून व शिलालेखावरून स्पष्ट होत आहे. कावेरी नदीच्या मुखापासून सुमारें १०० मैल इतक्या लांबीचें हें खोदकाम आहे. अर्थातच या कार्यास अनेक वर्षें घालवावीं लागलीं असलीं पाहिजेत. यावरून या करिकल राज्याच्या अगर त्याच्या पूर्वीच्या राजांच्या आमदानींत सिलोनवर ही स्वारी आली असावी असें मानणें भाग आहे. या करिकल राजाचा नातू चेंगुट्वन व मगध राजा सातकर्णी यांची भेट झाल्याचें वर्णन छिलपदिकारम् या ग्रंथांत दिलें आहे. चेर राज्याच्या अचन राजाच्या व चेंगुट्वन राजाच्या नांवाचा उल्लेख अनेकवार मदुरा संघाच्या वाङ्मयांत आढळ होतो; यावरून मदुरा वाङ्मय संघाचा काल इ. स. चा दुसरा शतक असावा असें ठरविलें गेलें आहे.

तामील-भाषाकोविंद व इतिहासज्ञ यांचें या संगमकालाबद्दल अद्याप एकमत झालेलें नाहीं, व नवें प्रत्यंतर मिळेपर्यंत मतैक्य होणें शक्यहि नाहीं; ही गोष्ट खरी असली तरी बहुमतानें तिसऱ्या–शेवटल्या–संगमाचा काल इ. सनाचें दुसरें शतक ठरविण्यांत आलें आहे व तोच काल खरा असें यापुढें गृहीत धरण्यांत आलें आहे. या तिसऱ्या संगमांतील ४९ कवींपैकीं शेवटचा कवि नकीरर यासच या तिन्ही संगमाची माहिती देण्याचें श्रेय देतां येतें. नकीररनें लिहून ठेविलेल्या माहितीवरून वैय्याकरणी तोल्कापियर हा पहिल्या व दुसऱ्या संगमाचा सभासद होता, असें होत आहे. या वैय्याकरणी **तोल्कापिअरचा कालनिर्णय** करितां आल्यास त्याबरोबरचा तामलि देशांतील जैनधर्म प्रसाराच्या कालाचाहि निर्णय होणार आहे.

दक्षिण हिंदुस्थानांतील पांड्य देशांत दुसऱ्या संगमकालीं एक भूकंप अगर धरणीकंप झाला व त्यामुळें बराच भूभाग जलाच्छादित झाला, याबद्दल संगम-वाङ्मयांत उल्लेख आहे. तिसऱ्या संघाच्या वाङ्मयलेखकांना या प्रसंगाची अंधुक कल्पना असावी असें त्या काळच्या वाङ्मयावरून दिसतें. छिल्लप्पदिकारम् या ग्रंथांतहि या धरणीकंपाचा उल्लेख आहे. या भूकंपाच्या धक्क्यामुळें कुमरी व पहुली या दोन नद्यांमधील भूभाग जलाच्छादित झाला. या प्रलयामुळें किती भूभाग नष्ट झाला याबद्दल माहिती भिन्न भिन्न आहे. तथापि प्रस्तुत विषयाशीं त्यांचा संबंध नसून या प्रलयाचा काल-निर्णय करण्याच्या हेतूनें विचारकर्तव्य आहे. या प्रलयामुळें कमी झालेला आपला राज्यविस्तार भरून काढण्याकरितां पांड्य देशच्या राजानें चोल व चेर राजाच्या मालकीचे कुडुर व मुत्तुर या भागाचा जबरीनें कबजा घेतला, व या पराक्रमाबद्दल त्यास निलतिरुवीर पांड्यम् असें नामाभिधान मिळालें.

## महत्त्वाचा हा प्रलय केव्हां घडला !

सिलोनचा प्राचीन इतिहास लेखक मि. टेनेंट ( Tennent's History of Ceylon ) यानें आपल्या या इतिहासांत तीन भूकंप झाल्याचें लिहिलें आहे. त्यापैकीं पहिल्या प्रसंगाचा काल इ. स. पूर्वी २३८७ वर्षे म्हणून नमूद केला आहे. व त्यावेळीं सिलोन देश हिंदुस्थानापासून तुटक व अलग झाला असेंहि मत दिलें आहे. इ. स. ५०४ वर्षांपूर्वीं पांडुग्वास राजाच्या कारकीर्दींत दुसरा भूकंप झाला व त्यामुळें सिलोन देशाचें कल्पनातीत नुकसान झालें. या वरील दोन्ही भूकंपाच्या मानानें इ. स. ३०६ वर्षांपूर्वीं झालेला तिसरा भूकंप अत्यंत सौम्य होता. या वेळीं सिलोनमध्यें देवानाम प्रियतिसा हा राजा राज्य करीत होता.

समुद्राच्या या तिसऱ्या आक्रमणाचा उल्लेख 'इरेयनार अहवप्पूरल' या ग्रंथांत आढळत असल्यानें व त्यास सिलोनच्या राजावली कथेंत व महावंश या ग्रंथांत पुष्टि मिळत असल्यानें पहिला वैय्याकरणी तोत्कापिअर हा निदान इ. स. ३५० वर्षांपूर्वी होऊन गेला असें मानलें जातें. सुप्रसिद्ध **संस्कृत वैय्याकरणी इंद्र** यानेंहि आपल्या व्याकरण्यांत तोत्कापिअरच्या नांवाचा उल्लेख केला आहे. या इंद्राचा काल इ. स. पूर्वी ३५० वर्षे असा निश्चित झाला आहे. अलेक्झांडर धी ग्रेट यानें हिंदुस्थानवर स्वारी केल्यावेळीं त्याच्याबरोबर ग्रीस देशांतील ज्योतिषी आले होते व त्यांनीं लिहून ठेविलेल्या माहितीवरून तोत्कापिअरनें **होरा** या नांवाचा ग्रंथ लिहिल्याचें समजतें. वर दिलेल्या निरनिराळ्या पुराव्यावरून तोल्कापिअरचा काल किमान इ. स. पूर्वी ३५० वर्षांचा तरी असावा असें मानावें लागणार आहे.

## कुरल या ग्रंथकाराचा धर्म व काल

एलाचार्य हा या सुप्रसिद्ध ग्रंथाचा कर्ता आहे. जगांतील नामांकित लेखकांत कुरल ग्रंथकर्त्यांचा समावेश करण्यास हरकत नाहीं. या ग्रंथाचा काल व ग्रंथकाराचा धर्म याबद्दलहि मतैक्य नाहीं. **छिल्लपदिकारम्** या ग्रंथांत कुरल ग्रंथाचा उल्लेख आहे. छिल्लपदिकारम् या ग्रंथाचा कर्ता व राजा सेंगुत्तवन हे बंधु व सेंगुत्तवन हा इ. स. च्या दुसऱ्या शतकांत होऊन गेला.

मणिमेकले व छिल्लपदिकारम् या दोन्ही ग्रंथापूर्वी निदान एक शतक अगोदर म्हणजे इ. सनाच्या पहिल्या शतकांत हा ग्रंथ रचिला गेला असावा असें मानण्याकडे विद्वानांचा कल आहे. या ग्रंथकाराचा जन्म कृषीबल-हीन कुलांत झाला होता व जैनधर्मीय हीन कुली नव्हेत यामुळें तो जैनधर्मीय नसावा असें कांहीं लेखक प्रतिपादन करितात. प्रि. चक्रवर्ती यांनीं 'पंचास्तिकाय' या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत कुरल ग्रंथाचा कर्ता एलाचार्य ऊर्फ कुंदकुंदाचार्यच होत हें व त्यांचा जन्म जमीनदार वर्गातच झाल्याचें सप्रमाण सिद्ध केलें आहे. हा ग्रंथकार-सम्राट्—आपल्याच धर्माचा अनुयायी होता असें मानण्याकडे अनेक धर्मीयांचा कल आहे. या ग्रंथांतरींच्या पुराव्यावरून तो जैनधर्मी होता असें कै. प्रो. शेषागिरी शास्त्री यांनीं प्रतिपादन केलें आहे. या ग्रंथांत देवादिकांची स्तुति करतांना देवादिकांच्या नांवाचा उल्लेख केलेला नाहीं. देवदेवादिकांच्या अंगीं वसत असलेल्या गुणांचा गौरव केला आहे. म्हणजे ब्रह्मा, विष्णु, महेशादि हिंदुदेवांच्या अगर तीर्थंकरांच्या नांवांचा उल्लेख नाहीं!

देवादिकांना ज्या विशेषणानें या ग्रंथांत संबोधण्यांत आलें आहे तीं विशेषणें हिंदुदेवादिकांनाहि क्वचित् प्रसंगीं लाविलीं जातात. उदाहरणार्थ, कमलवाहन हें विशेषण जसें विष्णूचें नांव सूचक आहे; तसेंच तीर्थंकरांचा निर्वाण, कालसूचक वाहन सुचविते. तीर्थंकरांना त्रिकाल ज्ञान प्राप्त झाल्यानंतर समवशरणांत प्राणिमात्रांना उपदेश दिला जातो. अशा उपदेशभ्रमणासाठीं निघण्याच्या वेळां तीर्थंकर कमलवाहनी असतात. या प्रसंगास अनुलक्षून हें विशेषण तीर्थंकरांनाच विशेषतः लागूं पडतें. अष्ट गुण जैनधर्मानें मानिले आहेत व त्या स्वरूपाचें वर्णन वैदिक धर्मांतून आढळत नाहीं. यावरून कुरलमधील देवादिकांचें गुणवर्णन तीर्थंकरांनाच लागूं पडतें; इतरांना ते लागूं पडत नाहीं. कुरलग्रंथ हा हिंदुधर्मीय ग्रंथ असून त्याचा कर्ता शैव होता असें प्रतिपादन करून हा ग्रंथ व या ग्रंथकाररत्नाला आपल्या धर्मांत ओढण्याचा मोह अद्याप कांहीं हिंदुधर्मीयांना आवरतां येत नाहीं याचें ताजें प्रत्यंतर म्हणजे प्रो. दिक्षीतर, एम्. ए. यांचें 'Studies in Tamil Litrature' हें पुस्तक होय.

याहिपेक्षां अधिक बळकट व बिनतोड पुरावा म्हणजे **निलकेसी** या ग्रंथावरील टीका होय. सदर ग्रंथावरील टीकाकार व निलकेसी हा ग्रंथ हे जैनधर्मीय आहेत व या टीकेंत **कुरलग्रंथ** हा आमचा **प्रमाणभूत-वेदग्रंथ**-आहे, असें नमूद केलें आहे. कुरल जैनधर्मविषयक ग्रंथ नसता व ग्रंथकारहि जैनधर्मीय नसता तर निलकेसीवरील या टीकेंत या ग्रंथाविषयीं आपुलकीची व आदराची अशी भाषाच आली नसती. कुरलग्रंथाचा ग्रंथकर्ता हा संस्कृत व प्राकृत भाषेंतील तज्ज्ञ असला पाहिजे असेंहि मानिलें जातें. शिवाय त्या कालीं उत्तर हिंदुस्थानांत जैनधर्म-सूर्य पूर्ण प्रकाशानें तळपत होता व तेथील सुसंस्काराचा त्या कुरल ग्रंथकाराच्या मनावर व विचारावर संपूर्ण पगडा असल्याशिवाय कुरलमधील भाषा व विचारसरणी दृग्गोचरच होणार नाहीं दक्षिण हिंदुस्थानांत या साधनांचा त्याकालीं पूर्ण अभावच होता. यावरून एलाचार्य व कुंदकुंदाचार्य हें एकच होत. संस्कृत व प्राकृत भाषेंतील तज्ज्ञ व तामील देशांतील जैनधर्मप्रसारक म्हणून कुंदकुंदाचार्यांची प्रसिद्धि आहे. हे आचार्य इ. सनाच्या पहिल्या शतकांत होऊन गेले, याबद्दल वाद नाहीं. कांजीवरमच्या राजाच्या विनंतीवरून कुंदकुंदाचार्यांनीं **पंचास्तिकाय** नांवाचा जैनधर्म-तत्वज्ञान-विषयक ग्रंथ लिहिला आहे. प्रि. चक्रवर्ती, एम्. ए. ( जैन )-मद्रास यांनीं हा ग्रंथ छापवून प्रसिद्ध केला आहे.

या ग्रंथाला प्रि. मजकुरांनीं कुंदकुंदाचार्यांचा ऐतिहासिक दृष्ट्या कालनिर्णय करण्यासाठीं विद्वत्तापूर्ण व सर्वमान्य प्रस्तावना जोडली असून; त्यांत कुंदकुंदाचार्य व एलाचार्य हे एकच होत असें सिद्ध केलें आहे. यावरून कुरल हा जैनधर्ममत-प्रसारक ग्रंथ असून त्याचें कर्तृत्व आचार्य कुंदकुंदाचार्य यांच्याकडेच जात आहे. इ. सनाच्या पहिल्या शतकांत तामील मुलखांत जैनधर्माचा प्रसार व विस्तार खास झाला होता असेंच यावरून मानणें भाग पडत आहे.

इ. सनाच्या पहिल्या शतकांत आचार्य कुंदकुंदाचार्यांनीं कुरल ग्रंथ लिहिला असें वर ठरविलें आहे. याच कुंदकुंदाचार्यांनीं दुसरेहि कांहीं प्रमाणभूत जैनग्रंथ संस्कृत भाषेंत लिहिले असून संस्कृत भाषेंतील ग्रंथांत जैनधर्माचें महत्त्व व श्रेष्ठत्त्व उघड रितीनें प्रतिपादन केलें आहे; मात्र तामील भाषेंतील या कुरल ग्रंथांत प्रच्छन्न रितीनें हा प्रयत्न करणें त्यांना श्रेयस्कर कां वाटलें अशी शंका आल्याशिवाय राहणार नाहीं. तामील भाषेंतील ग्रंथलेखनानंतर संस्कृत भाषेंतलि ग्रंथरचना यांनीं केली असावी अगर तामील वाङ्मय संस्थेमार्फत जें ग्रंथलेखन झालें तें विशिष्ट धर्ममत–प्रसारक नसावें असा निर्बंध असल्यानेंहि या मार्गाचें अवलंबन करणें भाग पडलें असावें. मणिमेकले या ग्रंथाचा कर्ता चेतनार हा कट्टर बौद्ध होता. त्याच्या लेखणींतून उतरलेल्या ग्रंथावर जैनधर्मी शिक्कामोर्तब करण्यास जनांना शंकाहि येणार नाहीं. कारण या ग्रंथांतील **धर्मास्तिकाय** या विषयाखेरीज इतर विषयांचें प्रतिपादन जैनधर्मास अनुसरूनच आहे. जैनधर्माचा उघड विरोध करण्याचें साहस न झाल्यानें असें प्रच्छन्न लेखन झाल्याचें कुरलसारखें हें दुसरें एक उदाहरण आहे. कुंदकुंदाचार्यांचा बोलबाला यापुढें किमान पंधराशें वर्षें तरी अव्याहत व अखंड चालूं राहिला. कुंदकुंदाचार्यांचे शिष्य म्हणवून घेण्यांत अनेक जैन विद्वद्रत्नांना भूषणच वाटत होतें; हें अनेक ठिकाणच्या शिलालेखांत कुंदकुंदाचार्यांच्या शिष्य-परंपरेंतील विद्वानांच्या नांवांचा उल्लेख आला आहे, त्यावरून स्पष्ट होत आहे.

सत्य, अहिंसादि जैनधर्मीय शिकवणीनें तामिलादि प्रांतांतील द्राविडियन लोकांचीं मनें या–कुरल–ग्रंथानें आपल्याकडे ओढून घेतलीं. ज्या त्या प्रांतांतील लोकांच्या मातृभाषेंत ग्रंथलेखन केल्याखेरीज ग्रंथांतील उपदेशाचा चिरकाल टिकणारा परिणाम घडून येत नाहीं. जैनधर्मीयांनीं हें जाणिलें व ज्या त्या प्रांतांतील लोकांच्या जन्मभाषेंत उत्कृष्ट प्रतीचें ग्रंथलेखन करून उत्तरीय विचाराचें व संस्काराचें महत्त्व दाक्षिणात्यांना पटवून त्यांना जैनधर्मीय बनविलें.

## मि. फ्रेअर यांचें मत.

तामिलादि भाषेंतील उच्च विचार, ध्येय व प्रगल्भ भाषासरणी यांचें श्रेय जैन-धर्मीयांनाच आहे असें मि. फ्रेअर यांनीं ( The Literary History of India P. P. 310–311 ) या पुस्तकांत आपलें स्पष्ट मत नमूद करून ठेविलें आहे.

इ. सनाच्या सुरवातीस द्रविडियन लोकांचे आचार, विचार, धर्माबद्दलच्या व देवादिकांच्याबद्दल कल्पना काय होत्या हें विचारांत घेतां जैनधर्माचाच प्रसार कां झाला याचा बोध व उलगडा सहजीं होणार आहे. पशुबली व नरबली देणें, दैवी संचाराविषयीं विश्वास व देवाचे अंगांत येणें व पिशाच्चपूजा यांना द्रविडियन धर्म समजत. या धर्मकल्पनेच्या अज्ञानाचा फायदा घेण्याचा हिंदुधर्मीयांनीं प्रयत्न केला; परंतु यश मात्र जैनधर्मीयांच्या वांट्यास आलें. वैदिक धर्माचा प्रसार करूं पहाणाऱ्या ब्राह्मणांनीं आपल्या धर्मग्रंथांचें व वेदांचें दर्शनहि इतरांना होऊं दिलें नाहीं. उत्तर हिंदुस्थानांतील सर्वसामान्य लोकांप्रमाणें दाक्षिणेंतील सामान्य जनताहि वेदांतील **निसर्ग** ( अग्नि, सूर्य वगैरे ) पूजेचा धिक्कार करूं लागली तर त्यांत नवल नाहीं. जैन व बौद्धधर्मीयांच्या उदात्त विचारसरणीनें, व्यापक व नैतिक शिकवणीनें, नैसर्गिक पूजाअर्चादि विधि व उपदेशकांच्या विचाराप्रमाणें आचार यांनीं त्यांचीं मनें आपल्याकडे खेचविलीं; एवढेंच नव्हें तर बौद्ध व जैनधर्माचें प्रेमानें व आस्थेनें स्वागत करून जैनधर्माला राष्ट्रधर्माच्या स्थानीं मानावयाला लाविलें.

त्या काळांत व हल्लीं जैनधर्माची शिकवण एकच असतां जैनधर्म नामशेष होण्याच्या पंथास हल्लीं कां लागावा व त्या काळीं जेथें तेथें त्याचा प्रभाव कां दिसावा? याचें उत्तर दुसरे कोणी कोणतेंहि देवोत, पण जैनधर्माची ध्वजा फडक-विणाऱ्या महावीरांच्या खऱ्या वीर अनुयायांचा हल्लीं अभावच आहे असेंच आम्ही मात्र म्हणणार.

सिलप्पदिकारम् व मणिमेकले या दोन सुप्रसिद्ध ग्रंथांच्या आधारें इ. सनाच्या दुसऱ्या शतकांत तामील देशांतील जैनधर्मासंबंधीं विचार करतां बौद्ध व जैनधर्मा-संबंधींचे अनेक उल्लेख याहि ग्रंथांत आढळतात असें दिसून येईल.

चोल व पांड्य राजांचा जैनधर्मास आश्रय होता. चोल राजाची राजधानी कावेरिप्पुमपट्टिन, कावेरी नदीच्या कांठावरील उरेपूर व वैदिक धर्मानुयायांचा दक्षिणेंतील बाले किल्ला-मदुरा-वगैरे-ठिकाणीं जैन मुनिस्थानें होतीं. मुनिस्थानालगतच जैन अर्जिकासाठींहि स्वतंत्र आश्रम होते. जिन मंदिरांतून जिनबिंबाची पूजाअर्चा होत असे. अशा प्रकारचे उल्लेख मणिमेकले या ग्रंथांत मिळत आहेत. यावरून तामील प्रांतांतील स्त्री-पुरुष समाजावर जैनधर्माचा झालेला प्रभाव दिसून येणार आहे. हे मुनी व या अर्जिका हे उत्तर हिंदुस्थानांतील नसून त्याच देशांतील रहिवाशी होते ही गोष्ट विचारांत घेतां जैनधर्मानें यांच्या जन्मापूर्वीच कित्येक वर्षें अगोदरच आपलें आसन इकडे स्थिर केलें असलें पाहिजे हें निर्विवाद आहे. तामलि देशांतील या काळांतील वाङ्मयावरून असें दिसतें कीं, राजे लोक परमतसहिष्णु होते व ते जैन लोकांचा व धर्माचा द्वेष करीत नसावेत. तसे नसते तर मणिमेकले या ग्रंथांत निर्ग्रंथ लोक व त्यांचा धर्म याविषयीं उल्लेखच आला नसता. पूहर शहरीं वार्षिक इंद्रोत्साह होत असे. या निमित्तानें या शहरीं आलेल्या लोकांना उपदेशामृत देण्यासाठीं सर्व धर्मांतील प्रमुख विद्वानांना राजे लोक पाचारण करीत. या प्रसंगीं केलेल्या जैनधर्मोपदेशाचा प्रभाव जनतेच्या मनावर विशेष पडत असे असाहि उल्लेख वरील ग्रंथांत आढळ होत आहे. यापुढें सुमारें ८००।९०० वर्षांनंतर ही परिस्थिति बदलली. वैदिक धर्मानुयायी जैनधर्मीयांना पाण्यांत पाहूं लागले. हा लढा जैनधर्मीयांनीं यापुढें सुमारें दोनशें वर्षें लढविला व त्यानंतर जैनधर्मास उतरती कळा लागली. मणिमेकले ग्रंथाचा लेखक चेतनार हा कट्टर बौद्ध होता. तथापि याच्या लिखाणावरहि जैनधर्माचीच छाप पडलेली आहे. निःपक्षपाती जैन विद्वानांच्या मतें या ग्रंथांतील धर्मास्तिकाय या विषयावरील चर्चेखेरीज इतर कोणतेंहि विवेचन जैनधर्म तत्त्वज्ञानास सोडून आहे असें नाहीं. जैन तत्त्वज्ञानाविरुद्ध इतरांना उघड उघड आपलें मतप्रतिपादन करण्यास काळ व परिस्थिति अनुकूल नसावी हें एकच कारण अशा ग्रंथलेखाच्या मुळाशीं असावें असें मानावें लागणार आहे.

इ. सनाच्या तिसऱ्या व चौथ्या शतकांत जैनधर्मीयांनीं विशेष कांहीं केलें, असा इतिहास आजमितीस तरी उपलब्ध नाहीं. वैदिक धर्मानुयायी यांच्या ग्रंथांतही जैनधर्मासंबंधीं अनुदारपणाचा अगर आदराचा उल्लेख नाहीं. अवैदिक-ब्राह्मणेतर-ग्रंथांतून असे तुरळक उल्लेख मिळतात.

यावरून तामील देशांतील या दोन शतकांतील जैनधर्माचा इतिहास जवळ जवळ कोराच आहे असें आज तरी म्हणावें लागतें. मात्र यावरून या कालांत जैन धर्मास अवनत दशा आली होती असें मात्र प्रतिपादन करितां येणार नाहीं. दोन शतकांपूर्वी जैनधर्मीयांनीं मिळविलेला विजय व त्यानंतर पुढील ८००।९०० वर्षांतील जैनधर्मीयांची कर्तबगारी यांचा विचार करतां या मधल्या कालांत जैनधर्मीय स्वस्थ असावेत असें मानणें व्यवहारास धरून होणार नाहीं. अलेक्झांडरच्या स्वारीचा उल्लेखहि तत्कालिन उत्तरीय लिखाणांतून आढळ होत नाहीं. यावरून ती स्वारी झालीच नाहीं, असें मानणें जसें चुकीचें होणार आहे, तद्वतच दक्षिणेंतील या काळांतील वैदिक अगर अवैदिक वाङ्मयांत जैन व जैनधर्म यासंबंधीं उल्लेख आढळ होत नाहीं; यावरून जैनधर्म अस्तित्वांतच नव्हता असें मानणें चुकीचें होईल. कदाचित् असा उल्लेख करण्याचें त्यांनीं मुद्दाम टाळिलें असावें असेंहि अनुमान निघणार आहे. कुंदकुंदाचार्य व इतर अनेक विद्वानांनीं स्वमतप्रसारार्थ शिकस्तीचे व शिस्तीचे भगीरथ प्रयत्न इ. सनाच्या दुसऱ्या शतकापर्यंत केले; ही सर्वमान्य गोष्ट विचारांत घेतां त्यांच्या पश्चात् लागलीच सर्वत्र अनास्था माजली असावी असें मानणें बरोबर होणार नाहीं.

इ. सनाच्या दुसऱ्या शतकापासून तो ११ व्या शतकापर्यंत सुमारें ९०० वर्षें गंगवाडी येथें राज्य करणाऱ्या गंगवंशीय राजांच्या राजाश्रयाशिवाय व श्रवण-बेळगोळकडून मिळालेल्या उत्तेजनाच्या आभावीं जैनधर्मीयांचे धर्मप्रसारार्थ झालेले प्रयत्न व शिस्त वृथा व अयशस्वीच ठरले असते. या भागांतील धार्मिक इतिहासाच्या सूक्ष्म व खोल अभ्यासकांना मात्र असें स्पष्ट दिसतें कीं या भागांत इ. सनाच्या दुसऱ्या शतकापासून पुढें ८००।९०० वर्षें जैनधर्माचें प्राबल्य होतें.

## जैन वाङ्मयसंघ स्थापना

इ. सनाच्या चौथ्या व पांचव्या शतकांतील वैदिक-ब्राह्मण-धर्मीयांच्या-वाङ्मयांत जैनधर्मांचा फारसा नामनिर्देश झालेला नाहीं व ज्या ज्या वेळीं उल्लेख करण्याचा अनवस्था प्रसंग आला त्या त्या वेळीं पूर्वीचा आदरभाव नष्ट होऊन त्या जागीं अनादराची भाषा योजण्यांत येऊं लागली. धार्मिक, सामाजिक व राजकीय वर्चस्वासाठीं भावी लढ्याचें बीजारोपण होण्यास या कालांत सुरवात झाली. संघांतील वाङ्मयांत जैनधर्मासंबंधीं अनुदारपणाचे व द्वेषमूलक उद्गार पाहून जैनी

समाजालाहि या लढ्यास तोंड देण्याकरितां आपला स्वतंत्र वाङ्मयसंघ काढणें भाग पडलें; व असा नवा संघ स्थापन करण्याचें श्रेय पूज्यपादाचार्यांचे शिष्यवर आचार्य वज्रनंदी यांना मिळून इ. स. ४७०-विक्रम शक ५२६-मध्यें जैन वाङ्मय-संघ स्थापन झाला असें **दिगंबर दर्शन** या जैन ग्रंथावरून स्पष्ट होत आहे. याच ग्रंथावरून जैनधर्मप्रसारार्थ दक्षिणेंत जैनांचा संघ होता असेंहि नमूद आहे. पांड्य राजांचा जैनाचार्यांना आश्रय नसता तर आपला स्वतंत्र संघ स्थापन करण्याचें साहस जैनांनीं त्या काळीं खास केलें नसतें. या नव्या व स्वतंत्र संघाच्या स्थापनेमुळें ब्राह्मणांच्या वैराग्नींत तेल ओतल्यासारखें झालें. जैनांनीं संपादलेला राजाश्रयहि त्यांच्या डोळ्यांत खड्यासारखा सलूं लागला; मात्र जैनांच्या वर्चस्वामुळें या वैराग्नीचा भडका होण्याचा काळ कांहीं शतकें लांबणीवर पडला. इ. सनाच्या पांचव्या शतकाच्या सुरवातीस एक क्रांतिकारक, अत्यंत महत्त्वाचा व ऐतिहासिक-दृष्ट्या घडामोडीचा प्रसंग घडून आला; व तो प्रसंग म्हणजे पांड्य देशावर कलभ्रांची स्वारी हा होय. या स्वारीमुळें वैराग्नीचा वणवा लांबणीवर पडला.

## हे कलभ्र कोण ?

हे कलभ्र कोण व दक्षिणेंतील जैन व जैनधर्माशीं त्यांचा संबंध काय ? अशी शंका कोणीहि घेईल; परंतु पुढील विवेचनावरून या शंकेचें समाधान होणार आहे. पांड्य व पल्लव कालीन शिलालेखांत कलभ्रांचा अनेक ठिकाणीं उल्लेख येतो व त्यांत चोल, चेर व पांड्य राज्यांचे जेते म्हणून कलभ्रांना संबोधण्यांत आलेलें दिसतें. दक्षिण हिंदुस्थानांतील शिलालेखांखेरीज अन्यत्र शिलालेखादिकांत त्यांच्या नांवाचा उल्लेख आढळ होत नाहीं. यावरून ते द्रविडियन वंशाचे असावेत असें अनुमान काढल्यास तें चुकीचें होणार नाहीं. ते आर्यन आहेत असें म्हणण्यासहि पुरावा नाहीं. वेल्विकुडी येथील दानपत्रांत पांड्य राजांना जिंकून कलभ्रांनीं या प्रांतावर कांहीं वर्षे राज्य केल्याचा व **कडुनगोन** वंशजाकडून पराजित झाल्याचा मजकूर आहे. पांड्य देशावर कर्नाटक सैन्यानें स्वारी करून तो मुलूख त्यांनीं पादाक्रांत केल्याचा उल्लेख **पेरियापुराणांत** मिळतो. पांड्य देशावर आणखी दुसरी कोणतीहि व कोणाचीहि स्वारी झाल्याचा दाखला मिळत नाहीं. वेल्विकुडी दानपत्रांतील मजकुरावरून व पेरिया पुराणांत दिलेल्या ऐतिहासिक माहितीवरून मूर्ती नायनारकालीं मदुरा येथें कर्नाटक भूपतींचें राज्य होतें; हे कर्नाटक राजे म्हणजेच **कलभ्र** राजे होत असें मानण्यास मुळींच प्रत्यवाय नाहीं.

त्रिचनापल्लीपासून दोन मैलांवर असलेल्या शेंडाले गांवीं मिळालेल्या शिलालेखावरूनहि वरील सिद्धांतास बळकटीच येते. मि. गोपिनाथराव यांनीं शैव-तामील पुस्तक नं. ६ मध्यें हा शिलालेख प्रसिद्ध केला आहे. शेंडाले गांवीं मीनाक्षी सुंदरेश्वर देवाचें मोठें व भव्य देवालय आहे. या देवालयाच्या मंडपाच्या एका खांबावर एक सुंदर शिलालेख आहे. या शिलालेखांत पेरम् पिडुगुमुत्तरायन यांची जीं दुसरीं अनेक नांवें दिलीं आहेत त्यांत श्री. कल्भरकलवन् वगैरे नांवांचा निर्देश आहे. या राज्यांना मारन् व निडुमारन् अशा विशेषणानें संबोधण्यांत आलें आहे. यावरून् पांड्य राजांचा जेता असा अर्थ निष्पन्न होतो. ज्या दुसऱ्या विशेषणानें या राज्यांना संबोधण्यांत आलें आहे; त्यांचा अर्थ 'चोरांचा राजा' अगर 'चोरांचा चोर' असा होतो. व यावरूनहि वेल्विकुडी दानपत्रांतील 'कलभ्र' हे कल्लर कुलोत्पन्न होते असें मानावें लागत आहे. पांड्य देश जिंकल्यानंतर सन्मानदर्शक 'मुत्तरेअन' हें पद ते आपल्या नांवामागें लावूं लागले. मुत्तरेअन या शब्दाचा अर्थ मोत्यांचा राजा अगर तीन देशचा राजा असा होतो. यांपैकीं दुसरा अर्थ अधिक लागूं पडतो. या अर्थांतील तीन देश म्हणजे चोल, पांड्य व चेर हे होत. यावरून या कलभ्रांच्या अमलांखालीं वरील तिन्ही देश कांहीं काल तरी आले असावेत असें वाटतें.

## कलभ्र व जैनधर्म

पेरियपुराणांतील कर्नाटक राजांची पांड्य देशावरील स्वारी म्हणजेच कलभ्र राजाचें मदुरा येथें राज्य स्थापन होय असें वर ठरविण्यांत आलें आहे. या कलभ्रांच्या राज्यविस्ताराशीं, त्यांच्या वंशावळीशीं व त्यांच्या पद्व्याशीं जैनधर्माशीं संबंध काय आहे? या कलभ्रांच्या इतिहासाची एवढी माहिती देण्याचें कारण कोणतें अशी शंका वाचकांना येणें साहजिक आहे. हें जाणून कलभ्र राजे व जैन धर्म यांच्या अन्योन्य संबंधांबद्दलची माहिती यापुढें दिली आहे. याच पेरियपुराणांत दिलेल्या माहितीवरून असें दिसून येतें कीं कलभ्रांचे मदुरा येथें राज्य स्थापन झाल्याबरोबर अगर या युद्धांत विजयश्रीची माळ गळ्यांत पडल्याबरोबर कलभ्र राजानें जैनधर्म स्वीकारून जैनांना आश्रय दिला. पांड्य देशांत जैन बहुसंख्याक होते व त्यामुळें प्रजेचा धर्म तो आपला धर्म व बहुसंख्याक प्रजेस आश्रय तो जैनांचा आश्रय अशा सद्बुद्धीनें व दूरदृष्टि विचारानें हा प्रकार घडणें अशक्य नाहीं.

परंतु त्यांनीं तर आपल्या पूर्व धर्मांचा त्याग करून धर्मांतर करण्याची जरूरी नव्हती हें एक कारण व त्याहूनहि बलवत्तर दुसरें कारण असें आहे कीं, कलभ्र राजांनीं शैवसाधू व शैवधर्मीय यांच्या छळास सुरवात केली यावरून असें दिसतें कीं, जैनधर्मास अधिक बळकटी यावी व आपल्या धर्मप्रसारास आधिक मदत व्हावी म्हणून बहुसंख्याक जैनप्रजेनेंच ही स्वारी घडवून आणली असावी असें मानल्यास तें चुकीचें खास होणार नाहीं; अगर जितराष्ट्रांतील बहुसंख्यप्रजेच्या पाठबळाशिवाय आपले पाय स्थिर होणार नाहींत असें वाटूनहि जैनधर्मीयांची सहानुभूति संपादन करण्यासाठींहि हा प्रयत्न होणें शक्य दिसतें. एखाद्या देशांतील बहुसंख्य प्रजेनें आपणास हवे असलेल्या राजांना स्वारी करून देश हस्तगत करण्यास मदत केल्याचीं उदाहरणें हिंदुस्थान व हिंदुस्थाना बाहेरच्या इतिहासांत खास मिळतील. कलभ्र राजाच्या व त्यानंतरच्या काळांत जैनधर्मानें राजाश्रयाच्या सहानुभूतीच्या बळावर वैभवाशिखर गांठिलें असल्यास नवल नाहीं. याच सुमारास तामिल वाङ्मय-यांतील पंच महाकाव्यांपैकीं जैनांचें दुसऱ्या नंबरचें नालदिआर या महाकाव्याची रचना झाली. कलभ्र राजे जैनधर्मीय होते. त्यांचा जैनांना मोठा आश्रय होता; व ते मोठे वाङ्मयोपासक होते असा उल्लेख या महाकाव्यांत आढळ होतो. अशा राजवटींत या महाकाव्याची रचना झाली असल्यास नवल तें काय? सहाव्या प्रकरणांत या महाकाव्यासंबंधीं अधिक माहिती दिली आहे.

## कलभ्र वंशज

वेल्विकुडी दानपत्रांतील व पेरियपुराणांतील कलभ्र वंशज हल्लीं आहेत काय? व असल्यास ते कोठें आहेत? याचा तलास लावणें शक्य आहे.

त्रिचनापल्ली जिल्ह्यांत मुत्तरायर नांवचे जहागिरदार आहेत. मुत्तु रजकुल म्हणून आंध्र देशांत त्यांची वस्ती आहे. पेरियपुराणांतील वर्णनाशीं हें वर्णन जमत आहे. मदुरा जिल्ह्यांतील येलुर तालुक्यांतील मुत्तरायर हे जातीनें कल्लार आहेत. संगम वाङ्मयांत वेंगडमूच्या राजास "चोरांचा राजा" या नांवानें संबोधिलें आहे. त्रिचनापल्लीजवळच्या शेंडालें या गांवांतील मीनाक्षी सुंदरेश्वरांच्या मंडपाच्या खांबावरील शिलालेखांत कलभ्रराजांचा जो वंशवृक्ष दिला आहे, त्यांतहि या राजांना 'चोरांचा चोर' अगर 'चोरांचा राजा' असें विशेषण लावण्यांत आलें आहे.

वर ज्या नालदिआर महाकाव्याच्या रचनेचा उल्लेख केला आहे, त्यापूर्वी कांहीं वर्षे दिगंबर जैन संगमाची स्थापना झाली असावी असें मानणें भाग आहे. आपल्या धर्मांचा उपहास करणाऱ्या वाङ्मयसंस्थेशीं आपला संबंध जैन काय अगर इतर कोणीही स्वाभिमानी ठेवतील असें मानणें चुकीचें होईल. तसेंच या नालदिआर महाकाव्यांत जैन व ब्राह्मणधर्मीय यामधील चुरशीचा व द्वेषाचा उल्लेख आला आहे. हा चुरशीचा व द्वेषाचा काल व कलभ्रराज्यस्थापनेचा कालहि जवळ जवळ एकच आहेत.

वर ज्या कालास 'संगमकाल' या नांवानें संबोधण्यांत आलें आहे, त्या काळांतील वाङ्मयावरून खालील अनुमानें काढतां येतात.

( १ ) तोल्कापिअरच्या काळांत ( इ. स. पूर्व ३५० ) दक्षिण हिंदुस्थानच्या अगदीं दक्षिण टोंकापर्यंत जैनांचा बहुधा प्रवेश झाला असावा.

( २ ) इ. सनाच्या सुरवातीपूर्वी दक्षिण हिंदुस्थानच्या अगदीं दक्षिण टोंकापर्यंतच्या प्रदेशांत जैनांनीं आपली कायमची वस्ती केली.

( ३ ) तामिल वाङ्मयांतील ऑगस्टन् काल म्हणून ज्या कालाला संबोधिलें जातें तो जैनांच्या वैभवाचा काल होय.

( ४ ) इ. सनाच्या पांचव्या शतकानंतर जैनधर्म अत्यंत प्रबल होऊन तो पांड्य देशाचा राष्ट्रधर्म व पांड्य राजांचा कुलधर्म झाला.

यावरून इ. सनाचे सुरवातीपूर्वी सुमारें तीनशें चारशें वर्षे आपल्या धर्मप्रसाराबद्दल जैनांनीं नितांत प्रयत्न केला व दक्षिण हिंदुस्थानच्या अगदीं दक्षिण टोंकापर्यंत जैनधर्माची ध्वजा फडकाविली. इ. सनानंतरच्या पुढील ५००–६०० वर्षांच्या कालांत जैनधर्मीयांनीं आपल्या धर्मास बळकटी आणाविली. व त्यानंतरच्या ५०० वर्षांत जैनधर्मप्रसाराच्या आड येण्याचें इतर कोणाहि धर्मीयांनीं साहस केलें नाहीं. इ. सनाच्या ११ व्या शतकाच्या अखेरीपर्यंत जैनधर्मांविरुद्ध उघड बंड करण्याचें धाडस इतर धर्मीयांनीं केलें नाहीं. तथापि यापूर्वी १५०–२०० वर्षांच्या कालांत जैनांच्या द्वेषाचें बीजारोपण होतच चाललें होतें; व राजमहेंद्रीचा राजा राजनरेंद्र याच्या कारकीर्दींत ( इ. स. १०२२ नंतर ) या द्वेषांकुरास जोराची पालवी फुटत गेली व यापुढील ३०० वर्षांत हजारों जैनांचा बळी घेण्याइतका हा विषवृक्ष वाढला.

## सारांश

कर्नाटक, तामील, तेलगू भाषा प्रचलित असलेल्या मुलखांत व महाराष्ट्र आणि कोंकण प्रांतांत इ. स. ११ व्या शतकाच्या मध्यापासून पुढें सुमारें दोनशें वर्षांचा काल जैन व जैनधर्म यांना अनिष्ट असाच गेला. आपलें पूर्व वैभव संरक्षण करण्याकरितां जैनांनीं स्वतःच्या दौलतीचा त्याग केला व सर्वांना प्रिय असा आपला प्राणहि पणाला लाविला. यामुळें मध्यान्हीचा जैनधर्म रवि अस्ताचलाकडे न जातां तो स्थिर राहिला.

## जैनधर्म व जैनधर्मीयांचा उदय

जैनधर्मांचा मध्यान्ह व अस्तकाल दाखविणाऱ्या कांहीं ढोबळ खुणा दिल्यास वरील विवेचन लक्षांत येण्यास मदत होईल. राजमहेंद्रीचा राजा राजनरेंद्र याच उदय व गंगवंशिय राजाचा अस्त. वीरशैवांचा उदय व कलचुरी घराण्याचा नाश.

रामानुजाचा उदय व होयसाल कारकीर्दीतील धर्मसहिष्णुता. आणि सर्वांनाच परकीय अशा मुसलमानांचें वर्चस्व. विजयनगर राज्यांत जैनांनां हार्दिक ओलाव्याचा अभाव, इत्यादि, इत्यादि.

या सुमारास महंमदी धर्मीयांचें दक्षिणेंत राज्य स्थापन होऊन त्यांच्या साहसाकडे सर्वांचेंच लक्ष वेधलें नसतें तर जैनधर्म व जैनधर्मीय यांवर कोणकोणते अनर्थ ओढवले असते याबद्दल तर्क करीत बसण्यांत अर्थ नाहीं.

यापुढील प्रकरणांत इ. सनाच्या पांचव्या शतकापासूनचा तामील प्रांतांतील जैन व जैनधर्म यांचा इतिहास दिला आहे.

# प्रकरण चौथें

## इ. स. च्या ५ व्या शतकापासूनचा तामील प्रांत आणि जैनधर्म.



इ. सनाच्या पांचव्या शतकांत हिंदुधर्म पुनर्ज्जीवनाची जीं लाट उसळली त्यामुळें तामील व तेलगु प्रांतांतील जैनांच्या वर्चस्वास व धर्मवृद्धीस आळा बसत चालला, व नंतरच्या कांहीं काळांत त्यांचे या देशांतून प्रायः उच्चाटन झालें. या शतकाच्या सुरवातीपूर्वी बौद्धधर्म प्रायः लोकांच्या दृष्टीआड झाला होता. जैनधर्म मात्र यशाच्या मध्यान्हि होता. जैनांची कारकीर्द सर्वच प्रकारें जशी यशस्वी झाली तशीच ती त्यांची कारकीर्द दीर्घकालीनहि झाली. जैनाचार्यांनीं व जैन राजांनीं जैनधर्म प्रसारार्थ योजिलेल्या योजनेंतील दोषस्थळांची संपूर्ण जाणीव ब्राह्मणांना झाली होती. जैनधर्माची शिकवण जरी सौम्य स्वरूपाची असली तरी नित्य व्यवहारांत ती आचरण्यास कठीण आहे असें लोकमत बनविण्याच्या प्रयत्नांत ब्राह्मणांना यश येत चाललें. बदललेल्या परिस्थितीप्रमाणें आपलें धोरण न बदलण्यांत जनांकडून चूक झाली. फक्त राजाश्रयाच्या जोरावरच जैनधर्माचें वर्चस्व अवलंबून राहिलें आहे; यांचीहि जाणीव प्रतिस्पर्ध्यांना होऊन राहिली. मग हा राजाश्रय नष्ट करण्याच्या प्रयत्नास ते लागले तर त्यांत नवल तें काय? कोणत्याहि मतप्रसारास व विस्तारास राजाश्रयाची जरूरी निदान त्या काळीं तरी खास लागत असे. राजाचा धर्म तोच प्रायः प्रजेचा धर्म त्या काळीं असे त्यामुळें राजाच्या धर्मांतराबरोबरच प्रजेच्या धर्मांतहि अंतर पडत असे. त्यामळें राजांना आपल्या धर्मांचे अनुयायी करण्याची सुसंधी केव्हां प्राप्त होईल; याकडे ब्राह्मण धर्मांच्या अनुयायांचे डोळे उत्सुकतेनें लागून राहिले असल्यास नवल नाहीं.

लोकमत व राजमत अनुकूल करून घेण्याकरितां जैनधर्मीयांचें अनुकरण करून ब्राह्मणांनीं–शैवांनीं–आपल्या देवदेवतांचीं अनेक मंदिरें बांधविलीं; व देवदेवतांचें गुणवर्णनपर अनेक लहान लहान स्तोत्रें तयार करून त्यांचा प्रसार केला. या स्तोत्रांतून शंकरोपासकांनीं शंकराच्या अद्भुत व अमानुषीय कर्तबगारीचीं वर्णनें दिलीं; हेतु हा कीं तीर्थंकरांच्या अंगीं ही अद्भुत शक्ति नसून ती फक्त आपल्याच अधिष्ठात्री देवतांच्या अंगीं आहे.

अद्भुत व अतिमानुषीय कथाकडे सामान्य जनता मोठ्या कुतुहलानें सततच पाहते. राजराज चोल (९८४–१०१३) च्या कारकिर्दीपर्यंत अशा तऱ्हेचें वाङ्मय इतकें विपुल झालें कीं तें वेंचून एकत्रित करण्याचा प्रश्न निघाला व ती कामगिरी **नंबिआंदर** ( ९७५ ते १०३५ ) यांजकडे सोंपविली; व त्यानें तें ११ भागांत एकत्रित केलें. कुलोत्तुंग राज्याच्या कारकीर्दींत ( ११५० ) अनेक शैव साधूंच्या अद्भुत दंतकथा **पेरियापुराणम्** या ग्रंथांत गोंवण्यांत आल्या. नांबिआंदर यानें पुऱ्या केलेल्या या ११ भागांस पेरियापुराणाची जोड देऊन या १२ भागांत शैव-दैवत व त्यांचे भक्त यांच्या अद्भुत कथा दिल्या. याच बारा भागांच्या पूर्ततेच्या कालास **शैव–नयनार** व **वैष्णव अलवार** काल असें संबोधण्यांत येतें. या बाराहि भागांत जैनधर्मियांच्या धार्मिक व इतर चळवळीची बरीच माहिती मिळते.

या शैव वाङ्मयांत धार्मिक वैष्णव वाङ्मयानेंहि ( प्रबंधानें ) थोडीशी भर घातली. या बारा भागांपैकीं कोणत्याहि भागांत नयनार ( शैवसाधू ) यांचा काल दिलेला नाहीं; तसेंच यांत ज्या निरनिराळ्या कथा दिलेल्या आहेत त्या इतक्या अद्भुत व काल्पनिक आहेत कीं, ऐतिहासिक व चिकित्सक दृष्टीनें विचार करणारा कोणीहि विचारवान् त्यावर काडीमात्रहि विश्वास ठेवण्यास तयार होणार नाहीं असें इतिहासज्ञाचें मत आहे. पेरियापुराणांत ज्या ६३ शैवसाधूंच्या अद्भुत व अगम्य कथा दिल्या आहेत; त्यांपैकीं फक्त अप्पार, शिरुतोंडर, तिरुज्ञानसंबंदर यांचा वृत्तांत जैनधर्मासंबंधींच्या इतिहासाच्या दृष्टीनें महत्त्वाचा आहे; त्यांतहि शेवटचा साधू संबंदर यांच्या कर्तृत्वामुळें जैनधर्मप्रसारास जबर धक्का बसल्यानें त्याच्या चारित्राशीं प्रस्तुत प्रकरणाचा अधिक निकट संबंध येत आहे.

## शैवसाधू संबंदर

तंजावर जिल्ह्यांतील शिजल गांवीं एका ब्राह्मण उपदेशकाच्या ( Priest ) पोटीं संबंद यांचा जन्म झाला. वयाच्या तिसऱ्याच वर्षी तो शिवगुणवर्णनपर स्तोत्रें म्हणूं लागल्यानें बालपणांतच त्यांची साधुवृत्ति प्रगट होऊं लागली.

वेद व वेदांगांच्या अभ्यासकांत त्याचा हात धरणारा त्या कालीं तामीलदेशांत दुसरा कोणी नव्हता, अशी त्याजबद्दलची माहिती दिली आहे.

दक्षिण हिंदुस्थानांतील अनेक शव तीर्थ-क्षेत्रांचें त्यानें दर्शन घेतलें. या प्रवासांत शिवस्तोत्रांचा तो सतत उच्चार करीत असे. आपल्या अद्भुत व अगम्य कृतीनें त्यानें शेंकडों अनुयायी मिळविले. बौद्ध व जैनधर्मांचें उच्चाटन करणें हें एकच ध्येय आजन्म त्यानें आपल्या दृष्टीसमोर ठेविलें होतें. यावेळीं सुप्रसिद्ध सुंदर पांड्यन या नांवाचा पांड्य कुलोत्पन्न जैनधर्मीय राजा मदुरा येथें राज्य करीत होता. चोल राजाची कन्या मंगयर्करसि ही या सुंदर पांड्य राजाची पत्नि असून ती कट्टर शैवधर्मानुयायी होती. या राजाचा प्रधानहि शैवोपासक होता. संबंदर साधूची कीर्ति ऐकून त्यास राजधानीस बोलावून राजाचा धर्मांतर करवावा असा घाट राणी व प्रधानांनीं घालून संबंदर यांस त्यांनीं राजधानीस बोलविलें. या आमंत्रणाचा स्वीकार झाल्याचें वृत्त ऐकून जैनमुनीजनांत अर्थातच मोठी खळबळ उडाली. मदुरा एथें आल्यावेळीं संबंदरास अग्नीच्या भक्षस्थानीं टाकण्याकरितां ज्या इमारतींत संबंदर उतरला होता; त्या इमारतीस आग लावून देण्यांत आली; परंतु तो त्यांतून शरिरसलामत सुटला असें ‘ पेरिया पुराणांत ’ लिहिलें आहे. याच वेळीं मदुरेचा हा राजा एकाएकीं आजारानें अत्यावस्थ झाला. त्यास रोगमुक्त करण्याचें जैनसाधूंचें प्रयत्न अयशस्वी ठरले व त्यानंतर संबंदर याजवर ही कामगिरी सोंपविली. चारदोन शिवस्तुति स्तोत्रांचा त्यानें उच्चार केल्याबरोबर राजास आराम वाटला व त्यामुळें जैनधर्मांच्या प्रभावासंबंधी या राजाच्या मनांत शंका उद्भवली. या अनुकूल परिस्थितीचा फायदा घेऊन शैवधर्मांचें वर्चस्व स्थापन करण्याच्या उद्योगांत राजाचा प्रधान व राणी हे मग्न झाले. आपल्या धर्मांचा प्रभाव दाखविण्याचें आव्हान संबंदरानें जैनांना दिलें व राजानें त्याचा स्वीकार करण्यास जैन साधूंना सांगितलें. जल व अग्नि हीं नेहमींप्रमाणेंच दोन दिव्यें ठरविण्यांत आलीं. संबंदर यांचा स्तोत्र ग्रंथ व जैन धर्मग्रंथ हे दोन्ही अग्नींत टाकण्यांत आले. जैनधर्मग्रंथांची राखरांगोळी झाली. व संबंदर यांच्या ग्रंथांचीं पानें हिरवीगार दिसूं लागलीं. वैगई नदीचा प्रवाह फारच जोराचा आहे. त्या नदीच्या प्रवाहाबरोबर जैनधर्म ग्रंथ वहात गेले व प्रवाहाच्या उलट दिशेस संबंदर स्तोत्रें चढून गेलीं अशी आख्यायिका पेरिया पुराणांत दिली आहे.

याचा परिणाम राजाच्या मनावर होऊन शैवधर्म श्रेष्ठ व प्रभावी ठरल्यानें राजा सुंदर पांड्य यानें जैनधर्मांचा त्याग करून शैवधर्माचा स्वीकार केला. या धर्मांतरामुळें अर्थातच जैनधर्मास जबर धक्का मिळाला.

## सुंदर पांड्य यानें धर्मांतर तरी केलें ?

राजा सुंदर पांड्य यानें धर्मांतर केलें, असाहि पुरावा आज उपलब्ध नाहीं. तथापि संबंदर ही ऐतिहासिक व्यक्ति होऊन गेली व जैन धर्मप्रसारास त्यानें आळा घातला, असा प्रत्यंतर पुरावा मिळत आहे.

## संबंदर याचा काल निर्णय

सुंदर पांड्यास कुन पांड्य असेंहि नांव होतें. पेरिया पुरणावरून संबंद व सुंदर हे समकालीन होते असें दिसतें. सुंदर पांड्याच्या राज्यकालाविषयीं विद्वानांमध्यें तीव्र मतभेद आहे. टेलरच्या मतें इ. स. पूर्वी १३२० वर्षें. डॉ. कल्डलवल्थ यांच्या मतें इ. स. नंतर १२९२ वर्षें व डॉ. सुंदरम् पिल्ले यांच्या मतें इ. स. ६ वें शतक असा कालनिर्णय दिला जात आहे. तंजावर येथील सुप्रसिद्ध देवालय बांधविणारा राजा राजराजदेव ( इ. स. ९८४ ) यांच्यापूर्वी अनेक वर्षें संबंदर होऊन गेला असें प्रो. पिल्ले यांचें मत आहे. शंकराचार्यांच्या ग्रंथांत ( ८ वी शताब्दि ) संबंद यांच्या नांवाचा उल्लेख आहे. यावरून आद्य शंकराचार्यांचें अगोदर संबंदर होऊन गेला असेंहि म्हणावें लागतें. राजा सुंदर पांड्याच्या कालाबद्दल निर्णय एकमतानें होणें अशक्य झालें तथापि संबंद याचा काल-निर्णय करण्यास पुरावा उपलब्ध झाला आहे.

आद्य शंकराचार्यांनीं केलेल्या उल्लेखावरून तत्पूर्वी संबंद होऊन गेला असला पाहिजे असें वर प्रतिपादन केलें आहे. परंतु एवढ्यानें त्याचा नक्की कालनिर्णय झाला असें मानितां येणार नाहीं. कारण शंकराचार्यांच्या कालाबद्दलहि विद्वानां-मध्यें अद्याप तीव्र मतभेद आहेतच. संबंद यांच्या स्तोत्रांत त्यांचा स्नेही सिरु-तोंडर यांच्या नांवाचा वारंवार उल्लेख येतो व हा सिरुतोंडर पहिल्या नरसिंहवर्मा ( पल्लव ) यांच्या सैन्याचा मुख्याधिकारी होता व वातापि—हल्लीं बदामि—हस्तगत करण्यांत सिरुतोंडर हा प्रमुख होता हें मान्य झालें आहे. हा प्रसंग इ. स. ६४२ च्या वर्षी घडला. यावरून इ. सनाच्या सातव्या शतकाच्या मध्यास संबंद, सिरुतोंडर व अप्पार हे होऊन गेले असें सिद्ध होत आहे.

जैनधर्मास या दक्षिण भागांत याच सुमारास विरोध होऊं लागला असें मानावें लागणार आहे. मद्रास येथील ओडियन ग्रामोफोन रेकॉर्डस् कंपनीनें याच संबंदाच्या उपदेशाच्या कांहीं प्लेटी तयार केल्या होत्या व त्या जैनधर्मीयांच्या धर्म-भावना दुखविणाऱ्या आहेत अशी जोराची चळवळ झाल्यानें ते रेकॉर्डस् सरकारजमा झाले हा वृत्तांत ताजा आहे.

## अप्पार याची कामगिरी

पांड्य मुलुखांत जैनधर्म प्रसारास आळा घालण्यांत ज्याप्रमाणें संबंदर यांचे श्रम कारणीभूत झाले त्याचप्रमाणें पल्लव राज्यांत जैनधर्मास प्रतिकूल परिस्थिति निर्माण करण्यास अप्पार यांचे श्रम कारणीभूत झाले. संबंदप्रमाणें अप्पराचा जन्म ब्राह्मण कुळांत झाला नसून तो बेल्लाल जातीचा होता. शैवोपासक बनण्या-पूर्वी तो जैनधर्मीय होता असें त्यानें रचलेल्या जैनधर्मीय स्तोत्रावरून स्पष्ट होत आहे. जैनधर्मीयांच्या मतें हा तारुण्यावस्थेंत जैनधर्मीय साधु होता; मध्य वयांत तो शैव-धर्मीय झाला व पुढील काळांत पुनः जैनधर्मीय झाला. शैवधर्म प्रसारार्थ केलेल्या कामगिरीवर धर्मांतरानंतर वृद्धापकाळीं तो साफ बोळा फिरवील या भीतीनें शैवांनीं त्याचा खून केला. लोकक्षोभ होऊं नये म्हणून त्यास वाघानें खाल्लें, अशी हूल उठविली. शिव व वाघ यांचा अन्योन्य संबंध सर्वश्रुत आहे. जिनदेव स्तुतिपर अप्परानें रचलेलीं स्तोत्रें अद्यापहि जैनांच्या तोंडीं आहेत. जैनधर्मीय विधवा बहिणीच्या विनंतीवरून त्यानें वृद्धापकाळीं धर्मांतर करून तो जैनधर्मी झाला. शैवोपासक झाल्यानंतर इतर अनेक धर्मांतरीत लोकांप्रमाणें आपल्या पूर्वधर्माच्या उच्छेदास त्यानें जोराची मदत केली. पल्लव राजा पहिला नरसिंहवर्मा याचा मुलगा राजा महेंद्रवर्मा यास शैवोपासकाची दीक्षा देण्याचें श्रेय याच अप्परास आहे. यावरून पांड्य व पल्लव राज्यांत जैनधर्माऐवजीं शैवधर्म हा इ. सनाच्या ७ व्या शतकाचे अखेरीस कांहीं राजांचा राजधर्म झाला.

## जैनधर्मास उतरती कळा व जैनांचा छळ

इ. सनाच्या सातव्या शतकाच्या मध्यानंतर व आठव्या शतकाच्या सुरवातीस पांड्य व पल्लवराजे जैनधर्मीय राहिले नाहींत. चोल राजे तर बहुधा यापूर्वींच शैवोपासक झाले होते. यावरून या तिन्ही देशांतून जैनधर्माचा या काळीं सर्वस्वीं उच्छेदच झाला होता असें मानणें मात्र सर्वस्वीं चुकीचें होईल.

एखादी मोठी लढाई मारिली तर त्यामुळें राज्यवंशांत स्थित्यंतर होतें; परंतु धार्मिक क्षेत्रांतील स्थित्यंतर मात्र अशा एखाद्या विजयानें सहजासहजीं होत नसतें. जैनधर्माच्या दृष्टीनें विचार करितां तो या कालापूर्वी किमान एक हजार वर्षें तरी बद्धमूल होऊन त्यानें लोकांच्या मनाचा ताबा मिळविला होता. यामुळें चुटकी-सरशीं त्यांचें उच्चाटण होणें शक्य नव्हतें.

बौद्धधर्माप्रमाणें जैनधर्माचें उच्चाटन दक्षिणेंतून अखेरपर्यंत झालें नाहीं. संबं-दच्या चिथावणीवरून एक नाहीं दोन नाहीं, तर ज्या आठ हजार जैनपंडितांना घाण्यांत घालून पिळून मारण्यांत आलें ते सामान्य जैन नसून ते आठ हजार पुढारी होते; ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. पल्लव व पांड्य राज्यांत जैनधर्मीयांचा अपमानुष छळ झाला हे पेरियापुराणावरून स्पष्ट होत आहे. अप्परच्या स्तोत्रांत अनेकवार या निर्दय छळाचा गौरवपर उल्लेख आहे. अतिशयोक्तीचा भाग वगळला तरी वरील दोन देशांत जैनांचे सुखाचे व शांततेचे दिवस नष्ट होऊन त्या ऐवजीं त्यांना धर्मासाठीं अनेक असह्य दुःखें भोगावीं लागण्याचा काळ आला होता. तामील देशांत विशेषतः पांड्य राज्यांत इ. सनाच्या सहाव्या व सातव्या शतकांत राजकीय वर्चस्वहि जैनांचेंच होतें. कलभ्रांच्या स्वारीपासून सुंदर पांड्यांच्या धर्मांतरापर्यंतच्या दरम्यानच्या काळांत तर या देशाची राजकीय सूत्रें जैनांच्याच हातीं होतीं. या राजकीय वर्चस्वाचा फायदा घेऊन जैनांनीं आपल्या धर्माचा शक्य तितका प्रसार केला. सुंदर पांड्य राजाच्या धर्मांतरामुळें प्रतिक्रियेस सुरवात झाली. जैन पुढाऱ्यांचा शिरच्छेद होऊं लागला व तो टाळण्यासाठीं अनेकांना देशत्याग करावा लागला. धर्मासाठीं ज्यांना प्राणत्याग व देशत्याग करवला नाहीं, त्यांना शैवानुयायीं व्हावें लागलें. अशाहि लोकांची संख्या थोडथोडकी होती असें नाहीं. सुंदर पांड्य राजाचें धर्मांतर म्हणजे राजकीय क्षेत्रांतील क्रांति नसली तरी धार्मिक क्षेत्रांतील ती क्रांतीच होय.

संबंद व अप्पार यांच्या स्तोत्रांत आणि इतर लिखाणांत जैन व जैनधर्म यांच्या निंदेशिवाय दुसरा विषय नाहीं. त्यांची विचारसरणी व भाषा ग्राम्य आहे. एवढेंच नव्हे तर ती अत्यंत दुष्ट अशीहि आहे. जैन व जैनमुनी या विषयीं गैरसमजूत पसरवून जैन धर्माबद्दल लोकमत कलुषित करण्याच्या या प्रयत्नाकडे कोणीहि विचारवान् तिरस्कारानेंच पाहील.

संबंद् व अप्पार या शैव साधूंनीं अंगीकृत केलेल्या या कार्याचें ओझें यापुढें वैष्णव साधूंनीं आपल्या अंगावर घेऊन तीच परंपरा चालविली. तिरु मंगई अलवार हा एक चोल देशांतील ईशान्य भागांतील अतिवडू व त्याच्या आसपासच्या कांहीं खेड्यांचा इ. सनाच्या ८ व्या शतकाच्या पूर्वार्धांत राजा होता व त्यानें आपल्या पूर्वींच्या इतर वैष्णव साधूंचें ( अलवारांचें ) अनुकरण करून जैनधर्मांविरुद्ध मोहीम सुरू केली. तोंडर डिपोडी या वैष्णव साधूनें या कार्यांत बराच भाग घेतला होता असें त्याच्याहि लिखाणावरून दिसून येतें. या वरून इ. स. ७५० नंतर पांड्य व पल्लव राज्यांत जैनधर्माच्या उत्कर्षास पायबंद् बसला.

## तामील देश–सिंहावलोकन.

१ इ. सनाच्या ५, ६, ७ व ८ व्या शतकांत जैनांनीं सामाजिक, राजकीय व धार्मिक क्षेत्रांत असामान्य अशी सत्ता व वर्चस्व गाजविली.

२ शैवधर्मीय साधूंच्या उत्कर्षामुळें, त्यांच्या एकजुटीच्या प्रयत्नांमुळें व सुंदर पांड्यन् राजाच्या धर्मांतरामुळें पांड्य देशांत आणि अप्पारच्या कर्तबगारीमुळें व पल्लव राजाच्या धर्मांतरामुळें पल्लव देशांत इ. सनाच्या आठव्या व नवव्या शतकांत जैनधर्मप्रसारास आळा बसून जैनधर्म रवि अस्ताचलाकडे जाऊं लागला.

३ शैवांच्या छळानंतर वैष्णवांनीं जैनधर्मीयांच्या छळास व उच्छेदास सुरवात केली व इ. सनाच्या ९ व्या व १० व्या शतकांचे अखेरीपर्यंत हा उपक्रम सुरू ठेवून जैनधर्म रवीस संध्यासमय समीप करण्यास मदत केली.

४ पांड्य देशांतील व पल्लव राज्यांतील जैन व जैनधर्म यांच्या उत्कर्षास ओहटी लागल्यानंतर सुमारें दोनशें वर्षांनीं कर्नाटक व महाराष्ट्रांतील जैन व जैनधर्म यांच्या राशीस शनि पिडूं लागला, असें स्थूलमानानें म्हटल्यास तें चुकीचें होणार नाहीं. मुसलमानांच्या दक्षिणेंतील स्वाऱ्या व विजयनगर राज्यस्थापना या कार्यकारणभावाच्या व क्रांतिकारक गोष्टी घडल्या नसल्या तर महाराष्ट्र व कर्नाटक भागाखेरीज दक्षिण हिंदुस्थानच्या इतर भागांत जैनांची काय अवस्था झाली असती याची कल्पनाहि करवत नाहीं.

# प्रकरण पांचवें

## आधुनिक–शंकराचार्य–काल व तामील प्रांतीय जैनधर्म

सुप्रसिद्ध शैव नयनार व वैष्णव अलवार यांच्या कालानंतर आचार्य कालास सुरवात झाली. या आचार्यांनीं हिंदुधर्माच्या प्रगल्भतेला, प्रगतीला व उत्क्रांतीला अत्यंत मदत केली. आद्य शंकराचार्य (इ. स. ८ वें) यांनीं आपलें सर्व लक्ष व बुद्धिसामर्थ्य उत्तरेकडे दिलें; यावरून त्या कालीं दक्षिणेंत जैनांचें वर्चस्व म्हणण्यासारखें नसावें असें म्हणतां येईल; अगर उत्तर हिंदुस्थानांत मान्यता संपादन केल्याखेरीज खरी मान्यता नाहीं अशा समजुतीनेंहि हा प्रयत्न झाला असावा. पांड्य व पल्लव राज्यांतील छळास कंटाळून व देशत्याग करून अनेक जैन म्हैसूर संस्थानाकडे गेले व त्यांतील अनेक विद्वानांना श्रवणबेळगोळनें या आपत्कालीं आश्रय दिला. याच श्रवणबेळगोळच्या पुण्यभूमींतून इ. स. पूर्व ३०० वर्षांपूर्वी धर्मप्रसारार्थ ज्या जैन साधूंचें दक्षिणेंत–तामिलादि देशांत–प्रयाण झालें होतें; त्याच जैन साधूंचे धर्मवंशज पांड्य व पल्लवादि देशांतील छळास कंटाळून बेळगोळास–मूलस्थानीं–सुमारें हजार बाराशें वर्षांनीं परत आले.

यावेळीं श्रवणबेळगोळ व त्याच्या आसपासचा भाग गंगवंशीय राजांच्या ताब्यांत असून जैनधर्म हा त्याकालीं राजधर्म होता. अर्थात्‌च आपत्कालीं या राज्यांत जैनधर्मीय आले तर त्यांत नवल नाहीं. अनन्वित छळ झाला. हजारों जैनांनीं धर्मासाठीं मरण पत्करिलें; अनेकांनीं देशत्याग केला; तरी तामील प्रांतांतून बौद्धाप्रमाणें जैनांचा समूल उच्छेद ब्राह्मणांना अखेरपर्यंत करतां आला नाहीं; मात्र जैनांचें वर्चस्व नष्ट झालें. जैनांचें धार्मिक स्वातंत्र्य नष्ट झालें. राजकीय सत्ता त्यांच्या हातांतून गेली. सामाजिक क्षेत्रांत त्यांची माननान्यता राहिली

नाहीं; तथापि वाङ्मयक्षेत्रांतील त्यांचें वर्चस्व अबाधित राहिलें. जैन विद्वानांच्या वाङ्मयाची बरोबरी करण्याचा ब्राह्मणांनीं प्रयत्न केला परंतु त्यांत यश तर आलेंच नाहीं; उलट तुलनेस संधी मिळाल्यानें जैन वाङ्मयाची सरसताव त्यांचें श्रेष्ठत्व अबाधित राहिल्याचें जगाच्या प्रत्ययास आलें. कुरल व शिलप्पदिकारम् हे तामील भाषेंतील विख्यात ग्रंथ यापूर्वींच वाङ्मयक्षेत्रांत चमकतच होते परंतु जैनांनीं आपल्या या आपत्कालींहि वाङ्मयक्षेत्रांत नवीन भर घालून आपल्या पूर्वजांच्या नांवाची परंपरा अखंड राखिली.

जैनमुनि **तिरुतक्कदेवर** यानें **चिंतामणी** नामक तामील भाषेंत लिहिलेल्या ग्रंथाची महाकाव्यांत गणना होत आहे. हा ग्रंथ व ग्रंथकार याबद्दल सहाव्या प्रकरणांत अधिक माहिती दिली आहे. तामील भाषेंतील व्याकरण विषयावरील ग्रंथ **पवनंदी** जैनमुनीनें तेराव्या शतकांत लिहिला. याशिवाय ज्योतिष, भाषा, व्याकरण व गणितादि अनेक विषयांवर अनेक जैन विद्वानांनीं अनेक ग्रंथ लिहिले. मलयापूर, बिडुवाई, तिरुमलाई वगैरे भागांत या कालीं जैनांची वस्ती विशेष प्रामुख्यानें होती. हिंदुधर्मीय आचार्यांच्या उत्कर्षकालांत व राजाश्रयाचे वेळींहि तामील वाङ्मयांत ब्राह्मणांना वाङ्मयक्षेत्रांत जैनांची बरोबरी करितां आली नाहीं. मग श्रेष्ठत्व मिळविणें तर दूरच राहिलें. या आचार्यमालिकेंतील शेवटचे आचार्य माधवाचार्य–यांचे कालीं मुसलमान व मुसलमानी धर्मांचा प्रभाव दक्षिणेंत झाला व दक्षिणेंतील त्यांच्या राज्यस्थापनेबरोबरच हिंदु व जैनधर्मांच्या प्रसारास आणि जैनांच्या वाङ्मयसेवेस सारखाच पायबंद बसला.

तामील वाङ्मयाच्या आधारें दक्षिणेंतील जैनधर्मांचा प्रारंभ, विस्तार व ऱ्हास यांचा इतिहास मागील प्रकरणांत दिला आहे. वाङ्मयाच्या आधारें जैनधर्मांचा साग्र व साद्यंत इतिहास लिहिण्याइतकी सामुग्री आज उपलब्ध नाहीं. तसेंच दक्षिणेंतील उपलब्ध वाङ्मयांत तत्कालिन राजकीय, सामाजिक व धार्मिक माहितीचा अभाव हेंहि वैगुण्य असा इतिहास लिहिण्याच्या मार्गांतील दुसरी अडचण आहे. उत्तर हिंदुस्थानच्या वाङ्मयांत ही उणीव भासत नाहीं. युरोपियन प्रवाशांनीं लिहून ठेवलेल्या सामुग्रींच्या अभावीं जैनधर्मासंबंधीं इतिहास लिहिणेंहि अशक्य झालें असतें. हिंदुधर्मीयांच्या वाङ्मयांत जैनधर्मासंबंधीं फारसा उल्लेख येत नाहीं; आणि जेथें जेथें त्यासंबंधीं उल्लेख करण्याचा प्रसंगच आला त्या त्या ठिकाणीं जैनधर्मासंबंधीं भलेपणाच्या एकाहि शब्दाचा उच्चार करण्यांत आलेला नाहीं.

यामुळें शत्रुपक्षानें दिलेल्या माहितीचा उपयोग अत्यंत दक्षतेनें करणें जरूर आहे. अशा अनेक अडचणी जैनधर्माचा साद्यंत इतिहास लिहिण्याच्या मार्गांत आड येत आहेत.

त्या काळचा जैनसमाज व त्यांचे रितीरिवाज याबद्दलची साग्र माहिती या लहानशा पुस्तकांत साग्र देणें शक्य नाहीं; तथापि ११ व्या प्रकरणांत जी त्रोटक माहिती दिली आहे त्यावरून या विषयाची रूपरेखा समजून घेण्यास थोडीफार मदत होईल अशा आशा आहे. कर्नल मॅकेंझी व कोलब्रुक यांनीं या विषयांचा अभ्यास करून त्याबद्दल स्वतंत्र ग्रंथलेखनहि केलें आहे. जैन शिल्पकलेसंबंधींची चर्चा प्रस्तुत प्रसंगीं करणें शक्य नाहीं. जैन व जैनधर्मीय यांच्या अनेक वर्षांच्या सहवासाचा हिंदु समाजावर कसा व कोणता परिणाम घडला याबद्दल थोडेसें दिग्दर्शन करणें या विषयाच्या पूर्ततेच्या दृष्टीनें इष्ट व जरूर आहे.

वाङ्मय व शिल्पकला यांची जैनांना अत्यंत आवड. शिल्पकला व वाङ्मय यांचा अभ्युदय व विकास करितांना कोणत्याहि स्वार्थी विकारास ते वश झाले नाहींत. तामील वाङ्मयांत जैनधर्मीयांनीं टाकलेली भर अमूल्य आहे. संस्कृत शब्दांच्या धातूपासून अनेक तामील शब्द जैनधर्मीयांनीं बनविले; अनेक संस्कृत शब्दांचे उच्चाराचे दृष्टीनें फेरफार करून त्यांना तामील पोशाख चढविला. कोणत्याहि विशिष्ट देवाच्या अगर धर्माच्या नांवाचा उल्लेख न करितां आपल्या धर्माचा उपदेश करण्याची हातोटी जैनांना साध्य झाली होती; व त्याचें प्रत्यंतर कुरल व नालदिआर या ग्रंथांतून मिळतें. मनाचा खरा समतोलपणा असल्याखेरीज अशी कृति शक्य नाहीं. तामील भाषेपेक्षांहि कानडी भाषेवर जैनांचे अनंत उपकार आहेत. **कानडी भाषेचे उत्पादक व संरक्षक जैनच असें** म्हटल्यास तें वस्तुस्थितीस सोडून होणार नाहीं. इ. सनाच्या बाराव्या शतकाच्या मध्यापर्यंत जैन व जैनवाङ्मय म्हणजेच कानडी भाषा व कन्नड वाङ्मय असें मानावें लागतें. सर्वांत जुनें व सर्वोत्कृष्ट कन्नड वाङ्मयांची लेखणी जैनांची आहे. जात्यभिमान व धर्माभिमान यांच्या मोहास बळी न पडतां केवळ वाङ्मय प्रेमाखातर जैनांनीं वाङ्मयसेवा केली. स्वतंत्र ग्रंथलेखनाबरोबरच अनेक उत्कृष्ट संस्कृत ग्रंथांचें कानडींत रूपांतर केलें. पंप वगैरे जैन कवी व त्यांच्या काव्याचें आद्वितीयत्व यापुढें एका स्वतंत्र प्रकरणांत देण्यांत आलें आहे.

## अहिंसा

जैनधर्मीयांनीं अहिंसा मताचा जितक्या सूक्ष्म रितीनें विचार केला आहे तितका विचार इतर कोणत्याहि धर्मीयांनीं केलेला नाहीं; याबद्दल मतभेद नाहीं. जैनांच्या अहिंसा मताच्या प्राबल्यामुळें वैदिक धर्मानुयायांना यज्ञादि धार्मिक कृत्यांतहि हिंसेस–पशुबलीस–फांटा द्यावा लागला. हिंदु समाजांत आजमितीसही ब्राह्मणांचें वैशिष्ट्य मांसाहारत्यागामुळेंच राहिलें आहे. जैनांचा अमानुष छळ करितांना या उपकाराचें तरी स्मरण व्हावयास पाहिजे होतें. परंतु धर्मवेड व परधर्मद्वेश यांनीं पछाडलेल्या वैदिकांना एवढी कृतज्ञता दाखविण्याची बुद्धि कशी होईल !! अहिंसेचें महत्त्व प्रतिपादन करण्याची स्फूर्ति द्रवींडियन कवींनीं जैनापासूनच घेतली असें त्यांच्या काव्यावरून स्पष्ट दिसत आहे. इ. सनाच्या १५ व्या व १६ व्या शतकांत अनेक युरोपियन प्रवाशांनीं हिंदुस्थानच्या सफरी केल्या. विजयनगर व इतरत्र राज्यांत अहिंसा व सत्य धर्मांचें पालन सर्वत्र केलें जात असल्याचें शिफारसपत्र त्यांनीं स्वानुभवावरून दिलें आहे. जैनधर्मीय वंशज समूळ नष्ट झाले व जगांत अहिंसा, सत्य व क्षमादि तत्त्वांचें पालन झालें तरी जैनधर्माचा विजयच झाला. अशीच स्थिति त्याकाळीं या युरोपियन प्रवाशांना आढळून आली.

## मूर्तिपूजा, मंदिरें व मठ

मूर्तिपूजा करण्याचें व मोठ्या प्रमाणावर शिल्पकलायुक्त मंदिरें बांधण्याच्या कामांतहि जैनांचेंच अनुकरण इतर धार्मीयांनीं केलें. मूर्तिपूजा व मंदिरप्रतिष्ठा करून जैनधर्मीयांनीं आपल्या धर्माची छाप इतरांवर बसविली. हें पाहून तामील देशांतहि वैदिक धर्मानुयायांनीं त्याच मार्गाचें अवलंबन केलें. संबंध व अप्पर यांच्या कालानंतर तर तामील देश अशा देवालयांनीं फुलून गेला. शैवांच्या प्रत्येक देवालयांत अनेक कोनाडे व कोंपरे शैव साधूंच्या मूर्ति ठेवण्यासाठीं बांधकामाच्या वेळींच राखून ठेविले जाऊं लागले; हेतु हा कीं, देवाबरोबरच या साधूंचेंहि स्मरण भक्तांना व्हावें. मदुरा येथील सुप्रसिद्ध देवालयांत अशा ६३ शैव साधूंना स्थान मिळालें आहे. आपल्या धर्मशिक्षणासाठीं जैनांनीं अनेक मठ व पाठशाळा स्थापन केल्या व हिंदुधर्मीयांनीं त्यांचेंच अनुकरण केलें.

## हल्लींचे तामील जैन

सन १९२१ च्या खानेसुमारीवरून मद्रास इलाख्यांत २८००० हजार जैनवस्ती असल्याचें व त्यांपैकीं एका दक्षिण अर्काट जिल्ह्यांतच तेवीस हजार जैन असल्याचें दिसून येतें. सन १९३१ च्या खानेसुमारींत या संख्येंत थोडीशी वाढ झालेली आहे. तसेंच शैक्षणिक बाबतींत त्यांची प्रगति होत आहे. हल्लींचे जैन अशिक्षित, अडाणी, दरिद्री व शेतकरी आहेत. आपल्या प्रतिभासंपन्न, थोर, पराक्रमी व वीरशाली पूर्वजां-विषयीं माहिती तर त्यांना मुळींच नाहीं. इतर भागांतील विशेषतः उत्तर हिंदुस्थानां-तील जैनांची आर्थिक, शैक्षणिक व इतर परिस्थिति याहून अगदींच भिन्न आहे.

## जैन–अवशेष–स्मारक

अनेक जिनबिंबाचे भग्न व छिन्नविच्छिन्न झालेले अवशेष, डोंगरांतून खोंद-लेल्या अनेक निर्जन खोदीव लेणीं व मोडकळीस आलेलीं जिनमंदिरें यावरून सुमारें एक हजार वर्षांपूर्वींच्या जैन वैभवाची कल्पना येऊन मति गुंग होते. धर्माभिमानाच्या दुराग्रहाला बळी पडून किती सर्वोत्कृष्ट जैनवाङ्मय वैदिक धर्मानुयायांनीं नष्ट केलें; याचा अंदाज व त्यामुळें झालेल्या राष्ट्रहानीची कल्पनाहि आज अशक्य आहे. अनेक जिनमंदिरांतून हिंदु देवदेवतांची स्थापना करून त्यांना आपल्या धर्मीयांच्या मालकीचें म्हणून मानण्यांत येऊं लागलें आहे. जैनधर्मीयांची विद्या व संपत्ति हरण करूनहि वैदिक धर्मीयांची स्वार्थी व द्वेषी तृष्णा शांत झाली नाहीं. आठ हजार जैन विद्वानांना व पुढाऱ्यांना घाण्यांत गाळण्यानें अगर भिंतींत चिंबण्यानेंहि त्यांच्या रुधिरप्रियतेची तृष्णा शमली नाहीं; आपल्या दुष्कृत्याबद्दल भावी पिढी काय म्हणेल याचा विचारहि न करतां त्या दुष्कृत्यांचीं स्मारकें चित्ररूपानें मदुरा येथील देवालयांत रंगवून ठेवण्यांत आलीं आहेत; व जैनांचा मानभंग करणारीं व वैदिक धर्मीयांचें राक्षसी हृदय दाखविणारीं हीं चित्रें आजमित्तीस तेथें अस्तित्वांत आहेत. इतकी खबरदारी घेऊनहि आपल्या भावी पिढीला आपल्या या दुष्कृत्यांचें विस्मरण होईल अशी साधार भीति वाटूनच कीं काय ! या दुष्ट प्रकाराचें सतत स्मरण रहावें म्हणून पुढील तजवीज केली आहे. निरनिराळ्या महत्त्वाच्या प्रसंगांस अनुलक्षून मदुरा येथील देवालयांत सालदरसाल मासिक बारा उत्सव केले जातात. त्यांपैकीं पांच महोत्सवांचे प्रसंग जैनांचे मानहानिकारक आहेत, म्हणजे वर्षांतून पांच वेळां अद्यापहि या राक्षसी कृत्यांचें स्मरण व पूजन करण्याचा एक हजार वर्षें अव्याहत परिपाठ चालूं आहे.

## वंशपरंपरेचा अपमान सोसणारे जैन

हिंदुस्थानाबाहेर, जगांतील इतर कोणत्या तरी देशांत हा प्रकार पाहावयास मिळेल काय ? तसेंच वंशपरंपरेचा अपमान शेकडों वर्षें सहन करणारे जैनधर्मीयां-शिवाय जगांत दुसरे कोणी असूं शकतील काय? याचाहि वाचकांनीं शांत चित्तानें विचार करावा.

तामील देशांत उच्च संस्काराचें वळण लावण्यास ज्यांचे श्रम कारणीभूत झाले व वाङ्मयक्षेत्रांत ज्यांनीं अमूल्य व अतूल्य भर घातली व मांसाहाराचा त्याग करावयास लावून ज्यांनीं ब्राह्मणांचें वंशपरंपरेनें वैशिष्टय राखण्यास मदत केली, त्या जैनधर्मीयांच्या उपकाराचें हें रम्यस्मारक पाहून कोणाहि विचारी माणसाला खेद वाटल्यावांचून राहणार नाहीं. जैनांच्या अनंत उपकारांची फेड करण्यास हिंदुधर्मीयांजवळ त्याकाळीं कदाचित् दुसरें साधन नसेल, परंतु हल्लींच्या समतेच्या व विश्वबंधुत्वाच्या काळांत तरी या हिडिस प्रकाराकडे कोणाचेंहि लक्ष जाऊं नये व पूर्वजांच्या उपकारांची फेड करण्याची बुद्धि अद्यापहि कोणास होऊं नये !! राष्ट्र-हिताकडे व स्वातंत्र्याकडे अढळ दृष्टि ठेवून जातिभेद, धर्मभेद व वर्णभेद विसरून परस्पर कलहास मूठमाती द्या असें जेव्हां कंठरवानें सांगण्यांत येतें, तेव्हां हा उपदेश क्षणभर ग्राह्यहि वाटतो, परंतु पूर्वेतिहासांतील क्रूर व निष्ठूर छळाचें स्मरण ताजें रहावें म्हणून केलेल्या योजनांची अंमलबजावणी आजहि होते याचें स्मरण झाल्याबरोबर **पालथ्या घागरीवर पाणी** अशी या उपदेशाची स्थिति झाल्यास तो दोष कोणाचा ?



# प्रकरण सहावें

## जैन व तामील वाङ्मय

हा विषय अत्यंत व्यापक आहे. जैनाचार्यांनीं व विद्वद्रत्नांनीं तामिल वाङ्मयांत अमूल्य व अद्वितीय रत्नांची भर घातल्याचा उल्लेखहि जरूर त्या प्रसंगीं विषयांचें विवेचन करितांना जरूर तितका दिलाहि आहे. मात्र तसें करितांना विषयांतराचा आक्षेप येऊं न देण्याची दक्षता घेणें भाग असल्यानें नुसत्या नामनिर्देशापेक्षां अधिक माहिती देत आली नाहीं. या प्रकरणांत थोडीशी अधिक माहिती देण्याचें योजिलें आहें. तामील वाङ्मयावर जैनधर्मीयांनीं केलेले उपकार, जैनधर्मीयांचें ग्रंथलेखन याबद्दल स्वतंत्र प्रकरण लिहिल्याशिवाय या विषयांची पूर्तता होणार नाहीं, हें उघड आहे. ज्या देशावर जैनधर्मीयांनीं अगणित व अपरिमित उपकार केले, जैनधर्माचा प्रसार करून उत्कृष्ट संस्कृतीचें दान दिलें व ज्या देशाला तळहाताच्या फोडाप्रमाणें जपलें त्या देशाला जैनधर्मास मुकावें लागलें. जाळपोळ व नासधूस होऊनहि जें वाङ्मय काळाच्या कराल दाढेंतून व शत्रूंच्या हातांतून राहिलें त्याची रूपरेषा न दिल्यास पूर्वजांच्या उपकारांतून उतराई होण्याची सुवर्ण संधि वृथा घालविल्याच्या आरोपास पात्र व्हावें लागेल; तसेंच महाराष्ट्रांत राहणाऱ्या व मराठी वाचकांना आपल्या पूर्वजांनीं केलेल्या तामील व कन्नड वाङ्मयसेवेचें महत्त्व समजून यावें हाहि हेतु या प्रकरणांतील माहिती देण्यांत आहे. द्रवीडियन वंशापैकीं तामील लोकांचें सर्वांच्या आधीचें व संगम कालापूर्वीचें बहुतेक सर्व वाङ्मय नष्ट झालें तरी असावें अगर निदान अद्याप तें अज्ञात तरी असावें. तें उपलब्ध झाल्यास संगम पूर्वकालीन तामील देशांतील लोकांचा धर्म, त्यांचे रीतिरिवाज व त्यांची संस्कृति ही समजून घेण्यास खास मदत होणार आहे. तामील देशांतील ज्ञात प्राचीन कवींच्या काव्यावरून या देशांत ब्राह्मणांची वस्ती होण्यापूर्वींहि अनेक वर्षें अस्तित्वांत असलेल्या संस्कृतीबद्दलचा अंदाज बांधतां येतो. अहनानूर व पुरनानूर हीं दोन प्राचीन काव्यें अगदीं अलीकडे प्रसिद्ध झालीं आहेत.

त्यावरून तामीलीयन लोक युद्धप्रिय असावेत असा अंदाज करतां येतो. आर्य लोकांच्या आगमनानंतर वाङ्मयाची दिशा बदलली. या आर्य लोकांत जैन व बौद्ध यांचा समावेश होतो. राजेरजवाड्यांचे धार्मिक विधि करण्याकरितां या देशांत प्रथम ब्राह्मणांना आणण्यांत आले; व अशा ब्राह्मणांनीं जीं काव्यें लिहिलीं तीं अर्थातच देवस्तुतिपर स्वरूपाचीं होतीं.

जैनांना व बौद्धांना तामील लोकांची हिंसामय-शिकारी-वृत्ति आवडणें शक्य नव्हतें. अहिंसामताचा प्रामुख्यानें प्रसार करण्याकरितां त्यांचे अव्याहत प्रयत्न चालू होते; अर्थात्‌च अहिंसामताचा व त्याबरोबर मृगयात्यागाचा त्यांनीं जोरानें पुरस्कार केला; व त्याचा इष्ट तो परिणाम घडूनहि आला. जैनांची साधी राहणी, नितांत दयाबुद्धि, उत्कृष्ट साधुवृत्ति व धर्मप्रसारकार्यांतील तल्लीनता यांचा राजे-रजवाडे व इतर मोठमोठ्या सरदार-दरकदारांच्या मनावर अनुकूल परिणाम होऊन त्यांच्या आश्रयास ते पात्र ठरले असल्यास नवल नाहीं. या अनुकूलतेचा त्यांनीं धर्मप्रसारार्थं उपयोग करून घेतला.

संस्कृत व प्राकृत भाषेवर व त्यांतील वाङ्मयावर त्यांचें प्रभुत्व होतें; व त्यांतील विचारसरणी तामील भाषेंत त्यांनीं जनतेसमोर मांडिली; मात्र तसें करितांना तामील लोकांचे पूर्वसंस्कार विचारांत न घेण्याची त्यांनीं चूक केली नाहीं. त्या संस्कारास नवमताची जोड दिल्यानें लोकांच्या मनोवृत्तीचा ताबा सुलभतेनें जैनांना मिळवितां आला. याच काळांत वाङ्मयक्षेत्रांत नव्या वाङ्मयाची भर जैनांनीं घातली.

जैन व बौद्ध यांचें दक्षिणेंत आगमन झालें नसतें तर तामील वाङ्मयाची स्थिति आज कशी दिसली असती असा विचार केला तर कुरल, सिलप्पादि-कारम्, मणिमेकले व चिंतामणीसारख्या महाकाव्यांची तामील वाङ्मयांत भर खास पडली नसती, असेंच कबूल करणें भाग आहे. ब्राह्मण कवींनीं व ग्रंथ-कारांनीं ज्या ज्या स्वरूपाची काव्यरचना केली ती अगदींच टाकाऊ आहे असें नाहीं, परंतु हल्लींच्या तामीलांना आपलें अभिमानास्पद वाङ्मय आहे असें जें वाटतें तें मात्र जैन व बौद्धांच्या आगमनाभावीं खास मानितां आलें नसतें; या-बद्दल जसा मतभेद रहाणार नाहीं तद्वतच तामील देशीयांना सुसंस्कारयुक्त करण्याच्या श्रेयाचा बहुभाग जैनांनाच आहे, याबद्दलहि मतभेद होणार नाहीं.

## तामील वाङ्मयाचे ठळक विभाग

तामील वाङ्मयाकडे निरनिराळ्या दृष्टींनें पाहून त्या वाङ्मयाचे कांहीं ठळक विभाग पाडण्याचा कांहीं विद्वानांनीं प्रयत्न केला आहे. या कार्यांत सर्व विद्वानांचें अद्याप एकमत झालेलें नाहीं व अशा कार्यांत एकमत होणेंहि बहुधा अशक्यच असतें.

कोणी विद्वान् कालानुरोधानें वाङ्मयाचे विभाग पाडूं पहातात; तर कोणी विषयानुरोधानें असा प्रयत्न करितात; कोणी धर्मप्राबल्य पाहून त्या त्या कालांत रचिलेल्या ग्रंथांच्या विभागांना धर्मकालानें ओळखूं पहातात; अशा स्थितींत या पुस्तकांत प्रस्तुत विषयाच्या विवेचनाच्या दृष्टीनें त्याबद्दल निरनिराळ्या विद्वानांनीं मांडिलेल्या मुद्यांच्या विचारसरणीची रूपरेखा देण्याची जरूरी नाहीं असें आम्हांस वाटतें. यासंबंधीं विशेष माहितीची ज्यांना जरूरी असेल त्यांनीं "Studies in South Indian Jainism" या पुस्तकांतील सहावें प्रकरण व "Studies in Tamil Literature by Dikhitur" हीं पुस्तकें पहावींत. निरनिराळ्या धर्मांच्या प्राबल्याच्या दृष्टीनें, एखाद्या उत्कृष्ट ग्रंथाच्या अगर ग्रंथकाराच्या दृष्टीनें व परकीय स्वारीच्या दृष्टीनें, वाङ्मयाच्या कालाचे भेद न पाडितां व विभाग न करितां ज्या त्या ग्रंथांतील प्रतिपादित विषयाच्या दृष्टीनें जैनवाङ्मयाच्या वैशिष्ट्याचा विचार करणें इष्ट वाटल्यानें तसा प्रयत्न या प्रकरणांत केला आहे. तसेंच ज्या त्या ग्रंथकर्त्यांचा अल्प परिचयहि दिला आहे.

## उपदेशात्मक ग्रंथ

जैन विद्वानांनीं आणि पंडितांनीं उपदेशात्मक स्वरूपाचे जे ग्रंथ रचिले आहेत त्यांत तिरुक्कुरल ( कुरल ), नालदिआर, व पझमोझी नानूर या रत्नत्रय ग्रंथांचा प्रामुख्यानें उल्लेख करणें क्रमप्राप्तच आहे.

### कुरल

हा ग्रंथरत्न जैनांचा असून त्यांतील विचारसरणी, संस्कार व संस्कृति जैनांचीच आहे. तामील वाङ्मयांतील हें एक देदीप्यमान रत्न आहे, असा याबद्दलचा उल्लेख यापूर्वींच केला आहे; त्यामुळें प्रत्येक धर्म या ग्रंथावर आपला वारसाहक्क लादूं पहात आहे. हिऱ्यांत जसा कोहिनूर तसा तामील वाङ्मयांत **कुरल** आहे.

अत्युत्कृष्ट मानवी विचारांची हा ग्रंथ एक खाण आहे. विशिष्ट धर्मांच्या अभिमानानें प्रेरित होऊन ग्रंथकारानें कोणतेंहि मत प्रतिपादन केलेलें नाहीं.

अखिल मानव जातीला सदासर्वकाल व कोणत्या मार्गानें चालून उच्च ध्येय साध्य करितां येईल हें या ग्रंथांत दाखविलें आहे. अत्युत्कृष्ट विचारसरणीस अत्युत्कृष्ट भाषासरणीची जोड या ग्रंथांत मिळाली आहे, व या दोहोंवर काव्यरूपी कोहिनूरचें कोंदण करण्यांत आलें आहे. अनेक युरोपियन भाषेंत या ग्रंथाचें भाषांतर झालें आहे ही एकच गोष्ट या ग्रंथाच्या मोठेपणाची, लोकप्रियतेची व अद्वितीयतेची साक्ष देण्यास पुरेशी आहे. आमचे स्नेही व वाङ्मयभक्त श्री. अज्ञात यांनीं या ग्रंथाचा अनुवाद मराठींत नुकताच प्रसिद्ध केला आहे. विश्वबंधुत्वाचा उपदेश करून मन व मेंदू यावर सारखाच जय या ग्रंथानें मिळविला आहे. भरतखंडांतील धर्मच या ग्रंथावर आपला वारसा हक्क सांगतात असें नाहीं, परंतु ख्रिस्तानुयायीही यावर आपला हक्क सांगण्यास कचरत नाहींत. मलयापूर येथें सेंट थॉमस हा साधु ख्रिस्तवासी झाला अशी आख्यायिका आहे. या ख्रिश्चन साधूच्या उपदेशांतील अनेक गोष्टींचा कुरल ग्रंथकारानें आपल्या ग्रंथांत स्वीकार व पुरस्कार केला आहे असें ख्रिश्चन लोक प्रतिपादन करितात.

## मलयापूर–सेंटथॉम–सेंट

या नांवावरून या गांवाच्या आसपास अनेक शतकांपूर्वी ख्रिश्चन समाज रहात असावा. या भागांत सुंदर आर्मेनिअन व पोर्तुगीज ख्रिश्चन प्रार्थना मंदिरें आहेत व इ. स. ५ व्या शतकांतील एक शिलालेखहि आहे. अलेक्झांड्रियाचा पटीनस यानें येथें धर्मोपदेश केला. या धर्मोपदेशाचा परिणाम कुरल ग्रंथकर्त्यांच्या मनावर झाला असला पाहिजे असें ख्रिश्चन लोकांचें म्हणणें आहे. डॉ. पोप या विद्वान् गृहस्थानें या कुरल ग्रंथांतील विचारसरणीस व ग्रंथकारास अनुलक्षून खालील मत दिलें आहे.

' कुरल ग्रंथकर्ता जैनधर्मतत्त्वज्ञानाप्रमाणेंच हिंदुधर्मतत्त्वज्ञानी होता. धर्माभिमानातीत राहून अखिल मानव जातीच्या अभ्युदयार्थ त्यानें ग्रंथरचना केली. विश्वबंधुत्वाचें एकच नातें त्याचेपुढें असल्यानें परदेशीय–ख्रिश्चन–पंडिताशीं विचार विनिमय करण्यास त्याच्या मार्गांत आड येण्यासारखें कोणतेंहि कारण नव्हतें. अशा स्थितींत सेंट थॉमस व इतर ख्रिश्चन मिशनऱ्यांशीं चर्चा करून त्यांच्या धर्मांतलि उत्कृष्ट विचारसरणीचें त्यानें ग्रहण केलें नसावें असें मानण्यास जागा नाहीं. ' हें मत सर्वांशीं ग्राह्य होईलच असें नाहीं. या ग्रंथाची महती हल्लींच्या युगांतच मानिली जाते असें नाहीं; त्या कालींहि या ग्रंथापेक्षां सरस ग्रंथरचना करून या ग्रंथास दुय्यम दर्जा प्राप्त करून देण्याचे अनेकांचे श्रम वायां गेले आहेत.

यावरून आज किमान अठराशें एकोणीसशें वर्षें हा ग्रंथ सतत तेजस्वी, ओजस्वी व अद्वितीय राहिला आहे. हा ग्रंथ, त्याचा ग्रंथकार, त्याचा काल, ग्रंथकाराची जन्मभूमि वगैरे संबंधीं माहिती प्रकरण ३ मध्यें देऊन श्रीकुंदकुंदाचार्यांच्या लेखणींतून हा ग्रंथ उतरला आहे हें दाखविलें आहे.

## २ नालदिआर

**नालदिआरः**—तामील भाषेंतील सर्वोत्कृष्ट वाङ्मयग्रंथांत याहि जैन ग्रंथाची गणना केली जाते; परंतु कुरल ग्रंथाच्या खालोखाल यास मान दिला जात आहे. चाळीस परिच्छेदाचा हा ग्रंथ आहे. लक्ष्मीची चंचलता, मानवी प्राण्याच्या इतर लालसांचें वैफल्य व जीविताची क्षणभंगुरता दाखविण्याचा यशस्वी प्रयत्न या ग्रंथांत ग्रंथकारानें केला आहे. सत्यादि सद्गुणांचा, साधु व त्यागवृत्तीचा विकास करण्याबद्दल सुंदर उपदेश या ग्रंथांत आहे. या ग्रंथांत मुत्तुरायर ( मौत्तिक ाज अगर त्रिलोक राज–त्रिलोक–चोल–पांड्य व चेर) राजांचा वारंवार उल्लेख आहे. यावरून मदुरा येथें कलभ्रांच्या सत्ताकालीं ( इ. स. ७४० ) हा ग्रंथ लिहिला असावा असें दिसतें. या ग्रंथलेखनासंबंधीं खालीलप्रमाणें दंतकथा आहे. एका दुष्काळप्रसंगीं आठ हजार मुनींनीं देशत्याग करून पांड्य राजांचा आश्रय केला. दुष्काळ संपून जन्मभूमींतील सुकाळाची वार्ता आल्यानें आपल्या जन्मभूमीस परत जाण्याची इच्छा त्यांनीं राजास दर्शविली. या विद्वद्जनसमूहांचा वियोग आपल्यास होऊं नये ही तर राजाची तीव्र इच्छा; म्हणून राजानें त्यांना निरोप देण्याचें नाकारिलें. त्यानंतर एका रात्रीं कोणास न कळत हे मुनि निघून गेले; मात्र तेथून जाण्यापूर्वीं प्रत्येक मुनीनें आपल्या आसनावर एकेक अध्याय लिहून ठेविला. मुनिसंघ निघून गेल्याची बातमी राजास समजतांच त्या मुनींच्या आश्रमाची झडती घेण्यास राजानें हुकूम केला. या झडतींत वरील आठ हजार अध्याय मिळाले. संतापाच्या भरांत वैंगई नांवच्या नदींत ते अध्याय फेंकून त्यांना जलसमाधी देण्याचा हुकूम राजानें केला. कोणता भला मनुष्य राजाज्ञाची अवज्ञा करणार? राजाज्ञेप्रमाणें ते अध्याय नदींत टाकण्यांत आले. त्यांपैकीं चारशें अध्याय नदींत प्रवाहाच्या ओघाच्या उलट दिशेस चढून गेले; हें पाहून राजाचा क्रोधाग्नि शांत झाला व त्यानें मोठ्या आदरानें ते अध्याय एकत्रित केले व त्याच चारशें अध्यायाचा हा विद्यमान ग्रंथ आहे. निसर्गाच्या विरुद्ध वर्णन म्हणून ही दंतकथा विचारांत न घेतली तरी या ग्रंथाबद्दलचा तामील लोकांचा आदर मात्र या दंतकथेवरून स्पष्ट व्यक्त होत आहे.

दंतकथा बाजूस ठेविली तरी मदुरा येथील जैनाकडेच या ग्रंथाचें कर्तृत्व जातें. दिगंबर जैनांनीं आपली स्वतंत्र वाङ्मयसंस्था-संगम-स्थापन केल्यानंतर ( इ. स. ७४० ) हा ग्रंथ लिहिला गेला आहे.

अद्वितीय कुरल ग्रंथ रचल्यानंतर सुमारें ६००-७०० वर्षांनीं या ग्रंथाची रचना झाली आहे. या दरम्यानच्या काळांत जैन पंडितांची लेखणी व सरस्वती ह्या सुप्तावस्थेंत होत्या असें मानण्याचें मात्र कारण नाहीं. इतर स्वास्थ्य व सर्व प्रकारची अनुकूलता यांच्या अभावीं असें प्रभावशाली लिखाण होणें शक्य नाहीं. राष्ट्राच्या वैभवाच्या व शांततेच्या काळांतच उत्कृष्ट वाङ्मय निर्माण होत असतें; हा सिद्धांत खरा मानिल्यास या ग्रंथरचनेच्या काळीं वरील परिस्थितीची अनुकूलता असावी असें मानणें भाग आहे. कुरल व नालदिआर या दोन ग्रंथरचनेच्या दरम्यानच्या काळांतील जैनवाङ्मय उपलब्ध होण्याची आशा अद्याप नष्ट झालेली नाहीं.

## ३ पझमोझी नानुर

**पझमोझी नानुर**:-या ग्रंथाचा कर्ता राजा मनरूराय, हा पांड्य राजाचा मांडलिक असावा. प्राचीन तामील संस्कृतीचा बोध या ग्रंथावरून होतो. कुरल-प्रमाणेंच विश्वबंधुत्वाच्या दृष्टीनें अखिल मानवी प्राण्यांना उद्देशून यांत सदुपदेश केला आहे. विद्या व विद्यादानाचें महत्त्व, राष्ट्रपुरुषाचें गुणवर्णन व श्रावकाचार यासंबंधीं यांत मुख्यतः विवेचन केलें आहे.

अत्युत्कृष्ट गणलेल्या तीन उपदेशात्मक ग्रंथाचाच फक्त उल्लेख केला आहे. या सदराखालीं येणारे अनेक जैन ग्रंथ आहेत. यांतील शेवटच्या ग्रंथांत ( पझमोझी नानुर ) विद्या व विद्यादानाचें महत्त्व वर्णन करण्यास एका मांडलिकाची लेखणी सरसावली आहे. यावरून त्या काळीं राजेरजवाडे विद्येचे व विद्वानांचे फक्त भोक्ते व चहाते नसून ते स्वतः विद्याविभूषित होते असेंही या ग्रंथावरून दिसून येणार आहे.

तामील भाषेंतील महाकाव्यांत व लघुकाव्यांत जैनेतरांनीं थोडीशी भर घातली आहे. परंतु उपदेशात्मक ग्रंथांत नांव घेण्यासारखें ग्रंथलेखन जैनेतरांना अखेर-पर्यंत करितां आलें नाहीं; व उपदेशात्मक ग्रंथ लिहिण्यांत जैन विद्वान् अखेरपर्यंत अद्वितीयच राहिले.

## महाकाव्यें

तामील वाङ्मयांत पांच महा व तितकींच लघुकाव्यें आहेत असें मानिलें जात आहे. मणिमेकले, सिलप्पादिकारम्, वलयापादि, चिंतामणी व कुंदलकेसी यांची महाकाव्यांत गणना केली जाते. या पांच महाकाव्यांपैकीं तीन महाकाव्यांच्या लेखनाचें श्रेय जैनधर्मीयांना आहे.

## सिलप्पदिकारम्

चेर राजा सेंगुत्तवन यांचा भाऊ इलनगोवडिगल यानें हा ग्रंथ रचिला आहे. तामील देशीय जैनांच्या दर्जासंबंधीं व त्यांनीं केलेल्या जागृतीसंबंधीं हरएक तऱ्हेची माहिती या ग्रंथांत संग्रहित केली असल्यानें जैन धर्मासंबंधीं अनेक तऱ्हेची माहिती मिळण्याचें हा ग्रंथ एक अत्युत्कृष्ट साधन समजलें जात आहे. ग्रंथकाराच्या परधर्मसहिष्णुतेमुळें, ग्रंथरचनेच्या वेळीं जैनधर्मीयांनीं निरनिराळ्या ठिकाणीं नुकतेंच आपलें आसन स्थिर केलें असल्यामुळें, अगर परधर्मीयांचा द्वेष करणें हें जैन धर्माच्या शिकवणीच्या विरुद्ध असल्यानें इतर धर्मीयाबद्दल तिरस्कार व तुच्छता या ग्रंथांत बिलकूल दिसून येत नाहीं. अशाच परिस्थितींत संवंदर व अप्पर यांनीं जी काव्यरचना केली, त्यांत मात्र जैनधर्माबद्दल नितांत तिरस्कार व तुच्छता मात्र पदोपदीं आढळतात. हें चित्र पहा व तें चित्र पहा असें कोणी म्हणाल्यास याबद्दल कोणास काय वाटेल, याचा विचार वाचकांनीं करावा. जीवित, तारुण्य व संपत्ति हीं क्षणभंगुर आहेत; व यासाठीं आपण वेळींच सावध होऊन सत्कृत्यांत आपल आयुष्य वेंचावें; इहजन्मीं केलेल्या पुण्योदयानें पुढील जन्म सुखकर होईल. सत्कर्मांचा सांठा हीच खरी संपत्ति असून तीच मरणांत आपल्याबरोबर येणार आहे, वगैरे उपदेश या महाकाव्यांत केला आहे.

## २ वलयादपी

या महाकाव्यांत जैनाचार्यांचीं व मुनिवरांचा चरित्रें दिलीं आहेत. या काव्यांतील सुमारें ५० अध्याय कांहीं दिवसांपूर्वी छापून प्रसिद्ध झाले आहेत. बाकीचा भाग अद्याप प्रसिद्ध व्हावयाचा आहे. पेरियापुराण लिहून शैवांनीं आपल्या श्रेष्ट शैवसाधूंचें चरित्र वर्णिलें आहे. वलयादपींतील विषयही मुख्यतः जैनाचार्यांच्या व जैनमुनिवरांच्या चरित्रवर्णात्मकच आहे. या दोन्ही ग्रंथांतील चरित्रवर्णन चित्ताकर्षक व रम्य आहे.

एवढें साम्य वगळून, भाषासरणी, विषयांची मांडणी व आपल्या चरित्रनायकांचें गुणवर्णन करितांना दुसऱ्या धर्मांतील श्रेष्ठ व सन्मान्य व्यक्तीबद्दल व्यक्त केलेले उद्‌गार वगैरे इतर अनेक दृष्टींनें या दोन्ही ग्रंथांची तुलना केल्यास वलयाद्‌पींत कोणतेंही आक्षेपार्ह स्थळ मिळणार नाहीं. मात्र याच दृष्टीनें पेरियापुराण कसोटीस लावूं पहाणारें हें पुराण हातांत धरण्यासहि पात्र नाहीं असेंच निःस्पृहपणें मत देतील. कट्टर शैवांचें मत अर्थात्‌च भिन्न राहणार आहे.

## ३ चिंतामणी

महाकाव्यांत सर्वोत्कृष्ट जैन महाकाव्य चिंतामणी यास आग्रपूजेचा मान मिळणार आहे. तामील भाषेंतील उपदेशरूपी वाङ्मयांत कुरल या जैनग्रंथास आग्रपूजेचा मान देण्यांत येतो; तद्वतच वाङ्मयाच्या या दुसऱ्या–महाकाव्य–शाखेंत **चिंतामणीस** अग्रपूजेचा मान मिळत आहे. या ग्रंथाचा कर्ता तिरुतक्कदेवर याचें तामील भाषेइतकेंच संस्कृत भाषेवरही प्रभुत्व होतें. संस्कृत भाषेंतील अत्युत्कृष्ट ग्रंथरचना या तिरुतक्कदेवर यांनीं केली आहे. इतकेंच नव्हें तर संगम कवींच्या काव्यांतील सार देण्याचें श्रेयही यांच विद्वद्रत्नाला आहे. चिकित्सक बुद्धीनें संपूर्ण जैनदर्शनाचा तिरुतक्कदेवर यांनीं अध्ययन केलें होतें; यामुळें त्या काळच्या जैनधर्मज्ञांत यांची प्रामुख्यानें गणना केली जात असे. जीवकन राजाच्या जन्मकालापासून तों त्यांच्या मोक्षकालापर्यंतचा वृत्तांत या वीररसप्रधान महाकाव्यांत दिला असून त्यांच्या चरित्राच्या आधारें खालील नैतिक पाठाचे धडे ग्रंथकारानें जनतेला दिले आहेत.

( १ ) राजानें घाईनें व उतावीळपणानें कोणतेंहि कृत्य करूं नये. कोणत्याहि कार्यास हात घालण्यापूर्वी राजानें अनेकवार आपल्या मंत्र्यांशीं खलबत करावें व पूर्ण विचारांतीं कार्यप्रवृत्त व्हावें.

( २ ) स्त्रियांच्या समागमांत व सहवासांत अनेक काळ रहाणाऱ्यांचा शेवट त्यांच्या नाशांत व दुःखांत होतो.

( ३ ) आपल्या शत्रूंना ज्यांना पादाक्रांत करावयाचें आहे त्यांनीं आपल्या बेताचा व योजनेचा उच्चार कोणत्याहि परिस्थितींत व कोणाहिपुढें योग्य काल येईपर्यंत करूं नये.

( ४ ) परदुःखनिवारण करणें हें मानवी जीविताचें आद्य कर्तव्य आहे.

( ५ ) ज्यांच्यापासून आपणांस पीडा झाली नाहीं व उपसर्ग पोहोंचला नाहीं त्यांना पीडा व त्रास होईल असें आपलें वर्तन केव्हांहि असूं नये.

( ६ ) सन्मित्र हाच खरा साह्यकर्ता आहे.

( ७ ) आपत्कालीं, वैभवकालीं अगर सुखदुःखाच्या कोणत्याहि परिस्थितींत असतां मनाचा समतोलपणा ढळूं देऊं नये.

( ८ ) अखिल प्राणिमात्राविषयीं दया व प्रेमभाव धरणें हें मानवी जीविताचें अंतिम व श्रेष्ठ ध्येय असावें.

( ९ ) सन्मार्गच्युत झालेल्यांना पूर्वस्थळावर आणण्याचा मनोभावें प्रयत्न करावा.

( १० ) आपल्यावर झालेल्या उपकारांचें व केलेल्या दयेचें आमरणांत विस्मरण होऊं देऊं नका. वगैरे वगैरे.

सत्ताधारी राजेरजवाड्यांना व सामान्य जनांना व्यावहारिक व अहिंसा-स्थितिकरणादि जैनतत्त्वज्ञानांचा या उपदेशांत समावेश केला आहे. इतर कोणते ग्रंथ प्रमाणभूत मानून हें महाकाव्य लिहिलें असावें याचा अंदाज निश्चितपणें करितां येणें शक्य नाहीं; परंतु संस्कृत भाषेंतील **क्षत्रचूडामणी** व कत्तिया चूडामणी या ग्रंथावरून या तामील चूडामणीची रचना झाली असावी असा विद्वानांचा तर्क आहे. या विख्यात ग्रंथकाराच्या आयुःक्रमाबद्दलची विश्वसनीय माहिती उपलब्ध होऊं नये ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. यामुळें खालीं दिलेल्या दंतकथेवरच अवलंबून रहावें लागतें.

## तिरुतक्कदेव यांचें चरित्र

तिरुतक्कदेवर हा चोल देशाचा रहिवासी होता. त्यानें नामांकित विद्वान् गुरुजवळ राहून निरनिराळ्या अनेक शास्त्रांचें अध्ययन केलें. संपूर्ण संगम वाङ्मयाचा अभ्यास केला व त्याबरोबरच संस्कृत भाषेवरहि प्रभुत्व मिळविलें. मदुरा विद्यापीठाची महति ऐकून तेथें तिरुतक्कदेवर गेला व तेथील विद्वज्जनांच्या सानिध्यांत काव्य-शास्त्रादि चर्चेंत कालक्रमण करूं लागला. जैन पंडितांचें काव्यरचनेबद्दलचें तेथील पंडितांचें उपहासात्मक भाषण ऐकून तिरुतक्कदेवर यांस वाईट वाटलें. प्रेम व विषयभोगादिविषयांवर जैन विद्वानांना काव्यरचना करतां येणार नाहीं असा प्रतिपक्षाचा आक्षेप होता.

अशा विषयावर ग्रंथलेखन न करण्याची धर्माज्ञा असल्यानें असे विषय ग्रंथ-रचनेस जैन पंडितांना त्याज्य आहेत असें तिरुतक्कदेवर यांचें म्हणणें होतें; परंतु या उत्तरानें ब्राह्मण पंडितांच्या मनाचें समाधान तर झालें नाहींच परंतु त्यांनीं फिरून उपहासास सुरवात केली. कोणत्या मानी व कर्तबगार विद्वानास असा उपहास व अपमान सहन होणार ? तिरुतक्कदेवर आपल्या जैन गुरूकडे गेला व त्यांना झालेला वृत्तांत निवेदन करून अशा काव्यरचनेस त्यांची अनुज्ञा मागूं लागला. स्वतंत्र काव्यरचना करण्याचें बुद्धिकौशल्य व सामर्थ्य आपल्या शिष्याच्या अंगीं आलें आहे अगर नाहीं, याची कसोटी लावण्याच्या हेतूनें गुरूंनीं समोरून जात असलेल्या एका कोल्ह्यावरून काव्य रचण्यास तिरुतक्कदेवर यांस सांगितलें. गुर्वाज्ञेप्रमाणें काव्यगानास तिरुतक्कदेवरानें सुरवात केली व " नारिवृत्तम् " हें त्यांचें फळ होय. या काव्याची भाषा, विचारसरणी व विषयाची मांडणी पाहून त्यांच्या गुरूस अत्यंत समाधान वाटून त्यानें " जीवकन " यांचा चरित्रपर विस्तृत ग्रंथ लिहून ब्राह्मण विद्वानांना दाखविण्याबद्दल आज्ञा दिली व त्या आज्ञेनुसार लिहिलेला ग्रंथ म्हणजेच **चूडामणी महाकाव्य** होय.

या ग्रंथाविषयीं वरील दंतकथा आहे. ती खरी असो वा नसो; परंतु तामील भाषेंतील सर्वोत्कृष्ट ग्रंथांत या ग्रंथाची गणना केली जात आहे. आपुलकीच्या भावनेनें जैनधर्मीयांच्या गौरवास हा ग्रंथ पात्र झाल्यास त्यांत नवल नाहीं; परंतु जैनांच्या कट्टर शत्रूंनीं—शैवांनींहि—या ग्रंथाचीं जीं स्तुतिस्तोत्रें गायिलीं आहेत त्यावरून या ग्रंथाचें अद्वितीयत्व सिद्ध होत आहे. या ग्रंथाची लोकमान्यता व त्याचें वैभव नष्ट करण्याकरितां सेकिआर ह्यानें पेरियपुराण नांवाच्या ग्रंथलेखनानें कार्य हातीं घेतलें.

शैव साधूंच्या चरितात्मक वर्णन पेरियपुराणांत दिलें आहे. या पेरियपुराणाचा विषय मनास आनंद व स्फूर्ति देणारा असला तरी त्यामुळें **चिंतामणीच्या** लोकप्रियतेंत व लौकिकांत कमीपणा तर आलाच नाहीं परंतु या दोन्ही ग्रंथांची तुलना करण्यास संधी प्राप्त झाल्यामुळें चिंतामणीचें वैशिष्ट्य अधिकच स्पष्ट झालें. शिवज्ञान मुनिश्वराचा शिष्य कचिअप्पा मुनिवर यानें इ. सनाच्या सतराव्या शतकांत शैवसाधूंचे चारितात्मक ग्रंथलेखनास सुरुवात केली त्यावेळीं जैन चिंतामणी महाकाव्य अनुकरणीय नमुना म्हणून त्यानें आपल्यापुढें ठेविला. या ग्रंथास मागें पाडणारा अगर याची बरोबरी करणारा दुसरा ग्रंथ अद्याप कोणासहि लिहितां आला नाहीं; ही थोरवी असामान्य नाहीं असें कोण म्हणेल ?

उपदेशात्मक ग्रंथांतील पझमोझी नानुर हा ग्रंथ एका मांडलिक राजानें लिहून विद्या व विद्यादानाचें महत्त्व जगास पटवून देण्याचा प्रयत्न केला. तसेंच तामील भाषेंतील पंचमहा काव्यांतील सिलप्पदिकारम् या महाकाव्याचें कर्तृत्वहि एका राजपुत्रास मिळतें. चेर व पांड्य या दोन राज्यांत हे ग्रंथ निर्माण झाले. यावरून या ग्रंथलेखनाच्या कालीं या देशांत जैनधर्माचें प्राबल्य इतर जनाप्रमाणें राजवाड्यांतहि होतें असें दिसून येतें. इतरांप्रमाणेंच राजेरजवाड्यांनाहि शिक्षणाचें महत्त्व पटून त्यांनीं विद्वानांत आपली गणना करून घेतली होती.

## लघुकाव्यें

### १ निलकेशी

जैन लघुकाव्यांत निलकेशीचा प्रामुख्यानें समावेश होतो. तर्कशास्त्रांत यांची गणना करणें भाग आहे. बौद्ध, आजिवक, वैशेइक सारख्या मतांचें खंडण व जैनतत्त्वज्ञानाचें मंडण निलकेशी करीत असल्याचें वर्णन या ग्रंथांत दिलें आहे. याहि ग्रंथकर्त्याचें नांव उपलब्ध झालेलें नाहीं. समय दिवाकर मुनीवर नांवच्या जैनसाधूनें या ग्रंथावर एक उत्कृष्ट टीका लिहिली आहे. याच दिवाकर मुनीनें लिहिलेल्या टीकेंत कुरल ग्रंथाचा बहुमानपुरःसर उल्लेख करून "कुरल' हा आमचा वेदग्रंथ आहे" असें नमूद केलें आहे.

### २ बृहत्कथा अथवा पेरनकथे.

इसवी सनाच्या पांचव्या अगर सहाव्या शतकांतील हा ग्रंथ आहे. या मनोवेधक लघुकाव्याचा कर्ता कोंगुवेल असावा असें मानिलें जातें. गुणादित्य नांवच्या पंडित. वरानें पैशाची भाषेंत लिहिलेल्या **बृहत्कथा** या ग्रंथाचें हें भाषांतर असावें असें दिसतें. वत्सभूपति उदयन कुमाराचें साग्र चरित्रवर्णन या ग्रंथांत दिलें आहे. भाषासरणी, वाक्यरचना व शब्दयोजना या बाबतींत चूडामणीपेक्षांही हा ग्रंथ अधिक सरस आहे असें तज्ञांचें मत आहे. हा ग्रंथ अगदी अलीकडे छापून प्रसिद्ध झाला आहे.

### ३ यशोधर काव्य.

याहि ग्रंथकर्त्याचें नांव उपलब्ध नाहीं; परंतु या लघुकाव्याचा कर्ता एक जैनमुनि आहे हें निर्विवाद आहे. या ग्रंथांतील उपदेशांमृत पुढीलप्रमाणें आहे.

( अ ) कोणत्याहि कारणासाठीं हिंसा करूं नये.

( ब ) खोटें बोलणें आणि चोरी करणें हीं पातकें आहेत.

( क ) व्यभिचार वर्ज्य करावा.

( ड ) आपणांस जरूर तेवढ्याच वस्तूंचा संग्रह करावा, अधिक संग्रह करूं नये. अहिंसा, सत्य व परिग्रहप्रमाण इत्यादि तत्त्वें या उपदेशांत गोंविलीं आहेत.

तरुणांना उपयुक्त अशा अनेक नैतिक गोष्टींचा यांत संग्रह केलेला आहे. सर्व-साधारण नीतिशास्त्रावरील हा उत्कृष्ट ग्रंथ असल्यानें तरुणांना, वृद्धांना, स्त्रियांना व पुरुषांना, श्रीमंतांना व गरीबांना सारखाच उपयुक्त आहे.

## ४ नागकुमार काव्य व
## ५ चूलामणी इत्यादि

* नागकुमार काव्य व चूलामणी या ग्रंथांचा लघुकाव्यांत समावेश होतो. अशा या पांच लघुकाव्यांशिवाय अनेक ज्ञात जैन ग्रंथ आहेत. जैन मठांतून अनेक अज्ञात ग्रंथांचा संग्रह आहे. शतकानुशतकें लोटून गेलीं तरी त्यांना सूर्य-दर्शनहि घडलेलें नाहीं. भट्टारक व इतर मठाधिकारी यांची समजूत घालून अशा ग्रंथांना प्रसिद्धी देणें हें जैनधर्मीयांचें आद्यकतर्व्य आहे. निदान जिज्ञासू व चिकित्सक वाङ्मयभक्तांना तरी अध्ययनासाठीं ते ग्रंथ पाहूं देण्याची व्यवस्था होणें जरूर आहे. वर ज्या पांच लघुकाव्यांचा नामनिर्देश करण्यांत आला आहे. याशिवाय कनिमेथाविआर या जैनानें लिहिलेला एलादि नांवाचा उपदेशपर ग्रंथ आहे. कलोत्तुंग चोल राजा व उत्तर कलिंग राजा यांच्यामधील युद्धवर्णनात्मक **कलिंगत्तमराणी** या नांवाचा जैन ग्रंथ आहे. युद्धात्मक वर्णन देणारा कदाचित् हाच पहिला जैन ग्रंथ असावा. याशिवाय जैनांनीं लिहिलेलीं अनेक लहान मोठीं स्तोत्रें आहेत व तीं छापून प्रसिद्धहि झालीं आहेत. शब्दकोश ग्रंथ रचण्याचीहि आवड जैन पंडितांना दिसून येते. **चूडामणीनिगंडु** हा या स्वरूपाचा ग्रंथ आहे, गुणभद्राचार्यांचा शिष्य वीरमंडलपरुपक्षर यानें कृष्णदेवराय याचे अमदानींत हा ग्रंथ रचिला आहे. व्याकरणशास्त्रावरील जैन ग्रंथाची बरोबरी इतरांना करितां आली नाहीं. नानूल या व्याकरणशास्त्रावरील ग्रंथाशिवाय गुणवीर पंडितांचें नेमिनाथम् या नांवचा व अमृतसागर मुनीनें लिहिलला असे दोन व्याकरणशास्त्रा-वरील दुसरे उपलब्ध ग्रंथ आहेत. **श्री पुराणम्** नांवचा गद्यात्मक व **मेरू-मंदर पुराणम्** नांवचा पद्यात्मक धार्मिक व आध्यात्मिक विषयांवरील ग्रंथ प्रसिद्ध आहे. वर ग्रंथांची जी नामावली दिली आहे, त्यावरून जैन पंडितांनीं लिहिलेल्या सर्व ग्रंथांचा उल्लेख झाला असें मानणें मात्र चुकीचें होईल.

वाङ्मयांतील निरनिराळ्या अनेक विषयांवर जैन पंडितांनीं ग्रंथ लिहिलें आहेत, हें दाखविण्याच्या हेतूनेंच ठळक ठळक ग्रंथांचा फक्त नामनिर्देश करून समाधान मानण्या खेरीज दुसरा परिणामकारक मार्ग दिसत नाहीं.

यावरून महाकाव्यें, लघुकाव्यें, गद्यात्मक व पद्यात्मक, धर्मपर, नीतिपर, आध्यात्मिक, व्याकरण, गणित व ज्योतिष शास्त्रावर व संगीत शास्त्रावर जैनाचार्यांनीं ग्रंथलिखाण केलें आहे. वैद्यक विषयावरील जैन ग्रंथ अमूल्य आहेत. शब्दकोश तयार करण्याची कामगिरी जैनांनीं आपल्याकडेच घेतलेली दिसते. तामील भाषेंत स्वतंत्र ग्रंथरचना तर त्यांनीं केलीच परंतु संस्कृत, प्राकृत व पैशाच्च भाषेंतील उत्कृष्ट ग्रंथांचें तामील भाषेंत भाषांतर करण्यासहि ते चुकलें नाहींत. युद्ध म्हणजे हिंसेचें आगर व जैन तर अहिंसावादी, यावरून युद्धात्मक वर्णन देण्याचें धाडस जैन पंडित करणार नाहींत असें सकृद्दर्शनी कोणास वाटण्याचा संभव आहे; परंतु तोहि विषय जैनांच्या लेखणींतून सुटला नाहीं. अर्थशास्त्र व राजनीति या विषयांवरही जैन पंडितांनीं आपले शिक्कामोर्तब केलें आहे. आर्य चाणक्याचा सुप्रसिद्ध ग्रंथ **अर्थशास्त्र** व जैन पंडितानें याच विषयावर लिहिलेला **नीतिवाक्यामृतम्** या नांवाचा ग्रंथ यांची तुलना करून अधिकारवाणीनें मत व्यक्त होणें जरूर आहे. हा ग्रंथ श्री. माणिकचंद जैनग्रंथमालेंतून छापून प्रसिद्धहि झाला आहे.

तामील देशांत राहून संस्कृत वाङ्मयांत भर टाकणाऱ्या जैन विद्वद्रत्नांची व त्यांनीं रचलेल्या ग्रंथांची संख्या कमी आहे असेंही मानण्याचें कारण नाहीं. अज्ञात शिलालेख व ताम्रपट, जैन मठांतील ग्रंथ व इतरत्र असलेले अप्रसिद्ध ग्रंथ यांचा अभ्यास जसजसा अधिकाधिक होत जाईल तसतशी अनेक प्रकारची नवीन माहिती उपलब्ध होणार आहे. महासागरांतील एका बिंदु इतक्या प्रमाणांत आज जैन वाङ्मय पहावयास मिळत आहे. नष्ट झालेल्या जैन वाङ्मयाबद्दल उगीच हळहळ करीत बसण्यांत अर्थ नाहीं. अस्तित्वांत असलेलें सर्व वाङ्मय जनतेपुढें आलें तरी जगावर अनंत उपकार होणार आहेत; इकडे जैन समाज यापुढें तरी लक्ष देईल काय ?

या व या मागील तान प्रकरणांत तामील देश व तद्देशीय यांना सर्वांगसुंदर करण्यास जैनांनीं जे श्रम वेंचिलें त्यांची व जैनधर्मानें बजाविलेल्या कामगिरीची व त्याबद्दल मिळालेल्या मोबदल्याची त्रोटक माहिती दिली आहे. जैनांनीं व जैन-धर्मानें कर्नाटकांत कोणकोणती कामगिरी—विशेषतः—वाङ्मय—क्षेत्रांत—बजाविली याची माहिती पुढील प्रकरणांत दिली आहे. तामील देश व तेथील भाषा यांना कन्नड भाषा व कर्नाटक यापेक्षां अधिक स्थळ देण्यांत आलें आहे असाहि आक्षेप येईल परंतु अनेक कारणांमुळें एकाच प्रकरणांत हा विषय संपवावा लागत आहे.

---

# प्रकरण सातवें

## कर्नाटक अथवा कन्नड वाङ्मय, जैन व जैनधर्म

भाषेचे जे निरनिराळे विभाग मानले जात आहेत त्यांत 'पंचद्रविड' या भाषाविभागाची प्रमुखस्थानीं गणना केली जाते. या विभागांत--

(१) कर्नाटक अथवा कन्नड (२) तामील (३) तेलगु (४) मलयालम् (५) तिळू.

अशा मुख्य पांच भाषांचा या 'पंचद्रविड' भाषाविभागांत समावेश केला जातो. याशिवाय कुडगू, कोट, गोंड, खोंड वगैरे भाषांचाही कित्येक या विभागांतच समावेश करितात.

हिंदी, बंगाली, गुजराथी व मराठी आदि भाषांना प्रगल्भता प्राप्त झाली नव्हती, त्या काळींहि कन्नड भाषेचा विस्तार होऊन ती प्रगल्भ झाली होती. ही भाषाप्रचारांत असणाऱ्या मुलखाचें क्षेत्रहि अधिक होतें. परंतु ती हल्लीं पूर्वीइतक्या प्रदेशांत प्रचलित नसून मुंबई इलाख्यांतील दाक्षिण भाग, निजामसंस्थानचा पश्चिम भाग, म्हैसूर, कुर्ग, म्हैसूर आणि कुर्ग प्रांताच्या हद्दीस लागून असलेला मद्रास इलाख्याचा भाग, मध्यप्रांतांतील व वऱ्हाडांतील कांहीं भाग यांत हल्लीं प्रचलित आहे.

पंचद्रविड भाषाविभागांतील ज्या मुख्य पांच भाषांचा वर उल्लेख केला आहे, त्यांपैकीं कन्नड व तामील या दोन भाषेंत इतर कोणत्याही भाषेपेक्षां अधिक साम्य आहे. तामील भाषेच्या प्रसाराचा व विस्ताराचा काल कन्नड भाषेपेक्षां अधिक प्राचीन आहे. तामील वाङ्मयांतील कोहिनूर कुरल ग्रंथलेखनाचा काल इ. सनांचें पहिलें शतक असावें असें यापूर्वींच प्रकरण (३ पान ४७) वर लिहिलें आहे. तामील भाषेंतील पांच महाकाव्यांचें लेखन होण्याच्या पूर्वींच्या काळांतील कन्नड वाङ्मय आज तरी उपलब्ध नाहीं.

## कालभेदादि

**प्राचीन, मध्ययुगीन** व **आधुनिक** काल असें भाषासौष्ठव वगैरेंवरून या भाषेचे तीन कालभेद केले असून त्यासच जैन, शैव-वैष्णव व ब्राह्मण वाङ्मयकाल असेंहि म्हणतात. पूर्वद् हळगन्नड ( Primitive old Kannada ) ( २ ) हळगन्नड ( old Kannada ) ( ३ ) होसगन्नड ( Modern Kannada ) असेंहि या कन्नड भाषेचे तीन भाग पाडिलें आहेत. इ. सनाच्या सातव्या शतका अखेरपर्यंत पूर्वद् हळगन्नड व इ. सनाच्या सातव्या ते चवदाव्या शतकापर्यंत हळगन्नड भाषा प्रचारांत होती.

## उपलब्ध आद्य कन्नडग्रंथ

प्राचीन अगर जैन वाङ्मय कालांतील आज उपलब्ध पहिला ग्रंथसंपादनाचा मान राष्ट्रकूट वंशकुलोत्पन्न जैन राजा नृपतुंग ऊर्फ राजा अमोघवर्ष ( इ. स. ८१४ ते ८७७ ) यांच्या ' कविराज मार्ग ' या ग्रंथास मिळत आहे. या काळापासून-इ. सनाच्या ९ व्या शतकापासून--इ. सनाच्या १२ व्या शतकाअखेरच्या कालास प्राचीन-जैनकाल-लिंगायत-मध्ययुगीन काळ व इ. सनाच्या १२ व्या ते इ. सनाच्या सोळाव्या शतका अखेरच्या काळास शैव-वैष्णव व त्यानंतरचा काल म्हणजे आधुनिक-ब्राह्मण-काल असें मानिलें जात आहे.

राजा अमोघवर्षाचा ' कवि राजमार्ग ' या ग्रंथांत तत्पूर्वीच्या अनेक कन्नड ग्रंथांच्या व ग्रंथलेखकांच्या नांवाचा उल्लेख आहे; यावरून यापूर्वीहि कन्नड वाङ्मयसंपन्न व समृद्ध होतें असें मानावें लागतें. राजा अमोघवर्षाच्या या ग्रंथांत ग्रंथकार म्हणून दुर्विनिताच्या नांवाचा उल्लेख आहे. गंगवंशीय राजकुलांतील राजा दुर्विनीत (इ. स. ४७८ ते ५१३ ) हाच ही उल्लेखित व्यक्ति असावी असा तज्ज्ञांचा अभिप्राय आहे. हा अंदाज खरा मानिल्यास इ. सनाच्या ५ व्या शतकाच्या मध्यानंतर कन्नडवाङ्मयसुधारणेचा काल मानावा लागेल व असें झालें तरी तामील वाङ्मयाचा प्रथमपद मान कन्नड वाङ्मयास हिरावून घेतां येणार नाहीं. तसें झालें तरी आद्य कन्नड ग्रंथकार होण्याचा मान जैनधर्मीय राजाकडेच जातो. एकदोन अपवाद वगळल्यास गंगवंशीय सारेच राजे जैनधर्मीय होते; व राजा दुर्विनीत हा या अपवादांत नव्हता हें सिद्ध झालें आहे. या दुर्विनीत राजासंबंधीं व गंगवंशासंबंधीं अधिक माहिती ( प्र. ८ मध्यें दिली आहे. )

तत्त्वार्थ सूत्रावरील टीकाग्रंथ 'चूडामणी व टीकाकार श्रीवर्धनदेव' यांचा उल्लेख भट्टाकलंकदेव व दंडी यांनीं आपल्या ग्रंथांत केला आहे, व यांपैकीं दंडी हा इ. सनाच्या सहाव्या शतकांत होऊन गेला असा काल निर्णयतज्ज्ञांनीं दिलेला आहे. श्रीवर्धदेवाचा हा टीकाग्रंथ ९६००० पदांचा आहे. एवढा प्रचंड ग्रंथ ज्या काळीं लिहिला गेला त्या काळांतील कन्नड भाषा प्रगल्भ झालेली नव्हती असें मुळींच म्हणतां येणार नाहीं.

भारदस्त वाङ्मय निर्माण करण्यास लागणारी प्रौढ व प्रगल्भ कन्नड भाषा जैन विद्वानांच्या परिश्रमामुळेंच अस्तित्वांत आली. पंचद्रविड भाषाविभागांपैकीं कन्नड व तामील या दोन भाषांना हल्लीं जें महत्त्व प्राप्त झालें आहे; त्यांचें श्रेय सर्वस्वीं जैन-धर्मीयांच्याच पदरांत पडत आहे. इ. सनाच्या १२ या शतकाच्या मध्यापर्यंत प्रायः सर्वच वाङ्मय व वाङ्मयनिर्मिते जैनच आहेत. यामुळेंच या प्राचीन काळांतील वाङ्मयास **जैन वाङ्मय** व या काळास **जैनकाल** असें सार्थ नांव मिळालें आहे. इ. सनाच्या १३ व्या शतकापासून या क्षेत्रांत इतरांनीं विशेषतः लिंगायतांनीं पाऊल टाकिलें. यावरून या काळांत आपलें वाङ्मय अजिबातच जैनांनीं निर्माण केलें नाहीं, असें मात्र मुळींच नाहीं. शेकडों वर्षांची मोनॉपली जाऊन त्याऐवजीं या क्षेत्रांत इतर धर्मीयांनीं पदार्पण केलें. या चढाओढींत जैनांना आपलें अग्रस्थान टिकवितां आलें नाहीं असेंही नाही, मात्र धार्मिक क्षेत्रांत स्पर्धा सुरू झाल्यानें तेराव्या शतकानंतर जैनधर्मीयांकडून जें ग्रंथलेखन झालें तें प्रायः धार्मिक स्वरूपाचेंच झालें. चलबिचल झालेल्यांचीं मनें जैनधर्मांत दृढतर करणें हाच प्रश्न त्यावेळच्या जैन विद्वानांपुढें प्रामुख्यानें होता व तेंच ध्येय दृष्टीपुढें ठेवून त्याकाळीं ग्रंथलेखन झालें.

या कालापूर्वींच्या राजकीय व धार्मिक क्षेत्रांतील घडामोडींची स्थूलमानानें कल्पना दिल्यास जैनांना आपल्या शेंकडों वर्षांच्या अग्रस्थानापासून च्युत कां व्हावें लागलें याची कल्पना वाचकांना येईल. गंग, कंदब, चालुक्य, राष्ट्रकूट, रट्ट, कलचुरी, शिलाहार, होयसाल, काकतीय, विजयनगर, कारकाल, द्वारसमुद्र, चौट, केलादिनाईक व म्हैसूर आदि यांचें मांडलिक, सेनापती, मुत्सद्दी व देशांतील श्रीमान् लोकांचा आश्रय कवी व पंडित लोकांना असे. विद्वत्तेबद्दल व ग्रंथलेखनाबद्दल राजदरबारी व जनतेंत मानमान्यता होत असे. अशा अनेकांना भरपूर राजाश्रय व लोकाश्रय मिळाल्याबद्दलचे अनेक दानपत्रें व शिलालेख उपलब्ध झाले आहेत.

ग्रंथकारांनींही आपल्या ग्रंथांत आपलें आश्रयदाते व त्यांचें घराणें याबद्दल आदरपूर्वक उल्लेख करून झाल्या उपकारांचें उतराई होण्याचा प्रयत्न केल्याचें आढळतें.

राजाश्रय व लोकाश्रयाखेरीज धर्मप्रसारार्थ अनेक मठसंस्था होत्या. अनेक मठाधिकाऱ्यांकडून पाठशाळा चालविल्या जात होत्या; शिवाय अनेक विद्वानांनीं शिष्यपरंपरा चालूं ठेविली होती.

मठ व पाठशाळा यांच्या विद्याप्रसाराच्या कार्यास अग्रहार-विद्यापीठें-यांची जोड देण्यांत आली होती. मठसंस्थांचीहि ग्रंथलेखनास मदत मिळत असे. आपलें व आपल्या पूर्वजांचें नांव अजरामर राहून कुलाचा उद्धार होईल ही भावना व त्याबरोबरच धर्मसेवा व वाङ्मयसेवा घडावी ही प्रबळ इच्छा यामुळेंही ग्रंथलेखन झालें आहे.

निरनिराळ्या जैन विद्वानांनीं कोणकोणत्या विषयांत ग्रंथनिर्मिति केली आहे हें पहाणेंहि उद्बोधक होईल. एकाच विद्वानानें अगर पंडितानें अनेक निरनिराळ्या व परस्परभिन्न अशा विषयावर भिन्नभिन्न भाषेंत ग्रंथ लिहिले आहेत. राजदंड व लेखणी एकाच वेळीं हातीं घेणारे राजे, तरवार व लेखणी धरणारे सेनापती, तराजूं व लेखणी हातीं धरणारे श्रेष्ठी, फार काय नांगर व लेखणी सारख्याच सफाईनें चालविणारे शेतकरी यांनीं कन्नड वाङ्मयांत भर घातली आहे. त्यांपैकीं अनेकांनीं राजसत्तेवर, इतर अधिकारावर व संपत्तीवर, लाथ मारून शेवटीं संसारत्याग करून आपलें इहपर कल्याण करून घेतलें आहे. यावरून त्यांची चौरसबुद्धिमत्ता व अनभिलाषबुद्धि ही व्यक्त होत आहे. वाङ्मयसेवा करून त्यांनीं आपला, आपल्या कुलाचा, आश्रयदात्यांचा, देशाचा व धर्माचा उद्धार केला आहे. जैनस्त्रीसमाजही या क्षेत्रांत मागासलेला होता असेंहि दिसत नाहीं. द्वारसमुद्राच्या प्रख्यात बल्लाळ राजदरबारी “ **कन्ति-कान्ति** ” या नांवची एक विदुषि कवियित्री होऊन गेली. विद्वानांच्या मतें तिचा काळ इ. स. ११०५ चा आहे. या राजांनीं तिला “ **अभिनव वाग्देवी** ” ही पदवी अर्पण केली होती. कर्नाटक स्त्रीसमाजांत कवियित्री म्हणून दरबारांत मानमरातब मिळविण्याचा मानही एका जैन अबलेलाच मिळालेला आहे. यावरून तामिल व कन्नड भाषाप्रचारांत असलेल्या प्रदेशावर जैनधर्मीयांनीं अनंत व अजरामर टिकणारे उपकार करून ठेविले आहेत, याबद्दल शंकाहि घेण्यास जागा राहणार नाहीं.

लक्ष्मी व सरस्वती या सख्ख्या बहिणी असतांहि त्यांचें वास्तव्य एका ठिकाणीं व गुण्यागोविंदांनीं होत नाहीं; अशी आख्यायिका हल्लीं प्रचलित आहे. इ. सनांच्या बाराव्या शतकापर्यंतचा जैनधर्मीयांचा इतिहास वरवर पाहतांहि ती आख्यायिका खोटी आहे; निदान जैनांनीं तरी कृतीनेंच ती असत्य ठरविली होती असें दिसून येतें. इ. स. च्या बाराव्या शतकाच्या मध्यापासून स्वधर्मरक्षणाची एकच चिंता जैन समाजापुढें होती असेंहि नाहीं. याच सुमारांस जैन राज्यें बुडालीं. इ. स ११८६ मध्यें कलचुरी राज्य, इ. स. ११५६ मध्यें चालुक्य राज्य, इ. स. १३५६ च्या सुमारास होयसाल राज्य, व ११ व्या शतकाच्या सुरवातीस गंग राज्य अशीं जैन राज्यें लयास गेलीं. राजाश्रय तुटला. परधर्मसहिष्णु राजे जाऊन त्या जागीं कट्टर जैनधर्मविरोधी राजे तक्तनशीन झाले. बसव व रामानुजासारख्याशीं धार्मिक क्षेत्रांत दोन हात करण्याचा प्रसंग जैनधर्मीयांवर आला. या कारणसमुच्चयामुळें जैनांना उतरती कळा लागून जैनांच्या वाङ्मयबुद्धीवर व वाङ्मयसेवेवर अनिष्ट परिणाम घडून आले.

पंपभारतासारखा वर्षांगसुंदर महाप्रबंध अगर शब्दमणि-दर्पणासारखा शास्त्रीय ग्रंथ यांनीं आज हजार एक वर्षें अद्वितीय स्थान कायम ठेविलें आहे. राजमहेंद्रीचा राजा राजनरेंद्रानें ' पंपभारत ' तुल्य दुसरा ग्रंथ नानय्याभट्टाकडून लिहविण्यांत आपली सर्व संपत्ति व सर्व राजसत्ता खर्चीं घातली व तामील भाषेंत भारत लिहविला; परंतु तुलनेस संधि मिळाल्यानें पंपभारताचें श्रेष्ठत्व मात्र अबाधितच राहिलें. जैन विद्वानांनीं गणित, ज्योतिष, वैद्यक, संगीत, नाटक, काव्य, तर्क, धर्मशास्त्र, चरित्रात्मक ग्रंथ, स्तुतीपर पुराणें, स्तोत्रें, व्याकरण, शब्दकोश वगैरे अनेक विषयांवर गद्य, पद्य, चंपू व निबंध रूपानें ग्रंथरचना केली आहे.

जैन विद्वानांनीं लिहिलेल्या ग्रंथांची नांवनिशीवार यादी व त्या ग्रंथांतील विषय यांचा या छोट्याशा पुस्तकांत उल्लेख करणें शक्य नाहीं, अगर कन्नड भाषेंतील सर्व जैन ग्रंथलेखक व त्यांचे ग्रंथ यासंबंधीं माहिती या छोट्याशा पुस्तकांत करून देणेंहि अशक्य आहे. तथापि त्यांचें श्रेष्ठत्व समजावें म्हणून कन्नडसाहित्यमर्मज्ञ श्री. शे. भि पारीशवाड, म्हैसूर दरबारच्या पुराणवस्तु संशोधनखात्याचे मुख्याधिकारी श्री. नरसिंहाचार व श्री. भालचंद्र रामचंद्र पटवर्धन इत्यादिकांच्या अभिप्रायाचा सारांश पुढें दिले आहेत.

## वरील विद्वानांचे अभिप्राय

श्री. पारीशवाड लिहितात कीं "इ. स. च्या सहाव्या शतकापासून चौदाव्या शतकापर्यंतच्या दरम्यानच्या सातशें आठशें वर्षांच्या काळांत सुमारें २८० कन्नड कवि होऊन गेले; या कवींपैकीं सुमारें ६० कवी नामांकित व प्रातःस्मरणीय आहेत व या साठांपैकीं ५० कवी जैनच आहेत. त्यांतून ४० जैन कवि असे आहेत कीं त्यांची बरोबरी इतर धर्मीय कवींना करितां येणें शक्य नाहीं." संख्यानुरोधानें जैन कवींची माहिती सांगून ते पुढें म्हणतात कीं,

"लौकिक, चरित्र, पारमार्थिक, तीर्थंकरांचें पुराण व दार्शनिक आदि अनेक विषयांवर जैनांनीं ग्रंथलेखन करून आपलें नांव अजरामर करून ठेविलें आहे. चेन्नबसव पुराण व कन्नड महाभारत ग्रंथांचीं सुलभ व प्रगल्भ भाषासरणी वगैरे गुणांवर वाचक मुग्धच होतो. परंतु याहि विख्यात ग्रंथांना जैन कवींच्या कृतीची बरोबरी करितां आली नाहीं." ( पहा. कर्नाटक साहित्य परिषद् पत्रिका वर्ष ११ अंक १ ) यावरून इ. स. च्या १४ व्या शतकापर्यंतच्या साठ कवींपैकीं ५० नामांकित जैन कवि व त्यांची कृति आजवर अनन्य सामान्यच राहिली आहे.

## श्री नरसिंहाचार यांचें मत

म्हैसूर दरबारच्या पुराणवस्तूसंशोधन खात्याचे मुख्याधिकारी श्री. नरसिंहाचार एम्. ए. एम्. आर. ए. एस. यांनीं "कर्नाटक कवि चरिते" या नांवाचें पुस्तक लिहिलें असून त्यांतील पहिल्या पुस्तकांत इ. सनाच्या १४ व्या शतकाअखेरचे अनेक कवि, त्यांचे ग्रंथ, कवीचा काल, कवी–जन्मभूमि व इतर बरीच माहिती दिली आहे. पहिल्या भागाच्या प्रस्तावनेंत श्री. नरसिंहाचार यांनीं जैन कवींबद्दल जें आपलें मत दिलें आहे तें सर्वमान्य झालें आहे. श्री नरसिंहाचार आपल्या या प्रस्तावनेंत म्हण-तात कीं, "कन्नड भाषेंतील आद्य कवि जैन आहेत. आजवर उपलब्ध प्राचीन उत्कृष्ट ग्रंथांची रचना करण्याचें श्रेय जैनानांच आहे. जैनधर्मीयांचा उत्कर्षकाल व उत्कृष्ट वाङ्मयकाल ही दोन्ही एकच आहेत. कन्नड भाषेला प्रौढत्व व प्रगल्भता देऊन ती वाङ्मयास उपयुक्त करण्याचें श्रेय जैन विद्वानांनाच आहे".

ज्ञानेश्वरकालीं कानडी भाषा किती प्रगल्भ झाली होती याचें विवेचन श्री. भालचंद्र रामचंद्र पटवर्धन एम्. ए., एलएल बी. धारवाड यांनीं श्रीज्ञानेश्वर दर्शन-साहित्य खंड १ यांतील पान १७४ ( इ. स. १९३४ आवृत्ति ) वर केलें आहे.

**श्री. पटवर्धन** लिहितात कीं " कानडी भाषेंत समंतभद्र, पूज्यपाद व श्रीवर्धदेव या सारखे नामांकित कवि सहाव्या शतकाअगोदर होऊन गेले. त्यानंतर दहाव्या शतकाचे पंप, पोन्न व रन्न हे कानडी कवि तर त्या शतकांतील तीन रत्नेंच होत. पंपाची आदिपुराण व पंपभारत हीं दोन काव्यें फारच प्रसिद्ध आहेत. पोन्न हा संस्कृत व कानडी कवि असल्यामुळें त्यास **उभयभाषा-चक्रवर्ती** ही पदवी मिळाली होती. त्याचा मुख्य ग्रंथ " शांतिपुराण " हा होय. रन्न कवीनें " अजित-पुराण " व गदायुद्ध हीं दोन काव्यें लिहिलीं. या तीन कवींशिवाय शके ९०५ मध्यें लिहिलेल्या मराठी शिलालेखांत ज्याचें नांव येतें त्या चामुंडरायानें स्वतः त्रिषष्टीलक्षण शलाका नांवाचा गद्यग्रंथ कानडींत लिहिला आहे. यानंतर बाराव्या शतकांतील प्रसिद्ध कवि दुसरा पंप व कंति यांची प्रसिद्धी आहे. कंति ही स्त्री कवि होती."

याच पानावर पटवर्धन म्हणतात कीं ' बाराव्या शतकाच्या पूर्वी कानडी भाषेचा व्याप फार दूरपर्यंत पसरला होता. ' ' कवि-राजमार्ग ' या ग्रंथाचा उल्लेख यापूर्वीच येऊन गेला आहे. त्या ग्रंथांत " आ कावेरी यिदं आ गोदावरी वरेगम् ' या शब्दांनीं कानडी भाषेची व्याप्ति व विस्तार किती व कोठवर झाला होता हें नमूद केलें आहे. ही नोंद यथार्थ नाहीं असें कोण म्हणेल ?

पंप, पोन्न व रन्न हे कन्नड वाङ्मयांतील रत्नत्रय होत. राष्ट्रकूट राजा तिसरा कृष्णराज यानें पोन्न कवीस, चालुक्य नरेश तैलप यानें रन्न कवीस व होयसाल नरेश द्वितीय बल्लाळ यानें जन्न कवीस " कवी चक्रवर्ती " ही अत्यंत बहुमान-सूचक व यथार्थ पदवी देऊन गौरविलें आहे. दुसरा नागवर्ष कवी हा चालुक्याधिपति दुसरा जगदेवमल्ल याचा राजोपध्याय व सुमनोबाण हा होयसाल नराधिपति नरसिंव्ह याचे राजगुरु होते. याशिवाय गंगराज दुर्विनीत यास श्रीपूज्यपदाचार्य यांचा शिष्य म्हणवून घेण्याचा बहुमान मिळाला होता. इ. स. च्या बाराव्या शतकाच्या मध्यापर्यंतचे प्रायः सर्वच कवि व ग्रंथकार जैन आहेत.

कै. इतिहासाचार्य राजवाडे यांच्या मताचा विचार करितां शक ९०० पर्यंत मराठी भाषेंत सारस्वत मुळींच नव्हतें; असें मानावें लागणार आहे. मराठी भाषेचें मूल जन्माला येण्यापूर्वी व ते रांगू लागण्यापूर्वींच वर ज्या प्रतिभासंपन्न कवि व कवियीत्री यांच्या नांवाचा उल्लेख केला आहे; त्यांच्या ग्रंथांना मान्यताहि मिळाली होती.

चालुक्य, राष्ट्रकूट, यादव, गंग वगैरे राजवंशाच्या राजधान्या–बदामी, कल्याण मालखेड वगैरे कर्नाटकांतच होत्या. राजदरबारी भाषा कानडी, सामान्य जनता व लष्करी शिपाई यांची जन्मभाषा कानडी व **जैन धर्मांतील बरेंच लिखाण कानडी** यामुळें या भाषेचा विस्तार व व्याप फारच दूरवर झाला होता.

तामिल, कानडी व मराठी या भाषांची वृद्धि यांचा कालानुक्रमानें विचार करितां इ. सनाच्या पहिल्या सहा शतकांत तामिल भाषा उत्कर्ष पावली, सहाव्या शतका-पासून १२ शतकापर्यंत कन्नड भाषा उत्कर्ष पावली व तदनंतर मराठी भाषेच्या उत्कर्षास सुरुवात झाली. उत्कृष्ट संस्कृतीचें दान उत्तरीयांनीं दाक्षिणात्यांना दिलें. मातृभाषेंत उत्कृष्ट वाङ्मय निर्माण करून व इतरांना त्याची माहिती व सन्मार्ग दाखवून दाक्षिणात्यांनीं त्या उपकाराची फेड केली. इ. सनाच्या १२ व्या शतकाच्या मध्यापर्यंतच्या कन्नड वाङ्मयांतील काळास **जैन वाङ्मय काल** असें संबोधण्यांत येतें, तें किती सार्थ आहे हें आम्ही वर ज्या तीन विद्वा-नांचे अभिप्राय सार रूपानें दिलें आहेत त्यावरून कळून येण्यासारखें आहे.

मि. राईस वगैरे पाश्चात्य विद्वानांचे अभिप्राय स्थलाभावास्तव देण्यांत आले नाहींत. यानंतरच्या वाङ्मयास "शैव-वैष्णव-लिंगायतकाळ असें नांव देण्यांत आलें आहे. जैन काळांतील सर्वच श्रेय या काळांत इतरांना मिळवितां आलें असें मात्र मुळींच नाहीं. इ. सनाच्या १२ व्या शतकाच्या मध्यापासून इ. स.-च्या १४ व्या शतकाच्या अखेरपर्यंतच्या दरम्यानच्या १५० वर्षांचा काळ कर्नाटकांत कानडी भाषा प्रचलित असणाऱ्या मुलखांतच काय पण अखिल भारतवर्षांत अत्यंत घडामोडींचा व भानगडीचा झाला. राजा विज्जलाचा वध, बसवानुयायांचें वर्चस्व, मुसलमानांच्या दक्षिणेवर स्वाऱ्या, विजयनगर राज्याची स्थापना, रामानुजादि वैष्णव मतवाल्यांचें प्राबल्य, वगैरे अनेक घडामोडी झाल्या. या घडामोडीच्या, युद्धाच्या व बंडाळीच्या मुळाशीं नुसती राज्य-तृष्णा व राज्यविस्ताराचीच महत्त्वाकांक्षा असती; व ती फलद्रूप होऊन जैनांना राजाश्रयास मुकावें लागलें असतें; तरी वाङ्मयक्षेत्रांतील सम्राटपद जैनांनीं खास सोडिलें नसतें. या १५० वर्षांच्या दीर्घ कालांतील घडामोडींचें सूक्ष्म अवलोकन करितां असें दिसतें कीं या काळांतील झगड्याच्या मुळांशीं राज्यतृष्णा व राज्यविस्तार यापेक्षां स्वधर्मप्रसाराचीच खरी महत्वाकांक्षा होती.

स्वधर्म प्रसार करण्यास राज्यसत्तेची जरूरी जैनधर्मविरोधकांना कां भासावी? याचेंहि उत्तर फार खोल न जातांहि मिळणार आहे. या सुमारास राजदरबारी व राजवाड्यांत, श्रीमंतांच्या वाड्यापासून तों गरीबांच्या झोपडींपर्यंत, शहरांतून व खेड्यांतून, रानावनांत व मठांत सर्वत्र जैनधर्माचा प्रसार व विस्तार झाला होता. घरोघरच्या देव्हाऱ्यावरून जैनधर्मास हुसकून लावून त्याऐवजीं आपल्या प्रिय इष्ट देवतांची स्थापना करणें हा प्रधान हेतु व त्याचें साधन म्हणजे राजसत्ता असा हिशोब न घालतां, सर्वांना मत व धर्माचार स्वातंत्र्य दिलें गेलें असतें; अगर निदान परधर्मसहिष्णुत्वाचें धोरण स्वीकारण्यांत आलें असतें तरी ध्रुव नक्षत्राप्रमाणें वाङ्मयक्षेत्रांतील आपलें पद जैनांनीं खास अढळ ठेविलें असतें. उघड युद्धांत विजयश्री माळ घालीत नाहीं असें दिसून आल्यास कपटाचरण व विश्वासघात करण्यासहि इतर कचरले नाहींत. भल्याबुऱ्या मार्गांनीं राज्यपद मिळविल्यानंतर जैनधर्म द्वेषामुळें प्रजेचा धर्म तोच राजाचा धर्म अगर राजाला धर्मच नाहीं या तत्त्वाचें स्मरणहि राहिलें नाहीं.

राज्यक्रांतीमुळें दरबारांतून व राजवाड्यांतून जैनधर्माची हकालपट्टी झाली. परंतु घरोघरीच्या देव्हाऱ्यावरील व लाखों लोकांच्या मनांतील जैनधर्माचें उच्चाटन राज्यक्रांतीबरोबरच होण्याचा काळ लोटून गेला होता. जैनतत्त्वज्ञानाच्या बीजांकुरांचीं पाळेंमुळें खोल उतरून त्याचा प्रचंड व फलदायी वृक्ष बनला होता. शेंकडों विद्वान् प्रतिदिनीं त्यास जलसिंचन करून तो वृक्ष वाढीस लावीत होते. लोकांना समजेल अशा त्यांच्याच मातृभाषेंत जैनधर्म तत्त्वज्ञानाचें व इतर विषयांचें उपयुक्त वाङ्मय निर्माण होत होतें. नुसत्या राज्यक्रांतीमुळें स्वधर्म प्रसार होत नाहीं, जैन पंडितांची लेखणी व जिव्हा ही नष्ट केली पाहिजेत अशी परिस्थिति आहे असें कळून आल्यानें तें साध्य करण्याच्या उपायांचें अवलंबन करण्याचा मोहहि त्यांना आवरतां आला नाहीं. सामान्य अगर कट्टर जैनधर्मीयांचे नव्हे, तर जैन विद्वानांचे शिरच्छेद केले गेले. या अमानुष शिरच्छेदाची शिरगणति करणें कठीण म्हणून असा शिरगणतीचा एक सोपा मार्ग शोधून काढण्यांत आला. शिरच्छेदींत तोंडांतील पडलेल्या दांताचें पेव भरण्यांत येऊन त्यावरून किती जैन पंडितांचा शिरच्छेद झाला याचा अंदाज बांधण्यांत आला. सर्वसाधारण जैनधर्मीयांच्या पाडलेल्या दांतांची मोजदाद करण्याचें तर कारणच नव्हतेंऽऽ

निर्दयपणानें प्राणघात करण्यांतहि सौम्य व जालीम असे प्रकार आहेत. शिर-च्छेद करणें–एक घाव आणि दोन तुकडे–हा यांतील सौम्य प्रकार होय; व त्यामुळें व्हावा तितका दरारा व भीति उत्पन्न होत नाहीं असें प्रत्ययास आल्यानें असो, अगर अशा उपायांचें अवलंबन करणाऱ्या व्यक्तीच्या मनोरचनेमुळें म्हणा; शिर-च्छेदापेक्षां घाण्यांत घालून गाळून मारण्यानें अगर भिंतींत घालून चिणण्यानें जैनधर्मीयांमध्यें अधिक भीति व दरारा उत्पन्न होईल अशें ठरवून याहि अमानुष मार्गाचें अवलंबन केलें गेलें. राजकीय व धार्मिक स्वातंत्र्य नष्ट झालें, जीव-संरक्षणासाठीं अनेकांना देशांतर व धर्मांतर करावें लागलें. जिनमंदिरें उद्ध्वस्त करून मुसलमानांनीं त्याचा मालमसाला इतर कामास लाविला, तर हिंदूंनीं जैन मूर्तींचें जिनमंदिरांतून उच्चाटन करून त्याजागीं आपल्या आराध्य देवतांची स्थापना केली. वीरशैवानींहि हिंदुधर्मीयांचें या बाबतींत अनुकरणच केलें आहे. हिंदूंच्या व वीरशैवांच्या अनेक देवालयांत जे जैन शिलालेख मिळाले आहेत; त्या-वरून वरील विधानांचें प्रत्यंतर मिळणार आहे. जैनधर्मीयांबरोबरच त्यांच्या पूज्य मूर्तींनाही स्थानत्याग करावा लागला. कांहींनीं यज्ञोपवीतांत गुंडगडगी घालून प्राणरक्षण केलें. कांहींनीं केशरी गंधाऐवजीं वैष्णवी काळा गंध लाविला. शैव, वैष्णव व मुसलमान या तीन शत्रूंशीं जैनांना झगडावे लागले. अशा या झगडण्यांत जैन बलहीन व शक्तीहीन झाल्यास आश्चर्य तें कोणतें ? तसेंच या काळांत जैनांना अपेक्षित वाङ्मयसेवा न करितां आल्यास त्यांत नवल तें काय ?

हल्लींच्या कर्नाटक भागांत जैन लोकांना या काळांत इतर ठिकाणांपेक्षां थोड्याशा सहृदयतेनें वागविण्यांत आलें व यामुळें यापुढील काळांतहि अल्पशी कन्नड वाङ्मयसेवा करण्यास जैन समर्थ झाले.

यापूर्वीं राजघराण्यांची, राजांची, मांडलिकांची व मठसंस्थांची वगैरे जैन विद्वानांना आश्रय होता, असें लिहिलें आहे; त्या घराण्यांतील राजे, त्यांचें आश्रित व त्याकाळचे ग्रंथ यासंबंधीं त्रोटक माहिती खालीं दिली आहे. नवेनवे ग्रंथ उपलब्ध होत आहेत. व नवनवी इतर माहिती प्रत्ययहि मिळत आहे; यामुळें पुढील माहिती संपूर्णच आहे असें नाहीं; तथापि याबद्दलची स्थूलमानानें कल्पना यावी या हेतूनें हा प्रयत्न करण्यांत आला आहे.

## गंगराज्य.

या घराण्यांतील राजापैकीं राजा दुर्विनीत ( इ. स. ४७८ ते ५१३ ) हा आचार्य पूज्यपाद यांचा शिष्य होता. या राजानें गद्य ग्रंथ लिहिला आहे.

सुप्रसिद्ध कवि एरेयपा व हरिवंश रचयिता. गुणभद्र हे या राजघराण्याचें इ. स. ८८६ ते ९१३ च्या काळांत आश्रित होते. राजा राचमल्ल याचा सुप्रसिद्ध सेनानी वीर मार्तंड चामुंडराय यानें ' चामुंडराय ' पुराण ( इ. स. ९७८ ) नांवचा ग्रंथ लिहिला असून तो हल्लीं उपलब्ध आहे.

## कवि चक्रवर्ति रन्न.

वीर शिरोमणी चामुंडराय यांचे गुरु अजितसेनाचार्य यांचा शिष्यावर व कन्नड वाङ्मयांतील रत्नत्रय कवींपैकीं कविरत्न रन्न याचा जन्म इ. स ९४९ मध्यें मुधोळ ( विजापूर ) नजीकच्या एका खेड्यांत झाला हें सांगूनहि कोणास खरें न वाटल्यास नवल नाहीं. रन्न याच्या घराण्यांत कांकणें विकण्याचा धंदा होता. शिक्षण संपादन करण्याइतकी गृहस्थिति अनुकूल नव्हती, तथापि रन्न निराश झाला नाहीं. चामुंडरायांची कीर्ति ऐकून तो चामुंडरायाकडे गेला. गुणीजनांचा आश्रेता व विद्याप्रेमी चामुंडरायानें त्यास आपल्या पदरीं ठेविलें. चामुंडरायाचे गुरु अजितसेनाचार्य यांच्यापाशीं अध्ययन झाल्यावर रन्नकवीचा गंगराजदरबारीं प्रवेश होण्यास व मानसन्मान मिळवण्यास अवधी लागला नाहीं. त्यांच्या विद्वत्तेची कीर्ति ऐकून चालुक्यनरेश तैलप यानें आपल्या दरबारीं नेऊन त्यास '**कविचक्रवर्ती**' ही बहुमान सूचक व सार्थ पदवी दिली. राजा तैलपाच्या आज्ञेनुसार रन्नकवीनें **गदायुद्ध** अथवा '**साहसभीमविजय**' नांवाचा ग्रंथ लिहिला. या शिवाय अजित तीर्थंकर पुराण, परशुरामचरित्र व चक्रेश्वरीचरित्र, असें तीन ग्रंथ रन्नकवीनें लिहिले आहेत. पंपकविकृत आदिपुराण, पोन्नाचें शांतिनाथपुराण व रन्नाचें अजितनाथपुराण हे कन्नड वाङ्मयांतील कोहिनूर होत. या रन्नकवीची मोहिनी कन्नडभाषा प्रचलित असलेल्या मुलखावर आज हजार वर्षें अविचल आहे. थोड्याच वर्षांमागें धारवाड व म्हैसूर भागांत 'रन्नजयंती' साजरी करून या कवीबद्दल सर्व जातीच्या व धर्मांच्या लोकांनीं आपला आदर व्यक्त केला. या जयंतीप्रसंगीं ' रन्न ' गौरवपर लिहिलेला २७० पानांचा ग्रंथ म्हैसूर नरेश यांना अर्पण करण्यांत आला आहे.

## राष्ट्रकूट राजे

या घराण्यांतील राजा तिसरा कृष्णराज ( ९३९-९६८ ) याचा आश्रित पोन्न हा एक नामांकित कवि होता, व त्यास "कवि चक्रवर्ती" ही पदवी देण्यांत आली होती.

## चालुक्य.

सुप्रसिद्ध कवि आदिपंप, हा या घराण्यांतील राजा आरिकेशरी याचा आश्रित होता. सुप्रसिद्ध रन्न कवीचा आश्रयदाता राजा तैलप (९७३–९८७) असून " कवि चक्रवर्ति " हीं सन्मानसूचक पदवी त्यास अर्पण करण्यांत आली होती. इ. स. ९४० ते ९९० च्या ५० वर्षांच्या कालांत राष्ट्रकूट व चालुक्य या दोन राजदरबारीं पोन्न व रन्न या दोघां जैनग्रंथकारांनीं कवि चक्रवर्ती " अशी पदवी मिळविली. " जातक तिलक " या ग्रंथाचा कर्ता श्रीधराचार्य व " सुकुमार चरित्राचा ' लेखक शांतिनाथ हे अनुक्रमें राजा लक्ष्मण यांचे आश्रित होते. "समयसार परीक्षा " त्रैलोक्यरक्षामणी स्तोत्राचाकर्ता ब्रह्मशिव हा आहवमल्ल राजाचा मुलगा व विक्रमादित्य त्याचा बंधू कीर्तिवर्मा यांचा आश्रित होता. हा ब्रह्मशिव वत्सगोत्री जैन ब्राह्मण होता. दुसरा नागवर्म कवि हा जैन ब्राह्मण असून राजा जगदेव मल्लाचा ( इ. स. ११३८–११५० ) आश्रित होता.

## होयसाल राजे.

' अभिनव वाग्देवी ' पदवीधारक कन्ति व अभिनव पंप हे पहिला बल्लाळ राजा ( ११००–११०६ ) याचे आश्रित होते. व्यवहारगणित, व्यवहाररत्न, क्षेत्रगणित, लीलावती, जैन गणितसूत्र, टीकोदाहरण वगैरे गणितग्रंथांचा कर्ता राजादित्य हा विष्णुवर्धन ( ११११–११४१ ) राजाचा आश्रित होता. याची जन्मभूमि रायबाग ( M. S. M. Rly ) ( हुवीन बागे ) असून तो गणितज्ञ, कवि व भट्टारक शुभचंद्राचा शिष्य होता. यशोधर चरित्रादि ग्रंथांचा कर्ता ' जन्न ' कवि यांचा पिता सुमनोबाण हा राजा नारसिंह याचा आश्रित व राजोपाध्याय होता. ' कविताविशारद ' बूचीराज हा राजा वीरबल्लाळ याचा प्रधान होता.

या राजाचा दुसरा पद्मनाभ नांवाचा एक अधिकारी होता व त्याचा आश्रित नेमिचंद्र यानें ' अर्धनेमि ' नांवचा ग्रंथ लिहिला आहे. याच राजांचा रेचरस या नांवचा दुसरा एक मंत्री होता व त्याचा आश्रित ' आपन्न ' यानें ' वर्धमान पुराण ' लिहिलें आहे. याच राजानें जन्न कवीस **कवि चक्रवर्ती** ही पदवी अर्पण केली होती. केशीराज कवीचा पिता मल्लिकार्जुन यानें सोमेश्वराच्या मनोरंजनार्थ ' सूक्तिसुधार्णव ' ग्रंथाची रचना केली.

## सौदत्ति–रट्टराजे.

चौथा कार्तवीर्य राजाचा राजकवि पार्श्वनाथ पंडित यानें 'पार्श्वनाथ पुराण' लिहिलें. कवि दुसरा गुणवर्मा हा या राजाचा अधिकारी शान्तिवर्म याचा आश्रित होता. कवि बालचंद्र हाही या राजाच्या कारकीर्दींत होऊन गेला असावा असें मानिलें जातें.

## शिलाहार–करहाट–कऱ्हाड.

राजा गंडरादित्याचा मुलगा राजा लक्ष्मण यांच्या आज्ञेनुसार कृष्णवर्म्यांनें नेमिनाथ पुराणाची रचना केली. याच राजाचे कारकीर्दींत नेमिचंद्रानें लीलावती नांवचा ग्रंथ लिहिला.

## कोंगाल व चेंगाल्व

चंद्रनाथाष्टक स्तोत्र लेखक मौक्तिक कवि हा वीर कोंगाल कालीन असून त्याचा आश्रित होता.

जयनृपकाव्य, प्रभंजनचरित्र, श्रीपालचरित्र, सम्यकत्व कौमुदि, सूपशास्त्रादि ग्रंथाचा कर्ता तिसरा मंगरस हा चेंगाल्व राजाचा वंशपरंपरागत प्रधानाचा मुलगा होता.

## तुलुदेश राज्यघराणें.

कार्कल भैरवरसाचा पुत्र पांड्य राजा याच्यासाठीं कल्याण कीर्तीनें ' ज्ञान-चंद्राभ्युदय ' नांवाचा ग्रंथ लिहिला. संगीतपूरचा राजा देव याचा मुलगा संगम यांच्या आज्ञेनुसार कोटिश्वर कवीनें 'जीवंधरषट्पदी' ची रचना केली. कारकलचा राजा भैरवरस ओडेय याचा आश्रित कवि रत्नाकर यानें 'भरतेश्वरचरित्र' लिहिलें. तैलव, हैव व कोंकण देशाधिपति साल्वमल्लाच्या दरबारीं राजकवी साल्व यानें " रस–रत्नाकर " भारत वैद्यसांगत्य " आदि वैद्यक ग्रंथ लिहिले. याच घरण्यांतील राजा भैरवेंद्र यांच्या आज्ञेनुसार कवि बाहुबल्लीनें " नागकुमार चरित्र " व चंद्रम " कवीनें कार्कल गोमटेश्वर चरित्र " लिहिलें. " धन्य कुमार " चरित्राचा लेखक आदियण्ण हा गिरसप्पाचा ( गेरूसोप ) राजा भैरवराय याचा आश्रित होता संगमरायाच्या पुत्राचा आश्रित पायण्णा या कवीनें " अहिंसा चरित्र " लिहिलें. याच घराण्यांतील राजा माल्लिराज याचा आश्रित अभिनववादी विद्यानंद यानें विजयनगर दरबारीं इतर धर्मीयावर धर्मवादांत विजय मिळविल्यानें रत्नवृष्टि करून त्याचा दरबारांत सन्मान करण्यांत आला. बंग्वाडी लक्ष्मण भगरसाचा दरबार कवी चंद्रशेखर हा " रामचंद्र चरित्राचा " पूर्वार्ध लेखक असून याच चरित्राचा उत्तरार्ध लेखक पद्मनाथ कवी हा चेन्नरायाचा आश्रित होता. चौटराणी चेन्नमांबा इच्या आज्ञेनुसार सुरा कवीनें पद्मावती चरित्राची रचना केली.

## विजयनगर राज्य.

विजयनगर राजांनीं कन्नड वाङ्मयाला फारसें उत्तेजन दिलें नाहीं परंतु या राज्यांतील जैन सामन्त व सेनापती आदि यांचा ओढा कन्नड वाङ्मयाकडे असल्यानें कन्नड ग्रंथकार व कवी यांना अशा मांडलिकांनीं आश्रय दिला. पहिला हरिहर राजाचा (१३३६–१३५३) आश्रित कवि पहिला मंगरस यानें 'खगेंद्रमणि-दर्पण' व दुसरा हरिहर राजाचा दरबार कवी 'मधुर' यानें 'धर्मनाथ पुराण' यांची रचना केली. सुप्रसिद्ध 'शब्दानुशासन' वगैरे अनेक ग्रंथांचे कर्ते व वाद-विवादपटु भट्टाकलंक हे व्यंकटपति राजाच्या कारकीर्दींत होऊन गेले.

राजदंड, तरवार, तराजु अगर नांगर हीं एका हातीं व लेखणी दुसऱ्या हातीं धरून या दोन्हीं साधनांचा एकसमयावच्छेदेंकरून उत्कृष्ट उपयोग करण्याचा मान आणि श्री व सरस्वति या दोघींना एकत्र वास करण्यास लावण्याचें श्रेय जैनांना आहे; असें यापूर्वींच प्रतिपादन केलें आहे. आणखीहि एका दृष्टीनें जैनाचार्यांनीं व जैनविद्वानांनीं या लौकिकांत भर टाकिली आहे, असेंहि दिसून येईल. स्वामी समन्तभद्राचार्य, आचार्यपूज्यपाद, श्रीवीरसेनाचार्य, जिनसेनाचार्य, गुणभद्र, अलंकाचार्य, नेमिचंद्र सिद्धांत चक्रवर्ति, भूतबली, वादीभसिंह, पुष्पदंत वगैरे अनेक विद्वानांनीं संस्कृत–प्राकृत–मागधी भाषेंतच ग्रंथरचना करून सरस्वतीसेवा केली असें नसून या भाषेशीं विभिन्न अशा कन्नड भाषेंतहि तितकेंच सरस वाङ्मय निर्माण करण्याचें श्रेय जोडिलें आहे. या वैशिष्ट्यांतील अग्रस्थानापासून जैनांना च्युत करण्याचें श्रेय अद्यापहि इतर धर्मीयांना मिळवितां आलें नाहीं.

नक्षत्र सत्ताविसांतून सात वजा केल्यास बाकी वीस असें सरळ उत्तर प्राथमिक शाळेंतील विद्यार्थीहि देईल परंतु सत्तावीस नक्षत्रांतून पहिलीं सात नक्षत्रें वगळल्यास बाकी वीस, हें खरें सार्थ व सूचक उत्तर नसून शून्य असेंच खरें उत्तर विचारवंतांना द्यावें लागतें. तद्वत्च कन्नड व तामील वाङ्मयांतून जैन साहित्य वगळल्यास बाकी काय राहील याचें उत्तर निराळें कांहीं देतां येणार नाहीं.

विषयांतराचा दोष माथीं घेऊनहि जैन समाजाला एक आग्रहाची विनंती करून हें प्रकरण पुरें करणार आहों. अहिंसावादाच्या सततोपदेशामुळें हिंदुस्थान क्षीण व निर्वीर्य बनला असें वेळीं-अवेळीं प्रतिपादन करून जैन धर्मांतील अहिंसावादाची

हेटाळणी करून हिंदुस्थानच्या पारतंत्र्याचें पातक जैनांच्या पदरीं बांधण्याचा, अश्लाघ्य व खुनशी प्रयत्न होत असतो; तसेंच जैन वाङ्मयाच्या श्रेष्ठत्वाची कल्पना नसल्यामुळें त्या वाङ्मयाचें अस्तित्व मानण्यासही इतर धर्मीय सहसा तयार नसतात.

इतर समाजाच्या या आशा आक्षेपांकडे क्षणभर दुर्लक्ष केलें तरी चालेल, परंतु अशा आक्षेपांचें खंडन न झाल्यामुळें खुद्द जैन समाजावर जे अनिष्ट परिणाम घडत आहेत, त्याकडे मात्र दुर्लक्ष करून चालणार नाहीं. जैन समाजांत राजे होते, समर धुरंधर सेनानी होते; जैन मुत्सद्दी होते, जैन कवि व ग्रंथकार होते. समुद्र-पर्यटन करून परदेशांशीं व्यापार करणारे धाडशी व्यापारी होते. सारांश इतर धर्मीयांना अभिमानास्पद अशा ज्या ज्या गोष्टी आहेत त्या त्या सर्व पूर्वीच्या जैन समाजांत होत्या. याबद्दलचा इतिहास जैनांच्या हातीं असणें अत्यंत जरूर आहे. या महत्त्वाच्या विषयाकडे जैन समाजाचें जावें तितकें लक्ष गेलेलें नाहीं; ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे. तथापि आमचा हा उद्योग जैन समाजास पसंत पडून हा प्रयत्न उपयुक्त आहे असें दिसून आल्यास द. हिंदुस्थानांतील जैन राजे, सेनापती वगैरे राजकारणी विभूतींचा व वाङ्मयोपासकांचा इतिहास जैन समाजास सादर करण्यास आम्हांस उमेद येणार आहे.

पंचद्रविडभाषापैकीं तामील वाङ्मय व जैनधर्म यासाठीं चार प्रकरणें खर्ची घातलीं असतां कन्नड वाङ्मय व जैनधर्म यासाठीं फक्त एकच प्रकरण लिहिल्याबद्दल व या पंचद्रविड भाषात्रयीपैकीं तेलगू वाङ्मयावर सर्वस्वीं बहिष्कार घातल्याबद्दल वाचक आम्हांवर पक्षपाताचा आरोप करतील; परंतु तेलगू वाङ्मय व जैनधर्म याबद्दल कोणतीहि माहिती मिळवितां आली नाहीं. यामुळें नाइलाज झाला. कन्नड वाङ्मय, जैन व जैनधर्म याबद्दलची अस्पष्ट कां होईना पण कांहीं कल्पना कमी-अधिक प्रमाणांत अनेकांना आहे. यामुळेंहि एकच प्रकरण लिहून या विषयाची पूर्तता केली आहे. उपलब्ध जैन तामील वाङ्मय, उपलब्ध कन्नड वाङ्मयाच्या दृष्टीनें प्राचीन आहे. तामील देशांत जैनधर्माचा प्रसार व विस्तार झाला नसावा असें प्रतिपादन करणाऱ्यांचें समाधान व्हावें व त्याबरोबरच तामिल देशांतील जैन धर्माच्या प्राचीनतेबद्दल वाङ्मयांतील बिनतोड पुराव्याची माहिती एकत्रित करावी याहि हेतूनें अधिक विस्तारानें त्याबद्दल चर्चा केली आहे. शिवाय पंचद्राविडभाषा-समुच्चयांत काळाच्या दृष्टीनें तामील वाङ्मयास वडीलकीचा मान मिळवितां आल्यानेंहि त्यास अधिक स्थल देण्यांत आलें आहे.

# प्रकरण आठवें.

## दक्षिण भारतांतील प्रबळ जैन राजघराणीं



दक्षिण हिंदुस्थानांत मोडत असलेल्या मुंबई व मद्रास इलाख्याचे भाग व म्हैसूर संस्थान, यांत हल्लीं ज्या ज्या भागाचा समावेश होतो; त्या प्रदेशांत एके काळीं जैनांनीं राजकीय, सामाजिक, धार्मिक व साहित्य क्षेत्रांत जें वर्चस्व मिळविलें होतें, त्याची स्थूल मानानें कल्पना यावी या हेतूनें या प्रकरणांत माहिती देण्याचें योजिलें आहे.

अंतिम श्रुतकेवली यांचें दक्षिणेंतील आगमन व मोक्ष समयींच्या त्यांच्या उपदेशाप्रमाणें विशाख मुनींच्या अधिपत्याखालीं बारा हजार जैन मुनींचें चोल व पांड्य देशाकडे धर्मप्रसारार्थ प्रयाण, याबद्दल यापूर्वीं थोड्याशा विस्तारानें लिहिलें आहेच. श्री भद्रबाहू स्वामींच्या कर्नाटकांतील आगमनानंतर पश्चिमघाटाच्या किनाऱ्यावर व म्हैसूर संस्थानच्या दक्षिण भागांत जैनांनीं आपली कायमची वस्ती केली. विशाखमुनींच्या नेतृत्वाखालील मुनीसंघांनीं दक्षिण हिंदुस्थानांतील अनेक प्रांतांत धर्मप्रसार करण्याच्या उत्कट भावनेनें संचार केला. मदुरा आणि दक्षिण व उत्तर अर्काट जिल्ह्यांत त्यांनीं वास्तव्य केलें. या संघांतील अनेक विद्वानांनीं साहित्यांत उत्कृष्ट भर घातली. या संघांतील विद्वद्रत्नांनीं विचारविनिमय करून निरनिराळ्या ठिकाणीं वाङ्मयमंडळाची–संघाची–व त्याबरोबरच अनेक पाठशाळांची स्थापना केली.

अशा या साहित्य मंडळांपैकीं संघांत द्रमिल नांवाचा संघ व गणांत नंदिगण हे श्रेष्ठ मानिले जात होते. सर्व दक्षिण हिंदुस्थानभर विद्वान् जैनमुनी लहान लहान टोळ्या करून त्या त्या भागांतील भाषेंत धर्मोपदेश करीत संचार करीत. दक्षिण हिंदुस्थानभर अशा उपदेश मंडळाचें जाळें पसरून देण्यांत आलें. हे जैनमुनी धर्मप्रसाराखेरीज इतर बाबतींत बेफिकीर होते, अगर तिकडे ते लक्षच देत नव्हते,

असें मानणें मात्र साफ चुकीचें होईल. संसारीजनांत ते मिसळून राहात नव्हते, ही गोष्ट खरी असली तरी सुप्रसिद्ध प्रवासी मेग्यास्थेनिस यानें इ. स. ४०० वर्षां पूर्वी लिहिलेल्या प्रवासवृत्तांवरून रानावनांतून वास करणाऱ्या या जैनमुनिजनांकडे त्या काळचे राजेरजवाडे आपले दूत पाठवून त्यांच्या मार्फत बिकट राजकारणांतहि त्यांची सल्लामसलत घेत होते असें समजून येतें.

अहिंसावादाच्या सततोपदेशामुळें क्षात्रवृत्तीची हानी झाली असें प्रतिपादन करून अहिंसाधर्माची वेळीं अवेळीं निंदा करणाऱ्यांनीं दक्षिण हिंदुस्थानांतील जैन-राजे, त्यांचे पराक्रमी व वीर्यशाली सेनापती व अशांचे जैनगुरु यांच्या चरित्रांचें व या भागांतील ज्ञातइतिहासाचें स्थूल मानानें अध्ययन केलें तरी त्यांना खऱ्या अहिंसाधर्माच्या उपदेशाची थोरवी कळून येईल. अहिंसाधर्माच्या उपदेशानें हा भरतदेश स्त्रैण व निर्वीर्य बनला व त्यामुळें परकीयांना या भरतभूत आपली सत्ता प्रस्थापित करावयास संधि मिळाली असें मुळींच नसून परकीयांची सत्ता प्रस्थापित होण्याचीं दुसरींच बलवत्तर कारणें आहेत असें दिसून येईल.

दक्षिण हिंदुस्थानचा इतिहास समजून घेतांना खालील ठळक व महत्त्वाच्या बाबी वाचकांनीं संपूर्णपणें लक्षांत ठेवणें जरूर आहे.

( १ ) इ. स. पूर्वीचें सेंद्रक, नाग व कदंब यांसंबंधीं स्वतंत्र प्रकरण दिलें आहे.

( २ ) इ. सनाच्या दुसऱ्या (इ. स. १०३) शतकापासून तों अकराव्या शतका-अखेर ( इ. स. १००४ ) हल्लींच्या म्हैसूर संस्थानांत समाविष्ट झालेल्या प्रदेशां-पैकीं बहुतेक सर्वच प्रदेश **गंगवंशीय** राजांच्या सत्तेखालीं होता. चोलवंशीयांनीं गंगवंशीयांना पराजित केलें. चोल राजांना हा राज्यलाभ फार वर्षें लाभला नाहीं. इ. स. १००४ ते १११६ सुमारें ११२ वर्षें चोलांनीं राज्य केलें. होयसालवंशी-यांनीं चोल राजांना जिंकून त्या भागावर इ. स. च्या १२ व्या शतकापासून ( इ. स. १११६ ) ते चौदाव्या शतकापर्यंतच्या पूर्वार्धापर्यंत ( इ. स. १३४६ ) सव्वादोनशें वर्षें राज्य केलें.

( ३ ) इ. सनाच्या पांचव्या शतकाचें अखेरी अखेरीस ( इ. स. ४७९ मध्यें ) **चालुक्यांनीं** आपली सत्ता स्थापन केली व इ. सनाच्या सातव्या शतकाच्या पूर्वार्धांत (इ. स. ६१५) या राज्याचें **पूर्व चालुक्य** व **पश्चिम चालुक्य** अशीं दोन निरनिराळीं राज्यशकलें झालीं.

( ४ ) इ. स. ६१५ ते १२ व्या शतकापर्यंत **पूर्व चालुक्यांनीं** राज्य केलें, व यानंतर चोल राजांनीं त्यांना पादाक्रांत करून त्यांचें राज्य आपल्या राज्यास जोडिलें.

( ५ ) इ. स. ७४३ च्या सुमारास **राष्ट्रकूटांनीं** पश्चिम चालुक्य घराण्याचा पराभव करून त्याचें राज्य बुडविलें. राष्ट्रकूटांनीं इ. स. ७४३ ते इ. स. ९७३ पर्यंत राज्य केलें.

( ६ ) इ. स. ९७३ सालापर्यंत **राष्ट्रकूटांनीं** राज्य केलें व नंतर **पश्चिम** चालुक्यांनीं राष्ट्रकूट राजापासून आपलें राज्य परत घेतलें, व इ. स. ९७३ ते ११५६ पर्यंत राज्य केलें. या वेळीं पश्चिम चालुक्याचें पुनरुज्जीवन झालें.

( ७ ) **कलचुरी** राजघराण्याचा उदय इ. स. च्या बाराव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास ( इ. स. ११५६ ) होऊन त्यांनीं पश्चिम चालुक्याचा पराभव केला. या नव्या मुलखावर फक्त ३० वर्षें राज्य केलें.

( ८ ) **होयसाल राज्यघराणें** ( ११९६–१३४२ ) म्हैसूर संस्थानांतील मुलुख, हल्लींच्या सालेम, कोईमतूर, बेल्लारी व धारवाड जिल्ह्याखालील मुलूख इतक्या भागांत होयसाल राजांनीं आपलें स्वामित्व स्थापन केलें.

( ९ ) चालुक्य राज्यस्थापनापूर्वीं ( इ. स. ४७९ ) चालुक्य सत्तेखालींल मुलूख– कुंतलदेश– धारवाड जिल्हा व भोंवतालचा प्रदेश– **कदंबराजांच्या** सत्तेखालीं होता. इ. सनाच्या दुसऱ्या शतकापासून चालुक्य राज्यस्थापनेपर्यंतच्या काळांत कदंबांनीं या मुलखावर राज्य केलें, असें मानिलें जातें. चालुक्य काळापूर्वींची माहिती एका स्वतंत्र प्रकरणांत दिली असल्यानें त्याबद्दल येथें फक्त ओझरता उल्लेख केला आहे.

( १० ) या प्रमुख राज्यघराण्याशिवाय अनेक लहान लहान राज्यें होतीं. वरील प्रमुख राज्यघराण्याचे सामंत, महामंडलेश्वर, व दंडनायक वगैरे नांवानें संबोधिलें जाणारें लहान मोठे मांडलिक राजे होते. कधीं मांडलिक म्हणून तर कधीं स्वतंत्र राजे म्हणून ते कमी अधिक मुलखावर राज्य करीत असत, यामुळें अधिक विस्तारानें त्यांचें वर्णन दिलेलें नाहीं. वर ज्या राज्यघराण्यांचा उल्लेख केला आहे त्या त्या घराण्यांचा सत्ताकाल पहाण्यास सोईचें व्हावें म्हणून तो काल खालीं दिला आहे.

( १ ) **गंगवंशीय** राजांनीं इ. सनाच्या दुसऱ्या शतकापासून ( इ. स. १०३ ) ते इ. सनाच्या ११ व्या शतकाच्या सुरवातीपर्यंत–इ. स. १००४–सुमारें ९०० वर्षें राज्योपभोग घेतला.

( २ ) **चालुक्यांनीं** इ. स. ४७९ ते ६१५ पर्यंत राज्यसत्ता गाजविली; व त्या राज्याचे पूर्व व पश्चिम चालुक्य असे दोन भाग झाले. ( इ. स. ६१५ )

( ३ ) **पूर्व चालुक्यांनीं** इ. स. ६१५ ते इ. स. च्या १२ व्या शतकापर्यंत राज्य केलें.

( ४ ) **पश्चिम चालुक्यांनीं** इ. स. ६१५ ते इं. स. ७५० पर्यंत राज्य केलें.

( ५ ) **राष्ट्रकूटांचा** काळ इ. स. ७५० ते इ. स. ९७३ पर्यंतचा होता.

( ६ ) **पश्चिम चालुक्याच्या** पुनरुद्यानंतरचा काळ इ. स. ९७३ ते इ. स. ११५६ पर्यंत आहे.

( ७ ) **कलचुरी** घराण्यानें इ. स. ११५६ ते इ. ११८६ पर्यंत राज्य केलें.

( ८ ) **होयसालांनीं** इ. सनाच्या १२ व्या शतकापासून तो इ. स. १३४६ पर्यंत राज्य केलें.

( ९ ) कदंब घराण्याच्या राजसत्तो-दयाचा काल निर्णय अद्याप निश्चित झालेला नाहीं; परंतु त्यांची पहिली राज्यसत्ता इ. ४६९ मध्यें संपुष्टांत येऊन त्या जागीं चालुक्य घराण्याचा प्रारंभ झाला. कदंबाचें आधिराज्यपद नष्ट झालें तरी दुय्यम दर्जाचे राजे म्हणून निरनिराळ्या ठिकाणीं ते सत्ताधीश होते. हें पुस्तक वाचीत असतांना इ. स. ४७९ नंतरहि कदंबाचा उल्लेख येईल त्या वेळीं वाचकांची गैरसमज होऊं नये म्हणून हा खुलासा केला आहे.

## गंगराज्य

इ. सनाच्या ११ व्या शतकांतील शिलालेखावरून या वंशासंबंधीं खालीलप्रमाणें माहिती मिळते. इक्ष्वाकु–सूर्यवंशांतील–राजा धनंजय व राणी गंधारदेवी यांच्या पोटीं हरिश्चंद्र राजा जन्मला. हरिश्चंद्राची राणी रोहिणीदेवी यांचा मुलगा राजा भरत. या भरताची राणी महादेवी. ही गरोदर असतां गंगास्नानास गेल्यावेळीं तिला पुत्र झाला म्हणून त्याचें नांव गंग–दत्त–असें ठेविलें; व या गंगदत्ताचें वारस ते गंगवंशीय म्हणून संबोधिलें गेलें. या वंशांतील राजा विष्णुगोप यास भागदत्त व श्रीदत्त असे दोन मुलगे झाले; यांपैकीं भागदत्त हा अयोध्या भागावर व श्रीदत्त हा कलिंग देशावर राज्य करूं लागला, म्हणून त्या शाखेस कलिंग–गंग अशी संज्ञा प्राप्त झाली.


या इक्ष्वाकु कुलोत्पन्न राजांपैकीं राजा पद्मनाभ यांच्या राज्यावर उज्जैनीचा राजा महिपाल यानें स्वारी केली असतां वंशच्छेद होऊं नये म्हणून राजा पद्म-नाभानें आपले मुलगे **दडिग** व **माधव** यांना दक्षिणेंत पाठविलें. या हतभागी राजपुत्रांची व धर्मप्रसारार्थ संचार करीत असलेल्या जैनाचार्य **सिंहनंदी** यांची गंगपेरूर या गांवीं भेट झाली. राजकुमारद्वयांची करुणास्पद व दुःखद कथा ऐकून आचार्यांचें मन द्रवलें. त्यांना आपल्या सानिध्यांत ठेवून घेऊन अनेक विद्येंत पारंगत करून त्यांच्यासाठीं राज्य स्थापन केलें. या राज्यस्थापनेच्या मुळांशीं अद्भूत चमत्कारांची जोड देण्यांत आली आहे. ती अद्भूतता खरी असो वा नसो; परंतु **गंगवंशीय** राज्यस्थापनेचें सर्वच श्रेय आचार्य सिंहनंदी यांना इतिहासकार देत आहेत. या काळीं जैनधर्मीयांची संख्या या प्रदेशांत मोठ्या प्रमाणांत असावी व त्या समाजावर असलेल्या आपल्या वजनाचा उपयोग करून या अनाथ पण सुविद्य शिष्यांना आपले राजे मानण्यास आचार्यांनीं त्याचें मन वळविलें असावें. या स्वरूपाची राज्यस्थापना होणें अशक्य नाहीं. ( पहा. लेख नं. ५४ श्रवण बेलगोल; लेख नं. ३८७, उदयेन्दिरम्चें दानपत्र ( सा. इं. इ. २, ३८७ ) कुडलूचें दानपत्र ( म्है. आ. रि. १८२१ पृ. २८ ). ( ए. क. ७, शिमोग ४; ए. क. ८ नं. ३५ व ३६—गोमट्टसारवृत्ती. अभयचंद्र देव कृत. )

गंगवंशीय राजांनीं सातशेंपेक्षां अधिक वर्षें राज्य केलें, असें मि. लुईस राईस यांचें मत आहे. इतरांच्या मतें हा काल ९०० वर्षांचा आहे. इ. सनाच्या ११ व्या व १२ व्या शतकांतील अनेक शिलालेख नगर व शिमोगा येथें उपलब्ध झाले आहेत. त्या लेखांतून या घराण्याची उत्पत्ति व वाढ यासंबंधीं बरीच विस्तृत माहिती मिळते. या घराण्यांतील पहिला राजा माधव यास कोंगुनीवर्मा असेंहि म्हणत. आचार्य सिंहनंदी यांनी आपल्या या शिष्यांना दिलेला उपदेश मननीय नाहीं असें कोण म्हणेल ? वचनभंग करूं नका; जिनधर्म सोडूं नका; परस्त्री वर्ज्य माना; मद्यमांसाशनापासून विन्मुख रहा; कुसंगति करूं नका; कोणास विन्मुख पाठवूं नका; **लढाईंत पाठ दाखवूं नका**; यांत अंतर पडल्यास कुलनाश होईल. आचार्यांचा हा उपदेश निवृत्तिमार्गाकडे नेतो अगर प्रवृत्तिमार्गा-कडे नेतो ? **कोंगूदेश रजक्कल** या तामीळ वंशावळीवरून व **नागमंडळ** शिला-लेखांवरून इ. सनाच्या दुसऱ्या शताब्दींत हा राजा होऊन गेला असें ठरविण्यांत आलें आहे.

या राजवंशांतील तिसऱ्या व चौथ्या राजाखेरीज बाकीचे सर्व राजे जैनधर्मीयच होते. माधव नंतर मुखार व मुखार नंतर अवनित हे राज्यपदारूढ झाले. हा जैनधर्मीय असून पंडित विजयकीर्ति हा या राजाचा गुरु होता. सुप्रसिद्ध जैन वैय्याकरणी पूज्यपादाचार्यांचा शिष्य दुर्विनित हा अवनितानंतर गादीवर बसला. पैशाची भाषेंतील बृहत्कथेचें संस्कृत भाषेंत भाषांतर याच राजानें केलें आहे. अमोघ वर्षांच्या कविराज-मार्ग ग्रंथांत उल्लेखिलेला दुर्विनीत म्हणचे गंग दुर्विनीतच असें मानिलें जात आहे. यावरून पैशाची, संस्कृत व कन्नड या भाषेंवर या राजाचें प्रभुत्व होतें असें दिसतें. दुर्विनितानंतर त्याचा मुलगा मुष्कर हा गादीवर आला. लक्ष्मेश्वर ( सं. मिरज ) येथील मोक्कर ही बस्ती या राजाच्या स्मरणार्थ बांधविण्यांत आली. सहाव्या शतकाच्या मध्यास हा राजा राज्य करीत होता. यानंतरचें गंगराजे जैन धर्माचे निस्सीम अनुयायीं झालें; याबद्दल सर्व इतिहासज्ञांमध्यें एकमत झालें आहे. हा राजकुलांतील एकविसावा राजा चौथा **राजमल्ल सत्यवाक्य** यानें जैनधर्म उर्जितावस्थेंस आणण्याचा आटोकाट प्रयत्न केला. या राजाचा सुप्रसिद्ध सेनानी वीर शिरोमणी, विद्वद्राज राजा चामुंडराय, यानें **श्रवण** येथील गौतमेश्वराची जगप्रसिद्ध सुंदर व शिल्पकलायुक्त मूर्ति बनविली. जैनधर्माच्या वैभवाची खरी कल्पना या मूर्तीवरूनहि येणार आहे. या मूर्तीनंतर या गांवास बेलिया-चांदी-रूपें वं गोळ-लहान भांडे-अगर चंबू-बेलिया गोळ असें नांव पडलें. असें नांव पडण्याची अख्यायिका सुप्रसिद्ध असल्यानें तिचा पुनरुच्चार येथें केलेला नाहीं.

## मारसिंह

श्रावण बेळगोळ शिलालेख नं. ३८ (सं. ८६६ ) मध्यें गंगनरेश-मारसिंह याच्या प्रतापाचें वर्णन आहे. मोठमोठ्या लढाया जिंकून त्यानें शत्रूंपक्षांचें अनेक-किल्ले हस्तगते केलें. राष्ट्रकूट वंशांतील राजे लोकाबरोबर त्याची मैत्री होती. राजा मारसिंह व राष्ट्रकूट नरेश तिसरा कृष्णराज हे दोघे जिवलग मित्र होते. राष्ट्रकूट चौथा गोविंद व राजमल्ल यांची मैत्री होती. राष्ट्रकूट व गंगवंश यामध्यें अनेक विवाह झाले होते. राजा मारसिंहनें अनेक जिन मंदिरें बांधविली व अनेक मानस्तंभ निर्माण केलें. अंत्यसमयीं श्री अजितसेन भट्टारक यांचेकडून संलेखनाव्रत स्वीकारून बंकापूर शहरीं त्यानें प्राणोत्क्रमण केलें.




चित्र नं. ४

## समरकेसरी चामुंडराय.

चामुंडरायपुराण व श्रवण बेळगोळ येथील कांहीं शिलालेख यांच्या आधारें चामुंडराय यांच्या घराण्यासंबंधीं पुढीलप्रमाणें माहिती मिळते. हें घराणें ब्रह्मक्षत्र वंशीय होते, असें चामुंडराय पुराणावरून कळतें.

गोविंदमय्य ——— ईश्वरय्य
|
महाबालय्य
|
**चामुंडराय**
|
जिनदेवम्

गोविंदमय्य व ईश्वरय्य हे अनुक्रमें भीम व अर्जुनासारखे बलशाली व पराक्रमी होते असे या बंधुद्वयाचें वर्णन शिलालेखांत दिलें आहे. गंगराज तृतीय नारसिंहाच्या पदरीं हे बंधुद्वय होते. सद्गुणी व कर्तबगार म्हणून शिलालेखांतून महाबालय्याची स्तुति केली गेली आहे.

बाप व आजाप्रमाणें **चामुंडराय** बलशाली व वीर होता. धर्मज्ञ व धर्मरत होता. कवि व ग्रंथकारहि होता. सत्यवचनी म्हणूनहि चामुंडरायाची ख्याती आहे. छलदंड गंग यानें गंगराज्य बुडवून गादी बळकाविण्याचा जो व्यूह रचिला होता तो व्यूह ढासळून पाडण्याचा प्रथम मान चामुंडरायास दिला जात आहे.


राष्ट्रकूट राजा चौथा गोविंद व गंगराजा रायमल्ल यांनीं पाताळमल्ल पल्लव राजाचा भाऊ वज्जलदेव याच्याशीं केलेल्या युद्धांत चामुंडराय हा रायमल्ल राजाचा सेनापति होता. गोनूरच्या रणक्षेत्रावर झालेल्या या लढाईंत सेनापती चामुंडरायास विजयश्रीनें माळ घातली. या विजयाचें द्योतक म्हणून चामुंडरायास **वीरमार्तंड** अशी पदवी मिळाली. पांड्य राजा राजादित्य यास पराभूत करून त्याची राजधानी उच्छंगीं ही चामुंडरायानें हस्तगत केली. या जयाबद्दल **रणराजसिंह** अशी पदवी चामुंडरायास बहाल करण्यांत आली. बागेपूर या अजिंक्य किल्ल्याचा किल्लेदार त्रिभुवन वीर याचा शिरच्छेद करून हा–सिंहगड–किल्ला चामुंडरायानें हस्तगत केला.

राज, वास व कुंकण आदि ठिकाणीं चामुंडरायानें काम राजाचा पराभव केला. शौर्य, धैर्य, सत्य व वीर्यनिदर्शक अशा खालील अनेक पदव्या चामुंडरायास बहाल करण्यांत आल्या होत्या. समरकेसरी, समरधुरंधर, वैरीकुल काळदंड, भुजमार्तंड, समरपरशुराम इत्यादि. चामुंडरायानें थट्टेंतहि असत्य भाषण केलें नव्हतें म्हणून त्यास सत्ययुधिष्ठिर ही बहुमानसूचक पदवी अर्पण करण्यांत आली होती. यावरून धर्म, भीम व अर्जुन या तिघांच्याहि सद्गुणांचा समन्वय राजा चामुंडरायांत झालेला दिसत आहे.

चामुंडरायानें कन्नड भाषेंत चोविस तीर्थंकर स्तुतीपर पद्यग्रंथ लिहिला आहे. त्यांत थोडेंसें गद्यलिखाणहि आहे. हा ग्रंथ सं. ७७८ च्या सुमारास लिहून पुरा झाला असावा; कारण त्यांत चामुंडरायाच्या त्या सालानंतरच्या बहुविध कार्यांचा उल्लेख नाहीं. कन्नड वाङ्मयांत या ग्रंथास बरेंच उच्च स्थान दिलें जातें. रत्नत्रय कविचक्रवर्तींपैकीं कवि रन्न याचा आश्रयदाता चामुंडरायच होता. चामुंडरायाच्या कुटुंबीय मंडळीच्या परोपकारनिदर्शक अनेक उल्लेख कवि रन्नानें कृतज्ञतापूर्वक केले आहेत. कवी–चक्रवर्ती रन्न याजबद्दलची माहिती मागील प्रकरणांत दिलीच आहे.

## चामुंडरायाची चिरस्मरणीय कृति

दुसऱ्या अनेक कन्नड ग्रंथकारांनीं उत्कृष्ट ग्रंथलेखन करून वाङ्मयक्षेत्रांत चामुंडरायास दुय्यम स्थान दिलें. लढाया मारून मिळविलेल्या देशावर चामुंडरायाच्या ह्यातीनंतर सुमारें २० वर्षांच्या आंतच गंगराजांचें वर्चस्व लयास गेलें; परंतु चामुंडरायाचें नांव चिरस्मरणीय करणारे श्रवण बेळगोळ येथील चिक्कबेटा- वरील चामुंडराय वस्ती व दोड्ड बेटावरील श्रीगोमटेश्वराची भव्य व सुंदर मूर्ति हीं होत. श्री गोमटेश्वराच्या मूर्तीसारखी भव्य, सुंदर, व खोदीव मूर्ति पृथ्वीच्या पाठीवर नाहीं; या प्रचंड मूर्तीचें खोदकाम इ. स. ९८३ मध्यें पुरें झालें. या मूर्तीच्या पायाशीं "**चामुंडराये करवियेलें; गंगराये करवियेलें;**" असा लेख आहे. या लेखांतील मराठी भाषा मराठी लेखनांतील प्रायः प्रथम लेखन आहे. मराठी भाषेचा उगम व विस्तार यांबद्दल ज्या ज्या वेळीं विवेचन केलें जातें त्या त्या वेळीं वरील लिखनाचा उल्लेख न: करणें अपरिहार्यच होतें. याशिवाय चामुंडरायानें अनेक जिनमंदिरें बांधविल्याचा व दानधर्मांत पाण्यासारखा पैसा खर्चिल्याचा उल्लेख चामुंडराय पुराण व शिलालेख यांत मिळत आहे.




चित्र नं. ५

## मूरूरायर–आस्थान–चामुंडराय

सेनापति चामुंडराय व कवि–चक्रवर्ती रन्न यांचे गुरु अजितसेनाचार्य यांचें वास्तव्य बंकापूर येथें असतां गंगराज तृतीय नारसिंह यानें त्यांच्या आज्ञेनुसार सल्लेखनाव्रत घेऊन मरण साधिलें. अगदीं अलीकडे प्रसिद्ध झालेल्या **कदंबकुल** नांवच्या इंग्रजी पुस्तकांत चामुंडराय हा कदंब राजाचाहि सेनापति असल्याचा उल्लेख आहे. वर उल्लेखित छळदंड गंग यानें राज्याधिकारी गंगराजाविरुद्ध उभारलेल्या बंडापूर्वी चामुंडराय कदंब सेनेचा सेनापति असावा असें दिसतें. चामुंडरायास **मूरूरायर–आस्थान** अशीहि एक पदवी दिलेली आढळते; यावरून कदंब, गंग व आणखीं कोणा तरी एका तिसऱ्या राजघराण्याचा चामुंडराय सेनापति असावा असें मानिलें जातें. राष्ट्रकूट चौथा गोविंदराज यानें पल्लवराजा पाताळ-मल्ल याचा भाऊ वज्वलदेव याच्याशीं गोनूर रणक्षेत्रावर केलेल्या युद्धाचें सेनापति-पद चामुंडरायाकडे होतें; व त्यास उद्देशूनहि मूरुरायरास्थान मुरु–तीन–रायर–राजाचें-तिघा राजांचें विश्वासस्थान-सेनापति–ही पदवी असावी असें मानिलें जातें. या मूरूरायर– आस्थान चामुंडरायाच्या या चिरस्मरणीय कृतीमुळें श्रवण बेळगोळास तीर्थक्षेत्रस्थानाचें महत्त्व प्राप्त होऊन तें दुसरें **कोप्पळ** झालें.

## एक शंका ?

चोवीस तीर्थंकरांचा जीवनवृत्तांत भक्तिभावानें कथन करणाऱ्या चामुंडरायानें चोवीस तीर्थंकरांपैकीं कोणाही तीर्थंकरांची मूर्ति न खोदवितां श्री गोमटेश्वराचीच मूर्ति कां खोदविली ? तीर्थंकराखेरीज इतर कोणाचीहि मूर्ति मग तो केवली असो, श्रुतकेवली असो अगर यक्षकिन्नर असो; त्यांची मूर्ति पूजेसाठीं कोणीहि बनविली नाहीं. तीर्थंकराखेरीज इतर कोणीहि व्यक्ति पूजेस पात्र नसतां चामुंडरायानें श्री बाहुबलीसच पूजेस पात्र कां मानिलें ? जिनधर्मानुसार चोवीस तीर्थंकरांचा जीवनवृत्तांत लिहिणाऱ्या चामुंडरायाला जिनधर्माज्ञा ज्ञात नव्हती असें कसें मानितां येईल ? आज हजार वर्षांपेक्षां अधिक काळ श्री बाहुबलीची–गोमटेशाची तीर्थंकरसमान अष्टद्रव्यानें जैनधर्मीय तरी पूजा कां करीत आले ? चामुंड-रायाच्या या चिरस्मरणीय व अद्वितीय मूर्तिसारख्या मूर्ति मूडबिद्री व वेन्नूर येथें कां खोदविल्या असाव्यात ?

## शंका-समाधान

चामुंडराय वीर होता; व म्हणूनच त्यानें वीरधर्म शिरोमणी श्री बाहुबलीच्या मूर्तीचें खोदकाम करून खऱ्या वीरवृत्तीचें स्मारक केलें असावें असें या शंकेचें समाधान करितां येईल; अगर या शंकेचें दुसरेंहि एक उत्तर जैनधर्मीयांच्या श्रद्धेंतच मिळणार आहे. आद्य तीर्थंकरांनीं आपल्या शंभर पुत्रांत भारतभूचें राज्य वाटून दिल्यावेळीं श्रवण बेळगोलचा भाग बाहुबली यांच्या वांट्यास दिला गेला होता असें पुराणांतरीं वर्णिलें आहे. या भागचा प्रथम राजा श्री बाहुबली व त्याचें स्मारक म्हणूनहि ही मूर्ति बनविली असावी; तथापि या शंकेचें उत्तर अधिकारयुक्तवाणीनें कोणी देईल काय ?

गंगराजवंश घराण्याचा सेनापति चामुंडराय व होयसाल आणि विजयनगर राज्य-घराण्यांतील विख्यात सेनानी यांनीं आपला मर्त्यदेह टाकिला; तथापि वीर म्हणून ते आजही अमरच आहेत.

## चोल राज्यतृष्णेचा बळी.

याच सुमारास प्रबळ होत चाललेल्या व मुलुखगिरी करणाऱ्या चोल राजांच्या राज्यतृष्णेस पूर्व चालुक्य व गंगराज्य अशीं राज्यें बळी पडलीं. इ. स. १००४ मध्यें दक्षिण हिंदुस्थानांतील प्रथम जैनराज्य-गंगराज्य-लयास गेलें. अनेकांच्या मतें इ. स. १०३ ते इ. स. १००४ पर्यंत ९०० वर्षें या घराण्यानें राज्य केलें असें आहे; कांहींच्या मतें हा राज्यकाल सुमारें ७०० वर्षांचा मानिला जातो.

इ. स. १०३ ते १००४ पर्यंतच्या दरम्यानच्या ९०० वर्षांच्या सुदीर्घ काळांत या घराण्यांतील पंचवीस राजांनीं राज्य केलें. या सुदीर्घ काळांतील बहुभाग काळांत अधिराजे म्हणून व बाकीच्या काळांत अंकित राजे म्हणून राज्य केलें. मान्यखेट-मालखेड, बनवासी, विंध्यावासी व मालव देशी राजाशीं युद्ध करून विजयी होणारे राजे या कुलांत होऊन गेले. एक दोन राजे तर ग्रंथकार म्हणून प्रसिद्ध आहेत. फक्त दोन खेरीज बाकीचे सर्व राजे निःसीम जिनधर्मानुयायी होते याबद्दल मत-भेदासही जागा नाहीं. या राज्यांत जैनधर्मांचा अत्यंत उत्कर्ष झाला.

श्रवण बेळबोळ येथील व मद्रास व म्हैसूर सरकारनें प्रसिद्ध केलेल्या शिलालेखांत, या घराण्याची बरीच विस्तृत माहिती मिळते. शिवाय म्हैसूर गॅझेटीअरनें (१९३० ) या घराण्याची माहिती देतांना सुमारें १२० पानें खर्चिलीं आहेत. म्हैसूर युनिव्हर्सिटींतील इतिहास विषयाचें एक लेक्चरर यांनीं Gangas of Talkad या नांवाचें एक पुस्तक १९३६ सालीं प्रसिद्ध केलें आहे; परंतु स्थलाभावास्तव या पुस्तकांत या घराण्याची अधिक माहिती त्या आधारें देतां आली नाहीं.

## पूर्व गंगराजे

पूर्व गंगराज्यें म्हणून या गंगराज्याची एक शाखा मानिली जाते. या शाखेनें सुमारें ३५० वर्षं राज्य केलें, असेंही मानिलें जात आहे. प्रस्तुत विषयाशीं संबंध असणारा या घराण्याचा वृतांत न मिळाल्यानें या शाखेचा नुसता नामनिर्देश केला आहे.

## होयसाल राजे व जैनधर्म

होयसाल घराण्यांतील प्रथमचे कांहीं राजे चालुक्यांचे मांडलिक अथवा सामन्त होते. या घराण्यांतील प्रथम सामन्त साल यानें वाघापासून जैनमुनीचें रक्षण केलें व त्यामुळें त्यास पोयसल किंवा होयसल ही संज्ञा प्राप्त झाली. या वंशांचें मूळस्थान पश्चिम घाटामध्यें कडूर जिल्हा, मुदगेरी, तालुका यांतील हल्लींचें अंगडी हा गांव होय. यांसच प्राचीन काळीं शशकपूर असें म्हणत असत. कांहीं राजकारणासाठीं विजयनर राज्याचे वेळीं त्यास अंगडीं या नांवानें संबोधिण्यांत येऊं लागलें. या वंशांतील राजे आपणास ' मलपाओ ' ( पहाडी समन्ताचे प्रमुख ) असें म्हणवीत असत. यावरून हा वंश पहाडी होता असें दिसतें. या वंशांतील काम नामक राजाचे कांहीं शिलालेख मिळाले आहेत. त्यावरून या राजानें कुर्ग देशावर राज्य करणाऱ्या केडगुल्व राजाबरोबर युद्ध केल्याचें दिसून येतें. यावेळीं काम हा चालुक्यांचा मांडलिक होता. अकराव्या शतकाच्या आरंभीं चोलराजांनीं गंगवंशीय राज्य लयास नेलें, तेव्हां होयसाल सामन्तांनीं आपलें प्राबल्य इतकें वाढविलें कीं, यानंतर चालुक्य राजा आहवमल्ल सोमेश्वर याच्या महामंडलेश्वरामध्यें त्यांची गणना होऊं लागून ते गंगवाडि ९६००० चे महामंडलेश्वर झाले. श्र. बे. लेख नं. ५४ मध्यें विनयादित्यानें शान्तिदेव मुनीच्या चरणसेवेच्या आशीर्वादानें राज्यलक्ष्मीची प्राप्ति करून घेतली असा उल्लेख आहे. श्र. बे. लेख नं. ५३ वरून विनयादित्याची जैन-

धर्मांवर असलेली दृढ श्रद्धा दिसून येते. यानें अनेक तलाव व जिनमंदिरें बांधविलीं. केलेय बरसि राणीपासून विनयादित्यास एरेयङ्ग पुत्र झाला. श्र. बे. लेख नं. १२४ व १३७ मध्यें चालुक्य राजाचा उजवा हात असें याचें वर्णन आहे.

विनयादित्यास अनेक बायका होत्या. असें दिसतें. श्र. बे. ले. नं. १३८ मध्यें या एरेयङ्गाचें प्रतापवर्णन आहे. त्यास "क्षमकुल प्रदीप" 'क्षत्रमौलिमीणि 'साक्षात्समरकृतान्त' अशीं विशेषणें दिलेलीं आढळतात. यानें, मालव देशाची राजधानी धारा नगर लुटून उध्वस्त केल्याचा वृत्तांत एका शिलालेखांत मिळतो. चक्रगोटाचें यानें हरण केलें होतें व कलिंग व मालव देशांचा विध्वंस केला. श्र. बे. ले. नं. ४९२ (शक सं. १०१५) मध्यें यानें आपला गुरु गोपनंदि यास चन्द्रगिरी वरील बस्तीचा जीर्णोद्धार करण्याकरतां कांहीं गांवें इनाम दिल्याचा उल्लेख आहे. हा एरेयंग राजा गंगमंडलावर राज्य करीत असतां चालुक्य चौथ्या विक्रमादित्याचें सेनापतिपद याजकडे आलें. त्यावेळीं मालव वगैरे राजांवर यानें विजय मिळविले, व त्यामुळें चालुक्याचा सर्वत्र नांवलौकिक होऊन त्याच्या विजयी सेनेचा दरारा सर्वत्र उन्नत झाला. याला एचलदेवी राणीपासून **बल्लाल, विष्णुवर्धन** व **उदयादित्य** असें तीन पुत्र झाले. एरेयंगास एचल देवीखेरीज आणखींहि कांहीं बायका असल्याचें दिसतें. एरेयंगाच्या नंतर बल्लाळ (इ. स. ११००) हा राज्यावर आला. यानें आपली राजधानी शशकपूर "बेलूर" येथें नेली. मरियान्ने दंडनायकाच्या तिघां मुलीशीं या बल्लाळ (पहिला) राजानें एकाच मंडपांत विवाह केले. नृत्य व संगीतादि कलामध्यें या तिघी अत्यंत निष्णात होत्या. हा मरियान्ने निःसीम जैनधर्मीय असून त्यानें सुकचंद्राचार्य यांच्या देखरेखेखालीं बेलेगेरेपट्टण येथें बांधलेल्या जिनालयाचा पंचकल्याण महोत्सव साजरा केला. कोणत्या तरी असाध्य रोगांतून या बल्लाळ राजाची मुक्तता केल्याबद्दल चारूकीर्ती, यास **बल्लाळ जीवरक्षक** ही पदवी देण्यांत आली होती, असें श्रवण बेळगोळ येथील एका शिलालेखावरून दिसतें. चंगाल्व राजाबरोबर यास लढावें लागलें होतें. द्वारसमुद्र येथेंही याची राजधानी राहूं लागली.

बल्लाळानंतर विष्णुवर्धन हा राज्यावर आला. याच्या कारकीर्दींत होयसल राजांचा प्रभाव वाढतच गेला. गंगवाडी ९६००० चें सर्व राज्य यांच्या अमलाखालीं आलें. विष्णुवर्धनानें आणखीहि कांहीं देश जिंकिलें. त्यानें सुमारें इ. स. ११०६ ते ११४१ पर्यंत ३५ वर्षें राज्य केलें असें इतिहासज्ञ मानितात. आपल्या पूर्वजाप्रमाणें हा

चालुक्यांचा महामंडलेश्वर होता. हा राजा मोठा पराक्रमी होता. अनेक शिलालेखांत याचें प्रतापवर्णन सांपडतें. महामंडलेश्वर, समधिगत पंचमहाशब्द, त्रिभुवनमल्ल, द्वारावतीपुरवराधीश्वर, यादव कुलाम्बर धुमणी **सम्यक्त्व चूडामणी,** मलपरोमगण्ड, तलकाडू कोडग्ग, नड-गली-कोस्तुर-उच्छंगी नोलवाडी–दानुगोलगोण्ड, भुजबल, वीरगंग, वगैरे अनेक प्रतापसूचक पदव्या त्यास मिळाल्या होत्या.

## विष्णुवर्धन– वैष्णव कीं जैन ?

याच विष्णुवर्धन राजानें जैन धर्माचा त्याग करून वैष्णव धर्माची दीक्षा घेतल्याचे कांहीं इतिहासकार लिहितात. जैनधर्मत्यागानंतर त्यानें जैनधर्मीयांचा अनन्वित छळ केला असेंहि मानितात. इ. स. १११७ मध्यें हा प्रकार झाला असें मानिलें जातें. परंतु या सालानंतर त्यानें अनेक जिनमंदिरांना अनेक देणग्या दिल्याचा उल्लेख शिलालेखांत मिळत आहे. धर्मांतराच्या या मानिलेल्या कालानंतरहि त्याच्या राण्यांनीं जिनमंदिरें बांधविल्याचें, त्यांचा जीर्णोद्धार केल्याचें व त्यांना गांवेंही इनाम दिल्याचें दाखले शिलालेखांत मिळत आहेत. श्रवण बेळगोळ येथील शि. ले. नंबर ४९३ ( शंक सं. १०४७ ) वरून विष्णुवर्धननें वस्तींच्या जीर्णोद्धारासाठीं व मुनिजनांच्या आहारदानाप्रत्यिर्थ शल्यग्राम नांवचें गांव दान दिल्याचें आढळ आहे. हें दान नंदीसंघ प्राभिळगण श्रीपाल त्रैविद्यदेव यास दिलें होतें. शिवाय त्याच्या पंत्तअमात्यांपैकीं सर्वच अमात्य कट्टर जैनानुयायी असल्याचें स्पष्ट दिसत आहे. अशा स्थितींत विष्णुवर्धननें खरोखरीच जैनधर्माचा त्याग केलाच होता असें मानण्यास जागा दिसत नाहीं. याबद्दल अधिक माहिती पान * ११७ वर दिली आहे.

## प्रधान– मंत्री– गंगराज.

विष्णुवर्धनाचा हिरीयदंडनायक–प्रधान–दण्ड नायक–स्वामीद्रोहधरह सेनापति गंगराज हा जैन होता. श्र. बे. येथील अनेक शिलालेखांत या सेनापति गंगराजाच्या घराण्याच्या वंशावलीचें व त्यांच्या धार्मिक कार्यांचें आणि त्याच्या शौर्याचे वर्णन केलेलें आढळतें. श्र. बे. शि. लेखावरून गंगराज व त्याचे पूर्वज जैनधर्माचें पुरष्कर्ते असल्याचें स्पष्टपणें दिसून येतें. लेख नं. १४४ वरून सेनापति गंगराजांचा वंशवृक्ष खालील प्रमाणें देण्यांत आला आहे.

## गंगराज-वंशवृक्ष

कौण्डिण्य गोत्रीय नागवर्मा
|
मार=माकणब्वी
|
एचू बौद्धमित्र = पोचिकब्बी
|
बम्मचमूप — गंगराज

श्र. बे. लेख नं. ४४ वरून गंगराजास अनेक उपाधि-पद्व्या असल्याचें दिसतें. त्यांपैकीं कांहीं येथें देत आहों. समाधिगत-पंचमहाशब्द, **श्री जैन धर्मामृताम्बुधि, प्रवर्धन सुधाकर, सम्यक्त्व रत्नाकर, आहाराभय-भैषज्य-शास्त्रदान विनोद**, इत्यादि. या पद्व्यांवरून तो किती धर्मनिष्ठ होता हें उघड होईल.

या सेनापति गंगराजाचें खालील वर्णन वाचूनहि त्याची थोरवी कळणार आहे ज्याप्रमाणें इंद्राला वज्राची, बलरामाला नांगराची, विष्णूला चक्राची, अर्जुनाला गांडीव धनुष्याची मदत होते; त्याप्रमाणें विष्णुवर्धन राजास गंगराजाची मदत झाली गंगराज हा प्रधान सेनापति व मंत्रि होता; शंभर चामुंडराय घातले तरी गंगराजाचें पारडें जड होईल असेंच या दोघां वीर पुरुषांमध्यें तुलना करितांना म्हटलें आहे गंगराजास ज्या पद्व्या अर्पण करण्यांत आल्या होत्या त्यांत धर्मनिष्ठासूचक अशाच अनेक पद्व्या असल्यानें गंगराज हा चामुंडरायापेक्षां अधिक धर्मनिष्ठ असल्यानें तुलनेचा हा काटा गंगराजाकडे झुकता ठेवला असावा असेंहि दिसतें या दोघां सेनापतीमधील ही तुलना क्षणभर बाजूस ठेवून विचार करितां दाक्षिण हिंदुस्थानांतीलच काय पण अखिल भारतीय वीरांत या दोघां वीरांची प्रामुख्यानें गणना केली पाहिजे हें उघड आहे. जैनधर्मीयांचें तर हें भाग्यवीच होत.

सेनापति गंगराजानें तलकाडू, कोडगु, चेंडिंगरि आदि देश जिंकल्याचें, नरसिंगय्यास यमलोकास धाडल्याचें व आदिपम, तिमिल, दाम, दामोदर, वगैरे शत्रूंचा पराभव केल्याचें उल्लेख श्र. बे. ले. नं. ९० मध्यें दिसून येतात. विष्णुवर्धनराजाचा गंगराज हा अद्वितीय व अनन्यसामान्य सहाय्यक होता.

## विष्णुवर्धन भूपाल होयसाल–पूर्णकुंभ–गंगराज

पूर्णकुंभ या पदवीनें गंगराजास शिलालेखांत संबोधिण्यांत आलें आहे. विष्णुवर्धन राजाच्या राज्याभिषेक कार्यांत गंगराजानें प्रामुख्यानें भाग घेतल्यानें त्यास **पूर्णकुंभ** ही पदवी मिळाली होती. यानें गोमटेश्वराभोंवतीं तट बांधविला; गंगवाडी परगण्यांतील समस्त जिनमंदिरांचा जीर्णोद्धार करविला व अनेक ठिकाणीं नवीन जिनमंदिरें निर्माण केलीं. हा प्राचीन कुन्दकुन्दान्वयाचा उद्धारक होता; याकरितां तो चामुंडरायापेक्षां शंभर पटीनें अधिक धन्य समजला जात असे. धर्मबलामुळें गंगराजामध्यें अलौकिक शक्ति वास करीत होती. ज्याप्रमाणें जिनधर्माग्रणी अत्तियबरसि इच्या प्रभावामुळें गोदावरी नदीचा प्रवाह रोखला गेला त्याप्रमाणें कावेरी नदीच्या प्रवाहामध्यें सांपडला असतांना जिनभक्तीच्या अपार प्रभावामुळें गंगराजास लेशमात्रहि इजा पोहोंचली नाहीं, असा उल्लेख श्र. बे. शि. ले. नं. ५९ मध्यें आढळतो. कन्नेगालमध्यें चालुक्य नरेश त्रिभुवनमल्ल याच्या सैन्याचा पराभव करून परत आल्यानंतर राजा विष्णुवर्धनानें त्यास वर मागण्यास सांगितलें असतां गंगराजानें **परम** नामक गांव मागून घेऊन आपल्या मातेनें व भार्येनें निर्माण केलेल्या जिनमंदिरास तो अर्पण केला. त्याचप्रमाणें त्यानें गोविंदवाडी मिळवून गोमटेश्वरास अर्पण केलें. गंगराज हा शुभचंद्र सिद्धांतदेवाचा शिष्य होता.

गंगराजाच्या वडिलांचें नांव एचू ऊर्फ बौद्धमित्र. बौद्धमित्र हा नृपकाम होयसाल राजाच्या पदरीं नोकर होता. श्रवणबेळगोळ शि. ले. नं. ४४ मधील उल्लेखावरून एचू ऊर्फ बौद्धमित्र हा मल्लूर येथील कनकनंदी जैनाचार्यांचा परम शिष्य होता असें दिसतें. गंगराजाचा वडील भाऊ बम्मचमूप हा होयसाल सेनापतीपैकीं एक सेनापति होता. चामुंडरायानंतर गंगराजाइतकी जैनधर्मप्रसारास कोणाचीहि मदत झाली नाहीं. "स्वारीच्या ठिकाणीं, स्वारीवर जातांना पडलेल्या मुकामाच्या ठिकाणीं, त्याचें मन जेथें रमलें व जेथें त्याचें लक्ष गेलें तेथें त्यानें जिनमंदिराची स्थापना केली. यामुळें होयसाल राज्याच्या चतुःसीमेंत मंदिरेंच मंदिरें त्यानें निर्माण करून देशास पूर्वीचें स्वरूप प्राप्त करून दिलें असें एका शिलालेखांत नमूद आहे. निजाम संस्थानांतील हल्लींचें कोप्पण ( कोप्पल ) सारखे गंगवाडी ९६००० यास स्वरूप दिलें असें वर्णन दुसऱ्या एका शिलालेखांत आहे.

यावरून गंगराजाच्या अमदानीपूर्वींहि कोप्पल-कोपण्ण यास तीर्थक्षेत्राचें महत्त्व प्राप्त झालें होतें असें मानणें भाग आहे. राष्ट्रकूट अमदानींत कोप्पल प्रसिद्धीस आलें असल्यास नवल नाहीं. त्याकाळीं कोप्पल हें अत्यंत पवित्र जैनतीर्थ मानिलें जात असें. राजाकडून मिळालेल्या अनेक देणग्या, गांवें, जमिनी वगैरे त्यानें आपले गुरु शुभचंद्र सिद्धांतदेव यांच्या चरणीं धर्मकार्यार्थ अर्पण केल्या.

गंगराजाप्रमाणें त्याचे कुटुंबीय सर्वजण जैनधर्माचे परम उपासक होते. गंगराजाची भार्या लक्ष्मी ही धार्मिक क्षेत्रांत गंगराजाबरोबर स्पर्धा करीत होती. हिनें आपला भाऊ बूचन याच्या स्मरणार्थ श्र. बे. ले. नं. ४६ चा लिहविला आहे. बूचन हा पराक्रमी व धार्मिक असून यानें सर्व परिग्रहाचा त्याग करून प्राणत्याग केला. याच्या स्मरणार्थ सेनापति गंगराजानें एक पाषाणस्तंभ उभारिला आहे. गंगराजाप्रमाणें हाहि शुभचंद्र सिद्धांतदेवाचा शिष्य होता.

गंगराज व त्याची भार्या लक्ष्मी यांनीं जैनाचार्य मेघचंद्र त्रैविद्य देवाच्या स्मरणार्थ श्र. बे. ले. नं. ४७ लिहविला. लक्ष्मीनें आपली भगिनी हेमाति हिच्या स्मरणार्थ श्र. बे. ले. नं. ४९ खोदविला. श्र. बे. ले. नं. ६३ वरून असें दिसतें कीं शुभचंद्र देवाची शिष्या लक्ष्मी हिनें श्रवणबेळगोळ येथें जिनमंदिर बांधविलें. तें आज " एरडू कट्टे बस्ती " या नांवानें प्रसिद्ध आहे. गंगराजानें आपली माता पोचकब्बी इच्या स्मरणार्थ श्रवणबेळगोळ येथें **कत्तले बस्ती** नांवाचें जिनमंदिर बांधविल्याचा उल्लेख श्र. बे. शि. ले. नं. ६४ मध्यें मिळतो. श्रवणबेळगोळ येथील तीन शिलालेखांत गंगराजाचा वडील बंधु बम्मदेव–बम्मचमूप–याची भार्या जक्कण्णब्बी इच्या सत्कार्यांचा उल्लेख आढळ होत आहेत.

गंगराजाची सून ( भावाची ) जक्कनब्बी हिनेंहि श्रवणबेळगोळ येथें एक जिनमंदिर व एक तलाव बांधविलें. जक्कनब्बीचा नवरा दण्डनायक एच् यानें अनेक जिनमंदिरें बांधविलीं. यानें वर लिहिलेल्या कोप्पल, श्रवणबेळगोळ व इतर अनेक ठिकाणीं मंदिरें बांधविलीं. गंगराजाचा मुलगा बोप्प यानें श्रवळबेळगोळ येथें बांधविलेलें चैत्यालय "बोप्पन्न चैत्यालय" या नांवानें प्रसिद्धच आहे. गंगरायाच्या मृत्यूनंतर बोप्प यानें पार्श्वनाथ मंदिर बांधविलें. तें प्रोरघरट्ट जिनालय या नांवानें प्रसिद्ध आहे. नागमंगल तालुक्यांतील कंवडहल्ली येथेंहि आपल्या वाडिलांच्या स्मरणार्थ बोप्पनें दुसरें जिनालय बांधविलें. हा बोप्पहि विष्णुवर्धनचा सेनापति होता. विष्णुवर्धनच्या मरणसमयीं बोप्प हा त्याच्या संन्निध होता; व राजाचें शव त्यानेंच

चंकापुराहून गुडगेरीस आणिलें. गंगराज, त्याचा भाऊ, त्याचा मुलगा, सून, आई व बायको या कुटुंबीय मंडळींच्या धर्मकार्यांचा विचार केल्यास त्यास " **जिनधर्म प्रतिपालक** " अशी जी पदवी देण्यांत आली होती ती किती सार्थ व यथार्थ आहे हें दिसून येईल.

गंगराजाच्या आप्तवर्गासंबंधीं व राज्यांतील त्यांच्या दर्जासंबंधीं व त्यांच्या धर्मबुद्धीबद्दलची बरीच माहिती शिलालेखांकित आहे. विष्णुवर्धन राजाचे सेनापति मरियन्ने व त्याचा भाऊ भरत हे दोघेही गंगराजाचे अगदीं समीपचे आप्त होत. या बंधुद्वयाची बहीण गंगराजाचा मुलगा बोप्प याची बायको व या बंधुद्वयाची आत्या गंगराजाची बायको. या सर्वांनीं मनोभावें धर्म, देश व समाजसेवा केली. विष्णुवर्धननंतरचा राजा पहिला नारसिंह याचेहि हे बंधु सेनापति होते. या भरतानें ८० नवीन जिनालयें बांधविलीं, २०० जिनालयांचा जीर्णोद्धार केला; याशिवायहि या भरतानें अनेक धर्मकार्यें केल्याचें शिलालेखांत उल्लेख आहेत.

## विष्णुवर्धनचे दंडनायक

विष्णुवर्धन राजाच्या दण्डनायकांमध्यें भरतेश्वर व त्याचा बंधु, मरियेन्ने हे प्रमुख होते. हेहि जैन असल्याचे उल्लेख मिळतात. श्र. बे. ले. नं. ३६८ व ३६९ यावरून या भरतानें भरत व बाहुबली यांच्या मूर्तींची स्थापना केली असें दिसतें. याच्या इतर धार्मिक कार्यांचा उल्लेख दुसऱ्या एका शिलालेखांत मिळतो. गोमटेश्वराच्या बाजूस यानें कटघर ( Railings ) बनविलें; गोमटेश्वराजवळ एक गर्भगृह बांधविलें; पायऱ्या बांधविल्या; गंगवाडीमधील दोन जुन्या बस्तींचा जीर्णोद्धार करविला व नवीन बस्त्या बांधविल्या असा उल्लेख भरताची मुलगी शांतलदेवी इनें लिहविलेल्या श्र. बे. ले. नं. ११५ वरून दिसतें. भरतेश्वर हा **गण्डविमुक्त सिद्धांतदेवाचा** शिष्य होता.

याच विष्णुवर्धन राजाचा आणखी एक सेनापति पनिस व त्याची भार्या दण्डनायकित्ति जक्कियब्बी हेहि प्रातःस्मरणीयच होत. जक्कियब्बी इजला दण्डनायकित्तीचा अधिकार होता हें नमूद करणें जरूर आहे. या जक्कियब्बेच्या तुलनेशीं सीता व रुक्मिणी खेरीज दुसरें कोणतेंहि स्त्रीरत्न नाहीं असें एका शिलालेखांत नमूद आहे. यावरून शौर्यवीर्यादि तिचे गुण, तिची धर्मतत्परता आणि पातिव्रत्य इत्यादि सद्गुणांची कल्पना येईल. पनिस यांचे गुरु अजितसेन पंडिताचार्य होत. धन्य ते गुरु व धन्य ते शिष्य. याहि दांपत्यांनीं अनेक जिनमंदिरें बांधविलीं.

याशिवाय विष्णु ऊर्फ बट्टीयान्ना इमाडी व वासुदेव असे आणखी दोन विष्णुवर्धनचे सेनानि होते. विष्णु इमाडी याचें शिक्षण **श्रीपाद त्रिविधदेव** या जैनाचार्यांच्या देखरेखीखालीं झालें होतें व दुसरा सेनानि वासुदेव यानें पित्याच्या स्मरणार्थ वासुदेव–जिनबस्ती या नांवाचें जिनालय बांधविलें.

विष्णुवर्धन राजाचे कांहीं मांडलिकही जैनधर्मीय होते व त्यांनींहि जिनमंदिरें निर्माण केलीं आहेत.

## विष्णुवर्धनाची राज्ञी

राजा विष्णुवर्धनाची राणी शांतलदेवी ही प्रभाचंद्र आचार्यांची शिष्या होती. हिनें श्रवणबेळगोळ येथें "सवति गन्ध वारण बस्ती" बांधविल्याचा उल्लेख श्र. बे. ले. नं. ५६ मध्यें मिळतो. वरील मंदिरांतच तिनें भगवान शांतिनाथ तीर्थंकरांच्या मूर्तीची स्थापना केली. श्र. बे. ले. नं. ५३ (शक सं. १०५०) मध्यें 'शिवगंग' येथें शांतलदेवीनें समाधि मरण साधल्याचा उल्लेख आहे. हें स्थान बंगलोरपासून तीस मैल दूर असून शैवांचें तीर्थस्थान आहे. याच लेखांमध्यें शांतलदेवीच्या वंशाची माहिती सांपडते. हिचा पिता मारसिङ्गय्य हा शैव होता व माता माचिकव्वी जिनभक्त होती. यावरून त्या काळांत एका कुटुंबांत निरनिराळ्या धर्मांचे कट्टर उपासक वास्तव्य करीत व त्यांना आपल्या माताप्रमाणें धर्माचार करण्यास स्वतंत्रता होती असें दिसतें. शांतलदेवीच्या मामाचा पुत्र बलदेव व त्याचा मामा सिङ्गीमय्य यांच्या मृत्यूचा उल्लेख श्र. बे. ले. नं. ५१५।२ (शक सं. १०४१) मध्यें आहे. बलदेवानें मोरिङ-गोरेमध्यें समाधि मरण साधलें. तेव्हां त्याची आई व बहीण यांनीं त्याच्या स्मरणार्थ एक पाठशाळा स्थापन केली. शांतलदेवीचें मातुलघराणें जैनधर्मीय व या राणीची माता जैनधर्मीय होती असें स्पष्ट होत आहे.

## विष्णुवर्धनाचें धर्मांतर

यावरून होयसाल घराण्यांतील सर्वांत प्रबळ राजा विष्णुवर्धन याचे मुख्य प्रधान व सेनानि गंगराज, गंगराजाचा मेहुणा सेनापति, गंगराजाच्या सुनेचे दोघे भाऊ सेनापति, गंगराजाचा मुलगा सेनापति शिवाय पुनिस, बट्टीयान्ना व वासुदेव आणि भरत, बिट्टीदेव वगैरे अनेक सेनापति व कोषाध्यक्ष उत्तम हुल्ल हे सर्वच कट्टर जैनधर्मानुयायी राज्याचे आधारस्तंभ आणि त्याची राज्ञी जैनधर्मी व विष्णुवर्धन राजाची सर्वच कारकीर्द लढाईंत व स्वाऱ्यांत गेली असतां, विष्णुवर्धन धर्मांतर करून

जैनधर्मीयांचा अनन्वित छळ करण्यास उद्युक्त झाला असावा असें मानणें व्यवहार्य व युक्त दिसत नाहीं. अनेक देशच्या राजेरजवाड्यांना व त्यांच्या सेनापतींना कर्दनकाळ वाटणाऱ्या या सेनापतींनीं व मंत्र्यांनीं आपल्या धर्मबांधवांचा व प्राणापेक्षांही प्यार असलेल्या आपल्या धर्माचा छळ डोळ्यांनीं पाहिला असतां काय!

या पंतप्रधानांच्या व सेनापतींच्या समकालीन जैनाचार्यांची ओळख करून देणें अस्थानीं होणार नाहीं.

## जैनाचार्य

प्रधानमंडळांत गंगराज प्रमुख तर आचार्यमंडळांत **मल्लीसेन मलधारी** प्रमुख. शिलालेखांकित वर्णनावरून या मल्लीसेनाच्या मोठेपणाची, विद्वत्तेची व सदाचाराची कल्पना येईल. विष्णुवर्धनाची पट्टराणी शांतलदेवी इचे गुरु प्रभाचंद्राचार्य होत. गंगराजाचे गुरु शुभचंद्राचार्य; बट्टियान्ना इत्यादिक दंडनायकांचे व सेनापतींचे गुरु श्रीपाल त्रिविध देव, गंडविमुक्त सिद्धांतदेव हे सेनापति भरताचे गुरु होत. याशिवाय सुदत्त, वर्धमान, मुनींद्र कनकनंदी, महामंडलाचार्य नयकीर्ति सिद्धांतदेव, महामंडलाचार्य देवकीर्ति, पंडिताचार्य लेखनंदी, माधवनंदी, त्रिभुवनदेव याचे गुरु अजितसेन पंडित देव; हे होयसल विष्णुवर्धनाचे कारकीर्दीतच होऊन गेले. ज्यांच्या नांवाचा उल्लेख करणें शक्य नाहीं अगर आज ज्यांचीं नांवें उपलब्ध नाहींत असे याशिवाय अनेक आचार्य, पंडित व ग्रंथकार होऊन गेले.

अशा प्रभावी परिस्थितींत राजा विष्णुवर्धन यानें धर्मांतर करून जैनधर्मीयांचा छळ केला; अगर जैनधर्मप्रसारास आळा घातला हें म्हणणें चुकीचेंच खास होईल. रामानुजासारख्यांचें महत्त्व वाढविण्यासाठीं नंतरच्या काळांत ही गप्प ठोकून दिली असावी. या धर्मांतराचा उल्लेख जैनवाङ्मयांत अगर शिलालेखांत आढळ होत नाहीं. वैष्णव धर्मग्रंथांत या धर्मांतराचा उल्लेख आढळ होतो; ही गोष्ट व नंतरच्या कांहीं शिलालेखांत **विष्णुवर्धन** अशा नांवानें त्याचा झालेला उल्लेख; या गोष्टीस प्राधान्य देऊन धर्मांतराची ही कथा देण्यांत आली असावी असें मानावें लागतें. तो धर्मसहिष्णु होता इतकेंच म्हणणें फार तर वाजवी होईल.

विष्णुवर्धनानंतर त्याचा मुलगा **नारसिंह** हा गादीवर आला. इ. स. ११७३ पर्यंत यानें राज्य केलें. नारसिंहानें आपल्या पित्याप्रमाणें आपल्या राज्याची वाढ केली. दिग्विजयास निघाला असतां नारसिंह श्रवणबेळगोळास येऊन पोहोंचला. त्यानें सादर गोमटेश्वरास नमस्कार करून उत्तम हुल्लनें बांधविलेल्या चतुर्विंशति

जिनालयाचें दर्शन घेतलें; व त्या मंदिराचें नांव "भद्रचूडामणि" असें ठेविलें; कारण हुल्लाची उपाधि सम्यक्त्वचूडामाणि अशी होती. त्यानें या मंदिराच्या पूजन व जीर्णोद्धाराकरितां "सवणेरु" गांव दान दिला. श्र. बे. ले. नं. १३८ मध्यें असाहि उल्लेख आहे कीं हुल्ल मंत्रीनें राजाच्या अनुमतीनें गोमटपुरावरील व व्यापारी वस्तूवरील कांहीं कर मंदिरास दान दिले. नारसिंहाच्या राणीचें नांव एचल-देवी असें होतें.

## उत्तम हुल्ल

हुल्ल बाजीवंशाचा जक्किराज ( यक्षराज ) व लोकांबिकेचा पुत्र; लक्ष्मण व अमर, यांचा ज्येष्ठ भ्राता व मलधारी स्वामीचा शिष्य होता. याच्या भार्येचें नांव पद्मावती असून तिचें गुणवर्णन श्र. बे. ले. नं. १३७ मध्यें दिलेलें आहे.

उत्तम हुल्ल हा या राजाचा कोषाधिकारी व मंत्री होता. ले. नं. १३७ वरून असें दिसतें कीं हा विष्णुवर्धनाच्या कालींसुद्धां राजदरबारामध्यें याच पदावर होता व त्याच-प्रमाणें ले. नं. ९० व ४९१ वरून तो पुढील राजा बल्लाळ द्वितीय याच्या कारकी-र्दींतहि याच अधिकार पदावर असावा असें दिसतें, कारण त्याजपासून यानें एक दान मिळविल्याचा उल्लेख आहे. हा राजप्रबंधामध्यें योगंधरायणापेक्षां अधिक कुशल व राजनीतीमध्यें बृहस्पतीपेक्षां अधिक प्रवीण होता असें त्याचें वर्णन दिलें आहे. श्र. बे. ले. नं. ९० व ४९१ मध्यें हुल्लाच्या कीर्तीचें व धर्मपरायणतेचें रसभरित वर्णन आहे. यानें बेळगोळ येथें चतुर्विंशति जिनमंदिर निर्माण केलें. याची गणना चामुंडराय व गंगराज यांच्या कोटींत केली जाते. यानें बंकापूर व कलिविट येथील जिनमंदिराचा जीर्णोद्धार करविला. कोपणमध्यें जैनाचार्यांच्या उपजीविकेकरितां पुष्कळ जमीन दान दिली. केलेगेरेमध्यें सहा नवीन जिनमंदिरें बांधविलीं. बेळगोळमध्यें चतुर्विंशति तीर्थंकर मंदिर बांधून यानें गुणचंद्र सिद्धांतदेवाचा शिष्य महामंडलाचार्य नयकीर्ति सिद्धान्तदेव यास त्या मंदिराच्या आचार्यपदावर बसविलें. नारसिंह राजानें सवणेरु खेरीज बेक्कव व कगोरे अशीं दोन गांवें दान दिल्याचा उल्लेख आढ-ळतो. हुल्लाच्या प्रार्थनेवरून बल्लाळ द्वितीय यानें हेंच इनाम कायम केलें. श्र. बे. ले. नं. ४० वरून असें दिसतें कीं, हुल्लानें आपला गुरु महामंडलाचार्य देवकीर्ति पंडितदेव याच्या निषिदी निर्माण केल्या व त्यांची प्रतिष्ठा त्यांचे शिष्य लखनंदी, माधव व त्रिभुवन देव यांच्या हस्तें करविली. हुल्लनें सवणेरु गांव नयकीर्तीचा मुलगा भानुरविकीर्ति यास दान दिला होता.

## नारसिंहाचे सेनापति इत्यादि.

विष्णुवर्धनाच्या काळीं सेनापतिपदावर असलेल्या सेनापतींपैकीं भरत व दण्ड-नायक मरियान्ने व बिट्टिदेव हे या राजाचे काळीं सेनापतिपदावर होते. महा-प्रधान सेनाधिपती दण्डनायक लकमण्य हा मुख्य प्रधान होता. विष्णुवर्धनाचे काळीं प्रधान मंत्री व कोषाध्यक्ष पदावर असलेला **उत्तम हुल्ल** हा याहि राजाचे कारकीर्दींत त्याच पदावर होता. चामुंडराय, गंगराज व उत्तम हुल्ल हे या काळचे जैनधर्माचे केवळ आधारस्तंभच होत. जैनधर्मीय या **रत्नत्रयांनीं** आपली सर्व शक्ति, सामर्थ्य व संपत्ति जिनधर्म प्रचारासाठीं वेंचिली. निरनिराळ्या भागांत अनेक जिनमंदिरें बांधविलीं. विद्वान् व धर्माचरणरत यांना आश्रय दिला. जिन-मंदिराचा व विद्वानांचा योगक्षेम चालावा व ही परंपरा अखंड रहावी म्हणून राजा-कडून मिळालेल्या जमिनी व गांवचीं गांवें दान करून दिलीं. माता, पिता, बंधु व भगिनी वगैरे प्रिय व भव्य जीवांच्या स्मरणार्थ नवीं देवालयें बांधविलीं; व जुन्यांचा जीर्णोद्धार केला.

जैनधर्माबद्दल या रत्नत्रयांनीं काय केलें याचें उत्तर असें कीं, यांनीं काय केलें नाहीं व यांच्याइतकें कोणीं केलें ? राजा नारसिंहाचे वर नमूद केलेले मंत्रि व सेनापति याखेरीज आणखीहि मंत्रि व सेनापति व प्रांताधिकारी जैनधर्मीय होते; परंतु अत्यंत प्रसिद्ध अशाच थोर व्यक्तींचा नामनिर्देश वर केला आहे.

## वीर बल्लाळ ( द्वितीय )

नारसिंहानंतर त्याचा पुत्र वीर बल्लाळ द्वितीय ( ११७३–१२२० ) हा राज्यावर आला. याच्या काळांत होयसालांचें राज्य चालुक्य साम्राज्याच्या अंकित राहिलें नाहीं, तें स्वतंत्र झालें. यानें इ. स. १२२० पर्यंत सुमारें ४७ वर्षें राज्य केलें. यास **सनिवारसिद्धी, गिरीदुर्गमल्ल कुम्मट** व **एरम्बरंग** यांचा विजेता असें शिलालेखांत म्हटलें आहे. इच्छेगीवरील याच्या विजयाचें वर्णनहि शिलालेखांत दिलें गेलें आहे. श्र. बे. ले. नं. ४९१ शक सं. १०९५ हा या राजाच्या कारकीर्दी-तील प्रथमचा शिलालेख आहे. यांत या राजानें चतुर्विंशति तीर्थंकाराच्या पूजेसाठीं माखहल्ली गांव दान दिल्याचा व हुल्लाच्या सांगण्यावरून बेक्क गांवाचें दान पूर्ववत् चालविल्याचा उल्लेख आहे. या बल्लाळ राजानें आपला आजा विष्णुवर्धन याच्या-

पेक्षां अनेक पटीनें आपल्या राज्याचा विस्तार केला. या बल्लाळापर्यंत होयसाल राजे चालुक्याचे मांडलिक होते. वीर बल्लाळ आपणास स्वतंत्र राजा म्हणवूं लागला. त्यानें आपल्या नांवाचा शक सुरू केला व यानंतर होयसाल ऐवजीं **बल्लाळ** या नांवानें हें राजघराणें ओळखिलें जाऊं लागलें.

या राजाच्या मंत्रीचें नांव चंद्रमौली असून तोहि जैनधर्माचा सच्चा सेवक असल्याचें दिसतें. चंद्रमौली हा शंभुदेव व अक्कब्वी यांचा पुत्र होय. ह्याच्या मनावर शिवधर्माचाहि पगडा असल्याचें दिसतें. तो ब्राह्मण असून न्याय, साहित्य, भारतशास्त्र आदि विद्येमध्यें प्रवीण होता. आचियक्क व आचलदेवी अशा त्यास दोन बायका होत्या व त्या दोघीहि जिनधर्मपरायण होत्या. अचलदेवीनें बेळगोळ येथें अक्कनबस्ती नांवानें प्रसिद्ध असलेली पार्श्वनाथ बस्ती बांधविली. नयकीर्ति व त्याच्यानंतर त्याचा शिष्य बालचंद्र हे यांचे गुरु होत. चंद्रमौलीच्या सांगण्यावरून या राजानें अचलदेवीनें निर्माण केलेल्या मंदिराकरितां बम्मेयनहल्ली गांव दान दिला.

या बल्लाळ राजाचा रेचिमय्य नांवाचा एक जैनधर्मी सेनापति होता. या **वसुधैव कुटुंबकम्** रेचिमय्यानें जिननाथपुरांत शांतिनाथ तीर्थंकराची प्रतिष्ठा केल्याचा व शुभचंद्र त्रैविद्याचा शिष्य सागरनंदि यास या मंदिराचा आचार्य नेमल्याचा श्र. बे. ले. नं. ४७१ मध्यें उल्लेख आहे. बल्लाळ राजाच्या पदरीं येण्याच्या पूर्वी तो कलचुरी राजा बिज्जलदेवाचा मंत्रि होता. भरत, बाहुबल्ली, बुक्कीराज, नागदेव, महादेव, एक्कल्लरस, अम्रिया, एक्कन्न वगैरे याचे अनेक मंत्रि व सेनापति जैनधर्मीय होते. उत्तम हुल्ल हा या राजाचा प्रधान मंत्रि व कोषाध्यक्ष होता.

बल्लाळ द्वितीयाच्या वंशजांनीं यापुढें अजमासें ९० वर्षें राज्य केलें. बल्लाळ द्वितीयाचा मुलगा **वीर नारसिंह** ( दुसरा ) हा मोठा प्रबल राजा होऊन गेला. विष्णुवर्धन व पिता बल्लाळ यांजप्रमाणें त्यानें आपल्या राज्याचा विस्तार केला. यापैकीं सोमेश्वर राजाचा सेनापति शान्त यानें शान्तिनाथमंदिराचा जीर्णोद्धार केल्याचा व त्याच्या पराक्रमाचा उल्लेख श्र. बे. ले. नं. ४५ (शक सं. ११७० ) मध्यें मिळतो. वीर नारसिंह तृतीय याचा गुरु मेघनंदि हाच शास्त्रसारग्रंथाचा कर्ता मेघनंदि होय.

**होयसाल तृतीय बल्लाळ** गादीवर येण्यापूर्वींच दिल्लीच्या बादशाहांनीं दक्षिण हिंदुस्थानावर स्वारी केली. राज्यविस्ताराबरोबरच धर्मविस्ताराचीहि मुसलमानांची

महत्त्वाकांक्षा होती. देवगिरीवरील स्वारीनंतर विंध्याचल आलांडून दक्षिणेंत दुसरी स्वारी करण्यापेक्षां ओरिसा व वरंगल प्रांतांतून कर्नाटकांत प्रवेश करणें, लष्करी हालचालीच्या दृष्टीनें मुसलमानांना सोइचें होणार, याची कल्पना दक्षिणेंतील राजांना आल्यानें होयसाल तृतीय बल्लाळ यानें आपल्या राज्याच्या सीमांतरावरचा—विशेषतः जिकडून मुसलमानांची स्वारी होईल अशी धास्ती होती—प्रदेश अधिक चळकट करण्याचा प्रयत्न केला.

## कॉन्फेड्रेशन

पेशवाईच्या—मराठेशाहीच्या—उतरत्या काळांतील शिंदे, होळकर, गायकवाडादि सरदारांनीं मुख्य सत्तेशीं जसें वर्तन केलें तसाच प्रकार तृतीय बल्लाळ राजाच्या सरदारांनीं केला. मुसलमानांच्या स्वाऱ्यांना विरोध करण्यासाठीं शिंदे, होळकरादिकांना मुसलमानांच्या तोंडावर पेशव्यांनीं ठेविलें. तद्वत्च तृतीय बल्लाळ राजानें इ. स. १३१० च्या मुसलमानांच्या स्वारीच्या पूर्वीं व्यवस्था करून ठेविली होती.

बल्लाळ तृतीय याचे सेनापति व प्रधान यांची जी माहिती उपलब्ध झाली आहे, त्यांत खालील नांवें आढळ होत आहेत. मादण्णा—माधव—दण्ड—नायक, मादिगीदेव दण्डनायक, मादण्णा—दण्डनायकाचे दोघे पुत्र केतय आणि सिंगय, माचय्या दण्डनायक, माचय्याचा मुलगा गंगीदेव दण्डनायक, देवप्पा दण्डनायक, हरिहर व बुक्क आणि बाल्लप दण्डनायक इत्यादि. याशिवाय या राजाचे दोन पुत्र—बालप्प दण्डनायक व सिंगय्य दण्डनायक हेहि प्रांताधिकारी होते.

वर नमूद केलेल्या नांवांतील माचय्या दण्डनायक हा तृतीय बल्लाळाचा जामात होता; व गंगीदेव हा तृतीय बल्लाळाचा नातू (मुलीचा मुलगा). बाल्लप दण्डनायक हाहि या राजाचा जामात होता. या बाल्लप्पाच्या नांवाचा नामनिर्देश विजयनगर राजवटींत अनेकवार आढळ होत आहे. चौथ्या बल्लाळ राजाचे कारकीर्दीत रक्तपात न होतां राज्याचें स्थित्यंतर झालें. विजयनगर राज्य स्थापन झालें, जणूं काय पूर्वींचीच राजवटी पुढें चालूं राहिली. यावरून होयसाल राजघराणें व विजयनगरचें नवें राजघराणें यामधील अत्यंत जिव्हाळ्याचा व दृढ संबंध लक्षांत येईल. वर ज्या अनेक दण्डनायकांच्या नांवाचा उल्लेख करण्यांत आला आहे, त्यांपैकीं बऱ्याच दण्डनायकांनीं हरिहर व बुक्क यांचें आधिपत्य कबूल करून नव्या राज्याची मनोभावानें सेवा केली. या पुस्तकांतील विजयनगर साम्राज्याचा इतिहास समजून घेण्यास सोईचें व्हावें म्हणून ही त्रोटक माहिती येथें दिली आहे.

अपेक्षित मुसलमानांची स्वारी झाली व वीर बल्लाळ हा शत्रू हातीं सांपडल्यानें त्याचा त्यांनीं अमानुषपणें खून करून त्याचें शव वेशीवर टांगिलें. इ. स. १३२६ मध्यें ही लढाई झाली; व होयसाल–बल्लाळ–राज्याचा शेवट झाला, असें कित्येक इतिहासज्ञ मानितात; परंतु इ. स. १३४२ पर्यंत हा बल्लाळ जिवंत होता असें शिलालेखांवरून स्पष्ट होत आहे; व या सालीं झालेल्या लढाईत तृतीय बल्लाळ मारला गेला असेंहि सिद्ध झालें आहे, एवढेंच नव्हें तर या तृतीय बल्लाळाचा मुलगा चौथा बल्लाळ यास इ. स. १३४६ मध्यें राज्याभिषेक झाल्याचाहि पुरावा उपलब्ध झाला आहे. इ. स. १३४६ नंतर चौथ्या बल्लाळाचा उल्लेख अद्याप उपलब्ध झालेला नाहीं. यावरून होयसाल राज्याचा शेवट इ. स. १३४६ मध्यें झाला व तो इ. स. १३२६ मध्यें झाला नाहीं असें मानण्यास हरकत नाहीं.

विजयनगर साम्राज्याचा व तदनंतरच्या अनेक लहान मोठ्या जैन राजांचा व मांडलिकांचा त्रोटक वृत्तांत देण्यापूर्वी या पूर्वी दिलेल्या वृत्तांताचें सिंहावलोकन करणें इष्ट वाटल्यानें तसा प्रयत्न यापुढें केला आहे.

## सिंहावलोकन

इ. स. ९८३ मध्यें राष्ट्रकूट राज्य लयास जाऊन चालुक्य घराण्याचें पुनरुज्जीवन झालें व जैन धर्माचा एक आधार तुटला.

इ. स. १००४ मध्यें गंगराज लयास जाऊन शैवधर्मीय चोल राजाची सत्ता प्रस्थापित झाली. इ. स. ११६६ मध्यें राजा बिज्जलदेवाचा वध झाला व पुढें वीस वर्षांनीं तें राज्य लयास गेलें. होयसाल राज्य इ. स. १३४६ च्या सुमारास नष्ट पावलें. बिज्जलदेवाच्या वधानंतर कल्याण वगैरे भागांत वीर शैवांच्या उत्कर्षास सुरवात झाली. हिंदुस्थानच्या अगदीं दक्षिण टोंकांस शैवधर्म प्रबल होत चालला. कल्याण वगैरे भाग व हिंदुस्थानच्या अगदीं दक्षिणेकडचा भाग यामधील मुलखांत रामानुज–वैष्णवधर्माचा–उदय झाला. याशिवाय पाशुपत व कालमुख शैव सांप्रदायहि आपाआपल्यापरी आपला उत्कर्ष करून घेण्याच्या प्रयत्नास लागले होते.

यावरून इ. स. ११ व्या शतकाच्या सुरवातीपूर्वीपासून एका पाठीमागून एक अशीं जैन राजघराणीं नष्ट पावत चाललीं. धर्मप्रसारास राजसत्तेच्या पाठिंबाची जरूरी लागते याबद्दल मतभेदास जागा नाहीं; तथापि जैनधर्मप्रसारकांनीं केवळ उपदेशाच्या द्वारें आपल्या धर्माचा प्रसार केला होता व शतकानुशतकें स्वीकार-

लेल्या जैनधर्माचा लोकांना त्याग करण्यास लावणें जवळ जवळ इतर धर्मीयांना केवळ अशक्य कोटींतलिच होतें याची जाणीव त्यांना झाली नसावी असें नाहीं. अशा स्थितींत राजाश्रयाचा पाठिंबा व त्या पाठिंबाच्या जोरावर सामान्यच काम पण सन्मान्य लोकांनाहि धर्मांतर करण्यास भाग पाडण्याची तयारी इतरांना करावी लागली.

इतर धर्मीयांच्या या प्रयत्नाकडे जैनधर्माभिमान्यांनीं दुर्लक्ष केलें अगर अनास्था दाखविली असें मुळींच दिसत नाहीं. जैनधर्माचें प्राबल्य टिकावें व तो वर्धिष्णु राहावा यासाठीं जैनधर्माभिमान्यांनीं अनेक उत्कृष्ट व परिणामकारक उपायांचें अवलंबन केलें. नवीं नवीं जिनमंदिरें बांधून थाटांच्या प्रतिष्ठा महोत्सव केले. जिनमंदिरांचे जीर्णोद्धार केलें. अशा मंदिरांची पूजाअर्चा नित्यनियमित व्हावी म्हणून गांवचीं गांवें इनाम दिलीं. धर्मप्रभावनेचा हा एकांगी प्रयत्न करूनच ते थांबले नाहींत. विद्वान्, धर्मज्ञ व उत्कृष्ट ग्रंथकारांना व पंडित, आचार्यादिकांना ग्रंथलेखनाच्या व उपदेशाच्या कार्यांत उत्तेजन दिलें. त्यांचा योगक्षेम चालून अशा सुचरित विद्वानांची परंपरा राहावी व वृद्धि पावावी म्हणून त्यांना मोठमोठ्या देणग्या दिल्या. राजदरबारांत त्यांचा प्रवेश करवून विद्वत्ता व धर्मपरायणता सूचक कवि–चक्रवर्ति इत्यादि पदव्यांनीं त्यांना विभूषित केलें. इतर धर्ममताचें खंडन व जैनधर्ममताचें मंडन करणारे तत्त्वज्ञानविषयक व सामान्य जनांना उपयुक्त होतील असे पुराणादि ग्रंथ लिहिण्यास प्रोत्साहन दिलें. मठसंस्था अधिक कार्यक्षम होण्यासाठीं त्यांना इनामें दिलीं गेलीं. पाठशाळा स्थापन झाल्या.

जैनधर्माच्या उत्कर्षाच्या सुरवातीस चामुंडरायादिकांनीं, जिनसेनादि आचार्यांनीं व त्यांच्या राजांनीं धर्मप्रभावना केली. वीरशैवमत प्रसारास आळा घालूं पाहणाऱ्या राजा बिज्जलदेवानें आपला प्राण अर्पिला. वैष्णवांच्या स्पर्धाकालीं होयसालांचा सेनापति व प्रधान–मंत्री गंगराज, कोषाधिकारी उत्तम हुल्ल इत्यादि अनेकांनीं जैनधर्मप्रभावनेसाठीं आपलें सर्वस्व अर्पण केलें. या सर्वांच्या भगिरथ प्रयत्नास यश आलें; परंतु त्या यशाच्या फळाचा जैनधर्मास फार दिवस लाभ घेतां आला नाहीं.

प्रजेमध्यें आपापल्या धर्मप्रसाराचें कार्य चालूं झाल्यानें राजधर्म म्हणून असो वा प्राप्तपरिस्थिति म्हणून असो परधर्मसहिष्णुतेचें धोरण कांहीं राजघराण्यांनीं स्वीकारलें. कांहीं राजांना, त्यांच्या मांडलिकांना व सेनापति आदि मोठ्या दर्जाच्या

लोकांना शैव, वैष्णव, बौद्ध व जैन या चारही धर्मांचा अभ्युदय उत्कर्षेच्छु म्हणवून घेण्यांत भूषण व धन्यता वाटूं लागली. या धोरणाचा उल्लेख असलेले अनेक शिलालेख उपलब्ध झाले आहेत. आपल्या प्रजेंत चाललेल्या धार्मिक चळवळीकडे दुर्लक्ष करून कुलपरंपरागत चालत आलेल्या आपल्या धर्मास चिकटून राहणारे बिज्जलदेवासारखे प्रबल व खंबीर राजे राहिले नाहींत. परंपरागत धर्मचा त्याग करून नव्या धर्मांचा स्वीकार करणाऱ्यांना आपल्या या नव्या धर्माबद्दल नितांत आदर राहिल्यास त्यांत वावगें असें कांहींच नाहीं. अशा बाटग्यांकडूनच इतरापेक्षां आपल्या पूर्वधर्मांचा छळ अधिक झाल्याचीं अनेक उदाहरणें आहेत. चोल राजा राजनरेंद्र याची या वर्गांत प्रामुख्यानें गणना करतां येईल.

कल्याण भागांत वीरशैवांनीं जैनधर्मीयांचा अनन्वित छळ करून जैनधर्मीयांमध्यें धास्ति व दरारा उत्पन्न केला. जैनधर्मीयांच्या वधांची शिरगणती करण्यास सोपें जावें म्हणून त्यांच्या दातांचे पेव भरून शिरगणती केली. शैवांनीं जैनधर्मीय पुढारी, त्यांचे मुनिजन व इतर यांना घाण्यांत घालून पिळून मारिलें. कित्येकांना भिंतींत चिणून मारिलें. जैनधर्मीयांच्या जिवंत देहास दगडाइतकीहि किंमत दिली गेली नाहीं. रामानुज व त्यांचे अनुयायी यांनीं जैन विद्वानांच्या व जैनधर्मप्रसाराच्या अग्रस्थानाकडे दृष्टि वळवून त्यांना धुळीस मिळविलें. लक्ष्मेश्वर येथील विस्तीर्ण व भव्य जिनमंदिराच्या नाशाचें उदाहरण या बाबतींत डोळ्यापुढें न येणें अशक्य आहे. मदुरा येथील मीनाक्षिसुंदरम् या सुप्रसिद्ध देवालयांतील चित्रांचें स्मरण याप्रसंगीं न होणें अशक्य आहे. अशा कृत्यांना धर्मशास्त्रांत व धार्मिक विधींत अग्रस्थान देऊन आजचे हिंदुधर्मीयहि आपल्या पूर्वजांच्या या कृत्यावर शिक्कामोर्तब करीत असलेले पाहून उद्वेग वाटल्यावांचून रहाणार नाहीं.

अशा रीतीनें चोहोंकडून कोंडी व गळेचेपी झाल्यानें हजारों नव्हें तर लाखों जैनांना धर्मांतर करून प्राण वांचवावे लागले असल्यास नवल तें काय ? राजसत्ता गेलीच होती, समाजांतील जैनांचें वर्चस्व नष्ट होत चाललें होतें. अशा वेळीं जैनधर्मांच्या अनुयायांची संख्या लाखांनीं कमी झाली व जैनधर्मांच्या उत्कर्षास आळा बसला. **बौद्ध धर्माप्रमाणें जैनधर्मास देशत्याग करावा लागला नाहीं याचें श्रेय घेण्याचा तरी अधिकार जैनांना राहिला याबद्दल दुःखांतहि सुख मानण्यास तरी इतरांनीं जैनांना जागा करून ठेविली आहे.**

कोणत्याहि कारणामुळें प्रजेंत माजलेल्या अस्वस्थतेचा फायदा पर-प्रांतस्थ राजे राज्यविस्तारासाठीं कसा करून घेतात याचें प्रत्यंतर मुसलमानांनीं दक्षिणेवर स्वारी करून आणून दिलेंच होतें. मुसलमानांच्या या वाढत्या राज्यतृष्णेस पायबंद घालण्यासाठीं विजयनगरचें राज्य स्थापन झालें. या राज्यस्थापण्याची कल्पना कोणाचीहि असो, एवढें मात्र खरें कीं, विजयनगर राज्यांत जैनांचा छळ मात्र झाला नाहीं. विजयनगर राज्याबाहेर सर्वत्र मुसलमानी अंमल चालूं झाल्यामुळें उडदामाजी काळे बेरे जसें निवडता येत नाहींत तद्वतच निरनिराळ्या मुसलमानी अंमलाखालीं जैनांना कसें वागविण्यांत आलें याचा विचार करण्याचें कारण नाहीं.

## विजयनगरराज्य, जैन व जैनधर्म

हिंदूंच्या जन्मभूमींत हिंदूंचें राज्य रहावें; निदान हिंदुधर्माचें अस्तित्व तरी रहावें म्हणून सायन–माधवाचार्यांच्या प्रेरणेनें विजयनगरच्या नव्या राज्याची स्थापना इ. स. १३२६ मध्यें होऊन, इ. स. १३३६ मध्यें नव्या राजधानीचें बांधकाम पुरें झालें असें कित्येक इतिहासज्ञ मानितात. विजयनगरची स्थापना तृतीय बल्लाळ होयसाल राजानें केली व हरिहर यास त्या भागचा प्रांताधिकारी नेमले असें कित्येक इतिहासज्ञांचें मत आहे. विजयनगरचें राज्य स्थापन करण्याचा मान आजवर सायन माधवाचार्यांना देण्यांत येत आहे, तें चुकीचें आहे असें प्रो. हिरास यांनीं साधार सिद्धहि केलें आहे; तथापि यापुढें तरी हा वाद थांबेल असेंच म्हणतां येत नाहीं. महाराष्ट्र राज्यस्थापक शिवछत्रपति यांनीं रामदासस्वामींच्या प्रेरणेनें राज्य स्थापन केलें असें प्रतिपादल्याबद्दल जे आक्षेप घेतले जातात तशाच आक्षेपास याहि बाबतींत जागा राहणार आहे.

## Confederacy—संयुक्त-प्रतिकार संघ

उत्तर हिंदुस्थानांत मुसलमानी राज्य स्थिर झालें. मुसलमानांच्या राज्यवृद्धीस जीं कारणें उत्तरेंत झालीं त्यांची जाणीव दक्षिणेंतील राजेरजवाड्यांना होऊन चुकली होती. वरंगळचा राजा **प्रतापरुद्र** व देवगिरीचा **यादव राजा** या दोघांनीं मुसलमानांना संयुक्त प्रतिकार करण्याचा मैत्रीचा तहनामा केला; परंतु प्रतिकार यशस्वी होऊं शकला नाहीं. वरंगळ व देवगिरी येथील हीं दोन्हीं राज-घराणीं होयसाळाप्रमाणेंच यादववंशीय होतीं. उत्तरेंतून दक्षिणेंत यावयाचे झाल्यास मुसलमानांना दौलताबाद अगर वरंगळ ओलांडून यावें लागणार. समकुलीन व

समदुःखी म्हणून हा तहनामा जन्मास आला. हा तहनामा अयशस्वी ठरवून इ. स. १३१८ मध्यें देवगिरीचें व इ. स. १३२३ मध्यें वरंगळचें अशीं दोन्हीं राज्यें मुसलमानांच्या राज्यतृष्णेस बळी पडलीं.

## दुसरा प्रयत्न

तृतीय बल्लाळ–होयसाल–राजानें केला; त्या प्रयत्नास मात्र यश आलें. विजयनगर राज्य स्थापनेचें मूळ बल्लाळ राजाच्या या प्रयत्नांतच मिळणार आहे.

## नावेवर गाडा व गाड्यावर नाव

संयुक्त प्रतिकाराची घटना घडवून आणितांना नावेवर गाडा व गाड्यावर नाव असा कांहीं विपरीत प्रकार घडेल अशी शंकाहि बल्लाळाच्या मनानें घेतली नसावी. छत्रपति घराण्यास मागें टाकून पेशव्यांनीं राज्यकारभार केला व पेशव्यांच्या काळांतच शिंदे, भोसले आदि सरदार जवळजवळ स्वतंत्र झाले व पेशवाई गेली तरी या सरदाऱ्या राहिल्या. शिंदे, होळकर आदि यांनीं इंग्रजांचें आधिपत्य मान्य केलें; तद्वतच होयसालांचेंहि झालें. होयसालाच्या ऐवजीं हरिहरचें विजयनगर-राज्य पुढें प्रबल झालें व होयसालच्या सरदारांनीं हरिहरचें मांडलिकत्व मान्य केलें. इ. स. १३२८ चा एक शिलालेख उपलब्ध झाला आहे; त्यावरून मुसलमानांना संयुक्त प्रतिकार करण्यासाठीं ज्या सरदारांना व सेनापतींना इ. स. १३२६ मध्यें होयसाल बल्लाळ राजानें पाचारण केलें होतें, त्यांच्या नांवाचा उल्लेख या शिलालेखांत आहे. त्यावरून बलशाही भीमराव, सरदार कठोरहर, सिंह रघुनाथ, वीर कालमेघ, वीर शांत, दंडनायक चमूप, दंडनायक बैचप्पा, विख्यात मुत्सद्दी बालप्पा अगर बल्लप, दंडनायक सोमय्य, दंडनायक सिंगय्या, मादण्णा दंडनायक, माचय्य दंडनायक इत्यादि वीर शिरोमणी या संघाच्या सभेस हजर होते. बल्लप व बल्लाळ व सिंगय्या वगैरे तृतीय बल्लाळचे समीपचे आप्त होते. या वीरशिरोमणींपैकीं अनेक वीर जैनधर्मीय होते. जैनधर्मीय संघनायकाचे समीपवर्ती आप्त व दंडनायक बैचप्पा इत्यादि जैनधर्मीयांनीं इ. सनाच्या चौदाव्या शतकाच्या पूर्वार्धांत मुसलमानांशीं विरोध करण्याचें, त्यांचें राज्य कर्नाटकांत होऊं न देण्याचें व कर्नाटकचें स्वातंत्र्य रक्षण करण्याचें कंकण बांधलें नव्हतें असें कसें म्हणतां येईल ? विजयनगर साम्राज्याच्या भरभराटीच्या काळांतहि जैनांनीं आपापली जबाबदारी उत्कृष्ट रीतीनें पार

पाडली तर त्यांत नवल नाहीं; परंतु विजयनगरच्या साम्राज्याच्या नाशानंतरहि मुसलमानांचें आधिपत्य न स्वीकारतां स्वतंत्रपणें राज्यकारभार पहाणारे अनेक जैनवीरच आहेत.

मुसलमानांच्या हल्ल्याचा प्रतिकार करण्यासाठीं या सभेंत जी योजना केली त्यांत हरिहरनें प्रामुख्यानें भाग घेतला व पुढें थोड्याच वर्षांत बल्लाळ तृतीयाचे ह्यातींतच हरिहरनें स्वतंत्र राज्य चालवून आपली नवी राजधानी केली. या नव्या राजधानीचें बांधकाम इ. स. १३३६ मध्यें पुरें झालें व इ. स. १३४६ नंतर चौथ्या बल्लाळबद्दल कांहींहि माहिती मिळत नाहीं. यावरून या विजयनगर राज्य-स्थापनेनंतर सुमारें वीस वर्षें होयसाल राज्य अस्तित्वांत होतें हें उघड आहे.

मुसळमानांच्या स्वाऱ्या, अधिराज्यापेक्षां बलवान् सरदार व मांडलिक व प्रजेंतील अशांतता याचा फायदा घेऊन हरिहर व बुक्क या बंधुद्वयांनीं स्वतंत्र राज्यकारभार हाकण्यास सुरवात केली; व पुढें विजयनगर-राज्य या नांवानें तें राज्य ओळखिलें जाऊं लागलें. मात्र हरिहर अगर बुक्क यांच्या वंशजांनींच अखेरपर्यंत विजयनगर येथें राज्य केलें असें नाहीं. हें राज्य लयास जाईपर्यंत निरनिराळ्या चार घराण्यांनीं विजयनगर येथें राज्य केलें. (१) संगम राजघराण्यानें इ. स. १३३६ ते इ. स. १४८६ पर्यंत राज्य केलें. (२) सालुवराजांनीं इ. स. १४८६ ते इ. स. १४९९ पर्यंत राज्य केलें. (३) तुलुव घराण्यांनीं इ. स. १४९९ ते इ. स. १५४२ पर्यंत राज्य केलें; व चौथ्या अरविदु–कर्नाटक–राज्यघराण्यांनीं इ. स. १५७० ते इ. स. १६६५ पर्यंत राज्य केलें. दरम्यान इ. स. १५४२ ते इ. स. १५७० पर्यंत रामराज यानें सर्व सत्ता बळकाविली होती. हा रामराजा सालुव वंशीय शेवटच्या राजाचा मेहुणा होता.

## संगम घराणें

### (इ. स. १३३६ ते १३८६)

हरिहर व बुक्क यांनीं जरी स्वतंत्र राज्य स्थापन केलें तरी तत्पूर्वीं सत्ताधीश असलेल्या होयसाल व सेवूम या राजघराण्यांशीं फटकून न वागतां त्या घराण्यांशीं शरीरसंबंध जोडून त्यांचें सहकार्य त्यांनीं मिळविलें; एवढेंच नव्हे तर होयसाल व सेवून राजकालीन सरदार, दरकदाराकडे त्यांच्या सरदाऱ्या चालविल्या.

## नवी विटी व नवा दांडू

असा प्रकार त्यांनीं केला नाहीं. त्या परिस्थितींत हेंच धोरण उचित होतें व त्यांचीं गोड फळेंहि आलीं. हरिहर हा कट्टर शैव व होयसाल अगर त्यांचे कांहीं सेनापती निःसीम जैन; तथापि शरीरसंबंध घडवून आणून ताटांत काय अगर वाटींत काय अशा रीतीनें वागून सर्वांनींच या नव्या राज्यास **वृद्धिरस्तु, तुष्टिरस्तु** असा हार्दिक आशिर्वाद दिला.

हरिहरनें आपली एकुलती एक कन्या तृतीय बल्लाळ होयसाल राजाचा मुलगा बाल्लप्पा दंडनायक यास दिली. हा बाल्लप्पा दंडनायक चौथा बल्लाळ–होयसाल राजाचा भाऊ होता. बुक्कराजाचा मुलगा दुसरा हरिहर याचें लग्न मल्ला–देवी नांवाच्या सेवून राजकन्येशीं झालें होतें. तृतीय बल्लाळ राजाचा जामात बाल्लप्प दंडनायक यास विजयनगरच्या राज्यांत महामंडलेश्वरची जागा मिळाली. तिसऱ्या बल्लाळ राजाचा नातू-मुलीचा मुलगा-गंगीदेव याजकडे एका प्रांताचें आधिपत्य दिलें. याशिवायहि अनेक जैनधर्मीयाकडे सरदारी व दरकदारी हरिहरनें चालविली होती.

### बुक्कराय
### ( इ. स. १३५६ ते १३७६ )

मुंडप्पा दंडनायक, मल्लेय दंडनायक, बैचप्पा व बैच्चप्पाचा मुलगा दंडनायक इरुगप्प वगैरे जैनधर्मीय दंडनायक-सेनापति-प्रांताधिकारी या बुक्करायाचे अमदानींत होते. हरिहर ( प्रथम ) याचा जामात बुक्क अमदानींतहि महामंडलेश्वर या पदावर होताच. या बैचप्पानें गोवा प्रांतावर स्वारी करून तो प्रांत विजयनगर राज्यास जोडिला. बैच्चपा हा ता. २९।१०।१३८० रोजीं मरण पावला. बैचप्पाबद्धलचा एक विरगल गोवे प्रांतांत मिळाला आहे. त्यावर समरभूमीवर वीरोचित मृत्यूचा लाभ झाल्यानें बैचप्पानें स्वर्ग व जिनपद समीप केलें अशा अर्थाचा मजकूर आहे. या मजकुरास उद्धेशून लिहितांना एका थोर इंग्रज गृहस्थानें खालील उद्गार काढले आहेत. तो म्हणतो कीं, An extraordinary reward indeed for a Jain who is said to have sent many of the Kokanigas to destruction.

बैचप्पाचा हा मरण काळ विचारांत घेतां या एका पराक्रमी जैनधर्मीय सेनापतीनें किमान सुमारें पन्नास वर्षें ( इ. स. १३२६ ते १३८० मृत्यु समय ) या नव्या राजवटीची अत्यंत इमानें इतबारें राज्यकारभारांत व रणांगणावर सेवा केली. बैचप्पा हा

या राज्यांत महाप्रधान होता व या बैचप्पाचा मुलगा इरुगप्प हा दुसऱ्या हरिहर राजाचा महाप्रधान झाला. पहिल्या हरिहराचा जामात बल्लप्प दंडनायक हाहि बुक्क राजाचे कारकीर्दीत पूर्वीप्रमाणेंच महामंडलेश्वर होता. पहिल्या हरिहर कालीन अनेक जैनधर्मीय दंडनायक बुक्क राजाचे वेळीं सत्ताधारी होते. त्या काळचे दंडनायक, महामंडलेश्वर इत्यादि पगारी नोकर नसून त्यांच्या ताब्यांत मुलूख असे व त्या मुलुखांवर सत्ता त्यांचीच असे.

## जैन–वैष्णव–तहनामा

एक राजा दुसऱ्या राजाशीं मैत्रीचा व सलोख्याचा तहनामा करितो. इ. स. १३६८ सालीं आपल्या राज्यांतील जैन व वैष्णव प्रजेमध्यें बुक्कराजास तहनामा घडवून आणावा लागला. विजयनगर साम्राज्य-स्थापनकालीं शरीरसंबंध जोडून व सरदाऱ्या चालवून जैनांचें सहकार्य हरिहर व बुक्क यांना मिळवावें लागलें होतें; याबद्दलचा वृत्तांत यापूर्वी दिलाच आहे. बुक्करायांचे कारकीर्दीतहि विजयनगर राज्यांत अनेक पराक्रमी जैनधर्मीय सत्ताधारी असल्याचें वर दाखविलेंच आहे. तथापि बुक्कराजाचे वेळीं जैन व वैष्णवामध्यें धार्मिक बाबतींत वाद उत्पन्न झाला व त्या वादाचा समाधानकारक निर्णय या तहनाम्यानें करण्यांत आला. सदरच्या तहनाम्याचा सारांश खालीं दिला आहे. हा तहनामा व सलोखा घडवून आणितांना राजा बुक्क यानें जैन, शैव व वैष्णवधर्मीय पुढाऱ्यांना राजदरबारीं पाचारण करून जैन व वैष्णव या दोघांमध्यें मतभेद राहूं नये व राहिलेला नाहीं असें जाहीर केलें. या दोन्ही धर्मीयांनीं परस्परांशीं स्नेहभावानें व बंधुभावानें वागावें असें फर्माविलें. जैनधर्मीयांचे हात वैष्णवधर्मीयांचे हातांत घालून आपापल्या धर्मसमजुतीप्रमाणें ज्यानें त्यानें वागावें व तसें करण्यास प्रत्येकांस पूर्ण धर्मस्वातंत्र्य आहे असें जाहीर केलें. या तहनाम्याच्या अटी शिलेवर कोरून ते लेख राज्यांतील निरनिराळ्या जिनमंदिरांतून प्रजेच्या माहितीसाठीं ठेवण्याचा श्रीवैष्णवांना हुकूम दिला. यावच्चंद्रदिवाकरौ वैष्णवधर्म जैनधर्माचें रक्षण करील व जैनधर्माकडे परकीय भावनेनें वैष्णवांनीं पाहूं नये वगैरे अर्थाचा मजकूर शिलेवर कोरण्यांत आला आहे. या तहनाम्याचे कांहीं शिलालेख उपलब्ध झाले आहेत. शिलालेखांत जैनांना ज्या नांवानें संबोधण्यांत आलें त्याचें इंग्रजी भाषांतर The blessed people या शब्दांनीं केलें गेलें आहे.

## वादाचें साम्य व वैषम्य

जैन-वैष्णवामधील या वादाच्या मुळाशीं त्याकाळीं असलेलीं कारणें व हल्लीं हिंदुमुसलमानामध्यें वाद्यासंबंधीं जे वाद उत्पन्न होतात; त्यांचीं कारणें याची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. वैष्णवांच्या या मागणीची मुसलमानांच्या मागणीशीं तुलना करितां हल्लींची मुसलमानांची मागणी फारच सौम्य दिसते. पंचमहावाद्यांचा व कलशांचा उपयोग करण्याचा हक्क जैनांना नाहीं अशी वैष्णवांची तक्रार होती. हा आपला परंपरागत धार्मिक हक्क आहे असें जैनांचें म्हणणें. हा हक्क बजावूं पहाणाऱ्या जैनांचे वैष्णवांनीं बळी घेतले व त्यामुळें हा वाद राजदरबारीं गेला. जैनांचें म्हणणें न्याय्य असल्यानें मान्य ठरलें व बुक्करायानें हुकूमनामा decree दिली. जैनांना पंचमहावाद्यांचा व कलशांचा उपयोग करण्याचा हक्क आहे असें ठरविण्यांत आलें. या अटींचा व हुकूमनाम्याचा जो भंग करील तो देवाचा, धर्माचा व राजाचा अन्यायी ठरेल, असें जाहीर केलें गेलें. विजयनगर राज्यांतील दरएक जैन घरामागें कांहीं ठराविक रक्कम वसूल करण्याचा अधिकार **तातय्य** या नांवाच्या एका गृहस्थास देण्यांत आला. अशा रीतीनें वसूल झालेल्या रकमेंतून गोमटेश्वर संरक्षणासाठीं सत्तावीस पहारेवाले ठेवण्याचे व बाकीच्या रकमेंतून जीर्ण होत चाललेल्या जिनमंदिरांचा जीर्णोद्धार करण्याचें ठरविण्यांत आलें.

जैनधर्मीयांना असंतुष्ट ठेवण्यांत राज्यास धोका आहे असें बुक्कराज व वैष्णव यांना पटल्याखेरीज ही डिक्री–हुकूमनामा–होणें शक्य दिसत नाहीं. राजदरबारांत व राज्यांत जैनांच्या असलेल्या प्राबल्याचेंहि हें फळ असावें अगर जैनांची ही मागणी अत्यंत न्याय्य व इतरांना निरुपद्रवी म्हणूनहि मान्य झाली असावी. या अटीस वैष्णवांची पूर्ण संम्मती असावी असें अनुमान म्हैसूर गॅझेटरकारांनीं केलें आहे. ( पहा– व्हॉल्यूम दुसरा, भाग तिसरा, पान १४८४ ).

## बुक्ककालीन ग्रंथकार

या बुक्करायाचे कारकीर्दींत प्रसिद्धीस आलेल्या कांहीं ग्रंथकारांचा नामनिर्देश खालीं दिला आहे. धर्मनाथ पुराणचे ( इ. स. १३५२ ) ले. बाहुबली पंडीत, गोमटसार व अमितगती श्रावकाचारावरील टीकालेखक केशववर्ण ( इ. स. १३६९ ); खगेंद्र मणिदर्पणकर्ता मंगराज ( इ. स. १३६०; ); मल्लिसेनकृत सज्जनचित्त–वल्लभ ग्रंथाचा टीकाकार अभिनव श्रुतमुनि ( इ. स. १३६५ ); धर्मनाथपुराणकर्ता मधुर ( इ. स. १३६५ ); पद्मराजपुराणाचा कर्ता पद्मनांक; कन्नडरत्नकरंडकाचा कर्ता अयतवर्म. याशिवाय नरसिंह वगैरे अनेक जैनधर्मीय ग्रंथकार होऊन गेले.

यापैकीं पद्मराजपुराण यास कन्नड वाङ्मयक्षेत्रांत उच्च स्थान दिलें जात आहे. धर्मनाथपुराणाचा कर्ता मधुर व सेनापति व दंडनायक मुंड्ड हे दुसऱ्या हरिहरच्या वेळीं अधिक योग्यतेस चढले.

## दुसरा हरिहर

### (इ. स. १३७६ ते १४०४)

बुक्करायाचा मुलगा हरिहर (दुसरा) हा इ. स. १३४२ पासून बुक्कराजाच्या मरणापर्यंत आरग प्रांताचा प्रांताधिकारी होता. शेवटच्या कांहीं वर्षांत तर या प्रांताची सर्व सत्ता हरिहरकडेच सोंपविली होती. यानें २९ वर्षें राज्य केलें. यावरून हा राजा बराच दीर्घायुषी होता असें दिसतें. इ. स. १३८० मध्यें गोवा प्रांतांत बंड उत्पन्न झालें. तें मोडण्याचा प्रयत्न करीत असतां बैचप्पा दंडनायक हा कामास आला. या बैचप्पाबद्दल थोडीशी माहिती यापूर्वींच दिली आहे. वडिलार्जित मिळकत वारसाहक्कानें अनेकांना मिळते; परंतु या हरिहराच्या नशिबानें त्याला पूर्वींच्या राजवटींत जबाबदारीचीं कामें करून कसास उतरलेले सेनानी व प्रधानही मिळाले होते. मुख्य मंत्री मुंड्ड हा होता व त्याच्या पदरीं असलेल्या मधुर नांवाच्या जैन पंडितानें धर्मनाथपुराण लिहिलें आहे. मुंड्डदंडनाथ हा जैनधर्मीय होता अगर कसें याबद्दल मतभेद आहे. बैचप्पाचा मुलगा इरुगप्प हा या राजवटींतील नामांकित सेनानी होऊन गेला. इरुगप्पाचा गुरु पंडिताचार्य हा जैन होता. पहिल्या देवरायाची पट्टराणी भीमादेवी ही जैनधर्म उपासक असून या पंडिताचार्यांची शिष्या होती. या भीमादेवीनें मंगायी वस्तींत भगवान शांतिनाथ यांच्या मूर्तीची प्रतिष्ठापूर्वक स्थापना केली.

**सेनापती इरुगुप्प याचा वंशवृक्षः—**

बैच दंडनायक (प्रथम बुक्काचा मंत्री)

मानगप्प = जानकी    इरुगप्प, बुक्कण्ण

**बैचप्प**    **इरुगप्प**

आजा व नातू आणि चुलता व पुतण्या यांतील वरील नामसादृशामुळें इतिहासकारामध्यें थोडासा मतभेद होत असे, परंतु त्यानंतर मिळालेल्या माहितीमुळें आतां मतभेदास जागा राहिली नाहीं.

श्रवणबेळगोळ शिलालेख नंबर ८२ ( संवत् १३४४ ) मध्यें द्वितीय हरिहर व द्वितीय देवराय यांचा सेनापति इरुगप्प याच्या घराण्याचा दिलेला वंशवृक्ष वर दिला आहे. श्रीगोमटेश्वराच्या नित्योपयोगासाठीं त्यानें सुंदर बगीचा व मोठा तलाव बांधवून दिल्याचा त्या लेखांत उल्लेख आहे. इरुगप्पाच्या घराण्यांत सेनापती-दंडनायक-पद वंशपरंपरेनें चालत आलें होतें. विजयनगर राज्य स्थापण्यांत या घराण्याचा अत्यंत मोठा उपयोग झाला होता. या वंशांतील बैच हा बुक्करायाचा महाप्रधान होता. गोवा प्रांतांतील उपस्थित झालेल्या बंडाचा बींमोड करण्यासाठीं गेला असतां इ. स. १३८० मध्यें लढाईंत कामास आला. बैच याचा मुलगा इरुगप्प यानें विजयनगर राजधानींत जिनमंदिर बांधविलें ( पहा- South-Indian Inscriptions No. 156 ). पंडिताचार्य व श्रुतमुनीसारख्या आचार्यांचें हें शिष्यघराणें होतें. सेनापती इरुगप्प हा संस्कृतज्ञ असून त्यानें **नानार्थरत्नमाला** नांवाचा पद्यात्मक ग्रंथ संस्कृत भाषेंत लिहिला आहे. या राजाचा राजपुत्र उग यानें उघडपणें जैनधर्मांचा स्वीकार केला होता याच वेळीं हरिहरच्या एका सेनापतीच्या मुलानेंही धर्मांतर करून जैनधर्मांचा स्वीकार केल्याचा शिलालेख उपलब्ध आहे (पहा- South Indian Inscriptions No. 152&153 ). याही राजाचे कांहीं प्रधानमंत्री व सेनापति जैनधर्मीय होते. त्या राजाचे कारकीर्दींत बरेंच वाङ्मय निर्माण झालें. या वाङ्मयनिर्मितींतही जैनधर्मीयांचें प्रथम स्थान नष्ट झालें नाहीं. जैनधर्मांचा रवि पश्चिमेकडे ढळत चालला होता असेंही मानण्यास इतिहासज्ञ तयार नाहींत. वीरशैव मताचा प्रसार होत चालला होता व वाङ्मयक्षेत्रांतहि वीरशैवांनीं भाग घेऊन बरीच निर्मिती केली.

## प्रथम देवराय

### (इ. स. १४०६ ते १४२२)

दुसऱ्या हरिहरच्या मरणानंतर गादीच्या वारसाबद्दल दुसरा बुक्क, दुसरा विरूपाक्ष व प्रथम देवराय या तिघा भावांत अहमहमिका लागून राहिली; व अखेर ता. ५-११-१४०६ रोजीं देवराय यांस राज्याभिषेक झाला. भीमादेवी नांवाची याची जैनधर्मीय राणी होती व तिनें जिनमंदिरें बांधविल्याचें व इतर धर्मकार्य

केल्याचें श्रवणबेळगोळ येथील शिलालेखावरून कळतें. इजबद्दलचा त्रोटक वृत्तांत यापूर्वींच दिला आहे. दुसऱ्या देवरायाचे दरबारीं नेमिचंद्र हा जैनकवि प्रसिद्धीस आला. या नेमिचंद्राचा नातू तेरकनंबी बोम्मरस हा उत्कृष्ट व पहिल्या प्रतीचा ग्रंथकार होऊन गेला. **सनत्कुमारचरित्र व जीवंधर सांगत्य** असे दोन ग्रंथ यानें लिहिले आहेत. यापैकीं जीवंधर सांगत्य हा ग्रंथ अनेक दृष्टीनें उपयुक्त व बोधप्रद आहे. वयिचेय दंडनायक ओडेय या नांवाचा या देवरायाचा एक अत्यंत प्रबल सेनापति जैनधर्मीय होता.

## चैत्य निर्माण व भूमिदान

विजयनगरच्या संगम घराण्यापैकीं कोणकोणत्या राजानें जिनमंदिरें बांधविलीं व जैनधर्मीयांना दान दिलें याचा त्रोटक वृत्तांत खालीलप्रमाणें आहे.

दुसऱ्या देवरायानें ( इं. स. १४१९ ते १४४६ ) विजयनगर शहरांतील पान-सुपारी रस्त्यावरील आपल्या निवासस्थानीं इ. स. १४२६ मध्यें श्रीपार्श्वनाथ प्रभूंचें मंदिर बांधविलें.

मूडबिद्रि येथील होस बस्तीच्या-नवी वस्तीच्या-उजव्या दरवाजावरील शक १३५१ मधील लेखावरून हें जिनमंदिर चौथ्या वीर देवरायानें बांधविल्याची माहिती मिळते. मूडबिद्रि येथील गुरुगळ बस्ती-भट्टारकबस्ती-येथील शिलालेखावरून दुसऱ्या बुक्क-रायानें शके १३२९ मध्यें भूमिदान दिल्याचें समजून येतें. आपल्या निवासस्थानीं श्रीपार्श्वनाथ जिनमंदिर बांधणाऱ्या दुसऱ्या देवरायानें शके १३५३ मध्यें फर्मान काढून बसरूर येथील जिनालयास गोणा पाठीमागें एक कोळगा ( एक माप ) तांदूळ धान्य देण्याचें ठरविलें. दुसऱ्या विरूपाक्ष राजानें भूमिदान दिल्याचा लेख मूडबिद्रि येथील होस बस्तीच्या उत्तरेकडील भिंतींत आहे. तेथील गुरुगळ बस्तींतील दुसऱ्या एका लेखावरून दुसऱ्या हरिहरनें शके १३१२ मध्यें भूमिदान दिल्याचें समजतें. सदर लेख मूडबिद्रि येथील डाक बंगल्यापासून एका मैलावर एका शेतांत आढळला. मूडबिद्रि येथील मंडपाचें बांधकाम शके १३७३ साली दुसऱ्या देवरायानें केलें. वीरप्रताप सदाशिव महाराज यानें भूमिदान केलें. विरूपाक्ष राजाचा भूमिदानाचा शक १३९४ मधील लेख आहे. जिनमंदिरें, जैनाचार्य व जैन सेनापति आदि विजयनगरच्या राजांचा कृपेस पात्र झाले होते; अशाबद्दल अनेक लेख उपलब्ध झाले आहेत.

## सिंहावलोकन

संगम घराण्यानें इ. स. १३३६ ते १४८६ पर्यंत सुमारें दीडशें वर्षें राज्य केलें. या अवधींतील परिस्थितीचें स्थूलमानानें सिंहावलोकन केल्यास इ. पंधराव्या शतका-अखेर विजयनगर राज्यांत जैनधर्मीयांची परिस्थिति कशी होती, हें समजून घेण्यास सोईचें होईल.

जैनधर्मप्रसाराच्या दृष्टीनें या राजवटीकडे पाहतां या राज्याच्या चतुःसीमेंत जैनधर्मप्रसार होऊन जैनधर्माच्या उत्कर्षास जरी अनुकूलता मिळाली नाहीं; तथापि जैनधर्म मागें पडून प्रथमपद वैष्णव धर्मास मिळालें असें मात्र नाहीं. प्राप्त परिस्थिति म्हणून असो वा राजधर्म म्हणून असो वा या दोन्हीही कारणामुळें असो या घराण्यांतील राजांनीं सहिष्णुतेचेंच धोरण पाळिलें असें आज तरी म्हणण्यास हरकत नाहीं. नंजनगुड वगैरे त्या काळचीं अनेक शहरें भरभराटींत होतीं व अशा ठिकाणीं जैनांचें सर्व तऱ्हेचें वैशिष्ट्य व प्राबल्य राहिलें होतें अगर जैनांनीं तें राखिलें होतें.

या संगम घराण्याच्या दीडशें वर्षांच्या अमदानींत त्या राज्याचे प्रधान मंत्री, प्रबल सेनापति, प्रांतिक अधिकारी व मांडलिक निःसीम जैनधर्मीय होते. त्यांचे अनेक सहकारी वैष्णव असतांही राज्यसेवेंत त्यांना त्यांचा धर्म आड आला नाहीं. मुसलमानी सत्तेस विरोध करणें हेंच एक ध्येय सर्वांच्या दृष्टीसमोर उभे असल्यानें त्यांची दृष्टि त्या ध्येयपूर्ततेसाठीं अढळ राहिली. त्या वेळच्या समाजव्यवस्थेनेंहि या कार्यास थोडाफार हातभारच लविला. जैन व वैष्णव या धर्मीयांतील नेते लोकांत परस्पर विवाहाची आडकाठी असल्याचें दिसत नाहीं. बेटी-व्यवहाराची ही प्रथा रूढ असल्यानें रोटीव्यवहाराबद्दल विचार करण्याचेंही कारण नाहीं. जन्मावरून धर्म ओळखला जात नव्हता. ब्राह्मणांना व जैनांना शिपाईगिरी करण्यास मुभा होती. त्यावरून खरा वर्णाश्रम धर्म त्याकाळीं प्रचारांत होता. हल्लींप्रमाणें त्याला पोलादी चौकट बसविलेली नव्हती. धर्म जन्मावर विसंबून न ठेविता विचार व आचार यावर त्याचें अधिष्ठान होतें व त्यामुळें धर्मांतर सहजासहजीं घडून येत असें.

या घराण्यांतील राजे वैष्णवधर्मीय होते असें मानण्यापेक्षां ते पाशुपत सांप्रदायाचे अनुयायी होते असें मानणें अधिक युक्त होईल. बऱ्याच राजांनीं जैन-तीर्थस्थानास व जिनमंदिरास देणग्या दिल्याचें आढळतें. वैष्णवांना व वैष्णव-

तीर्थ अगर मंदिरें यांना मिळालेल्या देणग्यांशीं जैनांना मिळालेल्या देणग्यांची तलना करितां वैष्णवांना मिळालेल्या देणग्या संख्येनें जशा अधिक तशाच त्या भरीव आहेत असेंहि स्पष्ट दिसतें; तथापि त्यामुळें जैनांना मिळालेल्या देण-ग्यांची व्यावहारिक किंमत जरी वाटत नसली तरी नैतिकदृष्ट्या यांची किंमत कमी ठरत नाहीं. 'हस्तिना ताड्यमानोपि न गच्छेज्जिनमंदिरम्' या सुभाषिताचें त्याकाळीं विस्मरण झाल्याचें दिसतें. कारण खुद्द राजवाड्यांत राजपुत्र जैनधर्मीय होते व राजवाड्यांत जिनमंदिरहि बांधण्यांत आलें होतें.

## वाङ्मय

कन्नड व संस्कृत वाङ्मयक्षेत्रांतील आपलें पूर्वीचें स्थान जैनधर्मीयांनीं कायम टिकविलें. परंतु जैन वाङ्मयोपासकांशीं इतर धर्मीय वाङ्मयोपासक स्पर्धाक्षम ठरूं पहात होते. यासंबंधीं शक्य ती माहिती ज्या त्या ठिकाणीं दिली असल्यानें त्याचा पुनरुच्चार करण्याचें टाळिलें आहे.

## शिल्पकला इत्यादि

या राजवटींत नांवाजण्यासारखें शिल्पकाम झालें नाहीं असें दिसतें. कांहीं नवीन जिनमंदिरें बांधलीं गेलीं असलीं तरी तें होयसाल राजवटींतील बांध-कामाच्या पासंगालाहि पुरणार नाहींत. याचीं अनेक कारणें असावींत असें दिसतें. या पूर्वीच्या राजवटींत अनेक जिनमंदिरें बांधलीं गेलीं होतीं. जिनमंदिरांच्या जीर्णोद्धाराचें कार्य अवश्यक वाटत असावें व अस्तित्वांत असलेल्या मंदिरांची व्यवस्था करण्याकडेहि लक्ष प्रामुख्यानें वेधिलें असावें.

## इतर.

**सत्याणुव्रत—**

शंभर अश्वमेध करून जो पुण्यलाभ होईल त्याहिपेक्षां अधिक पुण्यलाभ सत्यवचनी असल्यानें मिळणार आहे अशी सर्वांची दृढ समजूत होती. केवळ तात्त्विकदृष्ट्या सत्याचें हें वर्णन नसून नित्य व्यवहारांत हा धर्म पाळिला जात होता; असे त्याकाळीं जे परदेशचे प्रवासी आले होते त्यांनीं आपल्या अनुभवा-वरून या गोष्टीचा प्रामुख्यानें आपल्या प्रवासवृत्तांत उल्लेख केला आहे. याचें श्रेय कोणी कोणाकडेहि देवोत परंतु यापूर्वीं हजार बाराशें वर्षें जैनधर्मीयांनीं केलेल्या उपदेशाचें व पोसलेल्या संस्कृतीचें हें फळ होतें असें तरी कां म्हणूं नये ?

**अहिंसा—**

विजयनगर-राज्यकाळीं सत्य धर्माचें पालन जितक्या आस्थेनें होत होतें तितक्याच आस्थेनें अहिंसाधर्माचेंहि पालन होत होतें असेंहि युरोपियन प्रवाशांनीं आपल्या प्रवासवृत्तांतांत आपला अनुभव नमूद केला आहे. या प्रवाशांना व्यभिचारी लोक आढळून आले नाहींत यावरून त्या काळीं लोकांची नीतिमत्ता उत्कृष्ट होती हें उघड आहे.

महापूर येतांना त्या नदीस मिळणाऱ्या इतर नद्या, ओढे, नाले भरून यावे लागतात. ज्या देशांतून अशी नदी वाहाते त्या प्रदेशांतहि ओलावा उत्पन्न व्हावा लागतो. नदीच्या उगमापासून तों तिच्या मुखापर्यंत अगर संगमापर्यंत पर्जन्यवृष्टि व्हावी लागते. इतक्या अनुकूल बाबी जमून आल्या तरच महापूर शक्य आहे. जैनधर्मप्रसारास पूर अगर महापूर या राजवटींत कां आला नाहीं, याचीं कारणें शोधूं पाहातां वरील उदाहरणांतील कित्येक बाबींच्या अनुकूलतेचा अभाव होता असें दिसून येईल. राजाश्रयाच्या अभावामुळें अंतःस्थ ओलावा नष्ट झाला होता. मान्यखेट-मलखेड, कोल्हापूर, कोंकण, रायबाग, तेरदळ, बेळगांव, सौंदत्ती, नगर, नाशिक वगैरे भागांतून वाहणारे धर्मप्रसाराचे नदीनाले जवळ जवळ कोरडे पडले होते; निदान त्यांतून वाहणाऱ्या पाण्याच्या प्रवाहास दुतोंडी बंधन घातल्यामुळें विजयनगर राज्यांतील जैनधर्माचा प्रवाह आणि वर नमूद केलेल्या प्रदेशांतील तो प्रवाह यांचा संयोग व संगम होऊं शकला नाहीं. अर्थातच धर्मप्रसाराचा महापूर अशक्य ठरला. विजयनगर राज्यांतील मुलखाव्यतिरिक्त वर नमूद केलेल्या इतर भागांत मुसलमानी सत्ता प्रस्थापित झाली होती व शैव अगर वीरशैव धर्मसंप्रदाय जैनांना डोकीं वर काढण्यास संधि देत नव्हता. हींच तीं दुतोंडी बंधनें होत. संगम राजघराण्याच्या दीडशें वर्षांच्या अमदानींपैकीं सुरवातीच्या निम्या काळांत जैन महाप्रधान सेनापति इत्यादिकांची जी संख्या होती ती पुढील निम्या काळांत स्थूल मानानें व्यस्त प्रमाणांत राहिली.

वाङ्मयक्षेत्रांतील जैनांचें वैशिष्ट्य विशेषतः संस्कृत व कन्नड भाषेंतील इतरांना हिरावून घेतां आलें नाहीं; तरी धर्मक्षेत्राप्रमाणें वाङ्मयक्षेत्रांतही वैष्णव, शैव व वीरशैव हे जैनाशीं स्पर्धा करण्यास समर्थ ठरले होते.

## पुढील शंका

आज सुमारें साडेचारशें वर्षांपूर्वी–इ. स. १४८६–मध्यें संगम राजघराणें नष्ट झालें. संगम राजघराण्याच्या नाशानंतर सुमारें १७५ वर्षांनीं महाराष्ट्रांत शिवछत्रपतींचें घराणें प्रबळ झाले. शिवछत्रपतींचा राज्याभिषेक इ. स. १६७४ मध्यें झाला. तत्पूर्वी फक्त एकशें दहा वर्षे आधी म्हणजे इ. स. १५६५ मध्यें विजयनगर राज्य लयास गेलें होतें. संगम राजघराण्याच्या नाशानंतरच्या पुढील फक्त दोनशें वर्षांच्या काळांतच म्हणजे शिवछत्रपतींचे घराण्याच्या उदयापर्यंतच्या काळांत सर्व बाजूंनीं जैनांचा ऱ्हास होऊन दक्षिण हिंदुस्थानांत प्रायः जैन नामशेष कसे झाले ही शंका अस्थानीं ठरणार नाहीं.

## समाधान

अशाच थोडया अवधींत रोमन साम्राज्य नष्ट झालें व साम्राज्याच्या नाशाबरोबर त्यांची संस्कृतीहि मार्गे पडली. उच्चशिखरावर असलेल्या इजिप्शियन संस्कृतीचे थोडयाच काळांत बारा वाजले. पेशवाईला तर धड शंभर वर्षांचेंहि आयुष्य लाभलें नाहीं. केवळ शंभर दीडशें वर्षांच्या अत्यल्प काळांत जर्मनी व जपाननें आपली उन्नति करून जगांतील पहिल्या प्रतीच्या राष्ट्रांत स्थान मिळविलें. इटली व सोव्हिएट रशिया यानें तर दहावीस वर्षांच्या काळांतच वैभव शिखर गांठिलें. अशींच उलट सुलट अनेक उदाहरणें देतां येतील. सारांश चक्रनेमिक्रमाचा फेरा जैनांनीं हजार बाराशे वर्षे तरी चुकविला.

## सालुव राजघराणें

### (इ. स. १४८६ ते १४९९)

सालुव नरसिंह ( पहिला ) यानें संगम घराण्याचा शेवट लावून राज्यपद बळकाविलें. पहिल्या नरसिंहानें इ. स. १४९७ पर्यंत राज्य केलें व त्यानंतर त्याचा मुलगा धर्मराय ऊर्फ इमादिनरसिंह ( दुसरा ) हा राज्याधिकारी झाला. दुसऱ्या नरसिंहाचा सेनापति तुलवनरस यानें इ. स, १४९९ मध्यें राज्यपद बळकाविलें. सालुव घराण्यानें फक्त बारा वर्षे राज्य केलें. आपल्या राजाला पदच्युत केल्याबद्दल सालुवनरसिंह यास इतिहासकार दोष तर मुळीं देत नाहींतच उलट या राज्यक्रांतीमुळें याच वेळीं येणारी आपत्ती सुमारे सत्तर वर्षे पुढें ढकलण्यांत आली असें इतिहासज्ञ मानितात.

## सालुव शाखा व तुलुव घराणें

सालुव नांव धारण करणाऱ्या अनेक शाखांचा व प्रसिद्ध व्यक्तींच्या नांवाचा उल्लेख शिलालेख व ताम्रपटांतून अढळ होत आहे. त्यापैकीं संगीतपट्टण ( उत्तर कानडा ) येथें राज्य करीत असलेलें सालुव राजघराणें जैनधर्मीय असून इ. स. १४८८ ते इ. स. १५६० पर्यंतच्या सत्तर वर्षांत त्यांची सत्ता प्रबळ होती. संगीतपट्टण सालुव घराणें काश्यप गोत्रीय व नरसिंह सालुव घराणें आत्रेय गोत्रीय होत. यामुळें हीं दोन्हीं घराणीं भिन्न आहेत असें मानिलें जात आहे. **सिमोगा** जिल्ह्यांतील सगर व नगर तालुक्यांत मिळालेल्या प्राचीन लेखावरून संगीतपट्टण येथें राज्य करीत असलेल्या या जैनधर्मीय राजांची कांहीं माहिती मिळते. इ. स. १४८८ ते १४९८ पर्यंत इंद्र, त्याचा मुलगा संगीराज व नंतर संगीराजाचे मुलगे सालुवेंद्र व इमादि सालुवेंद्र यांनीं राज्य केलें. त्यानंतर इ. स. १५३० पर्यंत मल्लिराय, देवराय, कृष्णदेव यांनीं राज्य केलें. तुलुव देशांतील सामंत अगर मांडलिक हे जैनधर्मीय होते. श्रवणबेळगोळ वगैरे भाग यांचा तुलुव देशांत समावेश होतो. या देशाची जन्मभाषा कन्नड व सामंताच्या धर्माचें बरेंच वाङ्मयहि कन्नड भाषेतील. विजयनगर राजांनीं कन्नड वाङ्मयास फारसा आश्रय दिला नाहीं; तथापि त्याचे हे सामंत व जैनसेनापति आदिकन्नड भाषेचे अभिमानी असल्यानें कन्नड कवी व ग्रंथकार यांना त्यांचा बहुमोल आश्रय मिळाला. या अशा आश्रिता-पैकीं कांहींना राजदरबारींहि मानमान्यता मिळवितां आली. कन्नड भाषेंत कांहीं उच्च व पहिल्या प्रतीचें ग्रंथलेखन विजयनगरच्या राजवटींत झालें असलें तरी त्याचें श्रेय जैनकवी व ग्रंथकार यांना आश्रय देणाऱ्या जैन मांडलिकाकडेच आहे. विजयनगर राजघराण्याच्या तिसऱ्या तुलव शाखेनें इ. स. १४९९ ते १५४३ पर्यंत राज्य केलें. या तुलवशाखेच्या कारकीर्दीतहि उच्च प्रतीचे कांहीं कन्नड ग्रंथ निर्माण झाले. इ. स. १५४२ नंतर व सुप्रसिद्ध तालिकोटची लढाई (इ. स.१५६५) या दरम्यान विजयनगरच्या चौथ्या राज्यशाखेच्या अमदानींतील जैन कवी, ग्रंथकार अगर सेनापति इत्यादिबद्दल माहिती मिळवितां आली नाहीं.

## विवादपटु-अभिनववादी-विद्यानंद

मल्लिरायाच्या कारकीर्दींत पंडित व विवादपटु विद्यानंद हा उदयास आला. श्रीरंग-नगर-सेरिंगपट्टण-येथें ख्रिश्चन मिशनऱ्यांशीं धर्मवाद करून त्यांत विद्यानंदानें

विजय मिळविला. विजयनगर राजा कृष्णदेवरायानें त्याचा सत्कार केला होता. या सत्काराला **रत्नाभिषेक** या नांवानें संबोधिल गेलें आहे (पहा–Studies in the History of Third Dynasty of Vijayanagar, पान ४२८). बुधेशभवन व्याख्यान ग्रंथाचा कर्ता हाच विद्यानंद होय. हा ग्रंथ इ. स. १५३० मध्यें लिहिला गेला असावा असें मानेलें जातें. विद्यानंद हा मल्लिरायाचा आश्रित होता.

इ. स. १५६० च्या एका लेखांत राजा भैरव व त्याचे बंधू अंब व साल्व-मल्ल यांचीं नांवें अढळ होतात. साल्वमल्ल जन्मतःच कनिष्ठ असला तरी कर्तबगार या नात्यानें बंधुत्रयांत तो श्रेष्ठ होता. भैरवरस व साल्वमल्ल यांच्या नांवाचा उल्लेख श्रवणबेळगोळ शिलालेखांत आढळ होत आहे. क्षीणपुरगिरसोप ही यांची राजधानी होती व या राजधानीवरूनच तेथील धबधब्यास गिरसप्पा हें नांव पडलें आहे.

विजयनगरचा राजा सदाशिव ( इ. स. १५५२ ते इ. स. १५७० ) याचे कारकीर्दींत भाटकळ येथें राज्य करीत असलेली चन्नादेवी ही या सालुव घराण्याच्या एका शाखेंतील राज्यकर्ती राणी असून ती जैनधर्मीय होती.

**तुलुव घराणें** (इ. स. १४९९ ते इ. स. १५४२) व तदनंतरच्या इ. स. १६६५ या सुमारें दीडशें वर्षांच्या काळांतील माहिती दिली नाहीं. विजयनगर साम्राज्य लयास गेल्यानंतर जेत्या मुसलमानांचें अधिराज्य न स्वीकारतां ज्या जैन राजघराण्यांनीं स्वतंत्र राज्यपद भोगिलें त्यांतील कांहींचा उल्लेख पुढें दिला आहे. ते मुख्यतः तुलव देशांवर राज्य करीत होतेः—

( १ ) कारकळ येथील भैरसुओडेयर.
( २ ) मूडबिद्रींचे चौटर.
( ३ ) नंदावरचे बंगर.
( ४ ) आल्दनगडींचे अल्दर.
( ५ ) मुलकीचे सावनतूर.
( ६ ) वैलनगडीचे भुतार.

हुमस, कारकळ, मूडबिद्री, बेळगोळ, कोल्हापूर, तेरदळ, रायबाग, होसूर, ( बेळगांव ) वगैरे ठिकाणीं जैन भट्टारकांचे मठ आहेत व त्याच ठिकाणीं लहान

मोठीं जैन राज्यें होतीं. हा कार्यकारणभाव आहे कीं काकतालीय न्याय आहे, त्याचें संशोधन होणें जरूर आहे.

बदामी येथील बनशंकरी देवी, कागवाड ( जि. बेळगांव ) येथील कग्गुडीराय, कोल्हापूरची महालक्ष्मी, सौंदत्ती ( जि. बेळगांव ) येथील अम्मा-हल्ली यलम्मा वगैरेंना आजहि आपलीं कुलदैवतें समजणारीं अनेक जैन घराणीं आहेत. या स्थलासंबंधींच्या अख्यायिका व इतिहास विचारांत घेतां या उपास्य देवता मूलतः जैनधर्मीय असून जैनांच्या अवनत काळांत त्या त्या स्थानांचें महत्त्व जाणून हिंदुधर्मीयांनीं या देवतांवर आपले शिक्का मोर्तब केले. पेहराव व नांव बदललें तरी त्यामुळें जैनांची श्रद्धा व भावना यांत अद्याप बदल झालेला नाहीं.

विजयनगर राज्याच्या अस्तानंतर त्या भागांतील अनेक जैनांनीं बेळगोळ, सातारा, व दक्षिण महाराष्ट्रांतील संस्थानें यांत येऊन कायमची वस्ती केली अशी अख्यायिका आहे. कोणी इतिहासज्ञ या प्रश्नाचा अधिक विचार करील काय ?

## चालुक्य व जैनधर्म

चालुक्यांनीं इ. स. च्या ४१९ मध्यें आपलें राज्य स्थापन करून सुमारें ६७५ वर्षें म्हणजे इ. स. ११५६ पर्यंत राज्य केलें. जैनधर्मप्रसारास या घराण्याचें बरेंच सहाय्य झालें.

रजपुतान्यांतील सोलंकी वंशापासून चालुक्याची उत्पत्ति समजली जाते. प्रथम पुलकेशी चालुक्य यास अधिराजपद मिळेपर्यंत हा वंश कदंब राजाचा सामंत होता. यानें विजापूर जिल्ह्यांतील वातापी-बदामी-आपली राजधानी केली होती. इ. स. ६१५ मध्यें या घराण्याच्या **पूर्व** व **पश्चिम** चालुक्य अशा दोन शाखा झाल्या. पूर्व चालुक्याची राजधानी वेंगी ( कृष्णा जिल्हा ) व नंतर राजमहेंद्री व पश्चिम चालुक्याची राजधानी कल्याण ( निजाम स्टेट ) अशी होती. चालुक्याची उत्पत्ति सोलंकी वंशापासून समजली जाते असें वर लिहिलें आहे; परंतु या घराण्याच्या मूळवंशाबद्दल अनेकांचीं अनेक मतें आहेत. कोणी विद्वान् या घराण्याचा संबध ग्रीक देशाशींही जोडतात.

सातारा जिल्ह्यांत व महाराष्ट्रांतील इतर भागांत सोळांकी-साळुंके-या आडनांवाचे मराठे आहेत. ते या चालुक्याचे वंशज आहेत असें मानलें जातें.

चालुक्यांनीं ज्या भागांत आपलें राज्य स्थापलें त्या भागांत राष्ट्रकूटांची सत्ता होती व राष्ट्रकूटांना पराजित करून त्यांनीं आपलें राज्य स्थापिलें. राज्यस्थापनेनंतर प्रथम त्यांना पल्लवाशीं दोन हात करावे लागले. पुढें या दोन राजघराण्यांत मैत्रीचा तहनामा झाला. शरीरसंबंध जोडून या तहनाम्यास बळकटी आणण्यांत आली.

चालुक्यांना कलचुरी, वनवासीचे कदंब व कोंकणचे मौर्य–मोरे?– यांच्यांशीं युद्धें करावीं लागलीं. यावरून राष्ट्रकूट, कदंब व कलचुरी वगैरे राज्यघराणीं चालुक्यापूर्वीं कमी अधीक प्रमाणांत व निरनिराळ्या लहानमोठ्या प्रदेशावर सत्ताधीश होतीं असें दिसून येईल.

## चालुक्य–राज्यविस्तार

उत्तरेस नर्मदा नदी, पश्चिमेस अरबी समुद्र,–दक्षिण–आग्नेय दिशेस कानडी भाषा प्रचालित असलेला मुलूख–बल्लारी जिल्हा, पश्चिमेस नगर अगर बिन्नूर व गुंड वगैरे भाग. या चतुःसीमेंतील भागावर चालुक्याचें राज्य होतें. चालुक्याच्या ताब्यांत आलेल्या मुलुखापैकीं कांहीं भागावर–बेळगांव वगैरे भागावर–कदंबांचें राज्य होतें. याशिवाय कर्त, रट्ट व कलचुरी या घराण्याच्या अमलाखालील मुलूख निरनिराळ्या वेळीं चालुक्यांनीं आपल्या राज्यास जोडून वरील चतुःसीमेंतील भागांत आपल्या राज्याचा विस्तार केला. चालुक्य राज्यस्थापक जयसिंह यांच्या घरण्याचा दक्षिणेशीं बिलकुल संबंध नव्हता असें नाहीं. या जयसिंहाच्या पूर्वजांनीं चिकोडी येथील राजघराण्यांतील एका राजकन्येशीं विवाह केल्याची दंतकथा आहे. इ. स. ८९९ या वर्षी रट्ट ( राष्ट्रकूट ) राजांनीं बंड उभारून चालुक्यांचा पराभव केला. व त्यानंतर सुमारें ७५ वर्षें इ. स. ९७३ पर्यंत राष्ट्रकूटांनीं आपली सत्ता चालविली. चालुक्य तैलपानें इ. स. ९७३ मध्यें आपलें सर्व राज्य परत मिळविलें. सौंदत्तीचे रट्ट राजे हे जैनधर्मीय असून त्यांना महामंडलेश्वर ही पदवी होती. सुगंधवति–सौंदत्ती–ही रट्ट राजाची राजधानी होती. सौंदत्तीच्या रट्टाप्रमाणेंच कोल्हापूरचे शिलाहार राजे चालुक्यांचे मांडलिक असून धर्मानें जैन होते. हलसी येथें कदंब राजाची एक शाखा राज्य करीत होती. कित्येकांचे मतें कदंब राजे–निदान कांहीं राजे–जैनधर्मीय होते असें आहे. यावरून कल्याण, कोल्हापूर, बेळगांव, हलसी या महाराष्ट्रांतील व कर्नाटकांतील भागावर चालुक्यांचें राज्य होतें; व ते जैनधर्मीयच होते असें बेळगांव, रायबाग, तेरदळ, डंबळ व

श्रवणबेळगोळ वगैरे ठिकठिकाणच्या शिलालेखावरून निर्विवाद शाबीत होत आहे. त्याकाळीं-प्राचीनकाळीं-राजाचा धर्म तोच प्रायः प्रजेचा धर्म असे. ही सर्वमान्य गोष्ट व या भागांतील अनेक खेड्यांतील त्या काळच्या जिनमंदिरांचें अस्तित्व, या बाबी विचारांत घेतां दक्षिण हिंदुस्थानांतील अगदीं दक्षिणेकडील भागाप्रमाणें याहि भागांत जैनधर्म सर्वत्र प्रचलित होता असें सिद्ध होत आहे. उपलब्ध इतिहासावरूनहि हेंच विधान सत्य दिसत आहे. चालुक्य राज्य अखेरीस ( इ. स. ११५६ ) व नंतरच्या कलचूर्यकुलोत्पन्न बिज्जलदेव राजाचे कारकीर्दींत ( इ. स. ११८३ ) हा भाग जैनमय होता.

आंध्र, कर्नाटक, मद्रास इलाख्यांत व मुंबई इलाख्यांतील दक्षिणभागांत जवळ जवळ एकाच वेळीं जैनधर्मावर आघात होण्यास सुरवात झाली.

बिज्जलदेव राजाच्या वधानंतर चालुक्य राजाचे अंमलाखालील मुलखांत-विशेषतः कानडी भाषा प्रचारांत असलेल्या मुंबई इलाख्याच्या भागांत-वीरशैव मतानुयायांच्या जुलुमामुळें जैनधर्मीय त्रस्त झाले. आंध्र कर्नाटक भागांत होयसाल घराण्यांतील शेवटच्या कांहीं राजांच्या धर्मांतरामुळें असो वा वैष्णवधर्माकडील ओढ्यामुळें अगर त्यांच्या माध्यस्थभाव स्वीकारामुळें असो; जैन धर्माच्या उत्कर्षास पायबंद लागला. ७००-८०० वर्षें जैनधर्माचा उच्छेद करण्याची वाट पाहणाऱ्या वैदिक धर्मानुयायांची ही मनीषा तृप्त होण्याची संधि आली; परंतु या वेळीं त्यांची इच्छा पूर्णांशानें सिद्धीस गेली नाहीं. वैष्णव, शैव व लिंगायतांचें ऐक्य घडून आलें नाहीं. ते परस्परांचा द्वेष करीतच होते. परंतु जैनधर्माचे ते सगळे व सारखेच द्वेष्टे होते. अशा स्थितींत मुसलमानांच्या वर्चस्वाच्या पायंडा दाक्षिणेंत घातला गेला व त्यामुळें जैन, शैव, वैष्णव व लिंगायत या सर्वांनाच विघातक असें वातावरण निर्माण झालें.

अल्लाउद्दिन खिलजीनें दक्षिणेवर प्रथम इ. स. १२९६ मध्यें स्वारी केली. या स्वारीपूर्वीं दुसऱ्या कोणत्याहि मुसलमान धर्मीयानें दक्षिणेवर स्वारी केली नव्हती. इ. स. १२९६ मध्यें त्यानें देवगिरी-हल्लीं दौलताबाद-जिंकून मुसलमानांचें दाक्षिणेंत राज्य स्थापन केलें; व यापुढील अवघ्या ५० वर्षांत मद्रास इलाख्यापर्यंतचा सर्व मुलूख मुसलमानी सत्तेखालीं गेला. हिंदुत्व राखण्यासाठीं विजयनगरच्या राज्याची स्थापना इ. स. १३२६ मध्यें होऊन इ. स. १३३६ मध्यें विजयनगर राजधानीचें बांधकाम पुरें झालें. बहामनी-मुसलमानी-राजे व विजयनगरचे राजे यांच्यामधील

लढे यापुढें सुमारें तीन शतकें चालून शेवटीं विजयनगरचें राज्यहि बुडालें. राजा बिज्जलच्या वधामुळें व त्यानंतर उपस्थित झालेल्या अनेक कारणामुळें दक्षिण हिंदुस्थान गिळंकृत करण्यास मुसलमानांना आयास पडले नसल्यास नवल तें काय ?

चालुक्यानंतर बिज्जलदेव राजास राज्यसुखोपभोग फार दिवस लाभला नाहीं. चालुक्याच्या अंमलाखालील मुलखाबद्दल म्हैसूर संस्थानांतील हालबिडी येथील व देवगिरी येथील यादवामध्यें वाद सुरू झाल्यानें व अंतस्थ, धार्मिक व राजकीय वर्चस्वासाठीं लागलेल्या कलहाचीं वर जीं कारणें दिलेलीं आहेत, त्यामुळें मुसलमानांना आपला राज्यविस्तार व धर्मप्रसार करण्यास आयतेंच फावलें; व चालुक्य अंमलाखालील मुलखाबद्दल आपसांत लढणारीं दोन्हींहि यादव घराणीं मुसलमानांनीं धुळीस मिळवलीं. मुसलमानांच्या वाढत्या सत्तेस विरोध करून हिंदुस्थानांत हिंदुराज्य अस्तित्वांत ठेवावें म्हणून विजयनगरच्या राज्याची स्थापना झाली; व आपसांतील या दुहीच्या पश्चात्तापानें पोळलेल्या राजा व प्रजा यांनीं जैन-वैष्णव तहनामा घडवून आणून नव्या राज्यास बळकटी आणण्याचा प्रयत्न केला. जैन, शैवादि–लिंगायत व वैष्णव यांच्यामधील धार्मिक लढे, चालुक्य, कलचुरी, राष्ट्रकूट व यादव यांच्यामधील राज्यतृष्णेमुळें उत्पन्न झालेले लढे, यामुळें मुसलमान विजयी झाले. बौद्ध व जैनांच्या अहिंसावादामुळें दक्षिण हिंदुस्थान क्षीण झाला होता म्हणून हा मुलूख परतंत्र झाला असें नाहीं. विजयनगरच्या नव्या राजवटींत ही चूक आढळून आल्यानें राज्याच्या बळकटीसाठीं शैव-वैष्णव-जैन तहनामा घडवून आणावा लागला. परधर्मसहिष्णुतादर्शक हा तहनामा खास नाहीं; कदाचित् या घराण्यांतील राजांच्या मनाचा कलहि जैनधर्माकडे असावा; परंतु या सुप्रसिद्ध तहनाम्याच्या वळीं हें उघड करणें इष्ट वाटलें नसावें असेंहि अनुमान काढतां येण्यासारखें आहे. राजपुत्र ‘ उग ’ याचा जैनधर्मस्वीकार हें या विधानाचें एक उत्कृष्ट प्रत्यंतर आहे; याबद्दलचा वृत्तांत मागें विस्तारानें दिला आहे.

दुसऱ्या पुलकेशी राजाचा गुरु रविकीर्ति या नांवाचा जैन मुनी व कवि होता. दुसरा पुलकेशी राजा इ. स. ६०९ मध्यें राज्याधिकारी झाला. गंगराजा व पुलकेशी राजा यांच्यामध्यें स्नेहसंबंध उत्पन्न झाला. पुलगेरे–हल्लींचें लक्ष्मेश्वर–येथें या पुलकेशीनें एक जिनमंदिर बांधविलें. रामानुजानें लक्ष्मेश्वर येथील या सुप्रसिद्ध जिनमंदिराचा नाश केला. यावरून लक्ष्मेश्वर हें कित्येक शतकें जैनधर्मप्रसाराचें एक प्रबळ व प्रमुख स्थान होतें असें दिसतें. याच पुलकेशीचा भाऊ विष्णुवर्धन

ऊर्फ कुब्ज यानें इ. स. ६१५ मध्यें **पूर्व** चालुक्य घराण्याची स्थापना केली. पल्लवापासून जिंकून घेतलेल्या मुलखावर पूर्व चालुक्य घराणें राज्य करूं लागलें. पूर्व चालुक्य घराण्याची स्थापना होण्यापूर्वी कांहीं वर्षें म्हणजे इ. स. ६११ मध्यें विष्णुवर्धन यास पुलकेशीनें त्या भागाचा प्रांताधिकारी नेमिला होता.

कनोजचा राजा शिलादित्य याजवर स्वारी करून या पुलकेशीनें इ. स ६२० मध्यें त्याचा पराभव केला. पल्लव राजा नरसिंहवर्धन यानें इ. स. ६४२ मध्यें या पुलकेशीचा पराभव केला. पुलकेशी बहुधा या लढाईत मारलाहि गेला असावा. इ. स. ६४२ ते ६५५ पर्यंतच्या मधल्या तेरा वर्षांचा या घराण्याचा इतिहास कोरा आहे. इ. स. ६५५ मध्यें पहिला विक्रमादित्य राज्याधिकारी झाला. पहिल्या विक्रमादित्याचा मुलगा विनयादित्य याचा धर्मगुरु निर्विघ्नदेव या नांवाचा जैन पंडित होता. या घराण्यांतील दुसरा विक्रमादित्य राजा (इ. स. ७३३) यानें एका जिनमंदिराचा पुनरुद्धार करून सुप्रसिद्ध वादविवादपटु पंडित विजय यास एक गांव इनाम दिल्याचें एका शिलालेखावरून समजतें. मि. इलियट यानें एकंदर ५९५ शिलालेखांचा अर्थ लाविला आहे. त्यापैकीं १५१ शिलालेख एकट्या या विक्रमादित्याच्या कालाचे आहेत. इ. स. १०७७ ते ११२८ पर्यंत विक्रमानें राज्य केलें. या विक्रमाची महाराज्ञी **जाकल देवी** या नांवानें प्रसिद्ध असून तिचें राज्य इंगळगी (गुलबुर्गा जिल्हा निजाम संस्थान) भागावर होतें. तिनें दोन जिनमंदिरें बांधविलीं असल्याचा शिलालेख उपलब्ध झाला आहे. त्या शिलालेखांत ( इंगळगीच्या शिलालेखांत ) " कलिकालपार्वती, अभिनव सरस्वती, सकलकलाधारी " वगैरे विशेषणांनीं तिचें गुणवर्णन केलें आहे. महाराज्ञी जाकलदेवी ही वीर्यशाली विक्रमाला शोभणारी राज्यकार्यकुशल, वीरबाला व वीरपत्नी होती; असें या शिलालेखांवरून स्पष्ट होत आहे. महाराज्ञी जाकलदेवी ही कदंबांची कन्या व चालुक्यांची सून; माहेरघरचा धर्म तो तिचा धर्म—जैनधर्म—होय. चक्रवर्ती विक्रमाचा धर्म कोणता होता याबद्दल मतभेद आहे. तिच्या पतीचा धर्म जैनधर्म नसेल तर एका राजवाड्यांत पतिपत्नींचा निरनिराळा धर्म असे, असें सहजीं दिसून येणार आहे. या राजाच्या अमदानींचे अखेरीस द्वारसमुद्राच्या बल्लाळांनीं—होयसाळांनीं—चालुक्य राज्यांतील दक्षिण भागावर स्वारी केली. कोंकण प्रांतांत तेढ उत्पन्न झाली. बल्लाळ राजसेना पराजित झाले. विक्रम राजाच्या सेनापतींनीं गोवा प्रांत जिंकून कोंकण प्रांतांत शांतता प्रस्थापित केली. चालुक्य घराण्यांतील कांहीं

राजांनीं हिंदुधर्मीय देवालयें बांधवून दिल्याचें शिलालेखावरून समजतें. त्यावरून ते परधर्मसहिष्णु होते असें दिसून येतें. यावेळीं जैनधर्माच्या खऱ्या उत्कर्षास सुरवात झाली होती. राष्ट्रकूटांचे अमदानींत जैनधर्म वैभवशिखरीं पोंचला असें यापुढें दिलेल्या राष्ट्रकूटादि घराण्याच्या इतिहासावरून कळून येईल.

हें घराणें पालीध्वजाचा उपयोग करीत असे; हा ध्वज जैनधर्मसूचक आहे; ही एकच गोष्ट या घराण्याच्या धर्माचा निर्णय करण्यास पुरेशी होणार नाहीं ?

## मांडलिक

म्हैसूर संस्थानांत चालुक्याच्या दोन मांडलीक घराण्याचें राज्य होतें. त्यांपैकीं रणपाकरस व गोग्गी यांच्या नांवाचा उल्लेख श्र. बेळगोळ चिक्कबेट शिलालेखांत आढळ होत आहेत. म्हैसूर संस्थानांतहि या मांडलिकाचें शिलालेख उपलब्ध झाले आहेत. हीं दोन्ही घराणीं जैनधर्मीय असून ते चालुक्याचें वंशज असल्याचें दिसतें.

## पश्चिम चालुक्य व जैनधर्म

### (इ. स. ९७३ ते इ. स. ११५६)

पश्चिम चालुक्य घराण्याचा पुनर्जीवन कालानंतरच्या अमदानींत पूर्वीप्रमाणें जैनधर्माचें प्रसारकार्य जामांत नव्हतें. जैनधर्माचा मध्यान्ह सूर्य पश्चिम दिशेकडे वळत चालला होता; निदान तो स्थिर राहिला असें मानावें लागतें. कांहीं जिनालयांतून तीर्थंकरांच्या मूर्तीचें उच्चाटन होऊन त्या जागीं हिंदुदेवदेवतादिकांची स्थापना याच राजवटींत झाली अशी आख्यायिका प्रचलित आहे. चालुक्याची ही दुसरी अमदानी ( इ. स. ९७३ ते ११५६ ) अल्पकालीन ठरली. कलचुरी राजसत्ता तर याहूनही अल्पकालीन ठरली. कलचुरी राजांनीं इ. स. ११५९ व्या वर्षी पश्चिम चालुक्य राज्य बुडविलें. जैनधर्मावरील शैवांचा हल्ला परतविणाऱ्या कलचुरी घराण्यांतील सुप्रसिद्ध राजा बिज्जलदेव याचा वीरशैवानीं बळी घेतला. याबद्दलचा वृत्तांत कलचुरी घराण्याच्या वृत्तांतांत व इतरत्र विस्तारानें दिला आहे.

अजितपुराणाचा कर्ता कन्नडकवि रन्न यास चालुक्य तैल ( दुसरा ) याचा आश्रय होता; व या कवीस कविचक्रवर्ति अशी पदवी तैल ( दुसरा ) यानेंच दिली आहे.

या तैल राजाचा मुलगा सत्याश्रय यानें इ. स. ९९७ ते १००९ पर्यंत राज्य केलें. विमलचंद्र नांवाचे जैनाचार्य हे या सत्याश्रयाचे गुरु होते. सत्याश्रय जैनधर्मीय होता असें मानिलें जातें.

या वंशांतील सर्वश्रेष्ठ राजा विक्रमादित्य ऊर्फ त्रिभुवनमल्ल यानें इ. स. १०७६ ते ११२८ पर्यंत ५१।५२ वर्षें राज्य केलें. त्याचा राज्यकाल जसा सुदीर्घ तशीच त्याची कारकीर्दहि यशस्वी ठरली. होयसाल वंशजाप्रमाणेंच यानेंहि आपला राज्यशक सुरूं केला व तो चालुक्य घराण्याच्या अंतापर्यंत चालूं होता. ही एकच गोष्ट त्याच्या प्रभावाची व मोठेपणाची साक्ष देण्यास पुरेशी आहे. राज्याभिषेकापूर्वींहि त्यानें प्रांताधिकारी म्हणून बरींच वर्षें राज्यकारभार चालविला होता. यावरून त्याच्या आयुष्याचा बहुभाग राज्यकारभारांतच गेला होता.

चोल, पांचाल, छेदी व आंध्र वगैरे देशच्या राजाबरोबर विक्रमादित्यास लढावे लागले. या युद्धांत तो नेहमींच विजयी झाला. युद्धाचा काल वगळल्यास राज्यांत शांतता व सुव्यवस्थितता नांदत असल्यानें प्रजा सुखी व संपत्तिमान झाली होती. राज्यकारभाराचें प्रत्यक्ष ज्ञान असावें म्हणून राज्यांतील प्रांतांतून अनेकवार तो फिरती करीत असे. शांतता व सुव्यवस्था यांचेंहि हें एक गमकच आहे.

## विक्रमादित्याचे मांडलिक

बनवासी, गोबूर, सिताबर्डी (नागपूर) सौंदात्ति, कोल्हापूर, कोंकण, कऱ्हाड, गोवा, पलसिगे व पनूमंगळ वगैरे ठिकाणीं विक्रमादित्याचे मांडलिक होते. महामंडलेश्वर जोयिम्मारस व कऱ्हाड, सौंदत्ति, कोल्हापूर व बहुधा कोंकण येथील मांडलिक जैनधर्मीय होते.

कालमुख शैव साधूंनीं आपलीं डोकीं वर उचलण्यास सुरुवात केली होती व त्यांना कांहीं मांडलिकांचा आश्रयहि मिळाला होता; असें शिलालेखावरून मानण्यास जागा आहे. खुद्द विक्रमादित्यांच्या एकदोन दानांस ते पात्र झाल्याचे शिलालेख उपलब्ध झाले आहेत.

या राजाच्या अनेक राण्या होत्या व त्यांपैकीं कांहीं राण्या राज्यांतील मुख्य मुख्य प्रांताच्या ठिकाणीं राहून राज्यकारभारहि चालवीत होत्या. हा राजा राज्यांत वरचेवर फिरतीवर जात असे हें जसें राज्यांतील शांततेचें व समाधानाचें लक्षण समजलें जाईल, त्याचप्रमाणें आपल्या राण्यांना भेटणें हेंहि फिरतीचें दुसरें कारण

असावें. मंगळवेढें (सांगली संस्थान) धरमपूर, डंबल (धारवाड जिल्हा) कल्याण, इंगलगी (निजाम सं.) चिक्ककेरूर (धारवाड) वगैरे ठिकाणीं रहाणाऱ्या राण्यांनीं राज्यकारभार चालविल्याचे उल्लेख मिळतात. यांपैकीं बऱ्याच राण्या जिनमतानुयायी होत्या. खुद्द राजा विक्रमादित्य हा जैनधर्मीय होता. आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात त्यानें शैवदेवदेवतांना कांहीं देणग्या दिल्याबद्दलचे शिलालेख आढळ होतात. यावरून त्याच्या मनाचा ओढा शैवधर्मांकडे असावा असें कांहींचें मत असलें तरी तो शैवधर्मी होता असें मानण्यास हा पुरावा पुरेसा होईल असें नाहीं.

हा विक्रमादित्य धर्मानें जैन होता. निजाम संस्थानांतील हुणसी हडलगे (तालुका गुलबर्गा) येथील श्रीपद्मावती पार्श्वनाथ जिनालयांतील शिलालेखावरून या चालुक्य विक्रमानें इ. स १०९८ मध्यें माळवा प्रांतावर स्वारी करून तेथील राजाचा पराभव केल्याची नवी माहिती मिळत आहे. याच शिलालेखांतील मजकुरावरून अर्हनंदी मुनींच्या तपाचें हृदयंगम असें वर्णन आढळून येत आहे. सदरचें श्री पद्मावती पार्श्वनाथमंदिराचें बांधकाम माळव्यावरील या स्वारीच्या सुमारास पुरें झालें होतें. हें जिनमंदीर विक्रमादित्यानें बांधविलें व अर्हनंदीमुनि आचार्य हे विक्रमादित्याचे गुरु होत.

या गांवचें प्राचीन नांव हडंगिले असें होतें. श्रीक्षेत्र हुणसी हडगले या नांवानें तें हल्लीं प्रसिद्ध आहे. याच पार्श्वनाथमंदिराच्या शेजारीं श्रीशांतिनाथ तीर्थंकरांचें मंदिर असलें पाहिजे असें या शिलालेखांतील मजकुरावरून कळतें. परंतु त्या मंदिराचा मागमूसहि आज दिसत नाहीं.

कोप्पळ–कोप्पण, हडगले वगैरे हल्लींच्या निजाम संस्थानांतील गांवांना पूर्वीं जैन तीर्थक्षेत्राचें महत्त्व प्राप्त झालें होतें; ही गोष्ट विचारांत घेतां महाराष्ट्राच्या या भागांत जैनधर्माच्या प्रसाराची कल्पना येणारी आहे.

विक्रमादित्यानंतर तिसऱ्या सोमेश्वरानें (इ. स. ११२६ ते ११३८) राज्य केलें. यास **सर्वज्ञ** असें संबोधलें जातें. हा जैनधर्मीय होता.

जगदेकमल्ल व तैल तृतीय यांच्या कारकीर्दींत चालुक्य राजसत्तेस ओहोटी लागली. मांडलिक बेगुमान बनून सत्तेच्या केंद्राची आज्ञा अवमानूं लागले. राज्यक्षयाचे वेळचीं प्रायः हींच चिन्हें दिसून येतात. कलचुरी घराण्याचा राज्यस्थापक बिज्जल या वीरशाली व मुत्सद्दी सामंतानें राज्यांतील अंदाधुंदीचा फायदा घेऊन

आपलें राज्य स्थापन केलें. बिज्जलच्या या कार्यांत कोल्हापूर येथील महामंडलेश्वर विजयार्क, प्रोलराज–काकतीय–वगैरे मांडलिकांनीं बिज्जलास मदत केली. तिसरा तैल व प्रोलराज यामध्यें झालेल्या लढाईंत तैल हा प्रोलराजाच्या हातीं सांपडला असतांहि पूर्वसंबंध विचारांत घेऊन तैल यास त्यानें जीवदान दिलें. तैल तेथून अण्णेगिरी ( धारवाड जि. ) येथें गेला व तेथून दूर दक्षिणेकडे निघून जाऊन वनवासी येथें राहिला. तेथील वातावरणही अनुकूल न राहिल्यानें इ. स. ११६२ मध्यें तैल यानें वनवासी सोडली. त्यानंतर त्याच्या पुढील आयुष्याचें काय झालें याबद्दल इतिहासज्ञामध्यें मतभेद आहेत.

## जोल प्रांतीय चालुक्य

या पुस्तकांतील विषयानुरोधानें चालुक्य घराण्याची अत्यंत त्रोटक माहिती दिली आहे. ती माहिती देतांना पूर्व व पश्चिम चालुक्य घराण्यांतील बऱ्याच राज्यकर्त्यांच्या नांवाचा उल्लेख केला आहे. यापुढें ज्या एका चालुक्य शाखेची माहिती दिली आहे, त्यांतील एकाहि राजाच्या नांवाचा उल्लेख यापूर्वीं पूर्व व पश्चिम चालुक्य घराण्याची जी माहिती दिली आहे त्यांत अढळ होत नाहीं.

सुप्रसिद्ध कवि पंप यानें आपल्या **भारत ऊर्फ विक्रमार्जुनविजय** या ग्रंथांत जोलप्रांतावर राज्य करणाऱ्या चालुक्यांची वंशावळ दिली आहे. वि. सं. १०२३ मधील एका ताम्रपटांत दिलेल्या वंशावळीशीं पंपानें दिलेली वंशावळ तंतोतंत जुळत आहे. या ताम्रपटाचा सारांश खालीं दिला आहे; हेतु हा कीं, या घराण्याची अधिक माहिती मिळविण्यास मदत व्हावी.

\+ + + + +

चालुक्याची एक शाखा ‘ जोल ’ नामक प्रांतावर राज्य करीत होती. याच प्रांताचा एक भाग सध्यांच्या धारवाड जिल्ह्यांत मोडतो. चालुक्य अरिकेसरीची राजधानी पुलगेरी ’ येथें होती असें श्रीयुत आर. नरसिंहाचार्य यांचें मत आहे. पुलगेरी म्हणजेच हल्लींचें लक्ष्मेश्वर ( सं. मिरज ) गांव होय. या शाखेची वंशावळ पंपकवीच्या भारत किंवा विक्रमार्जुनविजय व अलीकडे सांपडलेल्या वि. सं. १०२३ च्या एका ताम्रपटावर उपलब्ध झाली आहे. ती पुढील प्रमाणें आहे.

**विक्रमार्जुनविजय–भारत ( वि. सं. ९९८); ताम्रपत्र ( वि. सं. १०२३ )**

| विक्रमार्जुनविजय–भारत | ताम्रपत्र |
|---|---|
| १ युद्धमल्ल | १ युद्धमल्ल |
| २ अरिकेसरी | २ अरिकेसरी |
| ३ नारसिंह | ३ नारसिंह, भद्रदेव |
| ४ युद्धमल्ल | ४ युद्धमल्ल |
| ५ बद्दिग | ५ बद्दिग |
| ६ युद्धमल्ल | ६ युद्धमल्ल |
| ७ नारसिंह | ७ नारसिंह |
| ८ अरिकेसरी | ८ अरिकेसरी=लोकांबिका |
| | १० भद्रदेव–बद्दिग |
| | ११ अरिकेसरी वि सं १०१६ |

वरील भारत ( विक्रमार्जुनविजय ) व ताम्रपत्र यांमध्यें २५ वर्षांचें अंतर असल्यामुळें ताम्रपत्रांमध्यें अरिकेसरी नंतरच्या पुढील दोन राजांची अधिक माहिती मिळते यांत मुळींच आश्चर्य नाहीं. ताम्रपत्रावरून वरील राजांची जी थोडी माहिती मिळते ती यापुढें दिली आहे.

या ताम्रपत्रांत चालुक्य घराणें सूर्यवंशी असल्याचा उल्लेख आहे. चालुक्यवंश चंद्रवंशी असल्याचे अनेक शिलालेखांवरून दिसतें. परंतु या एकाच नवीन उपलब्ध झालेल्या ताम्रपत्रांत चालुक्य सूर्यवंशीय असल्याचा उल्लेख आहे. या वंशाचा युद्धमल्ल नांवाचा राजा सव्वालक्ष प्रदेशाचा स्वामी होता. यानें तेलानें भरलेल्या वापींमध्यें मस्त हत्तींच्या जलक्रीडेचा उत्सव केला होता. याचा पुत्र अरिकेसरी यानें कालिंगत्रय ( त्रिकलिंग अर्थात् तैलंगण ) व वेंगीप्रदेश ( वेंगी राज्याची सीमा; उ. गोदावरी नदी; द. कृष्णा नदी; पूर्वेस समुद्रतट व पश्चिमेस पश्चिमघाट ) याचें रक्षण केलें. याची राजधानी वेंगीनगर होतें. यालाच आज पेड्डवेगी

( गोदावरी जि. ) म्हणतात. नं. ५ बद्दिग यानें पराक्रमशाली भीम नामक राजाला जल युद्धामध्यें अनायासें पकडले होते. नं. ६ युद्धमल्ल हा अत्यंत उदार, पराक्रमी, कीर्तिशाली व प्रतापी होता. नं. ९ अरिकेसरीबरोबर सुप्रसिद्ध राष्ट्रकूट कुल-कन्या लोकांबिका हिचें लग्न झालें होतें. नं. ८ अरिकेसरी हा राज्यकारभार पहात असतांना कानडी भाषेंतील सर्वश्रेष्ठ कवि पंप हा होऊन गेला. पंपाच्या कृतीवर लुब्ध होऊन त्यास या राजानें धर्मपूर नामक एक गांव बक्षीस दिला. पंप हा जैन होता. यानें केलेले दोनच ग्रंथ सध्यां उपलब्ध आहेत. एक **आदिपुराण चंपु** व दुसरा **भारत** किंवा **विक्रमार्जुनविजय भारत**. हा ग्रंथ वि. स. ९९८ मध्यें समाप्त झालेला दिसतो.

त्यावरून त्या समयास नं. ८ अरिकेसरी हा राज्य करीत असावा असें दिसतें; परंतु वरील ताम्रपत्रांवरून वि. सं. १०२३ च्या सुमारास नं. ११ अरिकेसरी हा राज्यावर असावा असें दिसतें. याच ताम्रपत्रांत वि. सं. १०२३ च्या सुमारास यशस्तिलकचंपुकर्ता सोमदेव यास वनिकटुपलु गांव दान दिल्याचा उल्लेख आहे; व हें दान अरिकेसरीनें आपला पिता बद्दिग याच्या "शुभधामजिनालय" नामक मंदिराकरितां केलें होतें. याच सोमदेवास यशोधर चरित्राचा कर्ता असें संबोधिलें असल्यानें हा ग्रंथ वि. सं. १०२३ च्या पूर्वींचा असला पाहिजे. यशस्तिलकाची रचना शक सं. ८८१ मध्यें झाली आहे व त्यावेळीं अरिकेसरीचा पुत्र बद्दिग हा राज्य करीत होता, असा यशस्तिलकचंपुमध्यें उल्लेख आहे, म्हणजे नं. १० बद्दिगच्या कारकीर्दींत यशस्तिलकचंपु हा ग्रंथ लिहिला असावा. बद्दिगचा पुत्र अरिकेसरी यानें वरील ताम्रपत्र लिहविलेला आहे. ज्या बद्दिगच्या कारकीर्दींत यशस्तिलकचंपूची रचना झाली; तो जैन धर्माचा उपासक होता. कारण त्यानें एक 'शुभधामजिनालय' बांधिलेलें होतें; व याच मंदिराकरतां याच्या मुलानें सोमदेवास वरील ताम्रपत्रांत दान दिल्याचा उल्लेख आहे. सोमदेवसुरी हे देवसंग किंवा गौडसंघाचे आचार्य होते. हे तप, शास्त्र व स्याद्वाद यांत पारंगत होते.

समस्त विद्यांचें दर्पण, यशोधर चरित्राचा रचयिता, स्याद्वादोपनिषदाचा कर्ता व सुभाषितांचा निर्माता म्हणून सोमदेवसुरीची ख्याति आहे. यशस्तिलकचंपू व नीतिवाक्यामृतम् या दोन उपलब्ध ग्रंथांशिवाय युक्ति चिंतामणी, त्रिवर्ग महेंद्र मातलिसंजल्प, बण्पवति प्रकरण, स्याद्वादोपनिषद् व सुभाषित संग्रह इत्यादिकांचें कर्तृत्व सोमदेवसूरीकडे असल्याचे उल्लेख मिळतात. हे ग्रंथ अद्याप उपलब्ध

झालेलें नाहींत. सोमदेवसूरी हे मोठे विद्वान्, तार्कीक, महाकवि व धर्माचार्य असून विशाल अध्ययन व उदार विचारशीलता याबद्दल प्रसिद्ध होते. यांचे ग्रंथ अद्यापहि याची साक्ष देत आहेत. सोमदेवसूरी हे निरनिराळ्या राजदरबारीं मानमान्यता पावलेले होते. बद्दिग व अरिकेसरी या दोन्हींहि राजाच्या कारकिर्दींत ते ह्यात होते. बद्दिगची राजधानी गंगाधारा असल्याचा उल्लेख आहे; परंतु याचा पुत्र अरिकेसरी याची राजधानी लेंबुलपाटक (वेमुलवाडा निजामस्टेट) येथें असल्याचा उल्लेख एका ताम्रपटांत आहे. गंगाधारा व लेंबुलपाटक हीं गांवें एकच आहेत कीं भिन्न आहेत हा एक विचारार्ह प्रश्न आहे.

राष्ट्रकूट राजांच्या-काळीं चालुक्य वंश निर्बल झालेला होता. राष्ट्रकूटांनीं त्यांचें सार्वभौमत्त्व हिरावून घेतलें होतें. राष्ट्रकूटांची सार्वभौमसत्ता होती तोंपर्यंत ते त्यांचे आज्ञांकित सामन्त किंवा त्यांचे मांडलिक राजे होते. वरील नं. १० व ११ हे अशा प्रकारचेच सामंत असावेत. वरील वंशवृक्षांतील अ. नं. १० यालाच बद्दिग असेंहि नांव दुसरें असावें असें भारत इ. सं. मंडळ भाग १३ अंक ३ यांत प्रसिद्ध झालेल्या वि. सं. १०२३ च्या ताम्रपटावरून अनुमान निघतें. या ताम्रपटलेखनाच्या वेळीं अ. नं. ११ अरिकेसरी हा सत्ताधीश असून राष्ट्रकूट राजा श्री कृष्णराज देव याचा अंकित असल्याचें बिरुदावलीवरून दिसतें.

या लेखांतील **शुभधाम जिनालय** म्हणजेच लक्ष्मेश्वर येथील सुप्रसिद्ध व विस्तीर्ण जिनालय तर नव्हे ना ! कांहीं कालपर्यंत जैनधर्मप्रसाराचे आद्यस्थानांत लक्ष्मेश्वराची गणना होत होती. येथील या सुप्रसिद्ध जिनमंदिराचा नाश रामानुजानें केला असें इतिहास सांगत आहे. (पहा म्हैसूर गॅझेटिअर व्हॉ. २ भाग २ पान ८९१) कविसम्राट पंप यानें इ. स. ९४१ मध्यें आपला प्रख्यात ग्रंथ **पंप–भारत** (कन्नड) पुलगिरी हल्लींचें लक्ष्मेश्वर येथें लिहिला. त्या गांवचा एक भाग अद्यापहि पुलिकर अगर हूलिकर या नांवानें प्रसिद्ध आहे. विद्येचें, विद्वानांचें व धर्माचें आगर लक्ष्मेश्वर–याजकडे रामानुजाची दृष्टि गेली नसती तरच नवल होतेंऽऽ

## रट्ट-राष्ट्रकूट राज्य व जैनधर्म

महाराष्ट्र हें नांव रट्ट अगर राष्ट्रकूट नांवावरून पडलें असावें असें डॉ. भांडारकर व मि. बर्नेल यांचें मत आहे. सर जॉन फ्लीट यांचें मत या विरुद्ध आहे. सर

फ्लीट यांच्या या मताचें डॉ. भांडारकर यांनीं निर्विवादपणें व यशस्वी रीतीनें खंडन केलें; व त्यावेळेपासून रट्ट अगर राष्ट्रकूट राजांनीं ज्या प्रदेशावर राज्य केलें त्या प्रदेशांस "महाराष्ट्र" असें संबोधण्यांत येऊं लागलें; हें मत सर्वमान्य झालें आहे.

मौर्य अशोक कालीन लेखांतहि महाराष्ट्र या नांवाचा उल्लेख आढळ होत आहे. यावरून अशोक पूर्वकालीं राष्ट्रकूट अगर रट्ट यांचें या भागावर राज्य होतें असें मानावें लागतें. राष्ट्रकूट घराणें हें उत्तर हिंदुस्थानांतील क्षत्रिय घराणें आहे; व याच कुलांत हिंदुपतपादशाही स्थापन करणाऱ्या शिवछत्रपतींचा जन्म झाला असें श्री. पाठक यांनीं प्रतिपादिलें आहे. निझाम संस्थान, बेळगांव व धारवाड वगैरे जिल्हे व त्यांच्या आसपासचीं संस्थानें यांत असणारे व '**रड्डी**' या नांवानें ओळखले जाणारे लोक हे रट्ट अगर राष्ट्रकूटांचे वंशज आहेत असें डॉ. बर्नेलादि इतिहासज्ञांचें मत आहे. सुप्रसिद्ध इतिहासज्ञ श्री. विश्वेश्वरनाथ रेऊ यांना मि. बर्नेल यांचें हें मत ग्राह्य नाहीं. ( पहा–भारत के प्राचीन राजवंश–राष्ट्रकूट )

अशोक पूर्वकालीहि राष्ट्रकूट राज्यकर्ते होते. सातवाहन व चालुक्यादि राजघराण्याच्या काळांत राष्ट्रकूट घराण्यांतील राजांना दुय्यम दर्जा प्राप्त झाला होता व कांहीं ठिकाणीं त्या त्या काळच्या सत्ताधाऱ्यांचें मांडलिकत्व त्यांना पत्करावें लागलें होतें असें इतिहासज्ञांचें मत आहे.

## राष्ट्रकूट घराणीं

मान्यखेट ( हल्लींचें मलखेड, निजाम सं. ), लाट ( गुजराथ ), सौंदत्ति ( बेळगांव जिल्हा ) हस्तिकुंडी, ( जोधपूर संस्थान ) वगैरे अनेक ठिकाणीं राष्ट्रकूटांनीं राज्य केलें. प्रस्तुत विषयाचे दृष्टीनें मान्यखेट व सौंदत्ति खेरीज इतर ठिकाणीं राज्य करणाऱ्या या घराण्यांचा विचार कर्तव्य नाहीं.

## मान्यखेट-राष्ट्रकूट व जैनधर्म.

या घराण्याचा काल इ. स. ५९३ ते ९८५ पर्यंत मानिला जातो. इ. स. ५९३ ते ७५३ पर्यंतच्या काळांत कोणत्या राजांनीं किती काळ राज्य केलें याबद्दलचा इतिहास आज तरी उपलब्ध नाहीं. इ. स. ७५३ ते ९८५ पर्यंत ज्या राष्ट्रकूट वंशजांनीं मान्यखेट येथें राज्य केलें; त्यांचा इतिहास उपलब्ध झाला

आहे. या घराण्याच्या सर्वमान्य वंशावळीवरून या घराण्यांत एकंदर २१ राज्यकर्ते होऊन गेले असें मानिलें जाते परंतु त्यांतील पहिल्या तीन राजाबद्दल कोणतीहि माहिती आज उपलब्ध नाहीं.

या घराण्यांतील राजा तृतीय गोविंद (इ. स. ७९३ ते इ. स. ८०४) याच्या बद्दलचा इ. स. ८१२ चा एक ताम्रपट उपलब्ध झाला आहे; त्यांत या घराण्याच्या पूर्वजांची जी माहिती दिली आहे ती पहिल्या कक्क राजापासून दिली आहे. यावरून या कक्क राजाचा मुलगा इंद्र (दुसरा) व इंद्र राजाचा मुलगा दंतिवर्म अगर दंतिदुर्ग अशी परंपरा मानिली जाते. जैनाचार्य अकलंकदेव यानें ज्याचा **साहसतुंग** म्हणून आपल्या ग्रंथांत उल्लेख केला आहे, तो साहसतुंग व दंतिदुर्ग या व्यक्ति एकच आहेत असें आतां सर्वमान्य झालें आहे. यावरून दंतिदुर्ग हा अकलंक समकालीन होता असें होत आहे. कोल्हापूर संस्थानांतील सामानगड गांवीं मिळालेल्या वि. सं. ७५३ च्या शिलालेखावरून कांची, केरल, चोल, पांड्य, कर्नाटक, कनोज वगैरे ठिकाणच्या राजांचा दंतिदुर्गानें पराभव केल्याचें नमूद आहे. कीर्तिवर्मा सोळंकी चालुक्य-याचा पराभव करून इ. स. ७५३ च्या सुमारास दक्षिणेंत यानें आपलें राज्य स्थापन केलें. यानंतर इ. स. ७५३ ते ९८५ पर्यंत या घराण्याचा राज्यकाल मानिला जातो.

प्रथम कृष्ण राजाच्या काळचे इ. स. ७६८ व ७७२ चे असे दोन शिलालेख उपलब्ध झाले आहेत. हा कृष्ण दुसऱ्या इंद्र राजाचा चुलता होय. इंद्र राजाला पुत्रसंतती नसल्यानें अगर अन्य कोणत्या तरी कारणामुळें दुसऱ्या इंद्रा नंतर कृष्ण (प्रथम) हा इ. स. ७६० ज्या सुमारास राज्याधिकारी झाला असावा असें मानिलें जातें.

अकलंकदेवानें आपल्या विद्वत्तेचें दंतिदुर्गापुढें वर्णन केलें व त्यावरून ते दोघे समकालीन होते असें मानण्यांत आलें आहे. यावरून दंतिदुर्गच्या धर्माची कल्पना होईल. इ. स. ७७५ ते ७७९ पर्यंत गोविंद (द्वितीय) यानें राज्य केलें. श्रीजिनसेनाचार्यांनीं आपल्या हरिवंश पुराणांत त्या काळच्या ज्या राजाचा उल्लेख केला आहे त्यांतील उल्लेखित राजा दुसरा गोविंदच असें मानिलें जातें. श्रीजिनसेनाचार्यांनीं हरिवंशपुराणाची रचना इ. स. ७८३ मध्यें समाप्त केली. जैनाचार्यांना या राज्यांत राजाश्रय होता व त्यामुळें अनेक आचार्यांना ग्रंथ लेखनास व उपदेशास मदत झाली.

या राजघराण्यांतील प्रबल राजांत राजा तृतीय गोविंद (इ. स. ७९८ ते ८१५) व राजा प्रथम अमोघवर्ष (इ. स. ८१५ ते इ. स. ८७८) यांचा प्रामुख्यानें समावेश होतो. गोविंद तृतीय यांचा मुलगा चक्रीरस–राजा–हा गंगवाडी–९६००० चा राज्यकारभार पाहात असतां त्यास झालेलीं शनीची बाधा अर्ककीर्ति या जैनाचार्यांनीं दूर केली. हेच अर्ककीर्ति यापनीय संप्रदायाचे संस्थापक होत. कोल्हापूर, रायबाग, बेळगांव, मलखेड पर्यंतच्या प्रदेशांत या मताचा फैलाव झाला असावा. कोल्हापूर व रायबाग येथील चैत्यालयें या यापनीय सांप्रदायाचे आहेत. दिगंबर व श्वेतांबर या संप्रदायांचा समन्वय करण्याचा प्रयत्न या संप्रदायाच्या नेत्यांनीं केला परंतु ही मध्यस्थी फलद्रूप तर झालीच नाहीं; उलट कांहीं वर्षें तिसराच संप्रदाय अस्तित्वांत राहिला. हा संप्रदाय इ. स. च्या १२ व्या शतका अखेर अस्तित्वांत होता. गंगवाडी हा गंगराजांचा मुलुख असतां तेथील राज्यकारभार राष्ट्रकूट चक्रीराजरस–यांस कां चालवावा लागला होता याबद्दलहि पुरावा उपलब्ध आहे. गंगराजा द्वितीय शिवमार हा राष्ट्रकूट राजांना शरण जाण्यापूर्वी चक्रीराज हा तेथें व्हॉईसराय म्हणून कारभार पाहात होता. शिवमार शरण आल्यानें त्याचें राज्य त्यास परत देण्यांत आलें.

इ. स. ८१३ चा एक ताम्रपट मिळाला आहे. यावरून राजा गोविंदनें गंगवंशिय राजा चक्रिराज याच्या विनंतीवरून अर्ककीर्ति जैनमुनींना गांव दान दिल्याचा उल्लेख आहे. अर्ककीर्तिसंबंधीं वर उल्लेख आलाच आहे. या अर्ककीर्तीचे विजयकीर्ति व विजयकीर्तीचे कुलाचार्य हे गुरु होते अशी गुरुशिष्यपरंपरा या ताम्रपटावरून कळून येत आहे. श्री जिनसेनाचार्यांच्या हरिवंश पुराणांत या राजाच्या नांवचा अनेकवार उल्लेख आला आहे. हे जिनसेनाचार्य पुन्नाग संघाचे आचार्य होते. आदिपुराण व पार्श्वाभ्युदय या ग्रंथाचे कर्ते श्री जिनसेन हे सेनसंघीय होते. नाम साद्धश्यामुळें वाचकांचा गैरसमज होऊं नये म्हणून हें येथें नमूद केलें आहे.

## प्रथम अमोघवर्ष-नृपतुंग-अतिशय धवल.

## ( इ. स. ८१५ ते ८७८ )

आदिपुराणकर्ते श्री जिनसेनाचार्य, उत्तरपुराणकर्ते श्री गुणभद्राचार्य, गणितसार संग्रहाचे कर्ते श्री महावीराचार्य इत्यादि आचार्य अमोघवर्षाचे कारकीर्दीत होऊन गेले व त्यांनीं केलेली ग्रंथ रचना अद्यापहि अद्वितीयच राहिली आहे. प्रश्नो-

त्तर रत्नमालिका नांवचा संस्कृत ग्रंथ व कविराजमार्ग नांवचा कन्नड ग्रंथ असे दोन ग्रंथ स्वतः राजा अमोघवर्षानें लिहिलेले आज उपलब्ध आहेत. कविराजमार्ग या कन्नड ग्रंथाच्या वाङ्मय श्रेष्ठत्वाबद्दल कन्नड वाङ्मय प्रकरणांत थोड्याशा अधिक विस्तारानें माहिती दिली आहे.

श्री. महावीराचार्यांनीं गणितसारसंग्रह या ग्रंथांत अमोघवर्ष राजाच्या नांवाचा आदरपूर्वक उल्लेख केला आहे. गुणभद्राचार्यांनीं आपल्या उत्तरपुराणांत या अमोघवर्ष राजासंबंधीं खालील अर्थपूर्ण श्लोक लिहिला आहे. तो असाः--

यस्य प्रांशूनखांशुजाल विसर द्वारान्तराविर्भव
त्पादां भोजरजः विशंग मुकूट प्रत्यग्र रत्नधुतिः ।
संस्मर्ता स्वमोघवर्षनृपतिः पूतोरमद्येत्यलं
स श्रीमान् जिनसेनपूज्य भगवत्पादो जगन्मगलम् ॥

**भावार्थः**—ज्यांना प्रणाम करण्यांत राजा अमोघवर्ष आपणांस पवित्र समजतो ते जिनसेनाचार्य मंगलस्वरूप होत, इत्यादि. राजा अमोघवर्षानें श्री जिनसेनाचार्यांना आपला गुरु मानिला होता असें यावरून स्पष्ट होत आहे.

श्री जिनसेनाचार्य रचित पार्श्वाभ्युदय काव्यांतहि वरील विधानास पुष्टीच मिळते. या काव्याच्या चौथ्या सर्गात पुढील उल्लेख आहे. 'इत्यामोघवर्ष परमेश्वर परम गुरु श्री जिनसेनाचार्य विरचिते मेघदूत वेष्टिते पार्श्वाभ्युदये भगवत्कैवल्य वर्णनं नाम चतुर्थः सर्गः ।'

यावरून राजा अमोघवर्षाचे श्री जिनसेनाचार्य हे परम गुरु होते हें दिसून येईल. याशिवाय शब्दमणिदर्पण व शब्दानुशासन या ग्रंथांतूनहि राजा अमोघवर्ष हा श्री जिनसेनाचार्यांचा शिष्य असल्याचे उल्लेख आढळ होत आहेत.

प्रश्नोत्तर रत्नमालिका या संस्कृत ग्रंथांत आपल्या स्वतःस उद्देशून राजा अमोघवर्षानें खालील वृत्तांत दिला आहे.

प्रणिपत्य वर्धमानं वक्ष्ये प्रश्नोत्तर रत्नमालिकाम् ।
नागनरामरवंद्यम् देवो देवाधि वीरम् ॥

या ग्रंथरचनेच्या शुभप्रसंगीं राजा अमोघवर्षानें **वीर-वर्धमानांना**-महावीरांना प्रथम नमस्कार केला आहे. यावरून राजा अमोघवर्ष हा जैनधर्मीय होता हें उघड होत आहे. यापुढें राजा अमोघवर्षानें लिहिलें आहे कीं:—

विवेका त्यक्त राज्येन राज्ञेयं रत्नमालिका ।
रचितामोघवर्षेण सुधियां सदलंकृति ॥

भावार्थः—ज्ञानोदय कर्माचा उदय झाल्यानें राज्यपदाचा व राज्याचा त्याग करून मी हा ग्रंथ लिहिलेला आहे.

या वरील आधारानंतरहि राजा अमोघवर्षाच्या धर्माबद्दल कोणास शंका राहील तर ती दूर करण्यास समर्थ कोण ?

धवलजयधवलादि महान् ग्रंथावरील टीका व शाकटायन व्याकरणावरील "अमोघवृति" टीका हे ग्रंथ याच राजाच्या कारकीर्दींत लिहिलें गेलें. वीर्यशौर्यादि दर्शक ज्या अनेक नांवानें अमोघवर्षाला संबोधण्यांत येतें त्यांत **अतिशय धवल** याहि नांवाचा समावेश केला गेला आहे. धवलादि ग्रंथ अगर त्या ग्रंथावरील टीका याचा व राजा अमोघवर्षाची अतिशय धवल ही पदवी यांचा कार्यकारण-भावाचा कांहीं संबंध येतो अगर कसें याचा शोध लावण्याचें कार्य विद्वानांचें व संशोधकांचें आहे.

प्रश्नोत्तर रत्नमालिकेच्या रचनाचातुर्याचा मान राजा अमोघवर्षाकडे न देतां वैदिक धर्मानुयायांनीं तो मान आद्य शंकराचार्यांकडे देण्याचा प्रयत्न केला. श्वेतांबर बंधूंनीं त्याचें कर्तृत्व आपल्या एका आचार्यांकडे देण्याचा प्रयत्न केला. वर उद्धृत केलेले श्लोक हस्तलिखींत प्रतींतून गाळण्यांत आल्यानें ज्यांना त्यांना ही संधि मिळाली; परंतु तिबेट देशांत असलेल्या या ग्रंथाच्या प्रतीनें खरी वस्तुस्थिति जगापुढें मांडण्यास मदत केली. तिबेट देशांतील भाषेंत या ग्रंथाचा अनुवाद करण्यांत आला आहे. त्या अनुवादांत अमोघवर्षानें दिलेला आत्मवृत्तांत आढळ होत आहे.

एलाचार्य–कुंदकुंदाचार्य–रचित कुरल या तामिल भाषेंतील ग्रंथावरहि वैदिक, बौद्ध, फार काय ख्रिश्चन मतानुयायांनीं आपला वारसाहक्क सांगितला होता. रत्न-मालिकेच्या बाबतींत या इतिहासाची पुनरावृत्ति झाली. श्री. काशिनाथ बापूजी पाठक यांनीं कविराजमार्ग या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत राजा अमोघवर्ष हाच रत्न-मालिकेचा कर्ता असल्याचें निर्विवादपणें सिद्ध केलें आहे.

कविराजमार्ग हा अलंकारशास्त्रावरील कन्नड भाषेंतील ग्रंथ आहे. या ग्रंथाचे तीन विभाग केले आहेत. पहिल्या विभागांत काव्यांतील दोषांचे, दुसऱ्या विभा-

गांत शब्दालंकाराचें व तिसऱ्या विभागांत अर्थालंकाराचें विवेचन केलें आहे. या ग्रंथांत तत्पूर्वीच्या कांहीं प्रमुख कन्नड ग्रंथांचा व ग्रंथकर्त्यांच्या नांवाचा उल्लेख आहे. ते ग्रंथ मात्र अद्याप उपलब्ध झाले नाहींत. त्यावरून कविराजमार्ग ग्रंथाच्या लेखनकाळींहि कन्नड भाषेंत बरेंच वाङ्मय तयार झालें असावें असें बिनधोक मानण्यास हरकत नाहीं; तसें नसतें तर कन्नड काव्यांतील दोष दाखविण्याचें कारण तरी कोणतें होतें ? कविराजमार्ग म्हणजे कविमधील राजानें वाङ्मयांतील दाखविलेला मार्ग.

मि. स्मिथ हे आपल्या History of India या पुस्तकांत राजा अमोघवर्ष हा जैनधर्मीयच होता असें स्पष्टपणें आपलें मत नमूद केलें आहे.

## राजधानी

अमोघवर्षानें मान्यखेड – मलखेड – मानकिर ( अरब लेखक ) येथें आपल्या राजधानीची स्थापना केली. राजधानी होण्यापूर्वी मलखेड आस्तित्वांत होतें हें जैनाचार्य प्रभाचंद्रकृत प्रमेयकमलमार्तंड या ग्रंथांतील उल्लेखावरून मानावें लागतें. श्री जिनसेनापूर्वी हे प्रभाचंद्राचार्य राजा अमोघवर्षाचे गुरु होते.

## परप्रांतीय मान्यता

अमोघवर्षाच्या कारकीर्दींत–इ. स. ८५१–मध्यें सुलेमान नांवाचा एक अरब प्रवासी हिंदुस्थानांत आला होता. हिंदुस्थानभर प्रवास केल्यावर त्यानें आपल्या प्रवासवृत्तांत ज्या हिंदी राजाच्या ऐश्वर्याबद्दल लिहिलें आहे, तो राजा अमोघवर्षच होय असें मानिलें जात आहे. या सुलेमाननें बगदादच्या खलिपास पहिला नंबर दिला असून चीनचा बादशाह, तुर्कस्थानचा बादशाह यांना अनुक्रमें दुसरा व तिसरा नंबर दिला आहे. अमोघवर्षाला त्यानें चौथें स्थान दिलें आहे. सूलेमाननें जगांतील ऐश्वर्यमान् राजांत राजा अमोघवर्ष याचा चौथा नंबर लाविला आहे; यावरून राजा अमोघवर्षाच्या मोठेपणाची कल्पना होईल.

## राज्यकारभार धोरण

आपल्या कारकीर्दीचे सुरवातीस अमोघवर्षानें गंगराज घराण्याशीं लढाया केल्या; परंतु पुढील कारकीर्दींत या दोन्ही घराण्यांत अत्यंत सलोखा नांदत असल्याचें दिसतें. या काळीं या दोन्ही जैनधर्मीय राजघराण्यांत अनेक विवाह झाल्याचें शिलालेखावरून दिसून येत आहे.

आतांपर्यंत दिलेल्या हकीकतीवरून अमोघवर्ष हा राष्ट्रकूट घराण्यांतच नव्हे तर हिंदुस्थानांतील त्या काळच्या राजांत मोठा विद्वान्, धार्मिक, वैभवशाली व यशस्वी होऊन राजा गेला. या राजाचे कारकीर्दींत राष्ट्रकूट राज्यांत जैनधर्मरवी मध्यान्हिं गेला.

## द्वितीय कृष्ण

( इ. स. ८७८–९११ )

राज्यत्याग करून अमोघवर्षानें आपलें उर्वरित आयुष्य धर्मध्यानांत व वाङ्मय-सेवेंत घालविलें. अमोघराजाचे हयातींतच त्याचा मुलगा द्वितीय कृष्ण यास यामुळें राज्यपद मिळालें. सुप्रसिद्ध जैनधर्मीय विवादपटु परवादीमल्ल यानें आपल्या नांवची पदवी या कृष्णराजास दिल्याचा शिलालेख मिळाला आहे.

## जक्कियब्बी

नागरखंड (७०) वर राज्य करीत असलेला कृष्णराजाचा मांडलिक नागार्जुन लढाईंत राज्यासाठीं कामास आला. नागार्जुनाच्या मरणानंतर तिच्या नवऱ्याचें मांडलिकत्व त्याची विधवा पत्नी जक्कियब्बी इजकडे चालविण्यांत आलें. नागर-खंडाचा सात वर्षें तिनें व्यवस्थित कारभार चालविला; पुढें प्रकृतीच्या अस्वास्थ्या-मुळें तिनें आपला अधिकार सोडून दिला व सल्लेखनाव्रत घेऊन स्वर्गधाम समीप केलें. तिच्या मरणानंतर तिच्या मुलीनेंहि प्रांताधिकारी म्हणून राज्यकारभार पाहिला.

सबलांची जबाबदारी उत्कृष्ट रीतीनें पार पाडणारी ही एकच अपवादात्मक जैन अबला होऊन गेली असें नाहीं. आद्य तीर्थंकरांच्या सुविद्य कन्या ब्राह्मी व सुंदरी अगर ऐतिहासिक काळांतील सुप्रसिद्ध कलिंगाधिपति सम्राट खारवेल याची राज्ञी, या प्राचीन काळांतील सबला म्हणून सोडून दिल्या तरी अगदीं अली-कडील प्रसिद्ध जैन वीरांगनांचा नामानिर्देश या स्थळीं करणें इष्ट वाटतें. विजय-नगरचें मांडलिकत्व झुगारून देऊन व आपल्या स्वातंत्र्याची द्वाहि फिरवून सरदार **इच्चप्पाच्या** एका वीरकन्येनें **गिरसप्पा** ( प्रसिद्ध धबधब्याचें ठिकाण ) येथें आपलें राज्य स्थापन केलें. यानंतरहि कांहीं स्त्रियांनींच त्या राज्याचा राज्य-कारभार चालविला. इ. सनाच्या १७ व्या शतकाच्या सुरवातीस **भैरवदेवी** ही या राज्याचा अधिकार चालवीत असतां वेंकटय्या या सरदारानें तिच्या राज्यावर स्वारी केली. या युद्धांत लढत असतां तिनें समरांगणावर देहत्याग केला.

गंगवंशाच्या भाग्योदयानें त्याहि राज्यांत ज्या वीरांगना होऊन गेल्या; त्यांत **सावियब्बे** इची प्रामुख्यानें गणना होईल. नवऱ्याबरोबर शत्रुपक्षाशीं लढत असतां ती जखमी झाली व पंचपरमेष्टि नामस्मरण करीत असतां तिचें प्राणोत्क्रमण झालें. श्री. बेळगोळ येथील एका शिलालेखांत याबद्दलचा वृतांत दिला आहे. होयसाल राज्यकाळांतहि अशा वीरांगना होऊन गेल्या. त्याबद्दलचा वृत्तांत होयसाल राजघराण्याच्या वृत्तांतांत दिला आहे.

## तिसरा इंद्र इत्यादि.

तिसरा इंद्र ( इ. स. ९१२ ते इ. स. ९१६ ) हा जैनधर्मीय होता असें शिलालेखावरून दिसतें. तृतीय कृष्ण ( इ. स. ९४० ते ९६६ ) तिसऱ्या कृष्णराजानंतरच्या राजाबद्दल फारशी माहिती उपलब्ध नाहीं. तृतीय कृष्ण हा महाप्रतापी व शूर राजा होऊन गेला. राजादित्य चोल व हा कृष्णराज यांच्यामध्यें इ. स. ९४८ मध्यें घनघोर युद्ध झालें व त्या युद्धांत कृष्णराजास जयश्रीनें माळ घातली. या युद्धाच्या मुळाशीं राज्यतृष्णा नसून चोल राजाच्या धर्मप्रसारास आळा घालण्यासाठीं कृष्णराजास हें युद्ध करावें लागलें. राजादित्य चोल हा शैवोपासक तर कृष्णराज हा जिनमतानुयायी होता.

राजादित्य चोलावरील विजयामुळें राष्ट्रकूट राज्याचा विस्तार अनेक पटीनें होऊन कांची, तंजावर पर्यंत राज्याची सीमाहद्द भिडली. तृतीय कृष्णाचे कारकीर्दींत पुष्पदंत, सोमदेव, इंद्रनंदी वगैरे अनेक जैनाचार्य होऊन गेले. सोमदेवविरचित यशस्तिलक चंपूमध्यें चेर, चोल, पांड्यादि राजांचा विजेता म्हणून या कृष्णराजाचें वर्णन दिलें आहे.

कृष्णराजानंतर त्याचा मुलगा कोट्टिग–नित्यवर्ष ( इ. स. ९६६ – ९७१ ) राज्याधिकारी झाला. हा जैनधर्मीय असून त्यानें एक जिनालय बांधविल्याचा शिलालेख उपलब्ध आहे. याच्या कारकीर्दींत राष्ट्रकूट वैभवसूर्य पाश्चिमेस ढळूं लागला.

या पुढील दोघां दुबळ्या राज्यांच्या परंपरेमुळें राष्ट्रकूट राजसत्ता कमजोर झाली. राज्यांत अराजकता माजली. शेजारच्या राजांनीं उचल खाल्ली. गंगवंशीय राजा मारसिंह यानें राष्ट्रकूटांचे इतरांनीं हरण केलेलें राज्य मिळवून तें चौथा इंद्र ( राष्ट्रकूट राजा ) यास देऊन राष्ट्रकूट राजसत्ता सावरण्यास अत्यंत मोठी मदत केली. या मारसिंहानें राष्ट्रकूट राज्य बुडविलें असें कांहींचें मत आहे. श्री. वैद्य हे आपल्या

' मध्ययुगीनभारत ' यामध्यें चालुक्य तैलप यानें राष्ट्रकूट राज्य बुडविलें असें लिहितात. चौथा इंद्र जिनधर्मीय होता. गंगराज–मारसिंह–यानें राष्ट्रकूट राजा चौथा इंद्र याचा पक्ष घेऊन त्याचें राज्यपद टिकविण्याचा प्रयत्न केला. तो प्रयत्न सफल न झाल्यानें या इंद्रराजानें सल्लेखनाव्रत घेऊन श्र. बेळगोळ येथें इ. स. ९८४ मध्यें समाधि मरण साधिलें.

कांहीं अपवाद वगळल्यास प्रायः सर्वच राष्ट्रकूट राजे व त्यांचे मांडलिक जैनधर्मीय होते असें मानिलें जातें. राजाश्रयामुळें व अनेक जैनाचार्यांच्या उदयामुळें या राजवटींत जैनधर्माचा अत्यंत मोठा उत्कर्ष झाला.

विजयनगर–संगम–घराणें इ. स. १४८६ मध्यें अस्त पावलें. राष्ट्रकूट राजाच्या नाशापासून ( इ. स. ९७८ ) संगम घराण्याच्या अस्तापर्यंतच्या दरम्यानच्या ५०० वर्षांच्या काळांत अनेक राज्यें उदयास आलीं व लयास गेलीं. प्रथम जैन राज्य—गंगवंशीय राज्य--इ. स. १००४ मध्यें लयास गेलें. त्या राज्याच्या अस्ताबरोबर जैनधर्मीयांचा ९०० वर्षांचा आश्रय तुटला. कलचुरी राज्य ११८६ मध्यें लयास गेलें व वीरशैवांना रान मोकळें झालें. इ. स. १३४६ मध्यें होयसाल राज्य लयास जाऊन जैनांचा अखेरचा मोठा राजाश्रय संपुष्टांत आला. अस्तास गेलेल्या राज्यांच्या जागीं चालुक्य, चोल, वगैरे राजघराणीं आलीं. राष्ट्रकूट ते संगम घराणें यामधील ५०० वर्षांच्या कालांत राज्यसत्तेच्या आश्रयाच्या अभावीहि जैनधर्म पूर्ववत आपलें प्राप्तस्थान संभाळून राहिला होता; मात्र इतर धर्मीय जैनधर्माशीं स्पर्धा करण्यास समर्थ ठरूं पहात होते.

सौंदत्तीच्या रट्ट–राष्ट्रकूट–घराण्याचा वृत्तांत इतरत्र दिला आहे.

## राष्ट्रकूट घराण्याचा राज्यविस्तार

उत्तरेस नर्मदेच्या पलीकडील धार, इंदूर, हुशंगाबाद, बडोदा व काठेवाड संस्थान, पश्चिमेस सुरत, मुंबई वगैरेचा भाग, दक्षिणेस गंगराज म्हणजे हल्लीचे म्हैसूर संस्थानची हद्द व नागपूर, चंदा, हैद्राबाद व अनंतपूर भागांत पडणाऱ्या मुलूखांत राष्ट्रकूट राज्यघराणें राज्य करीत होतें. याशिवाय गंगवाडी म्हैसूर संस्थानांतील मुलूख व उत्तरेस हल्लींचा माळवा व बुंदेलखंड म्हणून मानिल्या जाणाऱ्या मुलखावर या घराण्याचें स्वामित्व होतें. यावरून या घराण्याच्या राज्यविस्ताराची भौगोलिक कल्पना येईल.

एवढ्या मोठ्या भौगोलिक क्षेत्रावर या घराण्यानें सुमारें २२५ वर्षे राज्य केलें. या घराण्यांत २१ राजे होऊन गेले. त्यांतहि दंतिदुर्ग, पहिला कृष्ण, ध्रुव, अमोघवर्ष, तृतीय गोविंद, तृतीय इंद्र व तृतीय कृष्ण यांचा प्रामुख्यानें उल्लेख करणें जरूर आहे. अशा कर्तबगार व महत्त्वाकांक्षी राजांची परंपरा इतर कोणत्याहि राजघराण्यांत बहुधा पहावयास मिळणार नाहीं.

मौर्य, गुप्त, चालुक्य, आंध्र वगैरे तत्पूर्वीच्या कोणत्याहि राजघराण्याचा राज्यकाल राष्ट्रकूटा इतका सुदीर्घ झाला नाहीं. प्रतिहार या गुजराथेंतील राजघराण्याचा व दक्षिणेंतील गंगराजघराण्याचा राज्यकाल राष्ट्रकूटापेक्षां अधिक सुदीर्घ होता; तथापि त्यांचा राज्यविस्तार फारच लहान असून राष्ट्रकूट घराण्याला जें महत्त्व प्राप्त झालें होतें तें महत्त्व या वरील दोन्ही दीर्घायुषी राज्यांना केव्हांच प्राप्त झालेलें नव्हतें.

## अपवाद

ज्ञात इतिहासाकडे दृष्टि दिल्यास असें दिसून येईल कीं, उत्तर हिंदुस्थानांतील राज्यसत्ताधिकाऱ्यांनींच सतत दक्षिण हिंदुस्थानवर स्वाऱ्या केल्या. या नियमास दोनच ठळक अपवाद दिसतात. त्यांपैकीं पहिला अपवाद राष्ट्रकूटांचा व दुसरा मराठेशाहीचा. राष्ट्रकूट राजाच्या सैनिकांनीं तीन वेळां विंध्याचल ओलांडून उत्तरेंत आपल्या राज्याचा विस्तार केला होता. राष्ट्रकूट राजाच्या भौगोलिक विस्ताराबद्दल वर जी माहिती दिली आहे त्यावरून राष्ट्रकूट सेनापति व सैनिक यांच्या शौर्यवीर्याची कल्पना येणारी आहे. मोगल राजघराण्याप्रमाणें याहि घराण्यांत एक दुर्लौकिकाची बाब आढळ होते; व ती ही कीं, गादीवर आरूढ होतांना प्रत्येक राजास अनेक घडामोडी कराव्या लागत. रक्तपाताशिवाय त्याला राज्यलाभ झालेला नाहीं, असेंच दिसून येईल. या रक्तपातामुळें व अधिकारयोगाच्या वेळेच्या घडामोडींमुळें राज्यशक्तीवर कायमचाच अनिष्ट परिणाम होऊन राहिला नाहीं. या दृष्टीनें विचार करितां एका बाबतींत मोंगलाशीं साम्य तर परिणामाच्या बाबतींत मोंगलाशीं वैषम्य असलेलें दिसून येईल.

## राष्ट्रकूटांचा धर्म.

प्रथम अमोघवर्ष, कृष्ण व तृतीय इंद्र हे इतर राष्ट्रकूट राजांप्रमाणें जैनधर्मीय होते; निदान ते जैनधर्म, जैनधर्मीय व जैनवाङ्मयाचे आश्रयदाते, चहाते व उपासक होते. राष्ट्रकूटांचे बहुधा सर्वच सामन्त व अधिकारी हेहि जैनधर्मीय

होते. सौंदत्तीचे सामन्त रट्ट हे जैनधर्मीय होते. प्रथम अमोघवर्षाचा सेनानी बंकय व त्याचा सुपुत्र लोकादित्य व तृतीय इंद्राचा सेनापति श्रीविजय हे जैन होते. राष्ट्रकूट राज्यांतील प्रजेपैकीं किमान शेंकडा ३३ अगर बट्ट प्रजेपैकीं ⅓ प्रजाजन जैन होते असें इतिहासज्ञांचें मत आहे. या राज्यांत बौद्ध धर्मीयांची जनसंख्या १०००० पेक्षां अधिक नसावी असेंहि इतिहासज्ञांचें मत आहे.

## जैनधर्माचा उत्कर्षकाल.

राष्ट्रकूटांच्या अमदानींत जैनधर्मउत्कर्षरवी मध्यान्हीं पोहोंचला व तो अस्ताचलाकडे ढळण्यापूर्वी कांहीं शतकें तेथेंच स्थिर राहिला. या स्थिरस्थानापासून त्यास च्युत करण्याचा यशस्वी प्रयत्न फक्त वीरशैव-लिंगायत-धर्मीयांनीं केला व तामील तेलगू प्रांतांतील या यशाचा वांटा शैवधर्मीयांकडे जातो. शैव व वीरशैव यांपैकीं कोणाचे या कामीं योजिलेले उपाय अधिक क्रूर व निर्दयपणाचे होते याची तुलना करूं म्हटलें तरी अंगावर शहारेच उभे राहतातऽऽ.

राष्ट्रकूटांच्या या २२५ वर्षांच्या अमदानींतच जैनधर्मउत्कर्षरवी माध्यान्हीं आला असें नाहीं. पौराणिक कथांतील आधार विचारांत न घेतां व केवळ ज्ञात इतिहासाकडे पाहतांहि असें दिसून येईल कीं राष्ट्रकूट अमदानीच्या सुरवातीपूर्वींहि दक्षिण हिंदुस्थानांत जैनधर्म झपाट्यानें प्रसार व विस्तार पावत होता. राष्ट्रकूट राजघराण्यापूर्वींच इ. स. ५ व्या व ६ व्या शतकांत कदंब राजवटींतहि जैनधर्मवृक्ष फळफुलभारानें नम्र झाला होता. कदंबानंतरच्या ५००-६०० वर्षांचे जे शिलालेख उपलब्ध झाले आहेत त्यावरून चालुक्य राजघराण्यांतील विनयादित्य, विजयादित्य व द्वितीय विक्रमादित्यादि हे राजे जैनधर्मीय होते असें स्पष्ट दिसतें. इ. सनाच्या पहिल्या शतकांत स्थापन झालेल्या गंगराजघराण्याचा इतिहास महशूरच आहे. यावरून इ. स. च्या पहिल्या शतकापासून तों इ. स. ११ व्या शतका अखेर तब्बल १००० वर्षांच्या दीर्घ काळांत जैनधर्मास राजाश्रय मिळत गेला होता. राष्ट्रकूटांच्या अमदानींत त्यानें मध्यान्ह शिखर गांठिलें. राष्ट्रकूटांच्या राज्यनाशानंतर चालुक्यांनींहि त्यास आपला धर्म मानिला.

## अखंड उत्कर्षाचीं कांहीं कारणें

उज्ज्वल कीर्ति, आचार्य व पंडित यांची परंपरा, जैनधर्मविषयक उत्कृष्ट वाङ्मय, लोकांच्या मातृभाषेंत धर्मोपदेश करण्याची व वाङ्मय निर्माण करण्याची

अथा, उपदेशक व ग्रंथलेखक यांचें उत्कृष्ट चारित्र्य व त्याचा राजवाड्यापासून गरिबाच्या झोंपडीपर्यंत झालेला इष्ट परिणाम, तसेंच भट्टारक, मठसंस्था व विद्या-पीठें यांनीं केलेली धर्मजागृति व धर्मप्रसार, राजे, त्याचे मांडलिक व अधिकारी यांचा व राज्यांतील धनिक व विचारी लोकांचा आश्रय इत्यादि कारणसमुच्चयामुळें जैनधर्माचा प्रसार शुक्लेन्दुवत् वाढत वाढत जाऊन राष्ट्रकूट अमदानींत अखिल दक्षिण हिंदुस्थानांत त्यानें आपल्या उत्कर्षाचें मध्यान्हशिखर गांठिलें.

दक्षिण हिंदुस्थानांत ज्या प्रमाणांत या काळीं जैनधर्मानें वैभव मिळविलें तेंच वैभव उत्तर हिंदुस्थानांत जैनधर्मानें इ. स. च्या ११ व्या शतकानंतर राजा कुमरपाल यांच्या कारकीर्दींत मिळविलें. अनेक शतकें हें वैभव दक्षिण हिंदुस्थाननें उपभोगिलें परंतु उत्तर हिंदुस्थानास हें भाग्य फार काळ लाभलें नाहीं.

## राष्ट्रकूट राज्यांतील जैनाचार्य व त्यांचे ग्रंथ

राष्ट्रकूट राजघराण्याच्या अमदानींत जैनधर्मास प्रथमपद मिळण्यास जीं कारणें झालीं त्यांत उज्ज्वल कीर्ति, आचार्य व पंडित यांची परंपरा व त्यांनीं लिहिलेले धर्मग्रंथ यांना अग्रस्थान द्यावें लागणार आहे. हिंदुधर्म पुनरुद्धाराची जी लाट उसळली होती त्या लाटेचा परिणाम जैन धर्मावर या राज्याचे अमदानींत मुळींच झाला नाहीं. त्याचीं मुख्य कारणें दोनच संभवतातः—कदंब, चालुक्य, पश्चिम गंगराजे व राष्ट्रकूट राजे यांच्या व त्यांचे सामन्त, मांडलिक व त्यांचे सत्ताधिकारी वर्गा-च्या आश्रयास पात्र होण्याचें महत्‌भाग्य जैनधर्मास लाभलें. वरील राजघराण्यां-तील अनेक राजे, त्यांचे मांडलिक व त्यांचा अधिकारी वर्ग निःसीम जिनानुयायी होते; व जे जिनानुयायी नव्हते त्यांच्या मनाचा ओढा जैनधर्माकडे होता. या पहिल्या कारणांइतकेंच किंबहुना त्याहूनहि अधिक बलवत्तर कारण म्हणजे उज्ज्वल कीर्ति, आचार्य व पंडित यांची परंपरा, त्यांचा उपदेश व त्यांचे ग्रंथ हे होत. श्री समंतभद्राचार्य, श्री अकलंक देव, श्री विद्यानंद, श्री माणिक्यनंदी, श्री प्रभा-चंद्र, श्री जिनसेन, श्री गुणप्रभ व आदिपंप, पोन्न, रन्न इत्यादि हे आचार्य, पंडित व कवि होत. पंप, पोन्न व रन्न यांनीं कन्नड भाषेंत ग्रंथरचना करून बहुजन-समाजाला त्यांच्या मातृभाषेंत स्वतः धर्मज्ञान करून घेण्याची सोय करून दिली. कन्नड कवि, त्यांचे ग्रंथ, व त्यांची योग्यता याबद्दल स्वतंत्र प्रकरणांत शक्य त्या विस्तारानें लिहिले असल्यानें येथें त्याचा पुनरुच्चार करण्याचें टाळिलें आहे.

## अहिंसा–धर्म व राजकीय पारतंत्र्य

अहिंसा व संन्यास धर्मांच्या सततोपदेशामुळें हिंदुस्थानांतील लोकांची शौर्य-वीर्यादि गुणांशीं फारकत होऊन संसार असार आहे, या शिकवणीचा अनिष्ट परिणाम झाल्यानें स्त्रैण बनलेल्या हिंदुस्थानाला लष्करी सत्तेच्या व ताज्या दमाच्या परकीय सत्तेपुढें निभाव धरितां आला नाहीं व त्यामुळें हिंदुस्थानला राजकीय दृष्ट्या पारतंत्र्य प्राप्त झालें असें कांहीं इतिहासकारांनीं आपलें मत प्रदर्शित केलें. अहिंसा व जैनधर्म विरोधकांनीं या मताचा आपल्या स्वार्थासाठीं जोरानें पुरस्कार केला. हा कार्यकारणभाव चुकीचा आहे हें आम्हीं **जैनवीर** हें पुस्तक लिहून सप्रमाण यथामति दाखवून दिलें; आमची ही विचारसरणी अनेकांना पटलीहि आहे. आमचें हें वरील पुस्तक लिहून झाल्यावर सुप्रसिद्ध हिंदु युनिव्हर्सिटींतील इतिहास विषयाचे अध्यापक डॉ. आळतेकर यांनीं राष्ट्रकूट राजे व त्यांचें राज्य या विषयावर अधिकारयुक्त असें एक पुस्तक प्रसिद्ध केलेलें पहाण्यांत आलें. सदर पुस्तकांत–The Rashtrakuts and Their Times–डॉ. आळतेकर यांनीं अहिंसा व पारतंत्र्य यांचा अन्योन्य संबंध जोडणाऱ्या इतिहासकारांचें मत सप्रमाण खोडून काढिलें आहे; इतकेंच नव्हे तर अहिंसावादी व जैनधर्मीय राष्ट्रकूट राजांनीं व त्यांच्या जैनधर्मीय सेनापतींनीं त्या काळीं अनुल्लंघनीय मानलेला विंध्याचल त्रिवार ओलांडून उत्तर हिंदुस्थानांत आपला राष्ट्रध्वज यशस्वी रीतीनें फडकाविला असें सप्रमाण व साधार दाखविलें आहे. दक्षिण हिंदुस्थानांतील राजांनीं उत्तर हिंदुस्थानवर स्वारी केल्याचें पहिलें उदाहरण राष्ट्रकूट राज्यांतच घडून आलें. या संबंधीं डॉ. आळतेकर लिहितात कीं ' It is very often asserted that the gospels of Ahimsa and Sanyas that were popularised by Jainism and Buddhism, have ultimately resulted in the enslavement of India for the last 1000 years. ' (प. पा. ३१५) या आक्षेपाचें वैय्यर्थ त्यांनीं ३१६ वर विशद करून दाखविलें आहे. ते लिहितात कीं:– ' It must be remembered that Jainism preaches the doctrine of Ahimsa in a more extreme form than Buddhism, and yet the history of the Deccan of our period shows that it had no emasculating effect upon its followers. "

या वरील दोन्ही इंग्रजी उताऱ्यांचा सारांश हा कीं, **अहिंसा** व **संन्यासधर्म** यामुळें गेलीं एक हजार वर्षें हिंदुस्थान पारतंत्र्यांत खिचपत पडला आहे, असें वारंवार प्रतिपादिलें जातें; परंतु दक्षिण हिंदुस्थानचा राजकीय इतिहास पाहतां या धर्मांच्या उपदेशामुळें जनता स्त्रैण बनली होती असें मुळींच दिसत नाहीं. सत्य वस्तुस्थिति व धर्मतत्त्वज्ञान यांचा विचार करून डॉ. आळतेकर यांनीं वरीलप्रमाणें आपलें मत दिलें आहे. जैनधर्मीय शूरवीर राजे, सेनापति व सामन्त यांपैकीं कांहीं ठळक व्यक्तींचा नामनिर्देश या विधानाच्या पुष्ट्यर्थ त्यांनीं केला आहे. कदंब वंशीय राजा कृष्णवर्मा हा जैनधर्मीय असतांहि **रणप्रिय** या विशेषणानें त्यास शिलालेखांत संबोधिलें आहे. अनेक वेळ अकिंचन व्रताची दीक्षा घेणारा व शेवटीं संन्यास व्रत घेणारा राष्ट्रकूट राजा प्रथम अमोघवर्ष यास विगवल्ली रणक्षेत्रापासून अहिंसा धर्मानें परावृत्त केलें नाहीं ना ? याच राजाचा बनवासी येथील जैनधर्मीय सुभेदार व सेनापति बंकेय हा मोठा धोरणी व शूर सेनापति होऊन गेला. राष्ट्रकूट राजा तृतीय इंद्र व त्याचे सेनापति श्री विजय व नारसिंह हे निःसीम जैनधर्मीय असतांहि त्यांनीं अनेक युद्धें केलीं व मध्य हिंदुस्थानांत राष्ट्रकूट सेना नाचविली. सल्लेखनाव्रतधारि राजा नारसिंह यानें १०० लढायांत भाग घेतल्याचें शिलालेखावरून दिसतें. गंगराघजराण्यांतील अनेक राजांनीं अनेक लढायांतून निःशंकपणें भाग घेतला होता. डॉ. आळतेकर यांनीं दिलेलीं उदाहरणें वर दिलीं आहेत. अशीं आणखी शेंकडों उदाहरणें देऊनहि ही पुरी यादी करितां येणें शक्य नाहीं. राष्ट्रकूट राजघराण्याच्या समकालीन गंगराजघराणें व त्या राज्यांतील वीर शिरोमणी चामुंडरायादि सेनापति व त्या नंतरच्या होयसाल राजघराण्याचे हुल्लादि मंत्री व त्यानंतरच्या विजयनगर साम्राज्यांतील अनेक शूर जनधर्मीय सेनापति यांच्या वीर्यशौर्यादि गुणांची परंपरा पाहतां अहिंसा धर्म व पारतंत्र्य यांचा अन्योन्य संबंध जोडूं पाहणारे इतिहासक व आपल्या मतलबासाठीं त्यांच्या त्या मताची री ओढणारे लेखक यांचीं मतें कशीं साफ चुकीचीं आहेत हें स्पष्ट दिसून येईल.

व्यवहार व अनुभवाच्या या कसोटीवरच डॉ. आळतेकर थांबले नाहींत; ज्या त्या धर्मांच्या अनुयायांवर ज्यांच्या त्यांच्या धर्मतत्वाचा कितपत परिणाम होतो; हीहि कसोटी लावून पाहण्याचा प्रयत्न डॉ. आळतेकर यांनीं केला आहे. प्रत्येकाच्या चारित्र्यघडणीवर जे अनेक आघात होतात त्यांत धर्मतत्त्वज्ञानाचा कांहीं परिणाम

होतो; हें खरें असलें तरी चारित्र्य घडणींत धर्मतत्त्वाखेरीज इतर परिस्थितीचा परिणाम होतच नाहीं असें मात्र खास म्हणतां येणार नाहीं. ख्रिश्चन धर्मांतहि आकिंचनव्रत व क्षमाधर्म यांचें महत्व जैन व बौद्धधर्मांइतकेंच प्रतिपादिलें आहे; परंतु रोजचा अनुभव पाहतां तो अत्यंत कटू व त्या धर्ममताशीं नितांत विरोधी व उलटा असा आढळ होत आहे. ख्रिश्चन लोकांसंबंधीं जें म्हणतां येईल तेंच महंमदी धर्मानुयायासंबंधींहि म्हणतां येईल. **आपलें स्त्रैण व आपली नादान वृत्ति धर्माच्या मोठ्या नांवाखालीं झांकण्याचा मोह अनेक वेळां अनेकांना होतो व अशा प्रसंगावरून कोणतेंहि मत बनविणें इष्ट नाहीं.** या वादाचा समारोप करितांना डॉ. आळतेकर यांनीं आपलें जें ठाम मत दिलें आहे तें त्यांच्याच शब्दांत सांगणें अधिक उचित होईल. पान ३१७ वर डॉ. मजकूर लिहितात कीं, "In the face of the achievements of the Jain princes and generals of our periods, we an hardly subscribe to the theory that Jainism and Buddhism were chiefly responsible for the military emasculation of the population that led to the fall of Hindu India." सारांश या काळांतील राजेरजवाडे व त्यांचे सेनापति यांची रणांगणावर गाजलेली कीर्ति व कार्यें पाहतां जैन व बौद्ध धर्मांच्या अहिंसा व संन्यास धर्मांच्या शिकवणीनें शौर्यवीर्यादि त्यांच्या गुणावर व त्या राज्यांतील जनतेच्या मनावर परिणाम झाला असावा असें मानितां येणार नाहीं. हिंदुस्थानला जें राजकीय पारतंत्र्य प्राप्त झालें त्याचीं कारणें या धर्मांच्या अहिंसा तत्त्वाच्या शिकवणुकींत नसून त्याचीं कारणें दुसरींच आहेत असें डॉ. आळतेकरांचें स्पष्ट मत आहे. ( **जैनवीर** या पुस्तकांत आम्ही हीं कारणें विशद केलीं आहेत. )

इतक्या स्पष्ट व निर्भिड अभिप्रायानंतरहि अहिंसा तत्त्वज्ञानाचा व हिंदुस्थानच्या पारतंत्र्याचा बादरायण संबंध यापुढें कोणी जोडूं पाहतील तर त्यांच्या या अशा प्रतिपादनाकडे दुर्लक्ष करणेंच बरें.

## लोकशिक्षण.

राष्ट्रकूट राज्यांत बहुजन समाजाच्या शिक्षणासाठीं जैनधर्मीयांनीं केलेल्या प्रयत्नाबद्दल डॉ. आळतेकर यांनीं जें मत प्रदिपादिलें आहे, तें अत्यंत विचारार्ह असल्यानें त्याचीहि ओळख वाचकांना करून देणें जरूर आहे. ग्रंथकार म्हणतात कीं, The Jains seem to have taken an active part in the education of the masses" ( पहा पान ३१० ) जैनधर्मीयांनीं बहुजन समाजाच्या शिक्षणांत सर्व प्रकारें भाग घेतला होता, या विधानास प्रत्यंतर पुरावा म्हणून डॉ. नीं जें एकच व प्रमुख कारण दिलें आहे तें अत्यंत विचारार्ह व दूरगामी आहे. शिक्षणारंभापूर्वीं वियादेवता श्रीगणेश यांना अभिवादन करणें हें हिंदुधर्मीयांस उचित आहे; परंतु आजकालहि श्रीगणेशायनमः या ऐवजीं **ॐ नमः सिध्येभ्यः** असा पाठ प्रथम घालून देण्याची प्रथा आजहि दक्षिणेंत आहे व हा पाठ जैनधर्मसूचक आहे. आज अनेक शतकें हा पाठ व्यवहारांत प्रचालित रहावा याचें एकच कारण व तें हें कीं, बहुजन समाजाच्या शिक्षणाच्या बाबतींत जैनधर्मीयांनीं केलेले बहुविध प्रयत्न हे होत.

या राजवटीकडे कोणत्याहि दृष्टीनें पाहिल्यास त्यांत जैनधर्मांच्या उदात्त शिकवणीचीं अनेक स्पष्ट प्रत्यंतरें पहावयास मिळतात.

# प्रकरण नववें.

## दक्षिण भारतांतील दुय्यम राजघराणीं



मध्यप्रांतांतील सर्वांत प्रबल राजवंश म्हणजे कलचूरि हा वंश होय. या वंशाचें प्राबल्य आठव्या व नवव्या शतकांत वाढलें. एके वेळीं कलचुरी साम्राज्य बंगालपासून गुजराथपर्यंत व बनारस पासून कर्नाटकपर्यंत फैलावलें होतें. कलचूरी वंश प्रथमपासूनच जैनधर्मांचा पोषक होता. कलभ्रानीं कर्नाटकावर चढाई करून चोल, चेर व पांड्य राजांचा पराभव करून आपले राज्य स्थापिलें असें पांचव्या व सहाव्या शतकांतील अनेक पांड्य व पल्लव शिलालेखावरून दिसतें. कलभ्र वंशी राजे जैनधर्मांचे अनुयायी होते व त्यांचा तामील देशांत प्रवेश झाल्यामुळें तेथें जैनधर्मांची फार उन्नति झाली असें रामस्वामी अयंगार यानीं वेल्वीकुडी ताम्रपत्रावरून व तामील भाषेंतील 'पेरिया पुराणम्' यावरून सिद्ध केलें आहे. या राजापैकीं एकाचें नांव किंवा उपनांव 'कल्वर कल्वम' होतें. या घराण्याचे वंशज अद्याप विद्यमान आहेत व त्यांना कलार म्हणतात. कलभ्र ही कलचुरी वंशाची एक शाखा असावी. कलचुरी संवत् इ. सन २४८ पासून सुरू होतो यावरून पांचव्या शतकांत यांची दाक्षिणेंत स्वारी होणें संभवनीय दिसतें.

मध्यप्रांताचें कलचूरी राजे जैनधर्मांचे पोषक होते; याचें आणखी एक प्रमाण हें आहे कीं, त्यांचा राष्ट्रकूट राजाशीं फार दृढ संबंध होता व राष्ट्रकूट वंश जैनधर्मांचा मोठा उपासक होता. या दोन राजवंशांमध्यें अनेक विवाहसंबंध झाले होते. कृष्णराज द्वितीय यानें चेदि राष्ट्राचा राजा कोकल्लदेव याच्या राजकुमारी बरोबर विवाह केला होता. कृष्णराजाचा पुत्र जगत्तुंग याचा विवाह कोकल्लाचा पुत्र शंकरगण्णा याच्या दोन राजकुमारीबरोबर झालेला होता. याप्रमाणें इंद्रराज व अमोघवर्ष यानीं कलचुरी राजकुमारी बरोबर विवाह केले होते. कलचुरी राजधानी त्रिपुरी व रतनपूर येथें आजहि अनेक प्राचीन जैन मूर्ति सांपडतात. इसवी सन ११८० पर्यंत या वंशांतील राजे जैनधर्मांचे निस्सीम उपासक होते यांत मुळींच संशय नाहीं. (पहा राजपुतानेके प्राचीन जैनस्मारक, भूमिका)

या घराण्यांतील धवल, महाधवल, प्रासिद्ध धवल वगैरे राजांच्या नांवाशीं धवलादि सुप्रसिद्ध ग्रंथराजांचा संबंध येतो अगर कसें हें ठरविणें इतिहासज्ञ व संशोधक यांचें काम आहे. मध्यप्रांतांतील या घराण्यानें दक्षिणेंत आपलें राज्य-स्थापनेच्या मुळाशीं केवळ राज्यतृष्णाच होती अगर दुसरें कांहीं राजकीय कारण होतें याचा विचार करणें कर्तव्य आहे. वेल्विकुडी येथील ताम्रपट व पेरिया पुराण यांच्या आधारें प्रो. अय्यंगार यांनीं प्रतिपादिलें आहे कीं, शैव धर्मानुयायांच्या छळास कंटाळलेल्या जैनधर्मीयांनीं मध्यप्रांतस्थ या जैन राजांना दक्षिणेवर स्वारी करणेस पाचारण केलें असावें. हें प्रतिपादन खरें मानिल्यास जैनांच्या वर्चस्वाची व त्यांच्या छळाची कल्पना येणार आहे.

## कलचुरी

प्रस्तुत विषयांशीं या घराण्यांतील ज्या राजाचा प्रथम संबंध येतो त्या बिज्जल राजाच्या पित्याचें नांव परमादि व आजाचें नांव जोगम. सदाचार व नीति यांत मनूलाही परमादीनें मागें टाकिले होते असें शिलालेखांत त्याचें गुणवर्णन आहे. जोगमबद्दलची कोणतीहि माहिती आज तरी उपलब्ध नाहीं. इसवी सन ११२८ च्या एका शिलालेखा आधारें असें म्हणतां येईल कीं परमादि यानें चालुक्य तृतीय सोमेश्वर याच्या कारकीर्दींत विजापुराजवळील भागाचा राज्यकारभार चालविला होता. या घराण्यांतील विख्यात पुरुष **बिज्जलदेवच** होय. चालुक्य घराण्याच्या अस्तापासून या घराण्यांत स्वतंत्र राज्यपद आलें. इसवीसन ११५६ च्या एका शिलालेखांत चालुक्य तृतीय तैल, याचा बिज्जलदेव महामंडलेश्वर असलेचें नमूद आहे; तथापि याच शिलालेखांत सर्व चालुक्य राज्यावर त्याची सत्ता चालत असल्याचें स्पष्टपणें नमूद केलें आहे; मात्र इ. सन ११५८ च्या दुसऱ्या एका शिलालेखांत कलचुरी शक २ असा उलेख तर आहेच परंतु त्या बरोबरच **कलचुरी भुजबळ चक्रवर्ति त्रिभुवनमल्ल** अशा स्वातंत्र्य निदर्शक पदवीनें बिज्जल देवास संबोधिलें आहे. यावरून इ. स. ११५६ नंतर बिज्जलदेवानें आपणांस स्वतंत्र राजा म्हणवून घेण्यास सुरवात करून आपल्या घराण्याचा शक सुरू केला असें म्हणण्यास प्रत्यवाय दिसत नाहीं. इ. स. ११५६ पासून बिज्जलदेवानें स्वतंत्र राजा म्हणून राज्यकारभार करण्यास सुरवात केली होती; तथापि त्या पदाचा खरा उपभोग यापूर्वींच घेण्यास सुरवात झाली होती व चालुक्य तृतीय तैल हा केवळ नामधारी राजा बनला होता, असें इतिहासज्ञांचें मत आहे. इ. ११५५ च्या

सुमारापासून बिज्जलाचें महत्त्व प्रत्ययास येऊं लागलें. इ. स. ११५१ च्या एका शिलालेखांत बिज्जलच्या नांवाचा उल्लेख आहे व बिज्जलच्या नांवाचा प्रथम उल्लेख दाखविणारा हाच आज उपलब्ध शिलालेख होय. इ. स. ११५६–११६२ च्या दरम्यानच्या काळांत त्याचें राजेपण राज्यभर मान्य झालें. दरम्यानच्या चालुक्याच्या अनेक मांडलिकांनीं बिज्जलचें सार्वभौमत्त्व सुखासुखीं व एकाएकीं मान्य केलें असें नाहीं. इ. स ११६२ नंतर मात्र ही परिस्थिति बदलून बिज्जलदेवाचें सार्वभौमत्त्व मान्य झालें. चालुक्य घराण्याचा इतिहास देतांना याबद्दल थोडासा अधिक खुलासा दिला आहे. इ. स. ११६२ पर्यंत स्थीरस्थावर होऊन बिज्जलदेव या धडपडींतून मुक्त होतो न होतो तोंच त्यास दुसऱ्या एका शत्रूशीं झगडावें लागलें; याचा वृतांत थोड्या विस्तारानें पुढें दिला आहे.

## बसव–बसवेश्वर

कलचुरी राजघराण्याची सत्ता इ. स. ११५६ ते ११८६ पर्यंत फक्त तीसच वर्षें टिकून राहिली हें खरें असलें तरी या तीस वर्षांच्या अल्पावधींतच दक्षिण हिंदुस्थानच्या इतिहासकांना अनेक महत्त्वाच्या व दीर्घकाळ परिणामकारक अशा अनेक घडामोडी झाल्याचें आढळून येईल.

## बसवाचा बिज्जल दरबारीं प्रवेश

बसवाच्या शास्त्रज्ञानावर व त्याच्या इतर गुणांवर लुब्ध होऊन बिज्जलचा प्रधान दंडनायक बलदेव यानें आपली मुलगी बसवास दिली. बसवाचीं धर्ममतें पसंत न पडल्यानें लोकांचा रोष टाळण्यासाठीं त्यास स्थलांतर करावें लागलें. दरम्यान बसव याचा सासरा बलदेव दिवंगत झाला. मरणसमयीं त्याच्या इच्छेप्रमाणें बिज्जलनें त्यास राजधानीस बोलावून सासऱ्याची जागा त्यास दिली. बसवाशीं आपला अधिक जवळचा संबंध घडावा म्हणून बिज्जलनें आपल्या धाकट्या बहिणीचें बसवाशीं लग्न करून दिलें. बसवाच्या कुमारी बहिणीच्या पोटीं याच सुमारास एक मुलगा जन्मला. मावळ्यापेक्षांहि तो स्वरूपवान् असल्यानें त्याचें नांव चन्नबसव असें ठेविलें. चन्नबसवानें बसवाच्या धर्मप्रसारकार्यांत मदत केली. (पहाः–म्हैसूर गॅझेटियर व्हॉल्यूम २ भाग, दुसरा पान ८७६).

अनेक दैवी चमत्कारामुळें बसवाच्या लोकप्रियतेंत भर पडली. दुष्काळग्रस्तांसाठीं दामाजीनें जें केलें असें आपण दामाजी नाटकांत पाहतो त्याहिपेक्षां अद्भुत चमत्कार बसवानें करून दाखविले. बसवाच्या या दैवी चमत्काराचें विस्मरण न झाल्यानें दामाजीच्या पदरीं अशाच चमत्काराची शक्ति बांधली असावी, असें म्हटल्यास तें चुकीचें होणार नाहीं. राजदरबारांतील त्याच्या सत्तेचाहि परिणाम होऊन त्याच्या अनुयायांची संख्या वाढत चालली. चन्नबसवानेंहि बसवाच्या या मतप्रसारकार्यांत भाग घेतला. अशा रीतीनें ३६ हजार जंगम त्याच्या भोंवतीं गोळा झाले व वीरशैव मताच्या प्रसारकार्यास झपाट्यानें सुरवात झाली. अर्थातच बिज्जल व बसव यांचें बिनसलें व त्याचा परिणाम काय झाला याबद्दल बसवपुराण व बिज्जल चरित् यांत नमूद झालें आहे. बिज्जल राजाचा वध झाला अगर बिज्जलानें राज्यत्याग केला याबद्दल जसा वरील दोन्ही ग्रंथांत मतभेद आहे तद्वतच बसवाचा शेवट कसा झाला याबद्दलहि मतभेद आहे. तसेंच बिज्जलनें आपल्या बहिणीचा विवाह बसवाशीं केला होता; अगर बसवाच्या रूपसुंदर बहिणीशीं बिज्जलानें लग्न केलें होतें याबलद्दहि मतभेद आहेत.

## बसव याचा अंत–जैन–कथा.

धरणी धरणेंद्र पंडित यानें इ. स. १६५० च्या सुमारास लिहिलेल्या **बिज्जल राज चरित्** या ग्रंथांत खालीलप्रमाणें हकीकत दिली आहे. कोल्हापूरच्या भोजराजावर स्वारी करून परत येत असतां बिज्जलाच्या सैन्याचा भीमा तटाकीं मुक्काम पडला. दामाजीच्या मंगळवेढ्यांत बिज्जलदेवाचा मुक्काम यावेळीं झाला होता अशी एक आख्यायिका आहे. बिज्जलास विषप्रयोग करण्यासाठीं जैनवेषधारी एका जंगमाबरोबर एक विषारी आंबा बसवानें पाठविला. त्याचा अनिष्ट व अपेक्षित परिणाम होऊन बिज्जल मेला. मरणसमयींच्या बिज्जलाच्या आज्ञेनुसार त्याच्या मुलानें बसवाचा ससैन्य पाठलाग केला. शत्रू हातीं सांपडून मरण येण्यापेक्षां आत्महत्त्या करणें इष्ट वाटून बसवानें कानरा जिल्ह्यांतील यल्लापूर गांवानजीकच्या एका खेड्यांतील विहिरींत अब्रुसंरक्षणार्थ उडी घेऊन जीव दिला. उडी घेतांना ‘उळिवेनु’ ‘सुटलों’ ‘मुक्त झालों’ असें अखेरचे उद्गार त्यानें काढले व यावरून त्यानंतर त्या गांवास **उळिवी** असें नांव पडून वीरशैवाच्या तीर्थक्षेत्र स्थानाचें महत्त्व त्या गांवास प्राप्त झालें आहे.

## बसव पुराण-कथा

बसव पुराणांतील कथा अशी आहे कीं, धर्माभिमानास बळी पडून बिज्जलानें बसवाच्या दोघां पट्ट शिष्यांचा वध केला. याचा सूड म्हणून बिज्जलाचा वध करण्याची बसवानें जगदेव यास आज्ञा केली व जगदेवानें आपल्या एका स्नेह्याच्या मदतीनें हें शतकृत्य पार पाडिलें. आपल्या अनुज्ञेप्रमाणें जगदेवानें बिज्जलाचा खून केल्याची सुवार्ता ( १ ) ऐकण्याचा योग बसवास कृष्णा व तुंगभद्रा यांच्या संगमाच्या ठिकाणीं लाभला. ही वार्ता ऐकून कृतकृत्य झालों असें वाटलेल्या बसवानें शंकराची मनोभावानें प्रार्थना केळी. आपल्या शिष्याच्या या कृत्यानें संतुष्ट झालेल्या शंकरानें त्यास आपल्या उदरीं स्थान दिलें-बसव शिवैक्य झाला.

बसव पुराणाचा अर्थ इतर कसाहि करोत पण बसवानें आपल्या अन्नदात्या धन्याचा विश्वासघातानें खून करविला ही गोष्ट निर्विवाद आहे. ज्या पुण्य पुरुषाचें प्रातःस्मरण म्हणून जैनधर्मीय महिला प्रतिदिनीं जात्यावर त्याच्या वधानंतर शेंकडों वर्षें त्याचें गीत गात आहेत अशा त्या बिज्जलदेवाचा त्याच्या नोकराकडून वध व्हावाऽऽ या वधानंतर तरी वीरशैव मतप्रचारकांनीं कोणतें धोरण स्वीकारलें होतें हें वाचीत असतां अंगावर शहारे आल्याखेरीज राहत नाहींत. हिंदुस्थानच्या नोकरींतून निवृत्त झाल्यानंतर स्टोक्स नांवाच्या एका इंग्रज गृहस्थानें लंडन येथें " An historical account of Belgaum District " या नांवाचें एक पुस्तक छापून प्रसिद्ध केलें आहे; त्यांत वीरशैवानीं जिनानुयायांच्या केलेल्या छळाचें जें वर्णन दिलें आहे त्यांत लिहिलें आहे कीं, धर्मप्रसारार्थ म्हणून मारलेल्या जैनांची शिरगणती करण्यास सुलभ जावें म्हणून अशा लोकांच्या दातांचें पेंव भरण्यांत आलें व त्या पेवावरून शिरगणतीचा अंदाज बांधला गेला; तसेंच लिंगायत धर्मस्थापनेंमुळें ब्राह्मणधर्मप्रसारास अत्यंत जबर धक्का बसला. कल्याण-कलचुरी-राज्याच्या लयामुळें दक्षिणेवर स्वारी करण्यास मुसलमानांना सुवर्णसंधि मिळाली; इत्यादि.

बिज्जलानंतर त्याचा वडील मुलगा सोविदेव ऊर्फ सोमेश्वर यानें इ. स. ११६७ ते ११७६ पर्यंत व त्यानंतर सोमेश्वराचा भाऊ संकमदेव यानें इ. स. ११७७ ते ११८० पर्यंत राज्य केलें. संकमदेवानंतर त्याचा भाऊ आहवमल्ल यानें इ. स. ११८० ते ११८३ पर्यंत राज्य केलें. आहवमल्लानंतर त्याचा भाऊ शिंगणदेव हा राज्याधिकारा-

वर असतां चालुक्याचा सेनापति दंडनायक ब्रह्म यानें कलचुरी राज्य बुडविलें. बिज्जलानंतरचे हे राजे जैनधर्मानुयायी राहिले.

## अनिष्ट परिणाम

बिज्जलाच्या वधामुळें मुसलमानांना दक्षिणेंत पायंडा घालण्यास संधि मिळाली. राजा बिज्जलाच्या वधामुळें दक्षिणेंत धार्मिक बाबतींत स्पर्धा माजून राहिली. या स्पर्धेच्या दुफळीचा मुसलमानांनीं फायदा घेतला. वीरशैवांनीं जैनधर्मीयांचा जरी अनान्वित छळ केला तरी धार्मिक बाबतींत वीरशैवधर्माला त्यावेळीं अग्रस्थान मिळवितां आलें नाहीं; फक्त जैनधर्माचा तो एक प्रतिस्पर्धी धर्म होऊन राहिला.

यावरून अगदीं दक्षिणेंत शैव व वैष्णवाशी व कांहीं भागांत बौद्धाशीं व ब्राह्मणांशीं एकाच वेळीं जैनांना धार्मिक व राजकीय क्षेत्रांत झगडावें लागलें. शतकानुशतकें असा झगडा चालवून जैन हतबल झालें तर नवल तें काय ?

या वेळीं महत्त्वाची एक गोष्ट नमूद केल्याखेरीज हें प्रकरण संपाविणें योग्य होणार नाहीं. जैनधर्मीयांनीं मात्र राजसत्ता व समाजांतील आपला दर्जा यांचा दुरुपयोग करून धर्मप्रसारकार्य केल्याचा दाखला आजवर उपलब्ध झाला नाहीं व पुढेंहि तो होणार नाहीं; मग इतरांच्या अनन्वित छळांची गोष्ट तर दूरच.

## रट्ट—राजे व जैनधर्म

चालुक्य द्वितीय तैलप यानें राष्ट्रकूट राज्य बुडविलें. ( इ. स. ९७३ ) राष्ट्रकूटाचें प्रबळ राज्य जरी लयास गेलें तरी त्याच्या अस्तित्वकाळीं त्या राज्यघराण्याच्या ज्या शाखा इतरत्र राज्य करीत होत्या, त्यापैकीं सौंदत्ति—सुगंधवति—व नंतर बेळगांव—वेणुग्राम—येथें राज्य करणारे रट्ट—राष्ट्रकूट—हें दक्षिण हिंदुस्थानांतील राज्यघराणें होय.

रट्ट राज्याची सुरवात बेळगांव जिल्ह्यांत इ. स. ९ व्या शतकाच्या मध्याच्या सुमारास झाली. ह्या रट्ट राजांनीं इ. स. ८५० ते ११७० पर्यंत प्रथम राष्ट्रकूट व पश्चिम चालुक्य यांचें मांडलिक म्हणून व इ. स. ११७० पासून देवगिरी यादवांच्या उदयापर्यंत स्वतंत्र राज्यकर्ते म्हणून या भागावर राज्य केलें. इ. स. ७५३ चे सुमारास जेव्हां राष्ट्रकूट राजानें पश्चिम चालुक्य राजाचा पाडाव केला तेव्हां चालुक्याच्या इतर राज्याबरोबर हा प्रांतहि राष्ट्रकूटांच्या ताब्यांत गेला. त्यांची राजधानी

प्रथम सुगंधवति म्हणजे बसरगड तालुक्यांतील सौंदत्ति ही होती; व पुढें इ. स. १२१० च्या सुमारास वेणुग्राम-बेळगांव-ही त्यांची राजधानी झाली. इतिहासज्ञ या रट्ट घराण्याच्या दोन शाखा मानितात. त्यांपैकीं पहिल्या शाखेंत फक्त ४ च राजे होऊन गेले. या पहिल्या शाखेंतील प्रथम राजा मेरड याचा कालनिर्णय झालेला नाहीं. मेरडचा पुत्र पृथ्वीराम याचा इ. स. ९७५ चा एक शिलालेख मिळाला आहे. पृथ्वीरामास **महासामन्त** ही बहुमानाची पदवी इ. स. ९४० च्या सुमारास मिळाली असावी असा तज्ञांचा कयास आहे. पृथ्वीरामाचे पुत्र पिट्टुग व शांतिवर्मा. पश्चिम चालुक्य द्वितीय तैलप राजाचा शांतिवर्मा हा मांडलिक होता. दुसऱ्या शाखेंत चौदा राजे होऊन गेले. यांपैकीं ११ वा राजा तृतीय कार्तवीर्य याच्या शिलालेखांत त्यास **चक्रवर्ति** या पदवीनेंहि संबोधण्यांत आलें आहे. याचे कारकीर्दींत चालुक्य व कलचुरी राजसत्ता नष्ट झाल्यानें यानें आपणांस चक्रवर्ती असें म्हणविलें असावें; मात्र तेरदळ येथील इ. स. ११२३ च्या शिलालेखांत यास **महामंडलेश्वर** या पदवीनेंच संबोधिले आहे. या शाखेंतील चौदावा राजा द्वितीय लक्ष्मीदेव याचा इ. स. १२२८ चा एक शिलालेख मिळाला आहे. याच्या कारकीर्दीचा अखेर कालनिर्णय करण्यास फारसें साधन अद्याप उपलब्ध झालेलें नाहीं. यांचे शिलालेख बेळगांव जिल्ह्यांत भोज, संकेश्वर, कल्होळ, कोन्नूर, सौंदत्ति, सोगल, रायबाग, लोकापूर वगैरे अनेक ठिकाणीं सांपडतात. यावरून त्यांची राजपद्धति कशी होती हें समजण्यास फार मदत होते. आपल्या कांहीं शिलालेखांत हे रट्ट आपणास राष्ट्रकूट म्हणवून घेतात व एकदोन शिलालेखांत राष्ट्रकूट कृष्ण दुसरा (८७५-९११) याच्या वंशातले आपण आहोंत असें मानतात; परंतु बहुतेक शिलालेखांत रट्ट नांवानेंच तें आपल्यास संबोधतात. ते बहुतकरून तेथेंच वास्तव्य करून असलेले रट्ट जातीचे लोक असावेत. ते धर्मानें जैन होते. त्यांच्या राष्ट्रीय झेंड्यावर गरुडाचें चिन्ह होतें. व त्रिवली हें त्यांचें संगीत वाद्य होतें.

चालुक्य राजा सहावा विक्रमादित्य याचा सौंदत्ति व बेळगांव भागांचा महामंडलेश्वर दुसरा कार्तवीर्य हा होता व याचा समकालीन कुंडी देशाचा दंडनायक गोंक अगर गोंकरस यानें तेरदळ ( सं. सांगली ) येथें नेमिनाथ तीर्थंकारांचें मंदिर बांधविलें व याच वेळीं कोल्हापुरास याच चालुक्य राजाचा निंब अगर निंबरस हा शिलाहार वंशीय सामंत होता. महामंडलेश्वर, कार्तवीर्य, सामंत निंबरस व गोंकरस हे जैन धर्मानुयायी होते; असें तेरदळ येथील शिलालेखावरून

स्पष्ट होत आहे. या शिलालेखांतील याबद्दलचा पहिला भाग ता. १२–४–११२३ रोजीं लिहिला आहे. इ. स. ११८८ मध्यें शिलालेखाचा दुसरा भाग लिहिला असून त्यांत तेरदळ भागाचा सेनापति तेजुगुदेव व त्याचा मुलगा भाईदेव यांच्या पराक्रमांचें व अनेक जैनपंडितांच्या बिरुदावलींचें वर्णन आहे. सेनापती तेजुगु-देव व भाईदेव हे जैन होते हेंहि या शिलालेखावरून निर्विवाद सिद्ध होत आहे.

## कोल्हापूरचे शिलाहार राजे

### ( १०५० ते ११२० )

कोल्हापूरच्या शिलाहार राजांच्या अमलाखालीं इ. स. १० व्या शतकाच्या अखेरीपासून तेराव्या शतकाच्या आरंभापर्यंत कोल्हापूरच्या आसपासचा मुलूख व बेळगांव जिल्ह्याचा वायव्य भाग असें होतें. त्यांचे लेख कोल्हापूरास, मिरजेस व बेळगांव जिल्ह्याच्या अथणी तालुक्यांतील शेडबाळ या गांवीं सांपडलें आहेत. उत्तर कोंकण प्रांतांतील त्यांच्या भाईबंदांप्रमाणें कोल्हापुरचे शिलाहारहि विद्याधर जिमूतवाहनापासूनच आपली मूळ उत्पत्ति आहे असें मानितात. या विद्याधर जिमूतवाह यानें आपल्या देहाचा गरुडास मोबदला (बळी) देऊन शंकचूड नामक एका नागाचा जीव वांचाविला अशी कथा आहे. कोंकणच्या शिलाहाराप्रमाणें कोल्हापूरच्या शिलाहारांचाहि ध्वज सुवर्णगरुडच आहे. कोल्हापूरचे शिलाहार जैनधर्मी असून, त्यांची कुलस्वामिनी कोल्हापूरची महालक्ष्मी होती, असें मुंबई इलाख्याचे गॅझिटीअर ( पुस्तक नं. २४ ) वरून स्पष्ट दिसतें. या वंशांतील पांचवा राजा भंभा-याचें वर्णन अरब इतिहासज्ञ मसूदी यानें आपल्या वृत्तांतांत दिलें आहे, यावरून त्याचें महत्त्व न सांगतांहि कळणारें आहे. या घराण्यांतील दुसरी प्रसिद्ध व्यक्ति म्हणजे दुसरा भोजराज होय. इ. सनाच्या १२ व्या शतकांत हा भोजराजा होऊन गेला. कलचुरी राजघराण्याशीं यानें अनेक युद्धें केलीं, राजसत्तेसाठीं चालुक्य व कलचुरी या घराण्यांत चाललेल्या झगड्याच्या काळांत या भोजराजानें आपले सम्राट चालुक्य राजे यांचा पक्ष घेतल्यानें कलचुरी राजाबरोबर लढावें लागलें असावें असें दिसतें. याच भोजराजानें कोल्हापुरांत–आपल्या राजधानींत–अनेक जिन मंदिरें बांधविलीं. त्याची साक्ष आजहि तीं देत आहेत. याच वंशांतील 'निंबरस' निंबराजा याचा ' सामन्त ' म्हणून तेरदळ येथील शिलालेखांत उल्लेख आहे. सैधांतिक माघनंदी आचार्य हे या निंबरसाचे गुरु होते. डॉ. भांडारकर यांच्या

मनें कोल्हापूरचे शिलाहार वेदानुयायी होते. ते परधर्मसहिष्णु असल्यामुळें जैन व शवपंथी लोकांना त्यांच्यापासून काडीचाहि त्रास झाला नाहीं. डॉ. भांडारकर यांचें मत ग्राह्य नाहीं, हें हल्लीं उपलब्ध झालेल्या शिलालेखावरून स्पष्टपणें दिसून येत आहे. ते जैनधर्मीच होते याबद्दल आतां तिळमात्र देखील शंका उरलेली नाहीं.

## म्हैसूर राजवंश व जैनधर्म.

म्हैसूर राजवंश, जैनधर्म, व श्रवण बेळगोळ यांचा निकटचा व जिव्हाळ्याचा संबंध असल्याचें इतिहास ग्वाही देत आहे. बेळगोळ मंदिरांची भूमि फार दिवसांपासून गहाण पडली होती. ही गोष्ट म्हैसूरनरेश महाराज चामराज यांच्या नजरेस आल्यानंतर चेन्नन्नादि लोकांना बोलावून मंदिरांची भूमि सोडून देण्यास सांगितलें. त्यांनीं श्रीगोमटस्वामी व आपले गुरु चारुकीर्ति यांच्या समोर सर्व भूमि ऋणमुक्त केल्याचें सांगितलें. राजानें त्यावेळीं ज्या लोकांना बोलाविले होते त्यामध्यें भुजबली चरिताचा कर्ता पंचबाण कवीचा पुत्र बोगय्य व कवि बोमण्ण हे होते. लेख नं ८४ ( शक सं. १५५६ ) मध्यें वरील गोष्टीचा उल्लेख करून क्षेत्रसंपत्ति गहाणदान देणेघेणेविषयीं मज्जाव करण्यांत आल्याचा उल्लेख आहे, या गोष्टीच्या निर्यणाकरितां महाराजा चामराज बेळगोळास गेला असावा. चिदानंद कवीच्या **मुनिवंशाभ्युदय** काव्यामध्यें या राजाच्या बेळगोळ यात्रेचें वर्णन खालीलप्रमाणें दिलें आहे. " म्हैसूर राजा चामराज बेळगोळास आला व गर्भगृहास जाऊन गोमटेश्वराचें दर्शन घेतां झाला. पुन्हां द्वाराजवळ येऊन दोन्ही बाजूचे शिलालेख वाचवून घेतले. चामुंडराय बेळगोळास कसा आला व आपला गुरु नेमिचंद्र याच्या प्रेरणेनें त्यानें गोमटेश्वरास एक लक्ष न्याण्णव हजार उत्पन्नाच्या ग्रामाचें कसें दान केलें त्याची माहिती त्यानें सर्वांना समजावून सांगितली. त्याच्यानंतर सिद्धर बस्तीमध्यें राजा गेला व तेथील लेखावरून जैनाचार्यांची वंशावली, त्यांचें महत्त्व व त्यांचें कार्य याचा त्यानें परिचय करून घेतला. त्यानें गुरु भट्टारक कोठें गेले आहेत म्हणून विचारिलें ! मंदिराच्या अध्यक्षांपैकीं बम्मण कवि यानें उत्तर दिलें कीं, जगदेव नामक तेलगू सामन्ताच्या त्रासामुळें गोमटेश्वराची पूजा बंद झाली आहे व गुरु चारुकीर्ति हे भैरवराजाच्या रक्षणाखालीं भल्लातक ( गेरूसाघे ) पुरामध्यें राहतात. हें ऐकून राजानें चारूकीर्ति गुरूंना बोलावून आणण्यास सांगितलें. नंतर त्यानें भंडार बस्तीचें दर्शन घेतलें व चंद्रगिरविरलि सर्व

मंदिरांचें दर्शन घेऊन तो सेरिंगपट्टणास ( श्रीरंगपट्टण ) गेला. पदुमण शेट्टी व पदुमण पंडित यांना पंडित चारुकीर्ति यांना आणण्यास भल्लात्कीपुरास धाडून दिलें. त्यांच्याबरोबर जाऊन भट्टारकानें राजाची भेट घेतली व राजानें त्यांना बेळगोळास सत्कारपूर्वक पाठविलें व आपल्या वचनानुसार दान केलें. वरील वर्णनांत ज्या जगदेवाचा उल्लेख आलेला आहे, तो चेन्नपणाचा सामन्त राजा होता. शक सं. १५५२ मध्यें चामराजानें त्याचा पराभव करून त्यास पदच्युत केलें होतें.

श्र. बे. लेख नं. ४४४ मध्यें चिक्कदेव राजा ओडैअर यानें बेळगोळ मध्यें एक कुंड कल्याणी बांधविल्याचा उल्लेख आहे. लेख नं. ८३–( शक सं. १६४५ ) मध्यें कृष्णराज ओडेअर याचा बेळगोळमधील आगमनाचा, गोमटेश्वराकरितां बेळगोळादि कांहीं ग्रामांच्या दानाचा व चिक्कदेव राजकृत कुंडाजवळील दानशाळेकरितां कवाले नामक ग्राम दान दिल्याचा उल्लेख आहे. गोमटेश्वराचें दर्शन घेऊन राजा फार प्रसन्न झाला, व पुलकित गात्र होऊन त्यानें उक्त ग्राम दान दिलें, असें त्याच लेखांत वर्णन केलें आहे. अनन्तकविकृत गोमटेश्वर चरितामध्यें या राजाच्या बेळगोळयात्रेसंबंधीं वर्णन आहे.

वेळोवेळीं बेळगोळ येथील गुरूंना–भट्टारकांना–तिसरा कृष्णराज ओडेअर यानें दिलेल्या कांहीं सनदा आहेत. (पहा. ले. नं. ४३३ व ४३४) यांपैकीं पहिली सनद राजाचा मंत्रि पूर्णय्या यानें दिलेली आहे; व त्यांत प्रथम कृष्णराज ओडेअर यानें केलेल्या दानाचें समर्थन आहे. दुसरी सनद स्वतः कृष्णराज राजानें दिलेली आहे. यामध्यें बेळगोळ येथील समस्त मंदिरांचा खर्च व जीर्णोद्धार करण्याकरितां तीन ग्रामांचें दान केल्याचा उल्लेख आहे. या लेखांत सर्व मंदिरांची संख्या ३३ दिलेली आहे. विंध्यगिरीवर आठ; चंद्रगिरीवर सोळा, गांवामध्यें आठ व मल्लेपूर पहाडावर एक. यापूर्वीं मठाला मंदिरांच्या खर्चाकरितां व जीर्णोद्धाराकरितां राजापासून १२० गांवांचें उत्पन्न मिळत असे, परंतु या कार्यास हें पुरेंसें नसल्यामुळें राणीनें पंडितांच्या विनंतीवरून आणखी तीन गांवांचें दान केल्याचा उल्लेख आहे. याच राजाच्या वेळचा आणखी एक लेख आहे. मुंड राजाचा एक वंशज व कृष्णराजाचा एक प्रधान अंगरक्षक याचा मृत्यु गोमटेश्वराच्या मस्तकाभिषेकाच्या दिवशीं झाला. यानंतर त्याच्या मुलानें गोमटेश्वरीं प्रतिवर्षी पूजा होण्याकरितां दान दिल्याचा वृत्तांत शि. ले. नं. ९८ (सं. १७४८) यांत मिळत आहे.

हल्लींचे महाराज कृष्णराज ओडेअर (चतुर्थ) यांचें नांव तिथीसहित चंद्रगिरींच्या शिखरावर इ. स. १९०० मध्यें ते बेळगोळ येथें आल्याचें स्मारक म्हणून अंकित झालेलें आहे.

## कोंगाल्व वंश

कोंगाल्व राजांचें राज्य अर्कल्गुद तालुक्यांतील कावेरी व हेमवती या नदींच्या मधील प्रदेशावर होतें. यांचे लेख शक सं. ९४२ पासून १०२२ पर्यंतचे पहावयास मिळतात. यांच्या दक्षिणेस चंगल्व राज्य होतें. या वंशाचा सर्वांत चांगला परिचय ले. नं. ५०० मधील राजांच्या पदव्यांवरून कळून येतो. यांत या वंशाचा राजा राजेंद्र पृथ्वी यांचे ' समधिगत पञ्चमहाशब्द ' ' महामंडलेश्वर ' ' ओरेपुर पुरवराधीश्वर ' ' चोलकुल दयाचल, गभास्तीमाली ' व ' सूर्यवंश शिखामणि ' असें वर्णन दिलें आहे. कोंगाल्व राजा सूर्यवंशी होता व त्याची चोलवंशापासून उत्पत्ति झाली असें यावरून स्पष्ट दिसतें. यावरून चालुक्य हे चंद्रवंशयि नसून ते सूर्यवंशी होते असें इतिहासज्ञांचें जें अनेक कारणांवरून मत बनलें आहे, यास या शिला-लेखावरून पुष्टी मिळत आहे. ओरेपूर ( त्रिचनापल्ली नजीक ) व उरगपूर येथें चोल राजाची प्राचीन राजधानी होती. या वंशाच्या शिलालेखावरून आतांपर्यंत निम्नलिखित राजांचीं नांवें व समय उघडकीस आलेलीं आहेत.

## बाडिव कोङ्गल्व

राजेंद्रचोल पृथ्वीमहाराज इ. स. १०२२, राजेंद्रपृथ्वी कोङ्गल्व अद्दटरादित्य १०६६ ते ११००, त्रिभुवनमल्ल चोल कोङ्गल्व अदटरादित्य—११००

अद्दटरादित्य जैनधर्मावलंबी होता, हे श्र. बे. लेख नं. ५०० (शक १००१ ) व अन्य लेख यावरून स्पष्ट होत आहे. उक्त लेखांत उभयसिद्धांत रत्नाकर प्रभाचंद्र सिद्धांत देवाच्या कीर्तिउल्लेखानंतर असें लिहिलें आहे कीं, अद्दटारादित्य राजा राजेंद्रपृथुवी कोङ्गल्व यानें गणविमुक्त सिद्धांत देव यांच्याकरितां एक चैत्यालय बांधविलें. हा लेख चतुर्भाषाविज्ञ सांधिविग्राहक नकुलाचार्यानें लिहिलेला आहे. श्र. बे. लेख नं. ४९८ हा त्रिभुवनमल्ल चोल कोङ्गल्व यांच्या वेळचा आहे.

## चङ्गल्व वंश

या वंशांतील राजांचें राज्य पश्चिम म्हैसूर व कुर्ग या भागावर होतें. ते आपणांस यादव वंशयि म्हणवीत. त्यांचें प्राचीन स्थान चङ्गनाडु (आधुनिक हणसूर तालुका)

हें होतें. श्र. बे. लेख नं. १०३ मध्यें या वंशांतील एक राजा कुलोत्तुंग चङ्गल्व याचा मंत्रि महादेव याच्या मुलानें गोमटेश्वराच्या वरील खंडाळ्याचा शक सं. १४२२ मध्यें जीर्णोद्धार करविला असा उल्लेख आहे. या राजाचा उल्लेख आणखी एका शिलालेखांत ( क. ४ हणसूर ६३ ) पाहावयास मिळतो.

## निडुगल वंश

निडुगल राजे सूर्यवंशी असून ते आपणांस करिकाल चोलाचे वंशज म्हणवीत असत. ते ओरेपुराधीश्वर ही उपाधि धारण करीत असत. ओरेपूर ( त्रिचनापल्ली-जवळ ) चोल राजांची प्राचीन राजधानी होती. यांना चोल महाराज असेंहि म्हणत असत. यांची राजधानी पेंजरी होती. अनंतपूर जिल्ह्यांतील हेमवती हें गांव म्हणजे प्राचीन पेंजरी होय. होयसाल राजा विष्णुवर्धन यांच्यावेळीं या वंशाचा एक " संगोल " नांवाचा राजा राज्य करीत होता. श्र. बे. ले. ख. नं. ४२ मध्यें जयकीर्ति सिद्धांत देवाचा हा शिष्य असल्याबद्दल व त्याचा विष्णुवर्धनानें पाडाव केल्याबद्दल श्र. बे. ले. ख. नं. १३८ मध्यें उल्लेख आहे.

वरील राजघराण्याखेरीज बेळगोळ येथील कांहीं शिलालेखांमध्यें आणखीहि कांहीं राजांचा व राजवंशांचा उल्लेख मिळतो. ले. नं. १५२ मध्यें अरिष्टनेमी गुरूच्या समाधि मरणसमयीं **दिंडिकराजा** उपस्थित होता असें वर्णिलें आहे. दिंडिकाचा उल्लेख आणखीहि एका लेखांतहि आलेला आहे. हा लेख सुमारें इ. स. ८०० चा आहे; व वरील लेख नं. १५२ हा त्यापेक्षांहि २०० वर्षें प्राचीन असावा. ले. नं. १४ च्या नागसेन प्रशस्तीमध्यें **नागनायक** नांवाच्या एका सामन्त राजाचा उल्लेख आहे. ले. नं. ५५ मध्यें लिहिलें आहे कीं, प्रभाचंद्र **धाराधीश भोजद्वारा** व यशकीर्ति **सिंहल नरेशद्वारा** संमानित झाले होते. अकलंक देवानें **हिमशीतल** राजाच्या सभेमध्यें बौद्धांचा पराभव केला, व चतुर्मुख देवानें **पांड्य नरेशद्वारा** स्वामी ही पदवी मिळविली असें ले. नं. ५४ मध्यें कथन केलें आहे. ले. नं. ३७ मध्यें **गरुडकेशीराज** व नं. २९६ मध्यें **बालादित्य वत्सनरेश** यांचा उल्लेख आहे. ले. नं. ४० मध्यें **सामन्त** केदार नाकरस **कामदेव** व **निंबदेव** हे माघनंदीचे व दंडनायक **मरियाणे** व **भटत** व **बूचिसण्य** व **कोरय्य** हे गण्डविमुक्त देवाचे शिष्य असल्याचा उल्लेख आहे. निम्ब हा माघनंदीचा शिष्य असल्याचा उल्लेख तेरदळ येथील शिलालेखांत ( इ. स. ११२४ आहे. ) **सैधांतिक चक्रवर्ति** ही बहुमानसूचक

पदवी माघनंदीस मिळाल्याचेंहि या शिलालेखावरून दिसतें. शुभचंद्राचा शिष्य पद्मनंदी यानें आपल्या ' एकत्वसतती ' मध्यें या निम्ब राजास ' सामन्त चूडामणि ' असें संबोधिलें आहे. ले. नं. ४७७ मध्यें सिंगापनायक व नं. ४१ मध्यें बेलकेरेचा राजा **गुम्मट** यांचा उल्लेख आहे. गुम्मटानें शुकचंद्र देवाच्या निषिधि दुरुस्त करविल्या होत्या. ले. नं. १०५ मध्यें **हरियण** व **माणिकदेव** हे दोन सामन्त राजे पंडिताचार्यांचे शिष्य झाल्याचा उल्लेख आहे.

या पुस्तकांत चोळ, चोर, पल्लव वगैरे राजघराण्यांच्या नांवाचा उल्लेख अनेकवार आला आहे. त्या घराण्यांची निदान अंधुक तरी कल्पना यावी म्हणून पुढील माहिती दिली आहे; ती वाचकांना बोधप्रद होईल अशी आशा आहे.

खारवेल व अशोक शिलालेखांवरून इ. स. पू. तिसऱ्या शतकापूर्वी दक्षिण भारतांत पांड्य, चोल व चेर या राजघराण्यांचें अस्तित्व होतें हें निर्विवादपणें सिद्ध झालें आहे. जैनधर्मग्रंथहि या गोष्टीस पोषकच आहेत. करकण्डु चरित्रामध्यें हे राजवंश जैनधर्मानुयायी होते असा उल्लेख आहे. करकण्डु हा चंपा येथील राजा होता. यानें आपल्या दिग्विजयामध्यें दक्षिणेंतील राजवंशांबरोबर युद्धें केलीं; परंतु ते जैनधर्मानुयायी असल्याचें कळल्याबरोबर पश्चात्ताप पावून हरण केलेलें त्यांचें राज्य त्यांना परत देऊन टाकिलें. यावरून असें दिसतें कीं, दक्षिणेंतील क्षत्रिय वीरांनीं प्राचीन काळापासून जैनधर्माचा स्वीकार केला होता; वर उल्लेखिलेल्या करकण्डु राजानें बांधलेली एक गुंफा धाराशिव ( उस्मानाबाद ) पासून तीन मैलांवर एका डोंगरांत सांपडली आहे. त्या गुंफेंत पार्श्वनाथाची बैठी मूर्ति आहे. जवळच आणखीहि सहा गुंफा आहेत. वरील करकुंडचरित्रावरून " तेरनगरींत नील व महानील नांवाचे राजे होते. तेरच्या दक्षिणेस धाराशिव असून तें जिनेंद्रदेवाचें भुवनच आहे. जैनधर्मधुरंधर करकंडु राजानें आपली आई व बालदेव यांच्या नांवानें तीन लेणीं कोरविलीं व मोठ्या समारंभानें तेथें जिनबिंब प्रतिष्ठा केली. धाराशिवापासून तेर आठ मैलांवर आहे. तेथें महावीर स्वामींचें जुनें मंदिर आहे. इ. स. च्या पहिल्या शतकापासून तेर नगरी विख्यात आहे. त्यावेळचें तिचें नांव नगर होतें. इराणी प्रवाशांनीं या नगरीचें वर्णन केलें आहे. अकराव्या शतकापर्यंत हें शहर फार भरभराटींत होतें. तर्णानदी कांठचें हल्लींचें उत्तरेश्वराचें मंदिर पूर्वी जिनालय होतें. " ( महावीर चरित्र पान १३० ) यावरून करकंडु राजानें या भागावर स्वारी करून तेथील राजांना आपलें सामन्त केलें; व आपलें स्मारक करून ठेविलें असावें असें दिसतें.

इ. स. दुसऱ्या शतकांतील पांड्य राजांचा युनान–इराण–देशचे बादशाहा-बरोबर संबंध आला होता. एका पांड्य राजानें आपले राजदूत बादशाह ऑगस्टस याचे दरबारीं पाठविले होते. त्यांच्याबरोबर एक नग्न श्रमणाचार्यहि युनान देशास गेले होते. यावरून त्यावेळचा राजा जैन असून मोठा प्रभावशाली असावा असें दिसतें. पांड्य राजधानी मदुरा ही जैनांचें केंद्र होतें. चौथा पांड्यराज 'उग्रपेरवलुटी' (सन १२८–१४०) यांच्या राजदरबारामध्यें जैनाचार्य कुन्दकुन्द प्रणीत तामिल काव्य कुरल यांचें पठण होत असे. या कुरल ग्रंथाबद्दल यापूर्वी जरूर ती माहिती दिलीच आहे. पल्लवराजामहेंद्रवर्मन याचा समकालीन पांड्य राजाहि जैन होता याची चोल राणी शैव होती. तिच्यामुळें तो पुढें शैव झाला. इ. स. १२५० मध्यें बारकुर नगरचा राजा भूतलपांड्य हा जैन होता. या वंशाचे अन्य राजेहि जैन होते; त्यामध्यें वीरपांड्य प्रसिद्ध आहे. यानें इ. स. १४३१ मध्यें कारकल येथें गोमटेश्वराची विशाल मूर्ति स्थापित केली. श्रवण बेळगोळ येथील श्रीबाहुबलीच्या मूर्तीच्या खालोखाल वीरपांड्य राजाची ही कृति आहे.

## चोल राजवंश

हा वंश प्रथमतः जैनधर्मानुयायी होता; पण पुढें त्यांतील राजांनीं त्या धर्माचा त्याग केला. तथापि ते परधर्मसहिष्णु असल्यामुळें ते जैनधर्मीयांचा आदर राखीत असत. कुर्ग व म्हैसूरच्या मध्यवर्ति प्रदेशावर राज्य करणारे चंगलवंशी राजे मांडलिक असूनहि ते जैनधर्मानुयायी होते. त्यास महामंडालिक, मण्डलेश्वर म्हणत. या वंशांत राजेंद्र, मोदवन्ना, कुलोत्तुंग, उदयादित्य वगैरे प्रसिद्ध राजे झाले. चोलांना युद्धामध्यें सहाय्य करून या राजांनीं चोलसत्ता वाढीस लावण्यास सहाय्य केलें होतें.

'सांतारवंशा' ची उत्पत्ति उग्रवंशाच्या जिनदत्त रायापासून झाली असें मानतात. प्रथमतः या वंशांतील राजांची राजधानी हुमस येथें होती. पद्मावती-मुळें आजहि या गांवचा विसर जैनांना पडलेला नाहीं.

पुढें कारकल ही त्यांची राजधानी झाली. सान्तलिगे ही त्यांची जन्मभूमि असावी. या वंशांतील राजे कधीं कदंब राजाचे सामन्त होते तर केव्हां केव्हां स्वतंत्र होते. या वंशांतील जगदेव हा फार प्रसिद्ध होता. राजा बिज्जलानें याच्यावर स्वारी करून त्यास आपला सामन्त केलें होतें. तुलुव देशावर राज्य

करणारे हे राजे जैन होते असें बुचानन साहेबांचें मत आहे. कारकल येथील राजांपैकीं सोरय भैरव नायक यानें इ. स. १२२० च्या सुमारास तुलव देशावर स्वारी करून तेथील आलुप राजांना अंकित केलें होतें म्हणून त्यांना तुलव देशावर राज्य करणारे असें संबोधिलें जातें.

' चेरवंश ' हा प्राचीन कालापासून जैनधर्माचा उपासक होता. नंतरच्या कालांत चेरवंशांतील राजांची राजधानी वांगी होती. ' एलिन ' येथील ' राज-राजव पेरमल ' हे या वंशाचे राजे होते, व ते आपल्या पूर्वजांप्रमाणें जैनधर्माचे भक्त होते.

' धरणीकोटा ' चे राजेहि जैनधर्मानुयायी होते. त्यामध्यें कोटभीराज, कोटकेतकराय, आदि राजे प्रसिद्ध आहेत.

' पल्लववंशां ' तील राजे कांचीपूर ( ' कांचीवरम् ' ) येथें राज्य करीत होते. प्राचीन काळीं कांचीपूर हेंहि जैनांचें एक केंद्र होतें. ज्यावेळीं चिनी प्रवाशी हुइन्नसांग येथें आला होता त्यावेळीं येथील प्रजा वीरधर्मी, न्यायप्रिय, व विद्येमध्यें श्रेष्ठ असून येथें जैनांचें प्राबल्य होतें, असें त्यानें त्यांचें वर्णन केलें आहे. पल्लवराजवंशामध्यें जैनधर्मास आश्रय मिळाला होता. श्री विमल चंद्राचार्य हे पल्लवराजाचे गुरु होत. या वंशांतील प्रसिद्ध राजा महेंद्रवर्मन हा कट्टर जैन होता; पण पुढें तो शैवधर्माचा उपासक बनला.

सारांश, हा कीं अशा लाहानमोठ्या जैनधर्मीय राजघराण्यांची अत्यंत त्रोटक माहिती देऊं म्हटल्यास तें या चिमुकल्या पुस्तकांत शक्य नाहीं. जैनधर्मीय राजे व राज्यें यांची स्थूलमानानें कल्पना यावी म्हणून वरील प्रयत्न आहे. १९२२-२३ च्या एपिग्राफिका रिपोर्टमध्यें असें नमूद केलें आहे कीं, कांची येथील कांहीं पल्लव राजे, कांहीं पांड्य राजे, पश्चिम चालुक्य राजा प्रथम पुलकेशी, विजयादित्य व विक्रमादित्य व राष्ट्रकूट व गंगवंशीय राजे जैनधर्मीय होते. कलचुरी वंशांतील राजा बिज्जल, पल्लव राजा महेंद्रवर्म हे प्रसिद्ध जैन राजे होऊन गेले. होयसाल राजघराणेंहि मूलतः व मुख्यतः जैनधर्मीय होतें. सारांश श्री आद्यतीर्थंकर भगवान वृषभ देवानीं आपल्या राज्याची वाटणी करून हा दक्षिणापथ बाहुबलीस दिला, त्यावेळेपासून तों इ. स. च्या ११-१२ व्या शतकापर्यंत दक्षिणेचें राज्य-जैनराज्य होतें असें मानावें लागणार आहे.

---

# प्रकरण दहावें

## आंध्र–कालिंग–कुंतल देश व जैनधर्म अथवा इ. स. पूर्वींचीं आंध्र, कदंब व सेंद्रकादि जैन राजघराणीं

उत्तर हिंदुस्थानांत वसाहत करणाऱ्या तपस्व्यांनीं व मुनींनीं आंध्र कर्नाटकच्या इतिहासांतील जैन रियासतीचा बुद्धकालीं अगर त्याहि पूर्वीं पायंडा घातला होता; हें Epigraphica Jainica, South Indian Jainism यांत दिलेल्या माहितीवरून सहज लक्षांत येईल. कलिंग देशांतील खारवेलचा शिलालेख (सुमारें २००० वर्षापूर्वींचा) सर्वांत प्राचीन आहे, व त्यांत आंध्र देशांतील जैनधर्मासंबंधीं असलेले उल्लेखहि प्राचीन आहेत; हें निर्विवाद सिद्ध झालें आहे.

सातवाहन कालांतील "अमरावती" च्या संगमरवरी पुतळ्याचें गेल्या शतकांतील उत्तरार्धांत संशोधन झालें. यामध्यें डॉ. बर्गेस यांनीं वरचा भाग छाटलेला व केवळ डोकें व मूर्तीचा परिवेष असलेला व केस असलेला पुतळा पाहिला व तो जैन अगर बौद्धधर्मीय असावा असें त्याबद्दलचें मत दिलें आहे.

तसेंच १८९२ सालीं मि. रि. ( सुपरिंटेंडेंट मद्रास अ. लॉ. सो. ) यांनीं गुडीवाडा ( कृष्णा जिल्हा ) येथें एक सुंदर जैनमूर्ति व बेझवाडा येथें एक चतुर्मूर्ति स्तंभ शोधून काढला. तेलगू प्रांतांतील हीं दोन्हीं ठिकाणें बुद्ध कालांत फार प्रसिद्ध होतीं.

तेलगू लोक आपल्या मालेची सुरवात " ॐ नमः सिद्धय सिद्धंनमः " अशी करतात. हा मंत्र बुद्धापूर्वीं जैनधर्मीय उपयोगांत आणीत असत, परंतु बुद्धकाळीं बौद्धानींहि हा मंत्र वापरण्यास सुरवात केली· जैन लोक अद्यापहि हा मंत्र वापरतात. सिद्धं नमः हे बौद्धकालीं बुद्धसूचक झालें; परंतु त्याचे शेजारीं कालिंगाचे ओरिय " सिद्धिरस्तु " असें म्हणतात. हा मंत्र जैनांच्या दानपत्राच्या शेवटीं असतो.

चौक्तिय राजा खारवेल याच्या काळापासून तेलगू देशांतील कलिंग प्रांतांत जैनांच्या साम्राज्य सत्तेची स्थापना झाली. यापूर्वींच महावीर काळापासून दाक्षिणेंतील या प्रदेशावर जैनधर्मीय राजे राज्य करीत होते. ( हे ' कलिंग वं जैनधर्म ' या प्रकरणांत दाखविलें आहे. ) राजा खारवेल ( इ. स. पूर्वी १६७ ) यानें सम्राट् ही पदवी मिळविली होती. जैन आणि भूम या नांवानें ओळखिल्या जाणाऱ्या लोकांची जागा आपण पटकाविली अशी कलिंगांतील कोल व कोंड या लोकांची समजूत आहे. गांवाच्या नांवावरून विचार करितां कलिंगांतील कांहीं गांवें जैनांची असावींत असें वाटतें. यावरून हल्लीं जेथें कोल व कोंड राहतात त्या प्रदेशांत जैनांचें धार्मिक व राजकीय वर्चस्व होतें असें दिसतें. हे आंध्र जैन असून पुढील काळांत जसजसे दक्षिणेकडे मुलुख पादाक्रांत करीत गेले तसतसे कदंब, सेंद्रक, नाग वगैरे नांवानें ते प्रसिद्धीस आले. खारवेलनें जेव्हां दक्षिणेकडे स्वाऱ्या केल्या तेव्हां ( इ. स. पू. १६० वर्षें ). त्याचे सरदार आंध्र हे सामंत म्हणून दक्षिणेंत गेले व तेथेंच त्यांनीं पुढील काळांत आपलीं राज्यें स्थापिलीं असावींत. दिल्लीपतींच्या दक्षिणेंतील सुभेदारांनीं तरी यापेक्षां दुसरें काय केलें ? पलांवूर ( आजचें हळीपूर ) व टेक्कली ( आजचे टेक्कल ) हीं कदंब शहरें असून नंतरच्या काळांत गंगांच्या अमलाखालीं गेली.

## कदंब व जैनधर्म

हे कदंब ब्रह्मक्षत्रिय वंशांतील असून ते धर्मानें जैन होते; त्यांची राजधानी पालसिक ( आजचे हलसीक ) ही होती. मधुकेश्वर व जयंतीपूर ही देखलि कदंबांनींच वसविलीं.

रा. ब. वेंकैय यांच्या काळीं कदंबाच्या वंशावळीची सांखळी नीट जमली नव्हती. आज देखील या सांखळीचे कांहीं दुवे सांपडत नाहींत, तथापि रा. ब. वेंकैय यांनीं कदंब जयवर्मांच्या दानपत्राचा उल्लेख केला आहे. डॉ. हल्ट यानें तें दानपत्र खिस्त शतकापूर्वी दुसऱ्या शतकांतील असावें असा अंदाज केला आहे. या अंदाजास बळकटी आणण्यास कांहीं नवीन पुरावा उपलब्ध झाला आहे. मि. टेलर यांच्या शिलालेखसंग्रहांत एका कानडी लेखाचा उल्लेख आहे. या कानडी लेखांत मगध देशांत कदंबाचें राज्य होतें असें नमूद आहे. मगध देशांतून दक्षिण हिंदुस्थानांत येतांना या कदंबांना कोसल व कलिंगादि देशांतूनच यावें लागलें. हे

कदंब जैन असावेत असें म्हणण्यास त्यांनीं ज्या ज्या प्रांतांत वसाहत केली त्या त्या प्रांतांतील खुणा पुष्टीच देतात. शत्रुंजय माहात्म्य या ग्रंथांत कदंबगिरी नांवाच्या एका तीर्थक्षेत्राचा उल्लेख आहे. ही कदंबगिरी कदंबांचें पुण्यक्षेत्र असावें.

गंजम जिल्ह्यांत कदंबगिरी व मुनिसिगी हीं जैनांचीं पुण्यक्षेत्रें असून तीं धार्मिक-संस्कृतिनिदर्शक आहेत. नंतरच्या काळांत याच प्रांतांत कदंबांनीं वैजयंतिपूर ही आपली राजधानी केली. त्याच प्रमाणें विजगापट्टण जिल्ह्यांतील कदंबगड व काकडंब ही देखील त्या देशांत जैन क्षत्रियांची व मुनींची वसाहत झालेली होती, यांचे दर्शक आहेत. त्याचप्रमाणें कित्येक स्थळांचीं नांवें भट्ट शब्दानें पूर्ण होतात. कदाचित् हीं जैन पंडितांच्या नामनिदर्शक असतील. कदंबांच्या ह्या राज्यांतील गंजम व विजगापट्टण प्रांतांत आज क्रूर श्वापदें व रानटी लोक यांची वस्ती आहे. याच देशांत पूर्वीं मुनिजनांचीं विहारें, पंडित परिषदा, भरभराटीस आलेलीं शहरें व उच्च संस्कृतीचे लोक रहात होते; हें ऐकून कोणासहि आश्चर्य वाटेल. कदाचित् हें विधान खरेंहि वाटणार नाहीं; परंतु वस्तुस्थिति अशी आहे कीं, या देशांत अशा तऱ्हेच्या संस्कृतीची जोपासना करण्यांत जैन कदंबांचे बरेच श्रम कारणीभूत झाले.

या कदंबांच्या वंशांतील एक शाखा दक्षिणेंतील पश्चिम भागांत राज्य करीत होती, असें डॉ. फ्लीटसाहेब म्हणतात. यांच्या अमदानींत चालुक्य हे कमजोर होते; परंतु पुढील काळांत चालुक्य बलवान् झाले. या कदंबांची पालसिक ( हल्लीं हलसी ) ही राजधानी होती व गंजम जिल्ह्यांतील पळस हा गांव यांनींच वसविला.

खारवेल समकालीन तलेवार नदीकांठचे आंध्र, नाग, सेंद्रकनाग व कदंब हे सर्व जैन होते. या आंध्रांच्या वसाहतिकालासंबंधीं विशेष माहिती नसली तरी एवढें खास म्हणतां येईल कीं, त्यांची वसाहत " ऐतरेय ब्राह्मणा " इतकी तरी जुनी आहे. तसेंच तेलंग, कलिंग, मुंड व साबर यांच्यापासून जशीं खेड्यांचीं नांवें ठेविलीं गेलीं तसेंच आंध्रांच्या बाबतींत म्हणतां येईल. यावरून ज्या देशांत कलिंग व तेलंग यांनीं वसाहत केली, त्या देशांत हे बाहेरून आले असावेत असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. बुहलरचें म्हणणें असें आहे कीं, कदंब लिपीचे नंतरच्या काळांत, तेलगु-कानडी लिपींत रूपांतर झालें, हें मत ग्राह्य मानिल्यास आंध्र व कर्नाटक देशांतील कला व संस्कृति कदंबांनीं व आंध्रांनीं उच्चत्वास नेली असें म्हणण्यास कांहींच हरकत दिसत नाहीं.

## धान्यकटकचे आंध्र.

डेक्कनच्या पूर्व भागांतील आंध्राच्या वसाहतीसंबंधीं बुद्ध जातक कथामध्यें उल्लेख आलेला आहे. त्याचप्रमाणें कित्येक स्थळनामें देखील या भागांत आंध्रांची वसाहत होती, या म्हणण्यास पुष्टि देतात.

ऐतिहासिक कालांतील आंध्र शातवाहन वंशांतील धान्यकटक शाखेचे लोक कलिंग व मद्रास या प्रांतांतून धान्यकटक भागांत आले व धान्यकटक ही त्यांनीं आपली राजधानी केली. खारवेल कालीं हे आंध्र कलिंगाच्या पश्चिमेकडे रहात असल्यामुळें त्यांना कलिंग लोक "पाश्चिमाता" असें संबोधित असत.

## कलचूरी आभीर

इ. सनाच्या चौथ्या शतकाच्या आरंभींच शातवाहनांच्या सत्तेचा ऱ्हास झाला; व त्यांची जागा कलचूरींनीं ( आभिरांनीं ) व राष्ट्रकूटांनीं पटकाविली. परंतु या सत्ताधीश लोकांनींहि कदंब संस्कृति अखंड चालूं ठेविली.

## चालुक्य

चालुक्यांनीं कदंबाचा पराजय करून त्यांचें राज्य बळकाविलें. याला पुरावा हा कीं, चालुक्यहि आपणास कंदबाप्रमाणें " मानव्य गोत्र, हारेतीपुत्र " असेंच संबोधितात; परंतु शिलालेखांकडे पाहिल्यास या तऱ्हेनें आपणास संबोधून घेणारे कदंबच सर्वांत प्राचीन कदंब आहेत.

चालुक्याच्या उत्पत्तीसंबंधीं दिलेली शिलालेखांतील व वाङ्मयांतील माहिती यांचा मेळ जमत नाहीं. चालुक्य राजाश्रयाखालीं रचलेलीं पंपाचा 'विक्रमार्जुन-विजय," नानय्याचा, "महाभारत," विद्वानाचे "विक्रमदेव चरित्र" व पेट्टी राजाचा 'काव्यालंकार' वगैरे वाङ्मयांत, चालुक्य हे उत्तरेकडून आले असून चंद्रवंशीय असल्याचा उल्लेख आहे. या बाबतींत वाङ्मयांचा व शिलालेखांचा मेळ जमतो, परंतु इतर बाबतींत थोडासा खोल विचार करावा लागेल.

उत्तर हिंदुस्थानांतून आलेले रजपूत लोक वशिष्ठ, धनंजय, कौंडिण्य, भारद्वाज अगर काश्यप गोत्राचे आहेत. मानव्य गोत्रांचा उत्तर हिंदुस्थानांतील रजपूत लोकांच्या गोत्रांत समावेश होत नाहीं. आजमितीस देखील आंध्र देशांत मानव्य गोत्री क्षत्रिय नाहींत.

तसेंच अयोध्येकडून आलेले रजपूत लोक आपण सूर्यवंशीय असल्याचें सांगतात आणि इ. स. ५ व्या शतकापूर्वी अयोध्या नगरींत कोणीहि चंद्रवंशीय राजा राज्य करीत असल्याचा उल्लेख मिळत नाहीं. यावरून आपण अयोध्येहून आलों अशी कल्पना चालुक्यांनीं शातवाहनापासून घेतली असावी, असा तर्क केल्यास तो चुकीचा होणार नाहीं.

यावरून चालुक्य हे उत्तरेकडून आले आहेत ही कल्पना पोकळ ठरते. चालुक्यांनीं दक्षिण हिंदुस्थानांतील संस्कृतीचा उत्तर हिंदुस्थानांतील संस्कृतीशीं योग्य मिलाफ करून आपल्या राजकीय सत्तेच्या जोरावर तिची जोपासना केली. ज्याप्रमाणें उत्तर हिंदुस्थानांतील संस्कृति शातवाहनांच्या कालीं शिखरास पोहोंचली, त्याचप्रमाणें दक्षिण हिंदुस्थानांतील संस्कृति चालुक्यांच्या काळीं उन्नतीस पोहोंचली.

## कलिंग व जैनधर्म

मगध देशाप्रमाणें त्यांच्या निकटचा कलिंग देशहि प्राचीन काळीं जैनांचें एक मोठें केंद्र होतें. ह्या देशाचा इतिहासहि फार प्राचीन आहे. भगवान् ऋषभदेवानें जेव्हां आपल्या शंभर पुत्रांमध्यें आपलें राज्य विभागिलें तेव्हां हा प्रदेश त्याच्या **कलिंग** नांवाच्या एका मुलाच्या वांट्यास आला, व त्या वेळेपासून त्या देशास कलिंग ही संज्ञा प्राप्त झाली. वेद, स्मृति, महाभारत, रामायण व पुराणें यांमध्यें या देशाचा कलिंग या नांवानें उल्लेख मिळतो. भगवान् महावीरांच्या काळींहि ह्या देशास कलिंग म्हणत असत. श्री पन्नवण्णा सूत्रामध्यें आर्यावर्तांतील देशांचा उल्लेख आहे. त्यामध्यें कलिंगाचाहि समावेश केला आहे. तो असाः—

राजगद् मगर चंपा अंगा तहता प्रलिती वंगाय ।
कंचणपुरं कलिंगा वणारसी चैव कासीच ॥

यावरून या सूत्र-रचना-काळीं कलिंगाची राजधानी कांचनपूर ही होती. मोठमोठ्या महर्षींचा या पवित्र भूमिवर विहार झाला होता. भगवान् पार्श्वनाथ तीर्थंकरांच्या चरणरजांनीं हा देश पुनीत झालेला आहे. यांच्या नंतर यांच्या शिष्यांनींहि या प्रदेशांत विहार केलेला होता. महावीर स्वामींनींहि आपल्या धर्मचक्राचा मोर्चा इकडे फिरविला होता. या प्रांतामध्यें कुमारी ( खंडगिरी ) व कुमारीगिरि ( उदयगिरि ) नांवाचे दोन पहाड आहेत. तेथें जैनमंदिरें व साधूंच्याकरितां खोदविलेले विहार आहेत. हें एक जैनांचें पवित्र तीर्थक्षेत्र होऊन राहिलें आहे.

वैदिकानुयायांनीं आपल्या ग्रंथामध्यें कलिंगवासी लोकांना ' वेदधर्म विनाशक " " अनार्य " हीं विशेषणें लाविलीं आहेत. यावरून तेथील बहुशः सर्व लोक एकाच धर्माचे ( अर्थात् जैनधर्माचे ) उपासक होते असें दिसतें. हें विशेषण जैनांना किंवा बौद्धांना या दोघांनाहि लागूं पडेल, परंतु सम्राट् अशोक यानें इ. स. पू. २६२ मध्यें कलिंग देशावर स्वारी केल्यानंतर त्या देशांत बौद्धांचा प्रवेश झाला. त्या कालाच्या अगोदरच्या काळांतील आदित्य पुराणांत ' कलिंग देश हा अनार्य लोकांची रहाण्याची भूमि आहे; जो ब्राह्मण तेथें जाईल तो भ्रष्ट होईल ' असें लिहिलें आहे; यावरून कलिंग देश व कलिंगस्थ यांच्याबद्दलचा दर्शविलेला तिरस्कार बौद्धांना अनुलक्षून नसून तो जैनधर्म व जैन यांना अनुलक्षून आहे यांत तिळप्राय संदेह राहणार नाहीं.

" गत्वैतान कामतो देशात् कलिंगाश्च पतेत् द्विजः " भावार्थः-- कलिंग देशांत जाणें पापमय आहे.

बहुशः कलिंग देशामध्यें गेलेल्या ब्राह्मण लोकांनीं जैनधर्माचा स्वीकार केल्यामुळें ब्राह्मणांना कलिंग देशामध्यें न जाण्याचा धर्माज्ञेच्या नांवाखालीं निर्बंध घातला गेला असावा; यावरून इ. स. च्या ३ ऱ्या शतकापूर्वी या देशांत जैनांचें साम्राज्य होतें असें स्पष्ट दिसतें.

आणखी एक महत्त्वाचा पुरावा म्हणजे खारवेल कालीन खंडगिरि-उदयगिरि पहाडावरील शिलालेख हा होय. सम्राट् खारवेल हा जैन होता. यानें आपल्या कारकीर्दींत दूरदेशींहि जैनधर्माचा प्रसार केला. हा चंद्रवंशी असून याच्या पूर्वजापासून महामेघवाहन ही पदवी चालत आली होती. याच्या बापाचें नांव बुद्धराज व आजाचें नांव खेमराज होतें. याचा जन्म इ. स. पू. १६७ मध्यें झाला. यानें आपल्या वयाच्या १५ व्या वर्षानंतर नऊ वर्षें युवराजपद भूषित केलें; व पुढें तेरा वर्षें राज्य केलें. त्यानें दक्षिणेपासून उत्तरेपर्यंत आपल्या राज्याचा विस्तार वाढविला; व शेवटीं आपलें आयुष्य धर्मकार्य करण्यांत घालविलें. ( खारवेल व त्याचा शिलालेख यासंबंधीं माहिती यापूर्वींच इतरत्र दिली आहे. )

ख्रिस्तशतकापूर्वी कलिंग देशांत जैनांचें साम्राज्य होतें, हें स्पष्ट होत आहे. महावीर कालापासून पुढें कोणकोणत्या राजांनीं किती कालापर्यंत दाक्षिणेंत राज्य केलें याबद्दलची त्रोटक माहिती पुढें दिली आहे.

## सेंद्रक-नाग व जैनधर्म

सेंद्रक हे कदंबाप्रमाणें आपणांस नागवंशीय असें मानतात. कदंबाबरोबर कलिंग देशांतून हे कुंतल देशांत आले. बेलगामी, म्हैसूर प्रांतांतील हरिहर आणि बेलारी जिल्ह्यांतील हंपि किंवा विजयनगर या देशांचा समावेश कुंतल देशांतील दक्षिणेचा प्रदेश म्हणून गणला जात असे. वर उल्लेखिलेल्या प्रांतांच्या उत्तरेस, लक्ष्मेश्वर, गदग, लक्कुंडी, धारवाड जिल्ह्यांतील नरगेल व निझाम राज्यांतले कोक्कनूर प्रांत मोडत असत.

महावीराची क्षत्रियवृत्ति व वीरवृत्ति साहजिकच अंगीं बाणलेली असल्यामुळें कदंबांनीं राज्य कमाविलें तर सेंद्रकांनीं प्रथमच्या काळांत कंदबाचें सामन्तपद मिळवून कायम ठेविलें. कदंबाप्रमाणें सेंद्रक हेहि जैन होते. " The Andras of the Talevaha river ( refferred to in the Jataka stories of the sixth Century B.C. ) the contemporaries of Kharavela, must likewise have been, as also the Nagas in alliance with the Kadambas'' South Indian Jainism P. 74 Part II. खारवेल समकालीन तलेवाह नदीकांठचे आंध्र, नाग, सेंद्रक-नाग व कदंब हे जैन होते, असें शेषगिरीराव, एम्.ए. यांचेंहि मत आहे. हरिवर्मा व कृष्णवर्मा यांच्यामधील अंतस्थ कलहाच्या व धामधुमीच्या काळांत जरी चालुक्यांनीं कदंब साम्राज्याचें जूं झुगारून दिलें तरी आशा आणीबाणीच्या समयीं सेंद्रक सामंत हे आपल्या धन्याशीं बेइमान झाले नाहींत. यावेळीं सेंद्रक हे कदंबाचे मांडलिक होते असें हरिवर्म्याच्या एका ताम्रपटावरून दिसतें. सेंद्रक घराण्याचा सूर्यभानुशक्ति याच्या विनंतीवरून धार्मिक लोकांच्या उपयोगाकरितां व मंदिरांचे पूजाविधि वगैरे समारंभाच्या खर्चाकरितां जैन श्रमणास मरदे नामक गांव दान दिल्याचा यांत उल्लेख आहे. ( Fleet Sk. & old ( Inscription ) I. A. VI P. ३२ ) याखेरीज अधिक माहिती या वंशासंबंधीं या शिलालेखांत नाहीं. शांतिवर्म्याच्या तीन मांडलिक राजघराण्यांपैकीं हें एक घराणें असावें परंतु कृष्णवर्मा गादीवर आल्यानंतर या सेंद्रकांनीं त्याची सत्ता झुगारून देऊन निराळें स्वतंत्र राज्य स्थापिलें. पुढें इ. स. ६९४ चे सुमारास चालुक्यांनीं कंदबांचा पूर्णपणें पाडाव करून त्यांचें सर्व राज्य आपल्या राज्यास जोडिलें ( Fleet Sk. & old insp. I. A. VI P. ३२ ) सेंद्रक व चालुक्य या घराण्यांत शरीरसंबंध झालेला असल्या-

मुळें वनवासी प्रांताचा नगरखंडभाग याचा सर्व राज्यकारभार चालुक्यांनीं सेंद्रकाच्या ताब्यांत दिला. सेंद्रक राजा सेनानंदराज यानें चालुक्य राजसत्ता स्थापन करण्यामध्यें चित्रवाहन ( पहिला ) यास इमानें इतबारें मदत केली असल्यामुळें व त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध जोडले गेले असल्यामुळें चालुक्यांच्या इतर सामंतांप्रमाणें किंवा महामंडलेश्वराप्रमाणें सेंद्रकांसहि महामंडलेश्वर ही पदवी दिली गेली. वरील सेंद्रक राजाच्या वंशजांनींहि पश्चिम चालुक्यांची सेवा चालूं ठेविली. दक्षिण गुजरातमध्यें सांपडलेल्या एका शिलालेखावरून असें दिसतें कीं, ते चालुक्यांचे सेनानी म्हणून मुलूख काबीज करण्याकरितां तिकडे गेले होते. ( Bhuler Bagumba, Grant of Nikumbalsakti I. A. XVIII P. P. 266–67 ) पुलकेसी ( दुसरा ) याच्यानंतर राजा विक्रमादित्य हा गादीवर आला. याच्या कारकीर्दींत देवशक्ती सेंद्रक हा कदंब मंडलाचा कारभार पाहात होता. याच्या विनंतीवरून राजा विक्रमादित्यानें केशवस्वामी व त्याचा मुलगा प्रभाकर शर्मा यांना रट्टगिरी गांवांत एक जमीन इनाम दिल्याचा इ. स. ६६४ च्या एका शिलालेखांत उल्लेख आहे. देवशक्ती हा बहुतेक श्रीवल्लभ सेनानंदराज याचा मुलगा असावा. चालुक्यराजा विनयादित्य ( इ. स. ६८०–६९७ ) याच्या कारकीर्दींतहि वरील सेंद्रक राजाच्याच अंमलाखालीं वनवासी प्रांतांपैकीं नगरखंड व जेडूगूर गांव हें होतें. पुढें यांचे वंशज चालुक्यांचे आश्रित म्हणून राहिले; व आठव्या शतकांत जुन्या घराण्यांची उलथापालथ झाली. तेव्हां सेंद्रकांचें दक्षिणेंतील अस्तित्वहि नाहींसें झालें. या राजघराण्यानें जैनधर्मास जलसिंचन केल्यामुळें बद्धमूल झालेला जैनधर्म मात्र दिवसेंदिवस वाढत गेला.

## कुंतल व जैनधर्म

कुंतल देशावर ( हल्लींचा धारवाड जिल्हा व त्याच्या भोंवतालचा कांहीं मुलूख ) कदंब घराण्याचें राज्य सुरू होणेपूर्वींचा या देशाचा इ. स. पूर्वींचा इतिहासहि जैनांच्या दृष्टीनें विचारणीय आहे. कदंबराजा पहिला कृष्णवर्म याच्या देवगिरि ताम्रपटावरून या घराण्याचा व नंद घराण्याचा संबंध असलेला दिसतो. यावरून या देशावर ऐतिहासिक काळाच्या सुरवातीस नंद घराण्याचें राज्य होतें, असें स्पष्ट दिसतें. अकराव्या व बाराव्या शतकांतील कांहीं शिलालेखांत दाक्षिणेंतील या भागावर नंदांचेंच राज्य होतें, अशा परंपरागत आलेल्या एका आख्यायिकेचा उल्लेख आहे. बहुतकरून जनराजे बिंबिसार व अजातशत्रू यांनीं हा

देश जिंकला असावा व त्याच्यानंतर त्याच्या वंशजाच्या ताब्यांत तो होता; परंतु मौर्य राजांनीं जेव्हां नंदाचा पराभव केला तेव्हां हा देश मौर्यांच्या ताब्यांत आला. मौर्य चंद्रगुप्त भद्रबाहू बरोबर दक्षिणेंत आला होता. हें आतां श्रवणबेळगोळ येथील शिलालेखावरून सिद्ध झालें आहे. सोरब तालुक्यांतील एका शिलालेखावरून असें दिसतें कीं नगरखंडाचें चंद्रगुप्तानें रक्षण केलें. सिद्धापूर येथील अशोकाच्या आज्ञापत्रावरून महिष मंडळाच्या ( म्हैसूर संस्थानच्या ) उत्तर भागावर देखील मौर्य साम्राज्याचा अंमल झालेला होता असें दिसतें. इ. स. पूर्व ३३२ मध्यें अशोक स्वर्गवासी झाल्यानंतर मौर्य साम्राज्यास उतरती कळा लागली व पुढील अर्ध शतकांतच तें साम्राज्य धुळीस मिळालें. मौर्य साम्राज्यापैकीं दक्षिणेंतील भाग शातवाहनांनीं आपल्या ताब्यांत घेतला. ह्याच शातवाहनांना आंध्र अशींहि संज्ञा दिलेली आढळते. टालेमीनें " Andarai " म्हणून वर्णन केलेलें ते हेच लोक होत. पुराणांतरीं यांना आंध्रभृत्य या नांवानें संबोधिलें जातें. वैजयंती किंवा वनवासी ही त्या राजांची मुख्य राजधानी होती. या शातवाहनानंतर या देशावर पल्लवांचें राज्य सुरू झालें, व तालगुंड शिलालेखांत वर्णन केल्याप्रमाणें यांच्या मागून येथें कदंबाचें राज्य स्थापन झालें.

## कदंब

या कदंब घराण्याचा उदय कसा व केव्हां झाला आहे हें निश्चितपणें सांगणें अद्यापि शक्य झालें नाहीं. यासंबंधीं निरनिराळ्या पौराणिक कथा प्रचलित आहेत; व त्या अर्वाचीन असल्यामुळें विश्वसनीय मानणें धोक्याचें आहे. कदंबाच्या एका जैन दानपत्रांत कदंबाच्या उत्पत्तीसंबंधीं खालील माहिती दिलेली आहे. आनंदजिनवृत्तींद्राच्या बहिणीचा मुलगा हा प्रसिद्ध कदंब वृक्षाखालीं जन्मल्यामुळें मयूरवर्मा याचा वंश कदंब नांवानें प्रसिद्धीस आलेला आहे. शासनदेवीनें त्याला एक मोठें राज्य दिलें व प्रदेश सुपीक केला. निरनिराळ्या पौराणिक कथावरून मयूरवर्मा ही एक ऐतिहासिक व्यक्ति असून तोच कदंब वंशाचा संस्थापक होता ही गोष्ट निर्विवाद सिद्ध होते. पण हा उत्तरेकडून आला असावा कीं दक्षिणेंतीलच असावा हाहि एक वादग्रस्त विषय आहे. पण चिकित्सक बुद्धीनें सर्व शिलालेख पहाणारास ते दक्षिणेंतील असावेत असें वाटतें. कारण कदंब हें झाड दक्षिणेंतच वाढणारें आहे व कृष्णवर्मा पहिला यांच्या शिलालेखांत तो नागवंशापैकीं होता असें वर्णन आहे; व हे नागवंशी लोक जैनधर्माचे पुरस्कर्ते होते हें इतर ऐतिहासिक पुराव्यांवरून सिद्ध झालें आहे. तालकुंड शिलालेख अर्वाचीन असल्यामुळें विश्वासार्ह नाहीं.

प्राचीन कदंब हे ब्राह्मण होते असें प्रतिपादन केलें जातें, त्यास या अर्वाचीन तालकुंड शिलालेखाशिवाय दुसरा कोणताहि पुरावा नाहीं. ज्याप्रमाणें इतर राजांनीं

आपला संबंध सूर्यवंशाशीं लाविला त्याप्रमाणें कदंब राजांनीं केलें नाहीं ही गोष्ट खरी असली तरी या एका संशयात्मक शिलालेखावरून ते ब्राह्मणधर्मीयच असले पाहिजेत असें नक्की अनुमान काढितां येणार नाहीं. कदंब हे ब्राह्मण असल्यामुळें ते उत्तरेकडून आले असावेत असें म्हणणारा एक पक्ष आहे; परंतु शिलालेखादि पुराव्यावरून ते दक्षिणेंतीलच आहेत असें बऱ्याच विद्वानांचें मत आहे. म्हणून ते ब्राह्मणहि असूं शकणार नाहींत हें ओघानेंच सिद्ध आहे. मि. मोरास आपल्या ' कदंबकुल ' पुस्तकांत पान १७ वर म्हणतातः—

" But this tradition of the emigration of Bramhins from the North is lacking in sound historical basis. We have shown in the chapter on the origin of the Kadamb dynasty that Mukama Kadamba, whom tradition describes as the progenitor of the Kadamba Kula was a purely mythological personage. Further more the story of the Northern origin of the Canaries Brahmins seems to have been propaged in the latter times and it has no sanction, whatever in the early Kadamba records. "

हालसी नजीक सांपडलेल्या सात ताम्रपत्रांवरून हाळसी ही इ. स. ५ व्या शतकाच्या सुमारास कदंब राजाची राजधानी होती असें दिसतें. बहुतेक सर्व प्राचीन कदंब ताम्रपत्रांच्या सुरवातीस **जैन देवतांना नमस्कार केलेला आढळतो**; व जीं दानपत्रें दिलेलीं आहेत तीं जैनधर्माच्या अभिवृद्धीकरितांच दिलीं आहेत, असा स्पष्ट उल्लेख आहे. याच ताम्रपटामध्यें पलसिक किंवा हळसीचा उल्लेख आहे व एकामध्यें हलसी येथें एक जिनमंदिर बांधल्याचा उल्लेख आहे. यावरून कदंब घराण्याचा जैनधर्माशीं कसा निकटचा संबंध होता हें दिसून येणार आहे.

कदंब घराण्याचा इतिहास मयूरवर्मा ( ३४५–३७० ) पासून सुरू होतो. हा एक शूर व वीर सरदार असून यानें पल्लवांच्या विरुद्ध बंड पुकारिलें; पण पुढें तो त्यांचाच दंडनायक झाला. समुद्रगुप्ताच्या दक्षिणेंतील स्वारीमुळें झालेल्या धामधुमीच्या काळाचा फायदा घेऊन यानें आपलें स्वतंत्र राज्य स्थापिलें. तालगुंड गांवाजवळ सांपडलेल्या एका शिलालेखांत हा ब्राह्मण असून यानें अठरा अश्वमेध यज्ञ केले असें वर्णन आहे. अठरा अश्वमेधांची ही ख्याति अलीकडील असून आपलें प्रस्थ वाढविण्याच्या हेतूनेंच ब्राह्मणांनीं या विधानाला जन्म दिला असावा. मयूरवर्म्यांच्या काळच्या एकाहि शिलालेखांत यानें अश्वमेध केल्याचा उल्लेख आलेला नाहीं व अश्वमेध करण्याइतका मोठा प्रदेशहि यानें जिंकिला नव्हता. इ. स. ३४५ पासून इ. स. ६५५ पर्यंत या घराण्यांतील १४ राजांनीं राज्य केलें.

## प्राचीन कदंब

बनवासी

( १ ) मयूरवर्मा ( ३४५–३७० )

( २ ) कंगवर्मा ( ३७०–३९५ )

( ३ ) भगीरथ ( ३९५–४२० )

( ४ ) रघु ( ४२०–४३० ) ( ५ ) ककुस्थवर्मा ( ४३०–४५० )

( ६ अ ) कुमारवर्मा ( ४७५ ) ( ६ ) शांतिवर्मा ( ४५०–४७५ )

( ७ ) मृगेशवर्मा ( ४७५–४९० )

( ७ अ ) कृष्णवर्मा ( ४७५–४८० )

( ८ ) मंधातृवर्मा ( ४९०–४९७ ) ( ९ ) रविवर्मा ( ४९५–५३७ )

( ८ ) ब विष्णुवर्मा ( ४९५–४९७ ) देववर्मा

( ९ ब ) सिंहवर्मा ( ४९७–५४० )

( १० ब ) कृष्णवर्मा ( ५४०–५४७ ) ( दुसरा )

( ११ ) कृष्णवर्मा ( ५४७–५६५ ) ( दुसरा )

( १२ ) अजवर्मा ( ५६५–६०६ )

( १३ ) भोगिवर्मा ( ६०६–६१० )

विष्णुवर्मा

⋮

( १४ ) मधुवर्मा ( ६५१–६५५ )

रविवर्म्यांच्या कारकीर्दीतहि ( ४९५-५३७ ) जैनधर्म भरभराटींत होता. रविवर्मांच्या हलसी व निलंबूर दानपत्रावरून तो जैनधर्मांचा उपासक असून इतर धर्मांचा सन्मान राखत असे असें दिसतें. पलासिका शहरीं राजा रवीनें असा कायदा केला कीं वर्षाऋतूंतील चार महिने मुनींचें निर्वहन व्हावें व कुमारदत्त प्रमुख सर्व विद्वद्गणांना आपल्या मोठेपणाचा न्याय्य उपभोग घेण्यास मिळावा. हलसी येथील एका शिलालेखांत असें वर्णन आहे. या शिलालेखांत जिनेंद्रदेवास दिलेल्या देणग्यांचा व कार्तिक महिन्यांत आठ दिवस जिनेंद्रदेवाच्या उत्सवाकरितां केलेल्या व्यवस्थेचाहि उल्लेख केलेला आढळतो. चातुर्मासांत-पावसाळ्यांत-जैन मुनींचा विहार बंद असतो. विविक्षित जागेंतच राहाण्याची धर्मांची आज्ञा असल्यानें त्यांच्या अन्नपाण्याची तरतूद व्हावी या उद्देशानें ही योजना आहे. तसेंच कार्तिकी अष्टान्हिक उत्सव हा बराच खर्चाचा असतो. याबद्दलची तरतूद करणारे राजे जैनधर्मीय नसावेत असें म्हणणें धाष्टर्याचेंच होईल.

कदंब राजे कोणत्या धर्माचे पुरस्कर्ते होते, याचें यथाशक्ति वर विवेचन केलें आहे. या राजाच्या कारकीर्दींत सांपडलेल्या अनेक शिलालेख, ताम्रपट व दानपत्रांवरून कदंब राजे जैनधर्मीय होते असें डॉ. फ्लीट, के. बी. पाठक व इतर कांहीं विद्वानांचेंहि मत आहे. कोणाहि निःपक्षपाती इतिहासज्ञास हेंच मत मान्य करावें लागेल, परंतु तालगुंड येथील शिलालेख सांपडल्यानंतर डॉ. फ्लीट यांनीं आपलें मत बदललें; व डॉ. फ्लीट यांचें मत ग्राह्य मानून मोरासहि आपल्या कदंब कुलांत हे राजे ब्राह्मणधर्मी असावेत असें प्रतिपादन करितात. याला आधार म्हणून ते तालगुंड शिलालेख पुढें करितात, परंतु हा शिलालेख कदंब राज्यस्थापनेनंतर ८००-१००० वर्षांनंतरचा असल्यामुळें व तो असत्य विधानांनीं भरलेला आहे असें ऐतिहासिक पुराव्यानें सिद्ध झालेलें असल्यामुळें तो विश्वासार्ह नाहीं. मि. मोरास म्हणतात. त्याप्रमाणें दक्षिण हिंदुस्थानांत कदंब राज्यापूर्वी प्रथम लिंग व नंतर शैव मत प्रचलित झालें असेल, परंतु खालच्या दर्जाच्या व अज्ञानी लोकांतच फक्त त्याचा प्रसार झाला होता असें दिसतें. त्याचा बहुजनसमाजांत प्रसार होऊन त्यास सार्वधर्माचें स्वरूप आलें होतें, याबद्दल पुरावा नाहीं; म्हणून मोरास यांचें मत चुकीचें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. हे राजे परधर्मसहिष्णु होते; असा जो सिद्धांत मोरास यांनीं प्रतिपादिलेला आहे त्याबद्दल ऊहापोह करून हें प्रतिपादन चुकीचें आहे असें दाखविलेंच आहे.

मयूरवर्म्यापासून कदंब साम्राज्याची वाढ होत होती; परंतु मृगेशवर्म्याच्या कारकीर्दींत या राज्याचीं शकलें झालीं व त्रिपर्वत येथें नवीन राज्यशाखा स्थापन झाली. मृगेशवर्मा हा शूर, धीर व शहाणा राजा होता. प्रजेचें हित करण्यांत तो नेहमीं दक्ष असे. देवगिरि ताम्रपत्रावरून असें दिसतें कीं, तो आपल्या संपत्तीचा ब्राह्मण, साधु, आचार्य व विद्वज्जन यांच्याबरोबर उपभोग घेत असे. तो देव, ब्राह्मण, आचार्य व विद्वान् लोक यांचा सन्मान राखत असे व मुख्य ब्राह्मणास दान करीत असे. फक्त एवढ्या पुराव्यावरून हा ब्राह्मण राजा होता असें म्हणतां येणार नाहीं. कारण शिलालेखीय पुराव्यावरून असें दिसतें कीं, अनेक जैन राजांनीं ब्राह्मणांना देणग्या दिलेल्या आहेत. उलट ब्राह्मण राजांनीं जैनांना देणग्या दिल्याचा उल्लेख इतिहासांत क्वचितच मिळतो. ब्राह्मणासंबंधीं हा उल्लेख जैन ब्राह्मणांना उद्देशूनहि असूं शकेल. ब्रह्मशिव व नागकवि हे दोन पंडित जैन ब्राह्मण होते असें त्यांनीं लिहिलेल्या ग्रंथावरून दिसतें. ( पहा कर्नाटक वाङ्मय व जैन धर्म ) या ग्रंथकारांचे पूर्वज जैन होते व ग्रंथकारांनीं धर्मांतर करून जैनधर्माचा स्वीकार केल्याचा कोठेंहि उल्लेख आढळून येत नाहीं किंवा मृगेशवर्म्यानेंहि वैदिक धर्माचा स्वीकार केल्याचें दिसून येत नाहीं; असें असतांहि तो ब्राह्मण होता असें म्हणणें म्हणजे वस्तुस्थितीचा विपर्यास करण्यासारखें आहे. मोरास आपल्या "कदंब कुलांत" म्हणतात कीं, "The latter part of this statement, however, is not an exaggeration, since all his incriptions that have come down to us bear abundant testimony to his liberality " तो दानशूर होता हें खरें आहे. याबद्दल मतभेद नाहीं, असें मि. मोरास लिहितात. "Moreover, though a pious Hindu he was not intolerate of the other religions that flourished in his kingdom. Jainism in particular found favour in his eyes. We have three grants of his to the worshippers of Jinedra." तो हिंदु असून जैनधर्मावर त्याचा लोभ होता असें म्हणणें वस्तुस्थितीस सोडून आहे. वरील वाक्यांतील "हिंदु" हा शब्द काढून त्या ऐवजीं " जैन " हा शब्द घालून वरील वाक्यें वाचल्यास मात्र खऱ्या ऐतिहासिक सत्याचा बोध होईल असें वाटतें. याच्या कारकीर्दींत जैनधर्म उर्जितावस्थेस पोहोंचलेला होता. यावेळीं श्वेतांबर व दिगंबर या दोन्ही पंथांचा प्रसार झालेला

होता. कालावंग नांवाच्या गांवाचे तीन भाग करून ते दोन्ही पंथांच्या प्रमुख साधूंस दिलेले होते. कूर्चकांच्या श्वेतांबर साधूंच्या संरक्षणाकरितां त्यानें मातृसरित्पासून इंगिमी संगमापर्यंतचा मोठा प्रदेश दिलेला होता. शिलालेखांत वर्णन केलेली जैन देवालयांची संपन्न परिस्थिति, तेथें झालेले मोठमोठे पूजासमारंभ व त्याच्या खर्चाकरितां राजांनीं दिलेल्या मोठमोठ्या देणग्या यावरून कदंब साम्राज्यांत जैनधर्म राजधर्म असून सर्व प्रजेचाहि तो आवडता धर्म होता, हें स्पष्ट दिसतें. ( कदंबकुल पान ३४–३५ )

मोरास यांच्या या विधानाच्या पुष्ट्यर्थ आणखी दोन पुरावे आहेत. एका शिलालेखांत विष्णुवर्म्यास ' उत्कृष्ट ब्राह्मणधर्माचा रक्षक ' असें म्हटलें आहे. पण याच शिलालेखांतील इतर विधानें हीं "Empty boasts" पोकळ वल्गना आहेत असें मि. मोरास याचेंच म्हणणें आहे. अशा स्थितींत या शिलालेखांतील एकच विधान सत्य आहे, अशा म्हणण्यांत कितपत तथ्य आहे हें वाचकांनींच ठरवावें. याच राजावर गंग राजांची छाप पडली होती व त्यानें त्यांचें सहाय्यहि घेतलें होतें व ते गंगराजे तर जैन ही गोष्टहि लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. कदंब राजांनीं अठरा अश्वमेध यज्ञ केले असा तालकुंड शिलालेखांत उल्लेख आहे. हा हिंदूचाच विधी असल्यामुळें ते हिंदु होते असें मोरास म्हणतात. स्वतः मोरास हे या शिलालेखावर विश्वास ठेवण्यास तयार नाहींत. या संख्यांतील अश्वमेधाच्या अपूर्व पुण्याईबद्दल प्रत्यंतर पुरावाहि नाहीं.

शैवधर्म उदयास येत असल्यामुळें जैनधर्मांच्या अखंड प्रसारास अडथळा होत होता; कारण जैन राजे परमतसहिष्णु होते. ते आपल्या प्रजेचें हित रक्षण करण्यांत दक्ष असत. त्यानीं जैनेतर धर्मप्रसारासहि हातभार लाविला असल्यास त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. हालसी येथील एका ताम्रपटावरून असें दिसतें कीं ककुस्थवर्म्यानें खूश होऊन भोज आचार्य श्रुतकीर्ति यास खेटग्राम बक्षिस दिला. अनेक जैन शिलालेखांवरून मृगेश व इतर राजांनींहि जैनांना दानपत्रें दिल्याचें दिसून येतें. या राजावर जैनांचा धार्मिक बाबतींतच पगडा होता असें नसून राज्यकारभारांतहि जैन प्रामुख्यानें भाग घेत होते. राजकीय व धार्मिक बाबतींत विद्वद्मान्य कुमारदत्त हा रविवर्म्यांचा सल्लागार होता असें एका शिलालेखावरून दिसतें. पहा ( Fleet Sk. and old Canarese Inscriptions VI p. 27 )

भगवान पार्श्वनाथ व भगवान महावीर यांच्या कालापासून दक्षिणेंत जैनधर्माचा प्रसार झाला होता. या भागांमध्यें या तीर्थंकारांनीं समवशरणासहीत विहार केला होता. या तीर्थंकरांचे अनेक शिष्य आपआपल्या संघासह उपदेशार्थ सर्व देशभर पर्यटन करीत व लाखों लोकांना जैनधर्माचा उपदेश करीत असत. दक्षिणेंत जैन-धर्म हा एकच प्रमुख धर्म म्हणून प्रचलित होता. भगवान पार्श्वनाथाच्या कालापासून दक्षिणेंत जैन संस्कृति हीच प्रमुख उच्च संस्कृति म्हणून गणली जात असे; व त्याच संस्कृतीचें पालन आठ–नऊ शतकें करून कदंब उदयाचलावर येईपर्यंत अनेक सम्राट, राजे, सरदार, आचार्य, मुनि, आर्जिका, श्रावक व श्राविका यांनीं तिची वाढ केली होती. शातवाहन रियासतीच्या अंतिम काळीं कदंब घराण्याचा उदय झाला व या कदंबांनीं पूर्वींचीच संस्कृति–इतिहास काळांत दक्षिणेंत आठ-नऊ शतकें झपाट्यानें वाढत असलेली जैन संस्कृति–इचाच स्वीकार करून तिला वाढीस लाविली. दक्षिणेंतील कदंबरियासत व जैनधर्म यांचा परस्परसंबंध अत्यंत निगडित आहे. कदंब हे जैनधर्माचे निःसीम अनुयायी होते यांत तिळप्राय शंका दिसत नाहीं. त्यांचे कवि जैन होते, त्यांचे मंत्रि, सेनापति व सरदार जैन होते. परंपरागत जैनधर्मांचे ते धारक होते. त्यांच्या देणगीस पात्र असलेले लोक जैन होते, त्यांनीं बांधविलेलीं मंदिरें व विहार जैनासाठीं होते, यांच्या कारकी-र्दींत लिहिलें गेलेलें वाङ्मय जैन होतें. गोवा ताम्रपत्रावरून दिसून येणारें वाङ्मय जैन काव्यपद्धतीचें होतें. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे कदंबांची संस्कृति जैन होती. कदंबांच्या नंतर हीच संस्कृति चालुक्यांच्या अंमलाखालीं आली. राजकीय क्षेत्रांत क्रांति घडून आली तरी धार्मिक क्षेत्रांत परिवर्तन घडून आलें नाहीं. चालु-क्यांनीं तीच संस्कृति चालूं ठेविली. चालुक्यांच्या काळांत ही संस्कृति धार्मिक, राजकीय, व सामाजिक क्षेत्रांत वाढत जाऊन उर्जितावस्थेस पोहोंचली, याची साक्ष आज अनेक शिलालेख, ताम्रपत्रें व इतिहास देत आहेत.

कदंबांच्या उत्कर्ष कालांत जैनधर्माचा प्रसार अनिरुद्ध झाला होता; ही गोष्ट मि. मोरास यांसहि कबूल आहे. ( कदंबकुल पान २५९ ). या कदंबानंतर राष्ट्र-कूट राजे, राज्याधिकारी झाल्यानंतरहि जैनधर्मास उत्तेजनच मिळत गेलें. वीरसेन व जिनसेन या आचार्यांच्या उपदेशामुळें व प्रयत्नामुळें व त्याकाळीं लिहिल्या गेलेल्या जयधवल, अतिधवल इत्यादि अनेक विद्वत्तापूर्ण धर्मग्रंथलिखाणामुळें जैनधर्माची उन्नती झपाट्यानें होऊं लागली.

कर्नाटकांतील सर्व भागांत जैन मठांची स्थापना झाली. कुप्पदूर येथील जैन विहारासंबंधीं व तेथील गुरूंच्या वंशावलीसंबंधीं बरीच माहिती शिलालेखावरून मिळते. राणी मालवदेवी ही या संस्थेची आधारस्तंभ होती, असें कागदपत्रावरून दिसतें. भंडवपूर येथें एक प्रसिद्ध मठ होता. बेलगामी शहरांत मुख्यतः वस्ती जैनांची होती व तेथें एक जैन विहारहि होता.

जैनधर्माच्या प्रसारामुळें उदयोन्मुख वीरशैव मताची मुळांतच वाढ खुंटली. या मताच्या इतिहासांतील आणीबाणीचा काळ म्हणजे इ. स. १२ व्या शतकाचा मध्यकाल हा होय. कारण याच वेळीं जैनांच्या हल्ल्यांचा मोर्चा या मताकडे वळला; परंतु या मृत्युपंथास लागलेल्या मतास एकांतरामानें हातभार दिला असें एका शिलालेखावरून दिसतें. यानेंच शैवमताचा प्रसार करण्याचा प्रयत्न केला व याच्या नंतर या चळवळीचीं सूत्रें बसवाच्या हातांत गेलीं.

अकराव्या शतकांत वैष्णवमताचाहि प्रसार सुरू झाला. रामानुज हा या मत-प्रसारकांचा प्रमुख होता. चोलराजा कारिकल हा या मताच्या विरुद्ध असल्यामुळें त्यानें आपल्या राज्यांतून रामानुजास हांकलून लाविलें. तेथून तो जैनांचें केंद्र-कर्नाटक-येथें गेला. तेथें त्यानें आपल्या उपदेशानें पुष्कळ अनुयायी मिळविले. होयसाल राजा बिट्टीदेव यासहि त्यानें आपल्या मताची दीक्षा दिली व त्यास विष्णुवर्धन हें दीक्षा नांव दिलें, असें वैष्णव संप्रदायाच्या ग्रंथाधारें प्रतिपादिलें जातें, परंतु हें प्रतिपादन यथार्थ कां नाहीं याबद्दलचें विवेचन होयसाल राजघराण्याचा वृत्तांत देतांना केलें आहे. तें विवेचन मान्य झाल्यास बिट्टीदेवावरील धर्मांतराचा आक्षेप साफ फोल आहे असेंच मानावें लागेल.

इ. स. पूर्वीहि अनेक शतकें जैनधर्माचा दक्षिण हिंदुस्थानांत प्रसार होत चालला होता व श्रीभद्रबाहूस्वामीच्या दक्षिणेंतील आगमनामुळें तें प्रसारकार्य अधिक झपाट्यानें झालें. या क्रांतिकारक आगमनापूर्वी या प्रसारकार्यास अनुकूल भूमिका व वातावरण निर्माण करण्यांत ज्या जैन राजघराण्यांनीं सुरवातीस भाग घेतला व ज्यांच्या वंशजांनीं आपल्या पूर्वजांच्या अंगिकृत कार्यास यथाशक्ति हातभार लाविला त्यांच्या संबंधींचा हा त्रोटक वृत्तांत बोधपर होईल अशी उमेद आहे.

# प्रकरण अकरावें.

## जैनांची प्राचीन, सामाजिक व धार्मिक व्यवस्था आणि जैन राजनीति—जैन व जैन राजघराणीं यांच्या ऱ्हासाचीं कारणें

आपल्या संस्कृतीहून भिन्न संस्कृतीच्या लोकांत व देशांत राहून जैनधर्मांचा प्रसार करितांना जैन समाजाला आपली सामाजिक व्यवस्था विशिष्ट स्वरूपाची व वैशिष्ठ्यदर्शक करणें अत्यंत जरूर होतें व तशी त्यांनीं केली. वाङ्मयाच्या व आचार्यपरंपरेच्या दृष्टीनेंहि धार्मिक क्षेत्रांतहि सामाजिक बाबीप्रमाणेंच व्यवस्था आमच्या पूर्वजांनीं केली. राजकीय क्षेत्रांत वर्चस्व संपादन केल्यानंतर प्रथमच्या सामाजिक व धार्मिक व्यवस्थेचें महत्त्व तसेंच अबाधित राहिलें नसल्यास नवल नाहीं. परंतु राजकीय क्षेत्रांतील प्राबल्यामुळें धार्मिक व्यवस्थेंत अंतर पडण्याचें कारण नव्हतें. निर्जन रानावनांतून व मनुष्यवस्तीपासून दूर राहण्यानें धर्मप्रसाराचें कार्य मनुष्यवस्तींत झपाट्यानें करतां येणें शक्य नाहीं, हें जाणून प्रबल व सत्ताधीश होण्यापूर्वीं जैनांनीं ठिकठिकाणीं आपल्या स्वतंत्र वसाहति स्थापन करून सामाजिक व इतर बंदोबस्ताची व्यवस्था ठरविली. एका विशिष्ट व्यवस्थेंत राहणाऱ्या जैनांचे लहान व सुटसुटित गट बनविण्यांत आले. अशा गटास पल्ली असें म्हणत. अशा अनेक पल्लींच्या मिळून झालेल्या गटास ‘बस्ती’ असें म्हणत. बस्ती या शब्दानें जिनमंदिर असा दुसरा अर्थ निघतो. परंतु या दुसऱ्या अर्थानें हा शब्द या प्रकरणांत योजिलेला नाहीं. राज्यांत अगर संस्थानांत अशा अनेक बस्तींचा समावेश होत असे. हल्लींचे डि. लोकलबोर्ड्स, तालुकाबोर्ड्स, व गांवपंचायत अशाच स्वरूपाचीं कमी अधिक अधिकाराची व थोड्याशा भिन्न कार्यक्षेत्राची ही प्राचीन व्यवस्था दिसते.

गण, गच्छ व संघ असे धार्मिक बाबतींतील गट होते. अनेक गण मिळून एक गच्छ व अनेक गच्छ मिळून एक संघ असें मानिण्यांत येत असे. नंदी, सेन,

देव व सिंह असे चार संघ, व पुन्नत, बलात्कार, कौटीय वगैरे नांवाचे गण व पुस्तक, सरस्वती वगैरे गच्छ सुप्रसिद्ध आहेत. संघाच्या मुख्याचार्यांच्या आज्ञेनुसार सर्व व्यवस्था चाले. वरील संघांत अनेक विद्वान् आचार्य होऊन गेले. संघांत नंदी संघ व गणांत द्रमिण ( द्रमिल ) गण प्रसिद्ध आहेत. संघांत श्रावक, श्राविका व आर्जिका यांनाहि मुनिजनांबरोबर स्थान असे.

पल्ली व बस्तींतील जैन लोकांचे विशिष्ट आचारविचारांचा व संघ, गण आणि गच्छांतील लहानमोठ्या मुनिजनांच्या व आचार्यांच्या उपदेशाचा व सदाचरणाचा जनसमूहावर परिणाम न घडणें अशक्य होतें. आचार्यादिकांचा कीर्तिध्वनि राजेरजवाडे व इतर बड्या लोकांच्या कानावर जाण्यासहि फारसा अवधि लागण्याचें कारण नाहीं; व त्यामुळें राजदरबारींहि त्यांना मानमान्यता मिळूं लागली व त्यावरोबर राजाश्रयहि मिळण्यास सुरवात झाली. राजेरजवाड्यांच्या धर्मांतरामुळें तर जैनधर्मप्रसारास सर्वतोंपरी अनुकूल असें वातावरण निर्माण झालें. जैनांच्या यशाची गुरुकिल्ली कशांत आहे हें जाणून व त्यांच्या दोषाचीं मर्मस्थानें ओळखून हिंदुधर्मीयांनीं आपलें धोरण पुढें पुढें आखिलें; व त्या दृष्टीनें केलेल्या त्यांच्या प्रयत्नास भरपूर फल मिळण्यापूर्वीच नवीनच संकटें उद्भवलीं. बसवानें वीरशैव मताचा झपाट्यानें प्रसार केला. बसव त्यांचे अनुयायी यांचा कटाक्ष सुरवातीस मुख्यतः जैनधर्मीयांच्या विरुद्ध होता; तथापि हिंदुधर्मप्रसारासहि त्यामुळें पायबंद बसला. मुसलमानांनीं दक्षिणेंत राज्य स्थापन केलें, व त्यामुळें जैन, हिंदु, व लिंगायत, या सर्वांना सारखाच पायबंद लागला.

## कांहीं आचार्य.

दक्षिण हिंदुस्थानांत जैनधर्मांचा प्रसार करण्यास ज्या राजघराण्याचें श्रम कारणीभूत झाले त्यांचा इतिहास जरूर तितक्या विस्तारानें या छोट्याशा पुस्तकांत केला आहे. ज्या विद्वान् आचार्यांचे श्रम या कामीं लागले आहेत, त्यांच्या पैकीं कांहीं प्रमुख आचार्यांचा नामानिर्देश करून अंशतः उतराई होणें जरूर आहेच; परंतु त्याबरोबरच जैनधर्मांचा प्रसार व विस्तार कां झाला व सुमारें १५०० वर्षें तो सतत वार्धिष्णु कसा राखितां आला याचा विचार करितां उत्कृष्ट विचारांची आचार्यपरपंरा हें एकच उत्तर द्यावें लागेल. ही आचार्यपरंपरा टिकण्यास आमच्या पर्वजांनीं केलेली संघाची व अग्रहाराची योजनाच कारणीभूत झाल्या. अग्रहार

म्हणजे शिक्षण देणारीं विद्यापिठेंच होत. या परंपरेंत ज्यांना अग्रस्थान देण्यांत येईल त्यांपैकीं खालील कांही आचार्य होत. तत्त्वार्थ सूत्रकार उमास्वामी, आत्पमीमांसादिकांचे कर्ते स्वामी समंतभद्र, गंगराज्य संस्थापक सिंहनंदी, जैनेंद्र व्याकरणाचे कर्ते पूज्यपादस्वामी, महापुराण कर्ते श्रीजिनसेनाचार्य व वीरसेनाचार्य व उत्तरपुराणकर्ते गुणभद्राचार्य, शब्दानुशाशनाचे ग्रंथकार भट्टाकलंकदेव, तामिल चिंतामणीचे लेखक तिरूतक्कदेवर, गुणवीर पंडीत, अमृतसागर, गुणभद्राचार्य व त्यांचे शिष्य वीरमंडळ पुरूवर, जिनभूषण भट्टारकं, प्रभाचंद्र भट्टारक, भवसेन, त्रिविध चक्रवर्ती, बालेंदू मलधारीदेव, चारुकीर्ति भट्टारक, देवचंद, चंद्रभूति, चंद्रेंद्र, कनककीर्ति देव चंद्रकीर्ति, भट्टारक जिनचंद्र, पुष्पनंदी मलधारी देव, त्रिभुवनकीर्ति राउल, सिंहनंदी, अधिरा–भट्टाक्षित, ललित कीर्तिभट्टारक; देव मलधारी, भवधर्म भट्टारक, इंद्रकीर्ति, विजयकीर्ति, कलिंगाचार्य, अर्हनंदी, कलिभद्र आचार्य, भवनंदी, अनंतवीर्य देव, अमरकीर्ति आचार्य असे अनेक आचार्य, भट्टारक व मुनि होऊन गेले. सर्वच लहानमोठ्या आचार्य–भट्टारकादिकांची नामावलि या पुस्तकांत देणें शक्य व इष्टहि नाहीं.

## आचार्य व त्यांचें निवासस्थान.

इ. स. च्या पांचव्या शतकापूर्वी जैनाचार्य व जैन मुनिगण यांचें निवासस्थान लोकवस्तीपासून दूर जागीं असे. बौद्ध धर्मीय भिक्षूंचीहि वस्ती अशाच निर्जन जागीं असे. आचार्य, मुनि अगर बौद्ध भिक्षू उपदेशार्थ संचार करीत लोकवस्तींत येत व उपदेशकार्य समाप्त झालें कीं फिरून ते आपल्या निवासस्थानीं जात. त्यांच्या उपदेशश्रवणार्थ व त्यांच्या दर्शनार्थ त्यांचे शिष्य आचार्य अगर मुनिजनांच्या निवासस्थानींहि जात.

सम्राट खारवेलकालीन हस्तिगुंफादि गुंफा व इतर कांहीं शिलालेख यांत नमूद केलेल्या माहितीचा विचार करितां असें स्पष्ट दिसतें कीं, या गुंफा खोदवून मुनिगणांच्या वसतीची सोय करविण्यांत आली होती. डोंगरांतून खोदविलेल्या गुंफा अगर लेणीं आज काळाच्या कराळ दाढेंतून सुरक्षित राहिलेल्या दिसतात, परंतु यावरून मुनिवासासाठीं इतक्याच सुखसोयी होत्या असें म्हणतां येणार नाहीं. अशा ठिकाणीं मुनिजन तप, ध्यान, अध्ययन व अध्यापन करीत असत. अशा निवासस्थानीं मुनिजनाजवळ राहून विद्याभ्यास करणारे अगर मुनिजनांची सेवा–

शुश्रूषा करून पुण्यलाभ करून घेणाऱ्या लोकांचीहि वसति अशा मुनिनिवासस्थानासमीप असे. चातुर्मासांत मुनिजनांना धर्मानें विहाराची मनाई असल्यानें चातुर्मासांतील त्यांच्या आहाराची तरतूद केल्याचे कांहीं शिलालेख आढळ होत आहेत. यावरून इ. स. च्या ५ व्या शतकापूर्वीं आचार्यादि मुनिजन निर्जन जागीं राहून तप, ध्यान, अध्ययन व आध्यापन करीत असत असें मानिलें जातें.

## नंतरचें निवासस्थान.

इतर धर्मीय आपल्या धर्ममताचा प्रसार करूं लागले व त्यांचें राहणें लोकवस्तींत होऊं लागलें. याला प्रतिकार करण्याची जबाबदारी अर्थातच आचार्यादि मुनिजनांवरच पडली; व ती यशस्वी रीतीनें पार पाडण्यासाठीं आचार्यादिकांना आपल्या निवासस्थानांत परिस्थित्यनुरूप बदल करावा लागला. लोकवस्तींत राहण्याचा प्रसंग आल्यानें त्यांनीं जिनमंदिर हेंच आपलें वसतिस्थान केलें व त्यावरूनच वसतिबस्ती-हें नामाभिदान जिनमंदिरास प्राप्त झालें; परंतु तेथें एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे व ती ही कीं, निवासस्थानाच्या या अदलाबदलीमुळें पूर्वींचीं आरण्यांतील सर्वच वसतिस्थानें ओस पडलीं असें मात्र नव्हे. अशा कार्यासाठीं ज्यांची निवड झाली असेच आचार्य अगर मुनि हे लोकवस्तींत राहूं लागले. अशा विरोधास तोंड देण्यासाठीं म्हणून ज्या योजना त्या काळीं अमलांत आल्या त्यांतच मठसंस्थांचा जन्म झाला. मठांतून जिनमंदिरें बांधण्यांत आलीं व मठाधीश अगर भट्टारक हे मठांत राहून अध्ययन व अध्यापन करूं लागले. त्यामुळें मठसंस्था म्हणजे अरण्यांतील व जिनमंदिरांतील मुनिनिवासस्थानामधील माध्यम्यसंस्था निवासस्थानें–झालीं.

चालुक्यवंशीय राजा विजयादित्य याच्या काळच्या संवत् ६२२ मधील उपलब्ध झालेल्या एका शिलालेखावरून या राजानें पूज्यपादाचार्य यांचा शिष्य उदयदेव यास शंखजिनेंद्र मंदिराकरितां एक गांव दान दिल्याचें दिसून येत आहे. त्याचप्रमाणें चालुक्यवंशीय राजा अरिकेसरी हा युवराज असतां त्यानें आपला पिता बदिग यानें बांधिलेल्या शुभधाम जिनालयाच्या खर्चासाठीं सोमदेवसूरी यास संवत् ८८८ मध्यें एक गांव इनाम दिल्याचा उल्लेख एका शिलालेखांत आढळ होत आहे. यावरून या काळापूर्वीं आचार्यांनीं आपलें वसतिस्थान बदललेलें होतें असें स्पष्ट दिसतें.

## मंदिरप्रतिष्ठा व आचार्य स्थापना.

नवीन जिनमंदिर बांधविण्यांत आल्यानंतर ज्यांच्याकडून अशा मंदिरांची प्रतिष्ठा केली जात असे अशांची त्या मंदिराचे आचार्य म्हणून निवड केली जात असे व ही आचार्यपरंपरा चालावी व मंदिराच्या खर्चाची सोय व्हावी म्हणून इनाम दिल्याचेंहि कांहीं शिलालेख उपलब्ध झाले आहेत. यावरून केवळ जिनमंदिरें बांधवूनच समाधान न मानतां धर्मप्रसार व धर्मज्ञान होण्याकरितां आचार्य स्थापनाहि केली जात होती असें दिसतें. श्रवणबेळगोळ शिलालेख नं. ४७१ वरून होयसाल राजा बल्लाळदेव याचा सेनापति रेचिमय्या यानें जिननाथपूर येथें बांधविलेल्या शांतिनाथ तीर्थंकर मंदिराची प्रतिष्ठा करून त्या मंदिराच्या आचार्यपदावर शुभचंद्र त्रिविधदेव याचा शिष्य सागरनंदी याची स्थापना केल्याचें दिसून येते. तसेंच श्रवणबेळगोळ येथील शिलालेख नंबर ९० व ४९१ वरून होयसाल राजा नारसिंह याचा प्रधानमंत्रि **उत्तमतुल्ल** यानें श्रवणबेळगोळ येथें चतुर्विंशति ऊर्फ भंडार बस्ती जिनमंदिर बांधवून त्या मंदिराच्या आचार्यपदावर गुणचंद्र सिद्धांतदेव याची स्थापना केल्याचा उल्लेख मिळतो.

वर जीं कांहीं उदाहरणें दिलीं आहेत तीं केवळ विषयप्रतिपादनाच्या बळकटीसाठीं म्हणून दाखल केलीं आहेत. याच स्वरूपाचीं अनेक उदाहरणें आढळ होत आहेत. आचार्यपदावर स्थापना झाल्यावेळीं ते सर्वसंगपरित्यागी साधूच असत; कित्येक तर नग्नमुनीहि असावेत. ते संसारी नसत व त्यामुळें अर्थातच इनामाचा व आचार्यपक्षाचा वारसा अशाच अधिकारी व्यक्तीकडे जात असे.

याशिवाय विद्येच्या केंद्रस्थानीं-कोपण-कोप्पळ, बंकूर, बेळगोळ, बेलगामी, बंकापूर-लक्ष्मेश्वर वगैरे ठिकाणीं आचार्य असत व त्यांच्या देखरेखीखालीं विद्यार्थी व मुनिजन विद्याभ्यास करीत असत. अनेक जिनमंदिरांतून कवि, पंडित व मुनिजन ग्रंथलेखन करीत असत.

## आचार्यादिकांचा दर्जा

जिनमंदिरें, मठ अगर विद्यापीठें यांत वास्तव्य करणाऱ्या मुनींचा दर्जा व निर्जन वनांत वास्तव्य करणाऱ्या मुनींचा दर्जा यांत महदंतर मानिलें जात असें व हें यथार्थहि आहे. अरण्यवासीय मुनि अगर आचार्य जगांतील घडामोडीपासून

अगदींच अलिप्त असत. मंदिरें, मठ अगर विद्यापीठें यांतील आचार्य हे विद्वत्ता-दर्शक तर अरण्यांतील मुनि हे चारित्र्यदर्शक होत. यशस्तिलक चंपूमधील उद्गाराप्रमाणें यांची तुलना करावयाची झाल्यास प्राचीन मुनिजनांचे नंतरचे आचार्यादि मुनिगण हे छायामात्र होत. मूलाचार अगर भगवती आराधना यांत वर्णन केलेल्या मुनींशीं मंदिरादिकांतून राहणाऱ्या मुनींशीं तुलनाहि शक्य नाहीं असें पं. नथूरामजी प्रेमी यांनीं प्रतिपादिलें आहे. खुद्द सोमदेव सूरीच म्हणतात कीं, एको मुनिर्भवेत् लभ्यो। न लभ्यो वा यथागमम् ॥ यावरून सोमदेव सूरीच्या काळांतील मुनिजनांच्या दर्जाची कल्पना येईल.

## मठ व भट्टारक संस्था

गण, गच्छ व संघ असे धार्मिक बाबतींतील गट व पल्ली आणि बस्ती असे सामाजिक क्षेत्रांतील गट यांना मठ व भट्टारक संस्था आणि अग्रहार यांची जोड देऊन जैनांच्या धार्मिक व सामाजिक चळवळीच्या सांखळीचे दुवे अखंड जोडण्यांत आले होते. मठ व भट्टारक संस्था या केवळ दक्षिण हिंदुस्थानापुरत्याच होत्या असेंहि नाहीं. अशा संस्थांच्या बिरुदावलींत दिल्ली, कोल्हापूर, जिनकंची व पिनगोंडी या चार प्रमुख भट्टारक संस्थांचा नामनिर्देश प्रतिदिनीं करण्यांत येतो. याशिवाय इतर अनेक मठ निरनिराळ्या ठिकाणीं स्थापन करण्यांत आले होते. भट्टारकांच्या या गादीस तीर्थक्षेत्रासारखें मानिलें जात असे. यावरून मठसंस्था व भट्टारक वर्ग यांनीं धर्मप्रसारार्थ व धर्मसंरक्षणार्थ कोणते सायास केले असतील याची कल्पना सहजीं येणार आहे. मठ, भट्टारक व आचार्य, पाठशाळा व अग्रहार यांनीं विद्यादानाचा प्रवाह अखंड वाहत ठेविला. पल्ली व बस्ती हे सामाजिक गट परंतु भट्टारकांची आज्ञा व आचार्यांची शिकवण यांचा अंमल करणारे धार्मिक क्षेत्रांतील जिल्हे, तालुके व गांवें होत. निरनिराळ्या ठिकाणचे मठ व भट्टारक संस्था हे जिल्हाधिकाऱ्यांचे हुजूर होत. आचार्य, मुनि व पंडित यांच्या साहाय्यानें हा धार्मिक कारभार चालविला जात असून त्यांतहि सल्लागार व Executive अधिकारी असेहि भेद असल्याचें दिसतें.

## भट्टारक संस्थांची अवनति

जोंपर्यंत प्रबळ राजघराण्याचा जैनधर्माचा राजाश्रय होता तोंपर्यंत अशा तऱ्हेची धार्मिक व सामाजिक व्यवस्था बिनबोभाट चालली असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं.

अशा रीतीनें बसलेली ही घडी राजाश्रयाचे अभावाबरोबर खुळखुळी न होतां धर्मप्रसाराची व धर्मसंरक्षणाची ही साखळी राजाश्रयाच्या अभावानंतरहि कांहीं शतकें टिकूं शकली. मात्र या व्यवस्थेच्या अभावीं जैनांना पडत्या काळांतहि आपला धार्मिक व्यवहार बिनबोभाट चालवितां आला नसता. इ. स. च्या १३ व्या व १४ व्या शतकांतील राजकीय घडामोडी यामुळें समाजस्वास्थ्यांत बिघाड झाला. मठसंस्था नाममात्र राहिल्या. कालानुरोधानें मठाधिकाऱ्यांना आपल्या धोरणांत बदल करावा लागला. कोणत्याहि संस्थेची शासनपद्धति शेंकडों, हजारों वर्षें, एकाच ठराविक पद्धतीनें व मळलेल्या चाकोऱ्यांतून चालणें शक्य नाहीं. पल्ली व बस्ती या संस्था नष्ट होऊन त्या जागीं जातिपंचायतीच्या संस्था अस्तित्वांत आल्या. मठाधिकाऱ्यांनीं प्रांत तोडून घेतले. जैनसमाजांत निरनिराळ्या पोटजाती मानण्यांत येऊं लागल्या, व पोटजातींनींहि आपला निराळा भट्टारक केला. म्हैसूर व मद्रास इलाख्यांत म्हणजे जेथें पोटजाती मानिल्या जात नाहींत तेथलि भट्टारक फक्त प्रांताधीश बनले आहेत; इतरत्र अशी स्थिति नाहीं.

धर्मप्रसार करण्यास राजाश्रयाचा जितका उपयोग झाला त्याहिपेक्षां झालेल्या धर्मप्रसाराचें संरक्षण करण्यास जैनधर्मीयांनीं अस्तित्वांत आणलेल्या या संस्था अधिक कार्यक्षम ठरल्या. या अनुभवाचा फायदा घेऊन इतर धर्मीयांनीं आपापल्या मतप्रसारकार्यासाठीं मठ, पाठशाळा, अग्रहार व आचार्यसंस्था स्थापन केल्या.

सामाजिक व धार्मिक बाबतींत जैनांनीं केलेली ही व्यवस्था उपयुक्त ठरल्यानें व तोडीस तोड म्हणूनहि तिचें इतर धर्मीयांना अनुकरण करावें लागलें. ज्या काळीं वैदिक धर्मानुयायांना मूर्तिपूजेचें ज्ञानहि नव्हतें, त्या काळीं जैनांच्यामध्यें मूर्तिपूजा प्रचलित होती; याची साक्ष आज खारवेलचा शिलालेख देत आहे. मूर्तिपूजा व मंदिरें हीहि धर्मप्रभावनेस व धर्मप्रसारास सहाय्यभूत साधनें आहेत असें दिसून आल्यानें वैदिकधर्मानुयायांनीं याहि बाबतींत जैनांचेंच अनुकरण केलें आहे. उत्कर्षाच्या व अपकर्षाच्या या दोन्ही काळांत कमी अधिक प्रमाणांत या संस्था जैनांना उपयुक्त ठरल्या. अशा संस्था निर्माण करणाऱ्यांचीं मुक्तकंठानें स्तुतिस्तोत्रें गाण्यापेक्षां हल्लीं आम्हांस अधिक तरी काय करतां येणार आहेऽऽ

धार्मिक बाबतींतलि संघाधिकारी आचार्य व त्यांचे शिष्य यांनीं वाङ्मयसेवा करून जैनांचें नांव अजरामर तर केलेंच आहे. धर्मप्रसारकार्यासाठींच तर त्यांचें अस्तित्व होतें. राजेरजवाडे, सरदार–दरकदार, व शेटसावकार यांजकडून गांव,

भूमि व इतर हक्क यांच्या देणग्या आचार्यांनीं मिळविल्या, परंतु उपयोग सर्वस्वीं जैन अग्रहारासाठीं, धर्मप्रसारार्थ व जिनमंदिराकडेच होत असें हे त्या त्या देणगीच्या दानपत्रावरून दिसून येतें. भट्टारकांना मिळालेल्या देणग्यांचें स्वरूप निराळेंच असें. अशा या देणग्यांशिवाय अनेक ठिकाणीं अशा आचार्यांच्या प्रेरणेनेंहि जिनमंदिरें बांधविण्यांत आलीं. अशीं महत्कृत्यें ज्या व्यवस्थेमुळें घडवून आणितां आलीं त्या संस्थेच्या थोरवीचें वर्णन करावें तितकें अपुरेंच होणार आहे. मोडक्या तोडक्या तटावरून किल्ल्याची, वृद्धापकालाच्या हाडाच्या सांपळ्यावरून तारुण्यांतील सदृढ देहयष्टीची अगर मोडकळीस आलेल्या भव्य इमारतीची जशी एखाद्या खांबावरून कल्पना करितां येते तद्वतच विद्यमान मठ व भट्टारक संस्था यावरून त्यांच्या पूर्व वैभवाची व उपयुक्ततेची कल्पना करितां येण्यासारखी आहे. ज्या भागांत आपले अनुयायी नाहींत अशा भागांत मठ व भट्टारक संस्था स्थापन करण्याचें शहाणपण कोण करणार? तसेंच अनुयायी आहेत परंतु मत व धर्मस्वातंत्र्य नाहीं अशा प्रतिकूल वातावरणांत या संस्था स्थापन केल्या तरी त्या वाढीस लागणार नाहींत हेंहि तितकेंच खरें आहे. विद्यमान ज्या भट्टारक संस्था आहेत त्या तेथेंच कां स्थापन केल्या असाव्यात याचें गमक व कार्यकारणभाव हुडकण्यास फारसे श्रम पडतील असें नाहीं. कारंजा, लातूर, कोल्हापूर, तेरदळ, रायबाग, बेळगांव, होसूर, कारकाल, मुडबिद्री, हुमस, कांची, सादी व बेळगोळ वगैरे ठिकाणीं मुख्य मठ अगर मठांच्या शाखा आहेत. आजहि याच मठांच्या आसपास जैनधर्मीयांची वस्ती प्रामुख्यानें असलेली दिसते; पूर्वीं तर होतीच होती. याच ठिकाणीं जैन अधिराजे, त्यांचे सामन्त, महामंडलेश्वर, दंडनायक व नायक राज्यकारभार पहात होते. याच ठिकाणीं राजघराण्यांच्या कुलस्वामींचीं अगर आराध्य देवतांचीं उत्कृष्ट मंदिरें आहेत. याच ठिकाणीं मोठमोठे आचार्य, पंडित व इतर विद्याविभूषित जैनधर्मीय नांवारूपास पोंचले. पाठशाळा, अग्रहार, भट्टारक व मठसंस्था हे विद्येचें आगर व धर्मज्ञानाचें माहेरघर अशी समजूत बादशाहा अकबर याच्या काळापर्यंतहि होती व ती समजूत अन्यथा नव्हती हें त्या काळच्या भट्टारकांनीं कृतीनें राजदरबारीं सिद्धहि केल्याचा इतिहास मिळतो. काकतालीय न्यायानें हे अनेक अपूर्व योगायोग जमून आले अगर या योगायोगांत अपूर्व कार्यकारणभाव दृष्टीस पडतो? या अपूर्व योगायोगांत कार्यकारणभावच आहे असेंच कोणीहि म्हणेल. यावरून पूर्वकालीं आपल्या पूर्वजांनीं जी

सामाजिक व धार्मिक व्यवस्था आंखली होती त्याचें महत्त्व व श्रेष्ठत्व विद्यमान पडत्या काळांतील व अवनत दशेस पोहोंचलेल्या मठसंस्था व भट्टारक वर्ग यावरून कळण्यासारखें आहे. बापसे बेटा सवाई निघाल्यास कोणास नको नाहीं; परंतु नित्य व्यवहारांत कुलनाशापेक्षां कुपुत्रहि पतकरितो व आशा बाळगितो कीं पौत्रप्रपौत्र तरी कुलदीपक होतील; याच आशेनें, भावनेनें व विचारानें जैन-समाज हल्लींच्या भट्टारकाकडे व मठसंस्थेकडे आशावादीपणानें पहात आहे.

पल्ली, वस्ती, गण, गच्छ, संघ, पाठशाळा, आग्रहार, मठ, व भट्टारक संस्था निर्माण करून आपल्या पूर्वजांनीं धार्मिक व सामाजिक कारभार अनेक शतकें सुव्यवस्थित व सुयंत्र हाकिला. त्या काळांत या संस्था अत्यंत उपयुक्त ठरल्या याचें एकच गमक म्हणजे जैनेतरांनीं जैनांचें या बाबतींत केलेलें अनुकरण हे होय.

वर ज्या संस्थांचें वर्णन दिलें आहे त्याच्या पूर्वी तीन चार शतकें अगोदर खारवेल पूर्वकाळीं पौर व जानपद अशा संस्था होत्या व त्या संस्थांचें स्वरूप 'खारवेल चरित्र' देतांना दिलें आहे. विद्यार्जन व विद्याभ्यासाची सोय व्हावी म्हणून सार्वजनिक मठसंस्था, पाठशाळा व आचार्य पंडितादिकांचा खासगी आश्रय. याशिवाय 'अग्रहार' म्हणजे विद्यापीठांचीहि या योजनेस जोड दिली होती. बेलगामी, कुपटूर, भांडवपूर वगैरे ठिकाणीं अशी निरनिराळीं विद्यापीठें होतीं. अशा विद्यापीठांतून शिक्षणाचीहि सोय केलेली होती असें दिसतें. अशा अनेक अग्रहारांना राजे, रजवाडे, सरदार, सामन्त व शेटसावकाराकडून मिळालेल्या देणग्यांचीं दानपत्रें व शिलालेख उपलब्ध झाले आहेत. तामिल व तेलगू प्रांतांतील वाङ्मयसंस्था व आंध्र कर्नाटकांतील अग्रहार यांचे कार्य व ध्येय एकच असावे असें मानण्यास हरकत नाहीं. आंध्रकर्नाटकांतील अग्रहाराच्या मानानें तामील व तेलगू प्रांतांतील वाङ्मयसंस्था अगर संघ हे प्राचीन ठरतात. भूगोलावरून पाहतां अग्रहार महत्वाच्या व मध्यवस्तीच्या जागींच स्थापिले होते. अशा संस्थांच्या व व्यवस्थेच्या अभावीं जैन समाजाची काय दशा झाली असती याचा विचार करून मेंदू शिणविण्यांत अर्थ नाहीं.

## जैन व राजनीति

सामाजिक व धार्मिक क्षेत्रांतील जैनधर्मीयांच्या व्यवस्थेबद्दलचा मागील वृत्तांत वाचून राजकीय बाबतींत प्राचीन जैनाचार्यांचे विचार काय होते, अगर

निरनिराळे संघाचार्य व गणाधिपति यांची राजनीति व तिची शिकवण कोणत्या स्वरूपाची होती याबद्दल सहाजिकच वाचकांच्या मनांत कुतूहल उत्पन्न होईल. जैन राजनीतिविषयक विचारांचें खरें महत्त्व समजून घेतांना वेदानुयायांचे या बाबतींतील कल्पना व विचार कशा स्वरूपाचें होते, याचीहि स्थूलमानानें कल्पना देणें जरूर आहे. राजा हा ईश्वराचा अंश आहे. ना विष्णुः पृथ्वीपतिः अशी राजसत्ताधारी व्यक्तींविषयींची वैदिकांची दृढ कल्पना आहे. लोकोत्तर कार्य करणाऱ्या ' आवतारी व्यक्तिस ' राजा म्हणून समजण्यांत येते. हिंदुधर्मांतील अवतारी लोकोत्तर पुरुषासारखे कर्तबगार लोक हिंदुस्थानच्या बाहेरच्या देशांत अगर हिंदुस्थानांतच परंतु अन्य धर्मांत मुळीं जन्मलेच नाहींत, असें मुळींच नाहीं. मात्र तशा लोकांची अवतारांत गणना केली जात नाहीं. कमालीच्या अंधश्रद्धेमुळें आज हिंदुस्थानांतील ६७१ संस्थानाधिपति व बादशाहा पंचम जार्ज मिळून ६७२ व्यक्तींच्या ठिकाणीं ईश्वराचा बहुभाग अंश उतरला आहे, असेंहि बिनादिक्कत मानिलें जाईल.राजा म्हणजे विष्णूचा–ईश्वराचा–अंश व राजाज्ञा म्हणजे देवाज्ञा अशीच ठाम समजूत असल्यानें राज्यशासनाविरुद्ध तक्रार करणें म्हणजे खुद्द देवाशीं बेईमान होणें अशी समजूत झाल्यास नवल नाहीं. या मतांत कालमानानें थोडासा फरक होऊन प्रजा हीं राजाचीं लेकरें होत व गर्भार स्त्री आपल्या पोटांतील गोळ्याच्या सुखसोयीसाठीं जशी जपते; स्वतःच्या सुखसोईकडे व सुखदुःखाकडे व आवडीनिवडीकडे पाहत नाहीं; त्याप्रमाणें राजानें आपल्या प्रजेचें पुत्रवत् पालन करावें असें मत प्रतिपादण्यांत येऊं लागलें. दुसऱ्या दृष्टीनें पाहिल्यास पूर्वीच्या मतांत अगर विचारांत कालमानानें फरक झाला असें मुळींच नसून फक्त शब्दांत बदल झाला असें म्हणावें लागतें. मनुष्य व इतर जीव ईश्वरानेंच निर्माण केले आहेत व त्यांना सुखदुःख देणारा व त्यांचें लालनपालन करणारा ईश्वरच आहे व राजा हा ईश्वराचा अंश असल्यानें प्रजेचें लालनपालन अंशभागीं राजानें–ईश्वरानें–केलें पाहिजे हें क्रमप्राप्तच आहे. यामुळें विचारांत बदल होऊन राजावर कांहीं निराळी जबाबदारी ठेविली अगर निराळें कर्तव्यकर्म म्हणून त्यास दाखविलें असेंहि म्हणता येणार नाहीं. राजानें प्रजेकडे मुलांप्रमाणें व प्रजेनें राजाकडे बापाप्रमाणें पहावें यापलीकडे राजा व प्रजा यांच्या परस्पर कर्तव्यासंबंधाची शिकवण हिंदुधर्मीयांनीं राजाला अगर प्रजेला दिली नाहीं.

# जैनाचार्यांची राजनीति

जैनाचार्यांची राजनीतीची कल्पना मात्र वरील कल्पनेहून अगदींच व मुळांतच भिन्न आहे. कोणी असेंहि म्हणतील कीं जैन व वैदिक यांच्या ईश्वरविषयक कल्पनाच भिन्न व त्यामुळेंच राजनीतिविषयक कल्पनाही भिन्न झाल्यास नवल नाहीं; परंतु थोड्याशा विचारांतीं या म्हणण्यांत अर्थ नाहीं असें दिसून येईल. पाश्चात्य मताच्या लोकशाहीचा उदय होऊन शेकडों वर्षें लोटून गेलीं तरी अद्याप **राजा हा प्रजेचा नोकर आहे** ही कल्पना अगर **राज्य ही राज्याकडे एक अमोलिक ठेव आहे**; ही कल्पना संपूर्णपणें अंगवळणी पडलेली नाहीं. इंग्रज सरकारशीं त्यांच्याच मताचा अनुवाद करून हक्कांच्या बाबतींत वाद केले जातात, परंतु संस्थानच्या हद्दींत मात्र या तत्त्वांचा विसर पडून हिंदुधर्माच्या शिकवणीचें पिशाच्च भीति दाखवीत दत्त म्हणून उभें राहतें. लोकशाहीची पाश्चात्य कल्पना इतरत्र बद्धमूल होण्यापूर्वी अनेक शतकें अगोदर जैनाचार्यांनीं **राजा हा प्रजेचा नोकर आहे** अशी शिकवण प्रजेलाच दिली असें नाहीं तर राजानांहि तींच शिकवण खुद्द राजदरबारींहि सांगितली व या शिकवणीचा राजेरजवाड्यांनीं आनंदानें स्वीकारहि केला होता. यावरून या आचार्यांचें राजदरबारांत किती वजन असेल याची कल्पना होते. राजाच्या मर्जीविरुद्ध बोलणें अगर वागणें व कर्तुंम् अकर्तुंम् ही शक्ती राजाला नाहीं असें म्हणणें म्हणजे जिवंतपणीं जाळून घेणें होय, असा अनुभव सर्वत्र व सर्वकाळीं आहे. जैनाचार्य व जैनधर्मीय राजे मात्र या नियमाला अपवाद ठरले. **राजा हा प्रजेचा नोकर आहे; राज्यासाठीं राजाचें अस्तित्व आहे व राजासाठीं राज्य नाहीं**; अशी शिकवण जैनाचार्यांनीं राजांना व प्रजेला दिली आहे.

आर्य चाणाक्याच्या सुप्रसिद्ध "अर्थशास्त्र" या ग्रंथाच्या तोडीचा आचार्य सोमदेवसूरी यांनीं लिहिलेला "नीतिवाक्यामृत" या नांवाचा ग्रंथ आहे; व तो मुंबईच्या "माणिकचंद दिगंबर जैन ग्रंथमाला" या संस्थेमार्फत छापून प्रसिद्धहि झाला आहे. दाक्षिण हिंदुस्थानांतील अनेक राजदरबारीं या आचार्यांचें प्राबल्य होतें. वर मोठ्या टाईपांत जीं वाक्यें छापलीं आहेत तीं या आचार्यांच्या नीतिवाक्यामृत या ग्रंथांतील आहेत. धर्म, अर्थ, काम असे पहिले तीन भाग, दंड सेनापति, चार, विचार, दूत, आमात्य, दुर्ग, कोश, जानपद, राजरक्षित व बल

वगैरे असे या ग्रंथाचे तीस विभाग आहेत. वर ज्या विभागांचीं नांवें दिलीं आहेत त्यावरून या ग्रंथांतील प्रतिपादित विषयांची सहजीं कल्पना येणार आहे. या तीस विभागांचा सारांश देणें अगर चाणक्यकृत ग्रंथाशीं या ग्रंथाची तुलना करणें या पुस्तकांत शक्य व इष्टहि नाहीं.

याशिवाय आचार्य व राजगुरु राजकुलोत्पन्न शिष्यांना कोणकोणता उपदेश देत व राजांच्या कर्तव्यकर्माबद्दलचे त्यांचे विचार काय होते याचें थोडेसें दिग्दर्शन करून या विषयाची पर्तता करण्यांत येईल. आचार्य पंडितादिकांच्या अशा शिकवणीची धार्मिक व सामाजिक स्वास्थ्यासाठीं किती जरूरी होती हें कळेल व अशा शिकवणीच्या अभावीं जैनांनीं आंखलेली धार्मिक व सामाजिक व्यवस्था मूळ धरूं शकली असती अगर नाहीं हेंहि समजून घेण्यास सोईचें होईल हें सांगावयास पाहिजे असें नाहीं.

## जैनाचार्यांची शिकवण.

चिरकाल व अखंड सुख, संपत्ति, ऐश्वर्य व मानमरातब हीं केवळ सत्तेच्या व सामर्थ्याच्या बळावर राजांना मिळवितां येणें, लाभणें व टिकविणें शक्य नाहीं; **सिंहाला मात्र केवळ आपल्या बळावरच वनराज होतां येईल.** प्रजेच्या सौख्यांतच राजाचें सौख्य आहे. प्रजेनें राजा म्हणून मानिल्यासच राज्यपद राहील. राजा म्हणून जोंवर तसें मानण्यास प्रजा तयार आहे तोंपर्यंतच राजा; नाहीं तर नाहीं. प्रजेच्या कलानें वागून व त्यांचें मत विचारांत घेऊन राज्यकारभार चालवावा; सत्तेच्या व सामर्थ्याच्या जोरावर नेहमींच राज्यकारभार हांकणें शक्य नाहीं. अशी शिकवण ज्या काळांत मिळत होती त्या काळचा राज्यकारभार रामराज्यासारखा असल्यास नवल तें काय ? तसेंच अज्ञानी, अडाणी व माथेफिरू व्यक्ति राज्याधिकारी असणाऱ्या देशापेक्षां ज्या देशाला राजा नाहीं व जेथें सर्वत्र बंडाळी, धामधूम व जाळपोळ आहे, असा देश बरा व सुखी असे समजावें अशीहि शिकवण दिली जात असे. अर्थातच मूर्ख व अडाणी राजाच्या राज्यांत सुखानें रहावयास मिळत असलें तरी तें नको. देशांत दंगेधोपे आहेत, बंडाळी माजली आहे परंतु राजा शिक्षित, विद्वान् व सुशील आहे, तर तेथें राहणें बरें असा धडा जैनाचार्यांनीं सांगितला आहे. सैरावैरा सुटलेल्या मस्त हत्तीप्रमाणें सुसंस्कारहीन राजा खड्ड्यांत पडून नाश पावतो. अपराधी व अन्यायी इसमास दंड करणें अगर शिक्षा देणें यांत व रोग-

ग्रस्ताला औषध देणें यांत फरक नाहीं. या दोन्ही प्रकारांतील हेतु समानच आहेत. रोगग्रस्ताला रोगमुक्त करणें हा औषध देण्यांत हेतु असतो तद्वतच गुन्ह्यापासून परावृत्त करण्यासाठीं गुन्हेगाराला शिक्षा देण्यांत यावी. प्रजेच्या व गुन्हेगाराच्या भावी हितासाठींच शिक्षा द्यावी, पैशाच्या लोभासाठीं व सूडाच्या भावनेनें कधींही शिक्षा करूं नये. गुन्हेगारांना दंड करण्यांत राजाचा अंतिम हेतु निराळाच आहे असें प्रजेस वाटल्यास प्रजेच्या प्रेमाला, लोभाला व आदराला राजाला मुकावें लागतें. ज्याप्रमाणें वैदू लोक आपल्या पोटाची खळगी भरण्याकरितां इतरांच्या अंगांत रोग नसतांहि रोग आहे असें भासवितात त्याचप्रमाणें राजानें प्रजेवर नसते आरोप लादूं नयेत. योग्य शहानिशा केल्याखेरीज उतावीळपणानें अमूक इसम गुन्हेगार आहे असें राजानें म्हणूं नये. आपली राणी अगर राण्या ह्या फक्त वंशवृद्धीसाठीं आहेत याचें विस्मरण राजाला होऊं नये. राजाचें आपल्या प्रजेशीं कसें वर्तन असावें याबद्दल वर कांहीं बोधपर वेंचे दिले आहेत. सुविद्य व सुशील राजा असणें व त्याला शिक्षणाची व सुसंगतीची किती जरूरी आहे, याबद्दल जैनाचार्यांची शिकवण कशी होती याबद्दलचे कांहीं वेंचे खालीं देत आहों.

शिक्षणाचा मनावर परिणाम होऊन ज्याला योग्य वळण लागलें आहे तोच सुविद्य, हुशार व लायक राजा समजावा. राजा शक्तीमान आहे परंतु तो सुविद्य नसेल तर शस्त्रविहीन योध्याप्रमाणें तो सर्वांच्या टीकेला व निंदेला प्राप्त होईल. ज्ञान हें तृतीय नेत्र आहे; हे नेत्र ज्यास नाहीं तो अंध समजावा. सत्संगती असावी कारण ज्ञानांत असलेला कमीपणा सत्संगतीनें भरून निघतो. उच्चकुलीन, सच्चरित् व सुविद्य असे लोकच राजगुरु होण्यास लायक आहेत. यावरून शिक्षण, आचरण, अगर शास्त्रीय भाषेंतच बोलावयाचें झाल्यास सम्यग्दर्शन, ज्ञान व चारित्र्य यांची महती इतराप्रमाणेंच राजांनाहि आहे असें बोधामृत जैनाचार्य आपल्या शिष्यांना देत होते. सच्छील, निःस्पृह व सर्वसंगपरित्यागी आचार्य आपल्या उपदेशाचा ज्या राजाच्या मनावर परिणाम घडत नाहीं व ज्या राज्याचा राज्यकारभार आपल्या मताविरुद्ध चालतो त्याचे तोंडहि पाहणार नाहींत. अशा उज्ज्वल आचार्यपरंपरा-मुळेंच दक्षिण हिंदुस्थान उन्नतीस पोहोंचला. अनेक शूरवीर, राजे व सेनानायक उदयास आले; धर्मग्रंथ लिहून इहलोकीचें कल्याण साधून परलोकहित साधण्या-करितां जैनमुनीदीक्षेचाहि त्यांनीं आनंदानें स्वीकार केला.

जैनांची सर्वांगसुंदर प्राचीन सामाजिक व धार्मिक व्यवस्था व त्यांची उच्च राजनीति यांचा परिणाम होऊन देशाची व धर्माची भरभराट झाली. ही भरभराट चिरंजीव कां झाली नाहीं? उत्कृष्ट व उपयुक्त धार्मिक व सामाजिक व्यवस्था यांची आंखणी झाली असतां व शेंकडों वर्षे ती व्यवस्था उपयुक्त ठरली असतांहि जैन, जैनधर्म व जैन संस्कृति यांचा ऱ्हास कां झाला? जैन राजनीतिहि जैन राज्य व जैन संस्कृति टिकविण्यास समर्थ कां ठरली नाहीं? अशा अनेक शंका विचारी मनाला भेडसाविल्याखेरीज राहणार नाहींत. या शंकेचें एकच उत्तर मिळणेंहि शक्य नाहीं; तथापि या विषयाचा निरनिराळ्या दृष्टीनें विचार करून ऱ्हासाचीं जीं कारणें दिलीं आहेत त्यांची ओळख वाचकांना करून देऊन या विषयाची पूर्तता करण्याचें योजिलें आहे.

## ऱ्हासाचीं कांहीं कारणें

मि. ए. व्ही. कृष्णराव एम्. ए. बी. टी. Lecturer in history, university of Mysore यांनीं लिहिलेलें The Gangas of Talkad (१९३६) या पुस्तकांत पान २१० ते २१३ अखेर Decline of Jainism-जैन धर्माचा ऱ्हास--या मथळ्याखालीं जे विचार प्रदर्शित केले आहेत ते विचारार्ह असल्यानें साररूपानें त्यांचा यापुढें उल्लेख केला आहे.

शैवधर्माच्या पुनर्जागृतीमुळें इ. स. ८ व्या व ९ व्या शतकांत जैनधर्मप्रसारास विरोध उत्पन्न झाला; तथापि यापुढें आणखी दोन शतकें या धर्मानुयायांनीं शैव धर्माच्या विरोधास न जुमानतां आपल्या धर्मप्रसाराचें कार्य अखंड चालवून लोक-मतावरील आपली मांड ढिली पाडूं दिली नाहीं. थोड्याशा प्रतिकूल परिस्थितींतहि लोकमत अनुकूल ठेवण्यास जीं दोन कारणें प्रमुख ठरलीं त्यांपैकीं हार्दिक व खास राजाश्रय हें एक कारण व दुसरें कारण म्हणजे वैदिक धर्मांतील कर्मकांडाचें जैनाचार्यांनीं केलेलें अनुकरण. हें अनुकरण अखेर जैनांना विघातक ठरलें. त्याग सेवा, अहिंसा, व सत्यादि सद्गुणांच्या साहाय्यानें आत्मकल्याण साध्य करण्याची जैनाचार्यांची सुरवातीची शिकवण मागें पडली. वैदिक धर्मांतील कर्मकांडाचा व क्रियाकर्मांचा धिक्कार करून जैनधर्मानें त्यागादि सद्गुणांच्या उपदेशाच्या जोरावर लोकमत अनुकूल करून घेतलें होतें. अशा उपदेशकांच्या प्रत्यक्ष आचरणाचाहि लोकमतावर थोडाथोडकाच परिणाम झाला होता असें नाहीं. दारूनें भरलेली

बाटली हातांत घेऊन मद्यपानाविरुद्ध मोहीम करणाराच्या उपदेशास किंमत नाहीं. अहिंसादि तत्वांची शिकवण देणाऱ्या मूर्तिमंत सद्गुणी उपदेशकांचें आचरण त्याकाळीं सामान्य लोकांना अनुकरणीय झालें. कर्मकांडास व क्रियाकांडास इष्टापत्ति म्हणून जैनधर्मीयांनीं आपल्या धर्मांत स्थान दिलेलें पाहून विरोधी पक्षांना हायसे वाटलें. शैवादि विरोधी पक्षांनीं कांहीं जैनधर्मीय तत्वांचा स्वीकार करून त्यांना आपल्या उपदेशांत स्थान दिलें. या दोन्ही कृत्यांचा जैनधर्मप्रसार-कार्यावर अनिष्ट परिणाम घडला. लौकिक व धार्मिक बाबतींत जैनधर्मांच्या व आपल्या शिकवणुकींत स्थूलतः फरकच नाहीं, असा कांगावा करण्यास विरोधी पक्षास भरपूर संधि मिळाली व त्या संधीचा शक्यतो फायदा त्यांनीं घेतला.

मोठमोठे व विद्वत्तादर्शक ग्रंथ लिहिण्याची प्रवृत्ति बळावली व लोकांच्या नित्य भाषेंत उपदेश करण्याचें कार्य मागें पडलें. सुरवातीची साधीसुधी वागणूक व साधु आणि त्यागी वृत्ति आणि त्यागी आचार्यादिकांचें शिक्षण ( शिकवण ) व प्रसार-कार्य मागें पडून त्या ऐवजी दैनिक, मासिक व वार्षिक कार्यक्रमाचे आराखडे तयार झाले. सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत व सूर्यास्तापासून फिरून सूर्योदयापर्यंत कसें वागावें, आन्हिक कार्य काय करावें अशा नियमांनीं सुरवातीचा उपदेश जखडून टाकण्यांत आला. यामुळें विरोधी धर्मीयांना वर लिहिल्याप्रमाणें कांगावा करण्यास सुसंधि मिळाली.

या दोन्ही धर्मांतील तत्त्वज्ञानांतील सूक्ष्म भेद सामान्य जनतेस न कळलें तर आश्चर्य तें कोणतें ? जैन आचार्य, पंडित व इतर उपदेशकांनीं संस्कृत भाषेस आपल्या उपदेशांत व वादविवादांत अग्रस्थान दिलें. मूळच्या पाली भाषेंत संस्कृत शब्दांची भरती करून तीहि भाषा इतरांना अवघड करून ठेविली. भाषेची वाढ या दृष्टीनें ही सुधारणा इष्ट झाली; परंतु घडामोडीच्या कालांत मतप्रसारास भाषा-सहाय्याच्या दृष्टीनें ही सुधारणा अनिष्टच ठरली.

राजे लोकांच्या राज्यतृष्णेच्या महत्त्वाकांक्षेमुळें जैनांना घडामोडी झाल्यानें राजाश्रयास मुकावें लागलें. विरोधी पक्षाला अडविण्यासाठीं म्हणून खोदलेले खंदक व आंखलेले मार्ग जैनांना विघातक ठरून सामाजिक व धार्मिक क्षेत्रांत जैनधर्मी-यांचा ऱ्हास झाला.

जैनासारखे मठ, जैनासारखे भट्टारक, जैनासारखे आचार्य व पंडित, जैनांचे अनुकरण करून देवदेवालयांची स्थापना इत्यादि बाह्य व आकर्षक गोष्टी विरोधी पक्षीयांनीं अमलांत आणल्या. क्रियाकांडास व क्रियाकर्मास जैनांनीं तोडीस तोड म्हणून आपल्या धर्मांत स्थान दिलें, यामुळें या दोन्ही धर्मांत पूर्वीं दिसत असलेला ठळक फरक नष्ट होऊन सामान्य जनतेला या दोन्ही धर्मांत स्थूलतः दिसणारा फरक दिसेनासा झाला. सारांश हा कीं वैदिक अनुयायांनीं केलेलें जैनांचें अनुकरण त्यांना इष्ट ठरलें व जैनांनीं वैदिकांचें केलेलें अनुकरण हितपरिणामी न ठरतां ते जैनांना विघातक झालें.

समाप्त.

# दक्षिण-भारत, जैन व जैनधर्म

## सूची

### श्री



### अ

## छ



## ज

### फ



### ब

ल



व

दक्षिण-भारत, जैन व जैनधर्म

# शुद्धि-पत्रक

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २ | १५ | जनधर्मांचा | जैनधर्मांचा |
| २ | १९ | झकता | झुकता |
| ३४ | १९ | प्रथय | प्रथम |
| ५८ | १६ | जनाकडून | जैनांकडून |
| ६० | ३ | शव | शैव |
| ८२ | २१ | पंडितांचे | पंडितांचा |
| ८२ | २५ | आहे | आहेत |
| ८३ | २३ | तान | तीन |
| ८५ | ५ | होसगन्नड | होसगन्नड |
| ८६ | ७ | कन्नड | कन्नड |
| ८६ | २९ | मिळाल्याबद्दलचे | मिळाल्याबद्दलचीं |
| ९० | १६ | रत्नत्रय | रत्नत्रय |
| ९३ | ६ | अशे | असें |
| ९३ | २२ | राजघराण्यांची | राजघराण्याचा |
| ९३ | २२ | राजांची | राजांचा |
| ९३ | २२ | मांडलिकांची | मांडलिकांचा |
| ९३ | २२ | मठसंस्थाची | मठसंस्थाचा |
| ९४ | २८ | चक्रुवर्ती | चक्रवर्ती |
| ९५ | ४ | चक्रुवर्ति | चक्रवर्ती |
| ९५ | ६ | चक्रुवर्ती | चक्रवर्ती |
| १०४ | २० | श्रावण | श्रवण |
| १०७ | १४ | कृमीमुळें | कृतीमुळें |
| ११३ | १६ | केलें | केली |

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १२१ | १ | आलांडून | ओलांडून |
| १३५ | २ | तलना | तुलना |
| १४५ | १५ | जामांत | जोमांत |
| १५४ | २३ | साद्दश्यामुळें | सादृश्यामुळें |
| १५७ | २१ | सलेमाननें | सुलेमाननें |
| १६५ | २२ | जनधर्मीय | जैनधर्मीय |
| १८० | ७ | चोळ | चोल |
| १८० | ९ | होइल | होईल |
| २०० | २८ | पर्वजांनीं | पूर्वजांनीं |
| २०३ | १२ | उत्तमतुल्ल | उत्तमहुल्ल |

F
190